टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा ०१


अॅसेट बॅक्ड क्रेडिट
तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर
कर्जाची रक्कम ₹ 1 कोटी* पर्यंत
वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने*
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbank.co.in
Toll Free : 1800 266 3466 / 1800 223 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

To Dr Ashwini R. Mane 16/9/2025



# आनंदी व्हा रे!

**काही दिवसांपूर्वी** जागतिक आनंद क्रमवारी जाहीर झाली. त्यात भारताचा क्रमांक ११८ वा लागला. गेल्या काही वर्षात आपला देश, शंभराच्या पलीकडचा आपला क्रमांक सोडायला तयार नाही. आनंदी देशाची क्रमवारी तयार करण्यासाठी बरीच परिमाणं वापरली जातात. त्यात आपला देश बराच मागे असतो, हे ओघाने आलंच. आता, तुम्हाला हा प्रश्न पडला असेल की, या आनंदी क्रमवारीचा आणि करिअरचा काय बुवा संबंध?

तसा बादरायण संबंध जोडायचा म्हटला की कशाचाहीं कुठेही जोडता येतो. पण, आपल्याकडे करिअरच्या अनुषंगाने अपवाद वगळता फारच गंभीर आणि चिंतेचं वातावरण असतं. करिअर ही आनंददायी बाब असतानाही, त्यासाठी मात्र काळजीची सावली पांघरायला बहुसंख्य पालकांना आवडतं. या सावलीचं सावट मग मुलांवरही पडतं. वर्षानुवर्षे हे असेच सुरू आहे. काळजीही संपत नाही आणि करिअरही घडत नाही. या दुःखाचे काटे कायम सलत राहतात.

## आभासी दौड

पूर्वी किमान दहावीत मुलगा किंवा मुलगी गेल्यावर पालक, पुढच्या शिक्षणाचा आणि त्यानंतर करिअरचा विचार करू लागत. आता तर मुलगा पाचवीत जात नाही तोच, त्याला आयआयटी (इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) मध्ये किंवा मेडिकलला कसा प्रवेश मिळेल किंवा मिळण्यासाठी तो कसा हुशार वगैरे आहे, या विचाराचा घोडा पालकांच्या डोक्यात धावायला लागतो. त्यापाठीमागे मग लेकराला दौडावे लागते. मैदानात धावताना, खेळताना, त्याची दमछाक होणार नाही पण या, आयआयटी ते मेडिकलच्या आभासी दौडीने मात्र बिचाऱ्याची फरफट होते. पण लक्षात कोण घेतो?

## शिकवणी वर्गाचे जोखड

पाचवीतच सर्वोत्तम शिकवणी वर्गाचा शोध सुरू होतो. आजूच्याने आपल्या मुलाला, अमुकतमुक १०० टक्के यश देणाऱ्या कोचिंग क्लासमध्ये टाकले, बाजूच्याने तिथे टाकले अशी माहिती इकडून-तिकडून मिळवली जाते. मग, याने किंवा त्याने मुलाला आताच टाकले आहे, तर आपलाही मुलगा/मुलगी कसा काय मागे राहणार ? त्याला टाकायलाच हवे, या वर्गात. तरच तो स्पर्धेत टिकेल. उत्तम गुण मिळवेल. आयआयटीत आणि तेही मुंबई, दिल्ली, मद्रास, खरगपूर अशाच आयआयटीत जाईल, मेडिकलला जाईल, यावर पालक मंडळीचा जाम विश्वास असतो. या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून ते पाल्यास, सर्वोत्कृष्ट अशा शिकवणी वर्गात टाकतात. भरघोस शुल्क भरण्याचा अभिमान बाळगतात. पुढे घाण्याला बैल जोडल्याप्रमाणे या शिकवणी वर्गातून त्या शिकवणी वर्गात, मुलगा/मुलगी धावत राहते. खेळण्याच्या बागडण्याच्या, मैतर वाढवण्याच्या वयात हा पाल्य आयआयटी, मेडिकल प्रवेश परीक्षेच्या अभ्यासात बालपण आणि कुमारपणही घालवून बसतो. इतक्या आधी शिकवणी वर्गांचा मारा सहन करणारे किती मुले/मुली पुढे खरोखरच त्यांच्या मनाजोगत्या आयआयटी किंवा मनाजोगत्या अभियांत्रिकी शाखेत किंवा मेडिकलला प्रवेश मिळवतात, हा खरंतर सामाजिक संशोधनाचाच विषय ठरतो.

## पाया ठिसूळ

या सगळ्या शिकवण्याच्या माऱ्यात बऱ्याच मुलांचा मूळ अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष होते. खरंतर कोणत्याही शिक्षणमंडळाची पाठ्यपुस्तकं विचारपूर्वक तयार केली जातात. त्यातले विषयघटक तज्ज्ञांनी निवडलेले असतात. तज्ज्ञांनीच ते लिहिले असतात. विद्यार्थ्यांचा पाया प्रत्येक वर्गात, त्याच्या त्याच्या वयाच्या आकलनानुसार पक्का व्हावा, अशाच पद्धतीने अभ्यासक्रमाची रचना केलेली असते. प्रत्येक वर्गातील हा अभ्यासक्रमच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी, त्याच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आणि त्याचे विचारविश्व व्यापक करण्यासाठी उपयुक्त ठरतो. पण नेमके याकडे दुर्लक्ष होते. पाया अर्धाकच्चा किंवा ठिसूळ राहतो. मग पक्की इमारत कशी उभी राहणार? डगमगत्या इमारतीला शिकवणी वर्गरूपी सोन्याचा मुलामा द्या नाही तर हिरे माणके लावा, इमारतीचं डगमगणं कसं थांबणार?

अभ्यासाचा पायाच जर पक्का नसेल तर शिकवणी वर्गातले असंख्य प्रश्नसंच, शेकड्याने होणाऱ्या सराव परीक्षा, आकर्षक वेष्टनातील मोठमोठ्या नोट्स याचा मर्यादितच उपयोग होणार किंवा काहीच उपयोग होणार नाही. १२ वीनंतरच्या विविध ज्ञानशाखातील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षा या मुलांच्या पाठांतर कौशल्याची परीक्षा घेणाऱ्या नसतात. हे पालकांनी ठामपणे लक्षात घ्यायला हवे. मुलांची संकल्पनात्मक बाजू किती भक्कम आणि ठोस आहे, हे जाणून घेण्यासाठी या परीक्षा घेतल्या जातात. जो काही सिलॅबस असेल त्याच्या अलीकडे किंवा पलीकडे विचारलं जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्याच्या वेगवेगळ्या विषय घटकांच्या संकल्पना स्पष्ट नसेल आणि त्याला या संकल्पनांचा वापर प्रश्न सोडवण्यासाठी कसा करावा, याचेच आकलन झाले नसेल तर शिकवणी वर्गात शेकड्यानेच काय हजाराने सराव परीक्षा दिल्या असल्या तरी, प्रत्यक्ष परीक्षेत त्याची विकेट अनेक प्रश्नांची उत्तरं शोधताना किंवा काढताना उडू शकते. तशी ती बहुसंख्य विद्यार्थ्यांची उडतेच. त्याला चांगले गुण मिळत नाही. मग पुढचा सारा प्रवासच कठीण होतो. या सर्व बाबी लक्षात घेऊन पालकांनी मुलांना भरमसाठ शुल्क आकारणाऱ्या शिकवणी वर्गाचा रस्ता दाखवण्याऐवजी, मूळ अभ्यासक्रम कसा व्यवस्थित ग्रहण करेल, मनात आणि मेंदूत झिरपवेल याकडे लक्षं दिले पाहिजे. आजच्या अत्यंत स्पर्धेच्या काळात याचीच अधिक गरज आहे.

## उत्तम करिअरचा राजमार्ग

मूळ अभ्यासाचा पाया पक्का असेल तर, मुलांचा आत्मविश्वासही द्विगुणित होतो. मग अशांना करिअरच्या वाटा आणि दिशाही चांगल्या तऱ्हेने सापडतात किंवा दिसू लागतात. या वाटेवरून जाताना खाचखळगे आले तरी, अशी मुलं न खचता, न डगमगता पुढे जातात आणि यशस्वी करिअर घडवतात. अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखांशिवाय अशा अनेक ज्ञानशाखा किंवा विषय आहेत, ज्यांचा अभ्यास मनापासून आणि आनंदाने केला, त्या विषयाचा अभ्यासाच्या सर्व संकल्पना आत्मसात केल्या, पदवीच्या काळात केवळ ज्ञानार्जनाकडेच लक्ष दिले तर, कोणत्याही क्षेत्रात करिअर घडवता येतं. करिअर घडणं ही काही एका दिवसातली किंवा एका वर्षातली बाब नाही किंवा आयआयटीतला प्रवेश म्हणजे उत्तम करिअरची गॅरंटी, असे काही आता राहिलेले नाही. गेल्या वर्षी मुंबईच्या आयआयटीतील काही विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळवता मिळवता नाकी नऊ आले. मग नको त्या कंपनीत, अत्यल्प असे पॅकेज आणि नावडते काम या विद्यार्थ्यांना स्वीकारावे लागले. त्याची वेगवेगळी कारणं असू शकतील. पण, आयआयटीतला प्रवेश हाच उत्तम करिअर घडवण्याचा राजमार्ग नाही, हे लक्षात ठेवायला हवं. यंदा आयआयएम (इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट) च्या बऱ्याच मुलांनाही मनासारखी नोकरी मिळवण्यासाठी बरेच कष्ट गेले. करिअर घडवण्यासाठी चांगली संस्था निश्चितच हातभार लावते. पण त्याहीपेक्षा विद्यार्थ्यांकडे असणारा आत्मविश्वास, ज्ञानसंपन्नता, संकल्पनातील स्पष्टता, प्रश्न आणि समस्यांचे आकलन करण्याची क्षमता आणि ते सोडण्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी अशा बहुविध घटकांवर उत्तम करिअर घडत असतं.

यंदाच्या 'मार्ग यशाचा' मालिकेत, इंजिनीअरिंग आणि मेडिकलपलीकडे असणाऱ्या विविध ज्ञानशाखांमधील करिअर संधीची माहिती दिली जाईल. विशेषतः कौशल्य विकासाला प्राधान्य देणाऱ्या अभ्यासक्रमांचा यात समावेश असेल. या अभ्यासक्रमांना वाणिज्य, कला, विज्ञान यापैकी कोणत्याही ज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येऊ शकेल. सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या पण आवड आणि गती असणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यास हे अभ्यासक्रम करता येतील. यातील बहुतांश अभ्यासक्रम हे पदवीस्तरीय असतील, काही प्रमुख पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रसंगपरत्वे माहिती दिली जाईल. प्रामुख्याने केंद्र सरकारच्या अख्यत्यारीतील, राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था (इंस्टिट्यूशन ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स), राज्य शासनाच्या संस्था, शासकीय विद्यापीठे यांच्यातील अभ्यासक्रमांचा समावेश केला जाईल. यामध्ये या संस्थांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी असणाऱ्या चाळणी परीक्षेची पद्धत, यापरीक्षेसाठी असणारा अभ्यासक्रम, पदवी अभ्यासक्रमात नेमकं काय शिकाल, प्लेसमेंटच्या संधी, संपर्क संकेतस्थळ आदी बाबींचा समावेश असेल. गेल्या अनेक वर्षांपासून दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या आणि नॅशनल इंस्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये पहिल्या ५० मध्ये येणाऱ्या काही महत्त्वाच्या खासगी संस्थांची प्रसंगपरत्वे माहिती दिली जाईल. वेगवेगळ्या शिष्यवृत्ती आणि उद्योजकतेविषयी माहिती दिली जाईल.

यंदाचा, 'मार्ग यशाचा' ही मालिका २०२५ मध्ये १२ वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेलच, पण यंदा १० वीउत्तीर्ण होणाऱ्या आणि २०२६ मध्ये १२ वीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही होईल. पुढे काय करायचं? याचा रोडमॅप तयार करण्यासाठी या मालिकेतील लेखांचा उपयोग होऊ शकेल.

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)



S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# तणावमुक्त सीईटीसाठी

१९ एप्रिल २०२५ पासून भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र (एमएच-सीईटी-पीसीएम) ही परीक्षा सुरू होत आहे. ही परीक्षा, महाराष्ट्रातील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधनिर्माण शास्त्र, बॅचलर ऑफ प्लॅनिंग, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयातील इंटिग्रेटेड मास्टर ऑफ इंजिनीअरिंगचे पहिले वर्ष, मास्टर ऑफ प्लॅनिंग (इंटिग्रेटेड), फार्म डी (पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतली जाईल. ही परीक्षा २७ एप्रिल २०२५ पर्यंत चालेल. २४ एप्रिल रोजी ही परीक्षा होणार नाही.

ही संगणकाधारित म्हणजेच कॉम्प्युटर बेस्ड परीक्षा आहे. या परीक्षेची पहिली शिफ्ट सकाळी साडेसात वाजता आणि दुसरी शिफ्ट सकाळी साडेबारा वाजता सुरू होईल. विद्यार्थ्यांना पहिल्या शिफ्टसाठी सकाळी ८.४५ वाजेपर्यंत आणि दुसऱ्या शिफ्टसाठी दुपारी १.४५ वाजेपर्यंतच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. त्यानंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. सकाळच्या सत्राचे पहिले लॉग इन, सूचना वाचण्यासाठी सकाळी ८.५० वाजता आणि दुपारच्या पाळीचे पहिले लॉग इन दुपारी १.५० वाजता करता येईल. पहिल्या सत्राचा पेपर सकाळी ९ वाजता आणि दुसऱ्या पाळीचा पेपर २ वाजता सुरू होईल. सकाळची परीक्षा दुपारी १२ वाजता आणि दुपारची परीक्षा संध्याकाळी ५ वाजता संपेल.

## अभ्यासक्रम

सीईटी परीक्षेत, ११ वीच्या अभ्यासक्रमातील नेमके कोणते विषयघटक असतील याची स्पष्टता सीईटी सेलने केली आहे. उजळणी करताना त्यावरच लक्ष केंद्रित करणे योग्य ठरेल. १२ वीच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर सीईटीमध्ये प्रश्न विचारले जात असल्याने, सर्व घटकांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. या परीक्षेतील २० टक्के भाग हा बोर्डाच्या ११ वीच्या आणि ८० टक्के भाग १२ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित राहील.

## परीक्षा पध्दती

१ यापरीक्षेतील भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयाचा पेपर इंग्रजी, मराठी आणि उर्दू या भाषेत राहील. गणिताचा पेपर इंग्रजी भाषेत राहील. विद्यार्थ्यांनी सीईटीचा अर्ज भरताना जी भाषा नमूद केली असेल, त्याच भाषेतील प्रश्नपत्रिका सोडवता येईल. मराठी आणि उर्दू भाषेतील प्रश्नांमध्ये काही समस्या वाटत असल्यास इंग्रजी प्रश्नपत्रिका बघण्याची सूचना सीईटी सेलने केली आहे.

२ ही बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन), पध्दतीची आहे. प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्यायी उत्तरे दिली जातील. यापैकी एक अचूक उत्तर असेल. १८० मिनिटांमध्ये १५० प्रश्न सोडवावे लागतील. नकारात्मक गुणांकन नाही.

३ पेपर एक हा गणितचा असेल. गणिताच्या पेपर मध्ये १० प्रश्न ११ वीच्या अभ्यासक्रमावर आणि ४० प्रश्न १२ वीच्या अभ्यासक्रमावर राहतील. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तरासाठी प्रत्येकी २ गुण दिले जातील. कालावधी- ९० मिनिटे.

४ पेपर दोनमध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचे प्रश्न विचारले जातील. या प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी ५० प्रश्न विचारले जातील. भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रच्या पेपरमध्ये प्रत्येकी १० प्रश्न ११ वीच्या अभ्यासक्रमावर आणि ४० प्रश्न १२ वीच्या अभ्यासक्रमावर राहतील. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तरासाठी प्रत्येकी १ गुण दिले जातील. कालावधी- ९० मिनिटे.

५ संगणकाच्या पडद्यावर एकावेळी एकच प्रश्न दिसेल. त्यामुळे एखादा प्रश्न सोडवण्यासाठी फार वेळ घालवू नये, अशी सूचना सीईटी सेलने केली आहे. या परीक्षेत प्रारंभी रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र गटातील प्रश्न संगणकाच्या पडद्यावर येतील. ९० मिनिटाचा कालावधी संपल्यावर, या गटाचा पेपर ऑटो (आपोआप) सबमिट किंवा सादर होताच गणिताचे प्रश्न दिसू लागतील. याचा कालावधी ९० मिनिटांचा असेल.



६ परीक्षागृहात प्रवेश करण्यासाठीच्या अंतिम निर्धारित वेळेनंतर कोणत्याही विद्यार्थ्याला, प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्र ते निवासस्थान, हे अंतर लक्षात घेऊन आणि वाहतुकीतील संभाव्य अडथळे लक्षात घेऊन पुरेशा वेळेआधीच परीक्षा केंद्रांवर पोहचणे सोईचे ठरेल. त्यामुळे अनावश्यक धावपळ करण्याची गरज भासणार नाही व निष्कारण तणावही येणार नाही. कोणत्याही विद्यार्थ्याला कोणत्याही स्थितीत परीक्षेचा वेळ संपल्याशिवाय परीक्षा केंद्राच्या बाहेर सोडले जाणार नाही. परीक्षा संपल्यावर विद्यार्थ्याने परीक्षा केंद्र सोडल्यानंतर, त्याला पुन्हा परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

७ या परीक्षेचा निकाल पर्सेंटाइल पध्दतीने जाहीर केला जाईल. पीसीबी आणि पीसीएम या दोन्ही गटाचे पेपर दिलेल्या विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयातील पर्सेंटाइल, हे दोन्ही गटांमध्ये अदलाबदल (इंटरचेंज) केले जाणार नाहीत. पर्सेंटाइल पध्दती ही, गुणांच्या पर्सेंटेजपेक्षा वेगळी आहे. सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्सेंटाइल पध्दती स्वीकारल्याचे समजले जाईल, अशी स्पष्टोक्ती सीईटी सेलने केली आहे.

८ मोबाइल, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक/डिजिटल उपकरण परीक्षागृहात नेता येणार नाही. विद्यार्थ्यांनी याची काळजी घेणे गरजेचे आहे.

९ कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य किंवा गैरव्यवहार करताना विद्यार्थी आढळल्यास त्याच्यावर कारवाई केली जाईल, सीईटी परीक्षा आणि प्रवेश प्रक्रियेपासून त्याला बाद केले जाईल. सीईटीचा अर्ज भरताना चुकीची किंवा अर्धवट माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास परीक्षा आणि पुढे प्रवेश प्रकियेपासून संबंधित विद्यार्थ्याला बाद केले जाते.

१० लेखनिकाची सुविधा घेणाऱ्या दिव्यांग उमेदवारांना, प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनिटांचा कालावधी दिला जाईल. ही सुविधा घेऊ इच्छिणाऱ्या दिव्यांग उमेदवारांना परीक्षा केंद्रावर दिव्यांगाचे अधिकृत प्रमाणपत्र (किमान ४० टक्के अंपगत्व) आणि लेखनिकासाठीचा अर्ज सादर करावा लागेल. हा लेखनिक/स्क्राइब संबंधिताना स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्यावा लागेल. सीईटीचा अर्ज भरतानाच दिव्यांगाना अशी सुविधा घेण्याविषयी नमूद करणे गरजेचे आहे.

११ या परीक्षेसंदर्भातील कायदेशीर बाबी या मुंबई उच्च न्यायालयाच्या क्षेत्रात विचारात घेतल्या जातील.

## व्हेन्यू ऑफिसर

परीक्षा केंद्रावर वेगवेगळ्या समस्यांना विद्यार्थ्यांना ऐनवेळी तोंड द्यावे लागू शकते. उदा-प्रशासकीय चुकीमुळे परीक्षेचा कालावधी कमी होणे किंवा परीक्षेसंदर्भातील इतर महत्वाच्या बाबी इत्यादी) या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर, सीईटी सेलमार्फत एक, व्हेन्यू ऑफिसर नेमला जाईल. हा अधिकारी परीक्षेच्या दिवशी सकाळी साडेसात वाजेपासून परीक्षा संपेपर्यंत असेल. कोणतीही समस्या निर्माण झाली किंवा अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी तत्काळ परीक्षागृहातील पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आणणे अपेक्षित आहे. त्यानंतर पर्यवेक्षकामार्फत ही तक्रार व्हेन्यू ऑफिसरपर्यंत पोहचवली जाईल. ते याची तत्काळ दखल घेऊन, समस्या किंवा अडचणीचे निराकरण करतील. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांविषयी काही शंका असल्यास तत्काळ www. mahacet. org या संकेतस्थळावर संपर्क करुन तक्रार नोंदवण्याची सूचना सीईटी सेलने केली आहे. त्यासाठी त्याला माहिती पुस्तिकेतील सूचनेप्रमाणे लॉग-इन करावे लागेल. या परीक्षेचा सराव करण्यासाठी सीइटी सेलने, https:// cetcell. mahacet. org/ या संकेतस्थळावर मॉक टेस्ट उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे सीईटीच्या प्रश्नांच्या काठीण्यपातळीची कल्पना येऊ शकते.

## जय्यत तयारी

सीईटी सेल मार्फत ही परीक्षा घेण्यासाठी सर्व जय्यत तयार केली जाते. परीक्षेल्या बसलेल्या विद्यार्थ्यांनी, सीइटी सेलने दिलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन केल्यास, कुणालाही कोणतीही अडचण जाणार नाही. आता केवळ परीक्षेसाठी एकच दिवस असल्याने विद्यार्थ्यांनी कोणताही तणाव घेण्याची गरज नाही. जो काही आतापर्यंत अभ्यास केला असेल, तोच उपयुक्त ठरेल. ऐनवेळस नवे काहीतरी करु नये, किंवा हे राहिले, ते राहिले, असे वाटून घेऊ नये. महत्वाच्या संकल्पनांची उजळणी करावी. आता शेवटच्या क्षणी उगाच जागरण करण्यातही हशील नाही. शेवटच्या दिवशी चांगले भोजन, उत्तम झोप आवश्यक आहे. त्यामुळे प्रसन्नता कायम राहील. या प्रसन्नमुद्रेने परीक्षा केंद्रावर वेळत पोहचून, आत्मविश्वासाने पेपर सोडवा. अधिकाधिक उत्तरे अचूक येतील हे बघा. परीक्षा सभागृहात संपूर्ण लक्ष केवळ पेपरवरच केंद्रित करा. इतर बाह्य गोष्टींचा अजिबात विचार करु नका. या सर्व बाबींचे पालन केल्यास तुम्हाला नक्कीच चांगले यश मिळेल. सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा.

संपर्क- राज्य सामाईक कक्ष, आठवा माळा, न्यू एक्सलेसिअर बिल्डिंग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट मुंबई- ४००००१, टोल फ्री क्रमांक- १८००२०९०१९१, हेल्पलाइन- ०७९६९१३४४०२, संकेतस्थळ- https:// cetcell. mahacet

सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



आता हाऊसिंग लोन
₹3.00 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध



S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM-413507

# कॉर्पोरेटचे लीगल मॅनेजर्स !

**इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (रोहतक)ने बॅचलर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट– एलएलबी (बीबीए– एलएलबी) हा उत्तम करिअर घडवणारा अभ्यासक्रम सुरू केला आहे . कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम करता येतो . या अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षांचा आहे . यंदा या अभ्यासक्रमाची पाचवी बॅच, २०२५ ते २०३० या कालावधीसाठी निवडली जाईल .**



**बीबीए- एलएलबी** या अभ्यासक्रमाला दोन पद्धतीने प्रवेश दिला जातो. (१) कॉमन लॉ ॲडमिशन टेस्ट (सीएलएटी- क्लॅट २०२५) किंवा (२) आयआयएम ॲप्टिट्यूड टेस्ट (आयआयएम- एटी २०२५. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची तारीख निघून गेली आहे.) यापैकी क्लॅट परीक्षा देणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना, या अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावयाचा असल्यास, त्यांनी १९ एप्रिल २०२५ पर्यंत, संस्थेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. क्लॅट २०२५ मधील गुणांसह ऑनलाइन अर्ज करावा लागेल. पात्र विद्यार्थ्यांना जून २०२५ मध्ये मुलाखतीसाठी पाचारण केलं जाईल. मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांची (१) शैक्षणिक कामगिरी, (२) संवादकौशल्य (कम्युनिकेशन स्किल्स), (३) सर्वसाधारण घडामोडीं (करंट अफेअर्स) चं ज्ञान यावर भर दिला जातो. क्लॅट मधील गुणांना ५५ टक्के वेटेज, मुलाखतीला १५ टक्के वेटेज, दहावीतील गुणांना १० टक्के वेटेज आणि १२ वीतील गुणांना १५ टक्के वेटेज दिलं जातं. अर्हता - या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या संवर्गातील विद्यार्थ्याला दहावी आणि बारावीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग संवर्गासाठी ही मर्यादा ५५ टक्के आहे. संबंधित सर्व संवर्गातील विद्यार्थ्यांचं, ३० जून २०२५ रोजी कमाल वय २० वर्षे असावे.

आयआयएममध्ये व्यवसाय व्यवस्थापन शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा, हा इतर संस्थांपेक्षा अधिक उच्च श्रेणीचा असतो. या अभ्यासक्रमामध्ये, जागतिक दर्जाचे व्यवस्थापक निर्माण व्हावेत, अशी संरचना केली असते. त्यामुळेच आयआयएमधून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी देशविदेशातील कॉर्पोरेट, व्यवसाय, मोठे उद्योग, इंश्युरंस, बँकिंग, वित्तीय संस्था आणि स्टार्टअप यामध्ये अग्रक्रमाने नोकरीला लागतात. आयआयएममध्ये मिळालेल्या वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानाच्या बळावर वेगानं उच्च पदांवर पोहचतात. आयआयएम रोहतकने, हे वैशिष्ट्यूपर्ण व्यवस्थापकीय ज्ञान आणि विधि व सुशासन (गव्हर्नन्स) विषयक ज्ञानाचं एकत्रीकरण करुन विधि क्षेत्रासाठी आवश्यक ठरु पाहणाऱ्या, विधि-व्यवस्थापकांची (लिगल मॅनेजर्स) गरज भागविण्यासाठी, बीबीए-एलएलबी हा अभ्यासक्रम २०२१ साली सुरू केला.

काय शिकाल? अभ्यासक्रमाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या इंटर्नशीपची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. या अभ्यासक्रमाव्दारे विद्यार्थ्यांना, कम्पॅरिटिव्ह लॉ, इंटरनॅशल लॉ, डोमेस्टिक लॉ, फॉरेन लॉ अशा विविधांगी घटकांचा अभ्यास करण्याची संधी मिळते. त्याच बरोबर, व्यवसाय व्यवस्थापन, मानव्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी, सार्वजनिक धोरण (पब्लिक पॉलिसी), परकीय भाषा (फॉरेन लँग्वेज) या विषय घटकांचाही अभ्यास करता येतो. संपर्क - आयआयएम, मॅनेजमेंट सिटी, सदर्न बायपास रोड, एनएच १० सुनारिआ, रोहतक- १२४०१०, रोहतक, दूरध्वनी- ०१२६२-२२८६१३, संकेतस्थळ- iimrohtak. ac. in, ईमेल- ipladmission@ iimrohtak. ac. in इतर संस्था

(१) नॅशनल ॲकॅडेमी ऑफ लीगल स्टडीज ॲण्ड रिसर्च (नाल्सार) नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लॉ हैदराबाद - या संस्थेच्या स्कूल ऑफ मॅनेजमेंटने बीबीए- एमबीए (इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेट) हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांनी १२ वी परीक्षेत ५० टक्के गुण मिळवायला हवेत. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संस्थेमार्फत घेण्यात येणारी चाळणी परीक्षा (नालसार मॅनेजमेंट एंट्रन्स टेस्ट- अंडर ग्रॅज्युएट) अथवा इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंदौर मार्फत घेण्यात येणाऱ्या आयपीएमएटी (इंटिग्रेटेड प्रोग्रॅम मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट) चाळणी परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. एकूण ६६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. यापैकी ३० टक्के जागा महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येतात. गुणवत्ता यादी तयार करताना ७५ टक्के वेटेज चाळणी परीक्षेतील कामगिरीला आणि २५ टक्के वेटेज मुलाखतीतील कामगिरीस दिले जाते. नाल्सार मॅनेजमेंट एन्ट्रन्स टेस्टला अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे. ही परीक्षा १०० गुणांची आहे. संख्यात्मक कल चाचणी (क्वांटिटेटिव्ह ॲप्टिटयूड) या विषय घटकावर ५० प्रश्न आणि तार्किक विश्लेषण आणि भाषा कौशल्य (रिझनिंग आणि व्हर्बल ॲबिलिटी) या विषय घटकावर ५० प्रश्न विचारले जातील. दोन्ही विभागाचा कालावधी - प्रत्येकी साठ मिनिटे. https:// apply. nalsar. ac. in/ ipm- application- form या संकेतस्थळाच्या माध्यमातून अर्ज करता येतो. काय शिकाल? या अभ्यासक्रमात पुढील काही विषयांचा अभ्यास करण्याची सुविधा आहे- (१) ऑपरेशन ॲण्ड सिस्टिम, (२) मार्केटिंग, (३) इनोव्हेशन ॲण्ड सस्टेनिबिलिटी मॅनेजमेंट, (४) ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, (५) फायनांस (६) कोर्ट मॅनेजमेंट, (७) बिझिनेस रेग्युलेशन्स, (८) कॉर्पोरेट गर्व्हनन्स, (९) बिझिनेस ॲनॅलिटिक्स तिसऱ्या आणि चौथ्या वर्षाचा अभ्यासक्रम संपल्यावर कॉर्पोरेटमध्ये इंटर्नशीपची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. संपर्क - https:// doms. nalsar. ac. in/ ईमेल- ipmadmissions@ nalsar. ac. in (२) महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी छत्रपती संभाजीनगर- या संस्थेच्या, स्कूल ऑफ मॅनेजमेंटने, व्यवस्थापन व विधि शिक्षणाचे सांगड घालणारे पुढील अभ्यासक्रम सुरु केले आहेत. (१) बीबीए- एलएलबी, या अभ्यासक्रमाचा कालावधी- पाच वर्षे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी क्लॅट परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. एकूण ६० उमेदवारांना प्रवेश दिला जातो. यापैकी ३७ जागा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत. ३० टक्के जागा महिलांसाठी व ५ टक्के जागा दिव्यांग आणि १ टक्के जागा अनाथ संवर्गासाठी राखीव आहेत. इतर १७ जागा या अखिल भारतीय स्तरावरील आहेत.

(२) इंटिग्रेटेड बीबीए-एमबीए इन लॉ ॲण्ड मॅनेजमेंट, कालावधी- पाच वर्षे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी क्लॅट परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्यात येतात. काय शिकाल? या अभ्यासक्रमात पुढील विषयघटकांचा समावेश करण्यात आला आहे- (१) बिझिनेस एन्व्हॉयर्नमेंट, (२) ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, (३) बिझनेस कम्युनिकेशन,(४) कॉन्स्टिट्यूशनल लॉ, (५) कॉर्पोरेट फायनांस, (६) मार्केटिंग मॅनेजमेंट, (७) फायनान्शिअल सर्व्हिसेस मार्केट्स ॲण्ड इन्स्टिट्यूशन्स, (८) ऑपरेशन ॲण्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट, (९) बिझनेस इकॉनॉमिक्स ॲण्ड मॅथेमॅटिक्स, (१०) कॅपिटल मार्केट्स ॲण्ड सेक्युरिटिज लॉ, (११) क्रिमीनल लॉ, (१२) लेबर लॉ, (१३) एन्व्हॉयर्नमेंट लॉ, (१४) फायनान्शिअल अकाउंटिंग, (१५) कॉर्पोरेट गव्हर्नन्स, एथिक्स ॲण्ड रिलेटेड लॉज, (१६) इकॉनॉमिक ॲण्ड सायबर लॉज, (१७) इनडायरेक्ट टॅक्स लॉज, (१८) सिव्हिल प्रोसिजर कोड, (१९) क्रिमीनल प्रोसिजर कोड, (२०) ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ. संपर्क- महाराष्ट्र लॉ युनिव्हर्सिटी, पैठण रोड कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर-४३१००५, ईमेल- support@mnlua. ac. in संकेतस्थळ https:// mnlua. ac. in/ contact (४) महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर -

या संस्थेचे अभ्यासक्रम- (१) बीए-एलएलबी (एकूण जागा- १२०, या सर्व जागा महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत.), (२) बीबीए (ऑनर्स) -एलएलबी (एकूण जागा- ६०, या सर्व जागा महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत.), (३) बीबीए (ऑनर्स) इन ॲडज्युडिकेशन ॲण्ड जस्टिसिंग)- एलएलबी (एकूण जागा- ६०, या सर्व जागा महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत.) सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, क्लॅट (अंडरग्रॅज्युएट) परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. संपर्क- वारंगा बुटीबोरी, नागपूर- ४४११०८, संकेतस्थळ- https:// www. nlunagpur. ac. in, ईमेल- admission@nlunagpu. ac. in , दूरध्वनी-०७१२-२८१२६०५ (४) नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ओडिसा- येथे बीबीए - एलएलबी अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमामध्ये वित्तीय व्यवस्थापन, विपणन, मनुष्यबळ व्यवस्थापन, वित्तीय बाजार आणि संस्था, नैतिक उद्योजकता आणि नेतृत्व गुण, व्यवस्थापनाची तत्वे आणि कार्य, कॉर्पोरेट लेखा, संस्थात्मक वर्तणूक, अधिग्रहण, कॉर्पोरेट पुनर्रचना, वित्तीय अहवाल आणि विश्लेषण, व्यवस्थापकीय मानसशास्त्र आदी विषय घटकांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षे. कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम करता येतो. प्रवेशासाठी क्लॅट परिक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. संपर्क- https:// nluo. ac. in (५) नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी जोधपूर- येथे बीबीए-एलएलबी पाच वर्षे कालवधीचा अभ्यासक्रम करता येतो.प्रवेशासाठी क्लॅट परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. **संपर्क-** https:// nlujodhpur. ac. in

**सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड, मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)



S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# बीबीएची दिशा



**कला, वाणिज्य** आणि विज्ञान या ज्ञानशाखांपैकी कोणत्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण झालेल्या किंवा यंदा १२ वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना, बॅचलर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन (बीबीए), बॅचलर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (बीबीएम), बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस), बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (बीसीए), इंटिग्रेटेड एमबीए आणि इंटिग्रेट एमसीए या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा २७ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे.

या परीक्षेचा कालावधी ९० मिनिटांचा आहे. तथापि प्रवेश केंद्रातील प्रवेशापासून ते परीक्षा संपेपर्यंतच्या वेगवेगळ्या बाबींसाठी हा कालावधी १८० मिनिटांचा राहू शकतो, ही बाब सीईटी सेलने स्पष्ट केली आहे.

## परीक्षा पद्धती

या परीक्षेत बहुपर्यायी वस्तुनिष्ठ पद्धतीचे १०० प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिले जातील. यामधून अचूक उत्तर शोधावे लागेल. प्रत्येक अचूक उत्तरास एक गुण दिला जाईल. नकारात्मक गुणांकन नाहीत. ही परीक्षा संगणकाधारित म्हणजेच ऑनलाइन आहे.

या परीक्षेत पुढील विषयघटकांवर प्रश्न विचारले जातील- (१) इंग्रजी- एकूण प्रश्न ३०, एकूण गुण- ३०, (२) सामान्य ज्ञान आणि जाणीव- (जनरल नॉलेज अॅण्ड अवेअरनेस) - एकूण प्रश्न १५, एकूण गुण- १५, (३) संगणकाचे मूलभूत ज्ञान (कॉम्प्युटर बेसिक्स) - एकूण प्रश्न १५, एकूण गुण- १५, (४) तार्किकता- शाब्दिक आणि गणितीय (रिझनिंग व्हर्बल अॅण्ड अर्थमॅटिक)- एकूण प्रश्न ४५, एकूण गुण- ४५. प्रश्न इंग्रजीतच विचारले जातील.

हा अभ्यासक्रम सर्वसाधारण स्वरूपाचा असून विद्यार्थ्यांची सर्वसामान्य आकलन क्षमता, सामान्यज्ञान, मूलभूत गणित अशासारख्या बाबींचे ज्ञान तपासण्यासाठी प्रश्न विचारले जाऊ शकतात. सीईटी सेलने या परीक्षेसाठी काही नमुना प्रश्न दिले आहेत, त्यावरून याची कल्पना येऊ शकते. उदा- प्रसिद्ध खजुराहो मंदिर कुठे आहे? किंवा कोणते शहर गुलाबी शहर म्हणून ओळखले जाते? तार्किकता, इंग्रजी या विषयघटकांचेही असेच नमुना प्रश्न देण्यात आले आहेत. या सर्व अभ्यासक्रमाच्या, महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांमध्ये असलेल्या शिक्षण संस्था किंवा महाविद्यालयांमध्ये साधारणतः १ लाखाच्या आसपास जागा उपलब्ध आहेत. मात्र यंदा ७७ हजाराच्या आसपास विद्यार्थ्यांनी या सीईटी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. उपलब्ध जागांपेक्षा उमेदवारांची संख्या कमी असल्याने सर्वच उमेदवारांना प्रवेश मिळेल, हे जरी खरी असले तरी, चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यास, दर्जेदार आणि मनासारख्या शिक्षण संस्थेमध्ये प्राधान्याने प्रवेश मिळू शकतो. त्यादृष्टीने आता उर्वरित दिवसांमध्ये विषयघटकांची उजळणी करावी. संकल्पनात्मक बाजू आणखी पक्क्या कराव्यात.

## करिअर संधी

(१) इव्हेंट मॅनेजमेंट
(२) फॅसिलिटीज मॅनेजमेंट
(३) हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट
(४) रिटेल मॅनेजमेंट
(५) अॅडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजमेंट
(६) सेल्स अॅण्ड मार्केटिंग
(७) बँकिंग अॅण्ड फायनान्स
(८) ट्रॅव्हल अॅण्ड टुरिझम
(९) कस्टमर रिलेशनशीप अॅण्ड केअर

## काय शिकाल?

या अभ्यासक्रमात पुढील विषयघटकांचा समावेश आहे-(१) आंत्रप्रिनरशिप डेव्हलमपेंट अॅण्ड प्रोजेक्ट मॅनेजमेंट, (२) ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, (३) अॅडव्हान्स्ड हॉस्पिटॅलिटी अॅण्ड फॅसिलिटीज ऑपरेशन्स, (४) मॅक्रो आणि मायक्रो इकॉनॉमिक्स, (५) रिटेल मॅनेजमेंट, (६) टुरिझम मॅनेजमेंट, (७) फायनान्शिअल मॅनेजमेंट, (८) मार्केटिंग मॅनेजमेंट, (९) डिझास्टर मॅनेजमेंट, (१०) सप्लायचेन मॅनेजमेंट, (११) हॉस्पिटॅलिटी अॅण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट, (१२) अॅनॅलिटिक्स अॅण्ड डाटा प्रोटेक्शन, (१३) ऑर्गनायझेशनल बिहेव्हिअर, (१४) बिझनेस स्टॅटिस्टिक्स, (१५) अॅडव्हान्स्ड हॉस्पिटॅलिटी स्किल्स, (१६) बिझनेस इथिक्स, (१७) बिझनेस लॉ, (१८) एनव्हीरॉन्मेंटल सायन्स, (१९) इंग्लिश फॉर बिझनेस कम्युनिकेशन, (२०) ईकॉमर्स, (२१) फॅसिलिटीज ऑपरेशन स्किल्स, (२२) बिझनेस मॅथेमॅटिक्स, (२३) इव्हॉल्यूशन ऑफ इंडियन सर्व्हिस इंडस्ट्री, (२४) बेसिक्स ऑफ हॉस्पिटॅलिटी स्किल्स, (२५) फंडामेंटल्स ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, (२७) इंटरनॅशनल रिटेल मॅनेजमेंट, (२८) इंटरनॅशनल टुरिझम मॅनेजमेंट, (२९) इंटरनॅशनल फायनान्शिअल मॅनेजमेंट, (३०) इंटरनॅशनल मार्केटिंग मॅनेजमेंट, इत्यादी.

## काही संस्था

गेल्यावर्षी, या परीक्षेच्या आधारे सामाईक प्रवेश (कॉमन अॅडमिशन प्रोसेस- कॅप) प्रकियेत सामील झालेल्या काही संस्था व महाविद्यालये नमुन्यादाखल पुढे दिली आहे-

- **मुंबई** : (१) अखिलेश दिनेश मोदी इन्स्टिट्यूट ऑफ फायनांस अॅण्ड मॅनेजमेंट, बीएएमस-एमएमस इंटिग्रेटेड आणि बीएमएस, (२) स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई विद्यापीठ उपकेंद्र ठाणे- बीएमएस- एमएमएस इंटिग्रेटेड आणि बीएमएस, (३) ठाकूर कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी- बीबीए, (४) आदित्य इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अॅण्ड रिसर्च- बीएमएस, (५) भारतीय विद्याभवनचे- एमएम कॉलेज ऑफ आर्ट्स, एनएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एचआरजे कॉलेज ऑफ कॉमर्स-बीएमएस, (६) आर ए पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स- बीबीए आणि बीएमएस, (७) मिठीबाई कॉलेज ऑफ आर्ट्स- बीएमएस, (८) नरसी मोन्जी कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स- बीएमएस, (९) एसआयईएस कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स - बीएमएस, (१०) गुरू नानक खालसा कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स - बीएमएस, (११) जयहिंद कॉलेज- बीबीए आणि बीएमएस, (१२) रामनारायण झुनझुनवाला कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स - बीएमएस आणि बीबीए, (१३) उषा प्रवीण गांधी कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स -बीएमएस, (१४) डी. जी. रुपारेल कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स - बीएमएस, (१५) विद्यालंकार स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी- बीएमएस, (१६) विवेकानंद एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स - बीबीए आणि बीएमएस, (१७) सस्मिरा ऑफ इन्स्टिट्यूट आर्ट्स अॅण्ड कॉमर्स - बीएमएस, (१८) वझे कॉलेज ऑफ आर्ट्स, सायंस अॅण्ड कॉमर्स -बीएमएस आणि बीबीए, (१९) जानकीदेवी बजाज इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज- बीबीए (एसएनडीटी विद्यापीठ)
- **पुणे** : (१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्र नासिक- बीबीए, (२) डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट युनिव्हर्सिटी ऑफ पुणे बीबीए इन हॉस्पिटॅलिटी अॅण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट, (३) विद्या प्रतिष्ठान इंस्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बारामती- बीबीए, (४) एमआयटी कॉलेज ऑफ आर्ट्स, सायंस अॅण्ड कॉमर्स इ बीबीए, बीबीए (कॉम्प्युटर अॅप्लिकेशन), बीबीए (इंटरनॅशनल बिझिनेस), (५) सर परशुराम भाऊ कॉलेज इ बीबीए आणि बीबीए- इंटरनॅशनल बिझिनेस, (६) सेंट मिरा कॉलेज फॉर गर्ल्स इ बीबीए आणि बीबीए- कॉम्प्युटर अॅप्लिकेशन
- **इतर** : (१) लेडी अमृताबाई डागा लेडीज कॉलेज ऑफ आर्ट्स, सायंस अॅण्ड कॉमर्स नागपूर -बीबीए, (२) हिस्लॉप कॉलेज, नागपूर- बीबीए, (३) शिवाजी सायन्स कॉलेज अमरावती-बीबीए, (४) डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स अॅण्ड मॅनेजमेंट, कोल्हापूर विद्यापीठ- कोल्हापूर- बीबीए- एमबीए इंटिग्रेटेड, (५) कर्मवीर भाऊराव पाटील इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च सातारा- बीबीए, (५) जीएस रायसोनी कॉलेज इंजिनीअरिंग अॅण्ड मॅनेजमेंट जळगाव- बीबीए

अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाने बीबीए, बीएमएस, या अभ्यासक्रमांना व्यावसायिक (प्रोफेशनल) अभ्यासक्रमाचा दर्जा दिल्याने, याचे प्रवेश सीईटीमार्फत घेण्यात येत आहेत. या परीक्षेत उत्तम गुण मिळवून चांगल्या संस्थेत प्रवेश मिळाल्यास, इंटर्नशीप, प्लेसमेंटसारख्या संधी मिळू शकतात. बरीच महाविद्यालये आता स्वायत्त झाली आहेत. उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन आणि त्यांच्या सल्ल्यानेही काही संस्था अभ्यासक्रमातील विषय घटक ठरवताहेत. त्यामुळे अशा संस्थांमधील प्रवेश हा पुढील करिअरच्या अनुषंगाने उपयुक्त ठरू शकतो.

## हॉस्पिटॅलिटी अॅण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट

डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट युनिव्हर्सिटी ऑफ पुणे (पुम्बा) ही संस्था व्यवस्थापनविषयक शिक्षण-प्रशिक्षण देणारी महाराष्ट्रातील महत्त्वाची आणि प्रतिष्ठित संस्था आहे. व्यवस्थापनशाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या देशातील पहिल्या काही संस्थांमध्ये पुम्बाचा समावेश होतो.

या संस्थेने, बीबीए इन हॉस्पिटॅलिटी अॅण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट, हा अभ्यासक्रम २०१८ साली सुरू केला. कला, वाणिज्य, विज्ञान किंवा व्होकेशनल या शांखापैकी कोणत्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरतो. १२ वीमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्याला ४५ टक्के आणि राखीव संवर्गातील विद्यार्थ्याला ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. संपर्क- https:// pumba. in

सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा



तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466
टीजे बँक
Bharose ka b

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# 'नीट' ध्यानात घ्या



**जानेवारी २०२५** मध्ये पार पडलेल्या जॉइंट एंट्रन्स एक्झामिनेशन (जेईई)- मेन, या परीक्षेला देशभरातून १३ लाख ११ हजार विद्यार्थी बसले होते. एप्रिल महिन्यात होणाऱ्या दुसऱ्या सत्रात यामध्ये दोन ते तीन लाखांची भर पडेल. यापैकी साधारणतः अडीच लाख विद्यार्थी जेईई ॲडव्हान्सड परीक्षा देण्यासाठी पात्र ठरतील. या परीक्षेतील गुणांवर २३ आयआयटीमध्ये प्रवेश दिला जातो. अडीच लाखांपैकी १७ हजारांच्या आसपास मुले आयआयटीसाठी निवडली जातील. यापैकी ५० टक्के म्हणजे साडेआठ हजाराच्या आसपास खुल्या संवर्गासाठी जागा असतील. उर्वरित ५० टक्के जागा वेगवेगळ्या संवर्गातील (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नॉन क्रिमीलेअर ओबीसी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट- ईडब्ल्यूएस, दिव्यांग) यांच्यासाठी राखीव असतील. जेईई-मेनमधील गुणांवर आधारित, ३१ नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी) मधील २४ हजारच्या आसपास विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. इंडियन इंस्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) मधील साडेसहा हजार जागांवर प्रवेश मिळेल आणि केंद्रीय साहाय्यता मिळणाऱ्या ४० तंत्रज्ञान संस्थांमध्ये, ६ हजाराच्या आसपास विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळेल.

## ५५ हजार ८०० जागा

नॅशनल इलिजिबिलिट कम एन्ट्रन्स टेस्ट म्हणजेच 'नीट' मार्फत देशातील ३८६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील ५५ हजार ८०० जागा भरल्या जातात. जवळपास एवढ्याच जागा खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये भरल्या जातात. या साधारणतः एक लाख जागांसाठी २५ लाखांच्या आसपास विद्यार्थी 'नीट'ची परीक्षा देतात.

या दोन महत्त्वाच्या परीक्षांना बसणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या आणि प्रत्यक्षात उपलब्ध असणाऱ्या जागा यातील तफावत महाप्रचंड आहे. शिवाय ही आकडेवारी धडकी भरवणारीसुद्धा आहे. आयआयटी किंवा एनआयटी किंवा आयआयआयटी या अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान संस्थांमध्ये आणि वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी दिवसरात्र एक करू पाहणाऱ्या पालक आणि विद्यार्थ्यांसाठी डोळे उघडवणारीसुद्धा आहे.

प्रत्येक पालक आणि त्याच्या पाल्यास या महत्त्वाच्या संस्थांमध्ये प्रवेशाचं स्वप्न बघण्याचा अधिकार आहेच. पण स्वप्नं अशीच बघा की, जी साकार होऊ शकतात, असं माजी राष्ट्रपती एपिजे अब्दूल कलाम म्हणत. याचा भावार्थ समजून घेतला पाहिजे.

जेईई आणि नीट या दोन्ही परीक्षांसाठी, 'महा' आणि 'अती'च्या पलीकडे स्पर्धा असते, ही बाब उपरोक्त आकडेवारीवरून स्पष्ट होते. मेडिकल किंवा आयआयटीचा रोडमॅप तयार करण्याआधी प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याची बौद्धिक कुवत नेमकी किती, याचा १०० टक्के प्रामाणिकपणे विचार करायला हवा, असे ही आकडेवारीच स्पष्ट करते. प्रयत्नांती परमेश्वर म्हणून किंवा मग प्रयत्नच करायचे नाहीत का? असा सूर आवळून काही उपयोग नाही.

## झेपण्याची क्षमता

जेईई आणि नीट या दोन्ही परीक्षांची काठिण्यपातळी मुलांना खरोखरच झेपू शकते का, याचा विचार आधी पालकांनीच करायला हवा. आजूबाजूचे, परिचयातले, नातेवाईकांचे मित्रांचे मुलंमुली नीट किंवा जेईई देतात म्हणून आपणही त्याच वाटेने जायला हवे नाही, अन्यथा मागे पडू असे बऱ्याच पालकांना वाटते आणि मुलांच्या आधी तेच नीट किंवा जेईई परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचं स्वप्न बघू लागतात. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाची बौद्धिक कुवत नेमकी काय, हे पाचवीपासूनच कळू लागते. दहावीपर्यंत सारेच चित्र स्पष्ट होते. 'नीट' परीक्षेत भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्रावर आधारित प्रश्न असतात, तर जेईईमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयांवर प्रश्न विचारले जातात. या चारही विषयांमध्ये मुलांना किती गती आणि आवड आहे, याचा शोध पालकांनी सातवी-आठवीपासूनच घ्यायला हवा.

## गुणपत्रिकेचा आरसा

खरेतर मुलाची गुणपत्रिका हा आरसाच असतो. दहावीतील गुणपत्रिका तर मुलाच्या बौद्धिक आणि आकलन क्षमतेवर आणखीच बऱ्यापैकी प्रकाश टाकते. या चारही विषयांमध्ये फार उंच झेप मुलाला घेता येत नाही, हे दिसत असूनही जर पालक, 'नीट' किंवा 'जेईई' परीक्षेसाठी आग्रह धरत असतील तर मुलाचा कपाळमोक्ष होण्याची अधिक शक्यता असते.

या चारही विषयांचा पाया भक्कम नसल्यामुळेच दहावीपर्यंत मुलाला याविषयांमध्ये फार चमक दाखवता येत नाही, हे समजून घ्यायला हवे. या चारही विषयात किमान ८० ते ८५ टक्क्केच्या आसपास गुण असेल आणि त्यात सातत्य टिकवले असल्याचे दिसत असल्यास, प्रयत्नांती परमेश्वर, नक्कीच प्रसन्न होण्याची दाट शक्यता असते. मात्र यापेक्षा फार कमी गुण सातत्याने मिळत असल्यास, संकल्पनात्मकदृष्ट्या मुलगा बराच मागे असल्याचं लक्षात घ्यायला हवं. आतापर्यंत तो अभ्यासच करत नव्हता, किंवा इतरच गोष्टीत रस घ्यायचा, किंवा परीक्षेच्या काळात आजारीच पडायचा, असे किंवा अशाच प्रकारची विविध कारणं सांगण्याकडे बऱ्याच पालकांचा कल असतो. ''तो हुशार आहे हो, पण अभ्यास करत नाही, पण त्याने अभ्यास केला तर त्याला नक्कीच काही अशक्य नाही,'' असा लाडिक पण फसवा सूर लावला जातो. मुलाने आतापर्यंत मनापासून अभ्यास केला नाही, हे जर मान्य असेल तर, मग तो आता जेईई किंवा नीटचा अभ्यास मनापासून करेल, याची काय हमी?

## गाडी अडखळते कारण

नीट किंवा जेईई परीक्षेच्या अभ्यासक्रमाचे पूर्ण आकलन होण्याची क्षमता, विद्यार्थ्याने किमान आठवीपासूनच संबंधित विषयाचे ज्ञानग्रहण समजून-उमजून केले असल्यास होऊ शकते. ते त्याने आतापर्यंत केलेले नसते. त्यामुळे 'जेईई' किंवा 'नीट'चा अभ्यास करताना त्याची गाडी पदोपदी अडखळतच राहते. हे अडखळणे, शिकवणी चालकांच्या लक्षातही येत असावे, पण ही मंडळी साधूसंत नसल्याने, ते कधीच मुलाच्या अडखळण्याचा विषय पालकांपुढे काढत नाही. 'हो जायगा, बस थोडी और मेहनत की जरुरत है,' असं काहीसं ही मंडळी गोलगोल फिरवत सांगतात. एखाददुसऱ्या सराव परीक्षेत चांगले गुण मिळाले तर, ते पुराव्यादाखल सादर करतात. पण ही फसवणूकच समजायला हवी. ५० सराव परीक्षेत एक किंवा दोन परीक्षेत चांगले गुण मिळणे, ही काही प्रगती नाही. पालकांनीसुद्धा वेळीच ही बाब लक्षात घ्यायला हवी.

## पालकांची जबाबदारी

मुळात आपल्या पाल्याला जेईई किंवा नीट परीक्षेची काठिण्यपातळी जमू शकते का, कितपत जमू शकते, याकडे पालकांनीच आधी लक्ष द्यायला हवे. ते त्यांना विद्यार्थ्यांच्या संबंधित विषयातील गुणांवरून कळू शकते. शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील त्याच्या शिक्षकांकडूनही अशी माहिती काढता येणे शक्य आहे. असे केल्यास व त्यासाठी वेळ काढल्यास, पुढील बराच मनस्ताप टाळता येणं शक्य होतं. मुलांच्या बौद्धिक कुवतीचा अंदाज आल्यावर अट्टहास सोडून 'जेईई' किंवा 'नीट'चा मार्ग अनुसरण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे मग महागडे क्लासेस लावण्याची गरज राहणार नाही. भविष्यातील अपयशाने येणारी निराशा टाळता येणे हे आपल्याच हाती असते. हे नैराश्य मुलाला फार खंगवून टाकू शकते. त्याचा आत्मविश्वासही डगमगू शकतो. ही बाब पालकांनी ध्यानात घ्यायलाच हवी. जेईई किंवा नीट परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी म्हणजेच सारे काही नव्हे. या दोन्ही परीक्षांपेक्षा कमी काठीणपातळी असलेल्या इतर ज्ञानशाखांच्या परीक्षांवर लक्ष दिल्यास, चांगले यश मिळून वेगवेगळ्या केंद्रीय किंवा राज्यस्तरीय शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळू शकतो. इतरही ज्ञानशाखांकडे जाण्याचीही संधी मिळू शकते. या ज्ञानशाखांमध्ये प्रवेश घेऊन पुढील तीनचार वर्षात वेगवेगळी कौशल्ये प्राप्त केली, नवे तंत्रज्ञान आत्मसात केले तर स्वतःचं करिअर घडवणं अशक्य होणार नाही.

यासाठी पालकांनीसुध्दा मुलगा इंजिनीअरच झाला पाहिजे किंवा डॉक्टरच झाला पाहिजे, याचा अट्टहास सोडायला हवा. ही दोन्ही क्षेत्रे महत्त्वाची आहेतच. पण, त्याशिवाय इतरही क्षेत्रातील चांगल्या दर्जेदार मनुष्यबळाची गरज सातत्याने भासतच असते. अशी सध्या विविध क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. प्रारंभी ही क्षेत्रे आकर्षक वाटत नसतीलही, कदाचित आकर्षक पॅकेजही सुरुवातीला मिळत नसेल, पण या क्षेत्रामुळे आवडीच्या क्षेत्रात पाय रोऊन उभे राहण्याची संधी मिळते. आपल्यामध्ये असलेली गुणवत्ता, अथक परिश्रम करण्याची तयारी, नावीन्याचा ध्यास आणि प्रामाणिकपणा या गुणांवर आधारित, आवडीच्या क्षेत्रात टप्प्याटप्प्याने एकएक पायरी वर चढता येते.

–सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा ०६

टीजेएस्‌बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# बारावी बोर्डाच्या परीक्षेचे महत्त्व

**बोर्डाच्या परीक्षेत** जेमतेम किंवा बऱ्यापैकी गुण मिळाले की झाले, फार कष्ट करायची गरज नाही, अशीही, एक समजूत दृढ होत चाललीय. विशेषतः १२ वीमध्ये बरीच मुलं केवळ प्रात्यक्षिकांसाठीच महाविद्यालयात प्रवेश घेतात, बाकी त्यांचा संपूर्ण वेळ हा शिकवणी वर्गातच जातो.

दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्त्वाचा टप्पा समजल्या जातात. पण गेल्या काही वर्षांत या दोन्ही परीक्षांपेक्षा जेईई, नीट या परीक्षांच्या अभ्यासाला अधिक महत्व दिलं जात असल्याने दहावी आणि बारावी बोर्डाच्या अभ्यासाकडे बहुसंख्य विद्यार्थी दुर्लक्ष करतात.



## दुर्लक्षाचे परिणाम

१२ वीनंतरच्या वेगवेगळ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जेईई किंवा नीटसारख्या चाळणी परीक्षेतीलच गुण महत्त्वाचे असल्याने, विद्यार्थी तिकडेच अधिक लक्ष केंद्रित करतात, किंबहुना त्यांच्या मनावर तसंच बिंबवण्यात येतं. परिणामी ही मुलं १२ वीच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे बोर्डाच्या परीक्षेत बऱ्याच जणांना यथातथाच गुण मिळतात. पालक आणि विद्यार्थ्यांना याचं फारसं सोयरसुतक नसल्याचंही दिसून येतं.

१२ वी बोर्डाचे गुण फार महत्त्वाचे नसल्याची, मानसिकता बदलण्याची गरज आहे. बऱ्याच पालक आणि विद्यार्थ्यांना हे ठाऊक नसते की, १२ वी बोर्डाच्या परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळाले तर भविष्यात उच्चशिक्षणासाठी प्रवेश घेताना, चाळणी परीक्षांमधील गुणांसोबत या गुणाचांही विचार केला जातो.

याची काही उदाहरणं पुढीलप्रमाणे देता येतील- (१) आयआयटी मुंबईच्या अंतर्गत बिझनेस स्कूलमध्ये एमबीए प्रवेशाच्या वेळी, १० वी व १२ वीमधील गुणांना अतिरिक्त वेटेज दिलं जातं. ६५ टक्केपेक्षा अधिक ते ७० टक्के गुण असल्यास एक, ७० टक्केपेक्षा अधिक ते ७५ टक्के गुण असल्यास दोन, ७५ टक्केपेक्षा अधिक ते ८० टक्के गुण असल्यास तीन, ८० टक्केपेक्षा अधिक ते ८५ टक्के गुण असल्यास चार, ७५ टक्केपेक्षा अधिक पाच, वेटेज दिलं जातं. (२) इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रांचीच्या एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, १० वी आणि १२ वीमध्ये ८५ टक्केंच्यावर गुण असल्यास प्रत्येकी ४ वेटेज दिले जाते. (४) आयआएम मुंबईच्या एमबीए अभ्यासक्रमाला प्रवेश देताना १० वीमध्ये ९० टक्केंपेक्षा अधिक गुण असल्यास १० वेटेज दिले जाते. १२ वीमध्ये वाणिज्य आणि विज्ञानशाखेत ९० टक्के गुण असल्यास १० आणि कला व मानव्यशाखेत ८५ टक्के गुण असल्यास १० वेटेज दिले जाते. अशाच प्रकारे इतरही आयआयएमच्या धोरणानुसार १० वी आणि १२ वीतील गुणांना अंतिम गुणवत्ता यादीचे गुणांकन करताना अतिरिक्त वेटेज दिले जातं. (५) आयआयटीमधील प्रवेशासाठी खुल्या संवर्ग आणि नॉन क्रिमिलेअर ओबीसी संवर्गातील उमेदवारांना १२ वीमध्ये किमान ७५ टक्के आणि राखीव संवर्गातील उमेदवारांना किमान ६५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. समजा एखाद्या खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई ॲडव्हान्स्डमध्ये उत्तम गुण मिळाले, परंतु १२ वीत ७४ टक्केच गुण मिळाले तर त्याला आयआयटीच्या प्रवेशापासून वंचित व्हावे लागेल. (६) भारतीय नौदलाच्या, १० २ बीटेक, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयात सरासरीने किमान ७० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाला जेईई-मेन मधील गुणांवर आधारित प्रवेश दिला जातो. मात्र एखाद्या विद्यार्थ्यास जेईई-मेनमध्ये उत्तम गुण मिळवूनही, १२ वीमध्ये निर्धारित गुण मिळाले नाही तर, त्याचा प्रवेशासाठी विचार केला जात नाही. (७) भारतीय लष्कराच्या १० २ बीटेक अभ्यासक्रम प्रवेशासाठीही जेईई-मेनचे गुण ग्राह्य धरले जातात. मात्र अशा विद्यार्थ्यांना १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यामध्ये सरासरीने किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. अन्यथा प्रवेशापासून वंचित व्हावे लागते. (८) बिट्स पिलाणी यासारख्या नामांकित खाजगी संस्थेत बीई/बीटेक प्रवेशासाठी १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयांमध्ये सरासरीने किमान ७५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. शिवाय या प्रत्येक विषयात किमान ६० टक्के गुण मिळायलाच हवेत. (९) एसपीजैन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, या संस्थेतील एमबीए अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना, विद्यार्थ्यांना १० वी आणि १२ वीतील गुणांकडे लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना या दोन्ही परीक्षेत उच्चश्रेणीचे गुण मिळाले असल्यास, त्याचा प्रवेशासाठी सकारात्मक परिणाम होतो.

## भविष्यातील फायदा

१० वी आणि १२ वीमध्ये उत्तम गुण असल्यास भविष्यातही वेगवेगळ्या संस्थांमधील प्रवेशाच्या वेळी लाभ होतो. प्लेसमेंटच्या वेळी नियुक्तीकर्त्यांच्या लक्षात गुणांतील सातत्य लक्षात येते. याचा परिणाम मुलाखतीच्या वेळी व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण चाचपणी करताना, मुलखातकर्ते किंवा नियुक्ती अधिकारी यांच्यामार्फत अधिक सहानुभूती दाखवण्यासाठी होतो.

## मानसिकता बदलण्याची गरज

नीट, जेईई अशा चाळणी परीक्षांना बसण्यासाठी किमान अर्हता असणारे, १२ वीमध्ये गुण मिळवले तर चालू शकते, ही मानसिकता बदलण्याची गरज यामुळेच आहे. दहावी आणि बारावीतील गुणसुद्धा विद्यार्थ्यांचे पाणी किती खोल आहे, हे जोखण्यासाठी उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक माहिती किंवा परिचयपत्र (सीव्ही-क्युरिकुलम व्हाटेइ) मध्ये १० पासूनच्या पुढील सर्व परीक्षांचे गुण हे, त्याच्या व्यक्तिमत्त्व आणि बुद्धिमत्तेवर प्रकाश टाकत असतात. शैक्षणिक कामगिरीतील सातत्य यातून लक्षात येते. याचा निश्चितपणे लाभ होतो. त्यामुळेच १२ वीच्या अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष न करणे अधिक चांगले.

१२ वी बोर्डाच्या क्रमिक पुस्तकांतील सर्व विषयघटकांचा सखोल अभ्यास केला, त्यातील सर्व संकल्पना समजून घेतल्यास प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी किंवा स्पर्धा परीक्षेतही उत्तम यश मिळू शकते. कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट (सीयूईटी) या परीक्षेचा मूळ पायाच, हा १२ वी बोर्डाचा अभ्यासक्रम आहे. एव्हढाच अभ्यास करुन विद्यार्थ्यांनी ही परीक्षा द्यावी, असे साधारणतः अपेक्षित आहे.

शिकवणी वर्गात जाणारे जे चाणाक्ष विद्यार्थी १२ वी बोर्डाच्या अभ्यासक्रमाकडेही तितकेच मनापासून लक्ष देतात. त्यांना जेईई किंवा नीट किंवा इतर चाळणी परीक्षा कठीण जात नाही. त्यामुळेच क्रमिक पुस्तकातील विषय घटकांमुळेच अभ्यासाचा पाया मजबूत होतो, ही बाब ध्यानात घ्यायला हवी. शिवाय कोणत्याही पद्धतीचे प्रश्न समोर आल्यास, ते सोडवण्याची क्षमताही, या अभ्यासामुळेच प्राप्त होते.

जेईई किंवा नीटच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून बरेच विद्यार्थी १२ वी बोर्डाच्या अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष करतात. शिकवणी वर्गाचे चालक या दोन परीक्षांच्या अभ्यासावरच १२ वी बोर्डाच्या परीक्षेत कामचलाऊ किंवा चांगलेही गुण मिळवू शकतो, असे वातावरण निर्माण करतात. पालकांनासुद्धा चाळणी परीक्षेच्या गुणांमध्येच अधिक रस असल्याने ते, मुलांच्या १२ वीच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात किंवा मग कानाडोळा करतात.

बरेच पालक १० वी आणि १२ वीच्या वर्षात आम्ही मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यासाठी सुटी घेतली किंवा बऱ्याच तडजोडी केल्या वगैरे सांगत असतात. पण ही मंडळी अभ्यासाकडे लक्ष देतात म्हणजे चाळणी परीक्षेच्या अभ्यासावर देतात किंवा लक्ष ठेऊन असतात. १२ वी बोर्डाच्या अभ्यासक्रमाकडे कितपत लक्ष ठेवले जाते, मुलाची यातील प्रगती कितपत लक्षात घेतली जाते, हा संशोधनाचा विषय ठरू शकतो.

याची विस्ताराने चर्चा करण्याचे कारण म्हणजे १२ वीच्या गुणांनासुद्धा भविष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवरील प्रवेशाच्यावेळी आणि प्लेसमेंटच्या वेळी महत्त्व दिले जाते, वत्क्तिमत्त्व तपासणीचा, अभ्यासातील सातत्य तपासणीचा हा एक आधार ठरू शकतो, आयआयएम वा इतर दर्जेदार संस्थामधील एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी अतिरिक्त वेटेज दिले जाते याची कल्पना यावी. स्पर्धा प्रचंड असल्याने, आता अशा शुल्लक वाटणाऱ्या बाबीकडे झालेले दुर्लक्ष पुढे महागात पडू शकते. तेव्हा नशिबाला किंवा इतर अनावश्यक व आभासी घटकांना दोष दिला जातो. तसे केल्याने स्वतःशीच फसवणूक होते हे लक्षात घेतलेलं बरे. त्यामुळे चाळणी परीक्षेच्या अभ्यासक्रमोसाबतच विद्यार्थ्यांनी १२ वी बोर्डाच्याही अभ्यासक्रमाकडे अधिक लक्ष देण्याची आणि यासाठी पालकांनी त्यांना प्रोत्साहित करण्याची गरज आहे.

सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत



आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%*
द.सा. पासून

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# सीईटीचे महत्त्व

**महाराष्ट्रातीलच अभियांत्रिकी महाविद्यालयातच प्रवेश घेण्याचे एकदाचे मनात पक्के ठरवल्यावर जेईईच्या वाटेने जाण्याचा विचारसुद्धा करू नये. जेईईऐवजी सीईटीच्या तयारीवर संपूर्ण लक्ष केंद्रित केल्यास अधिक फायद्याचे ठरू शकते.**




**नुकतीच दहावीची** परीक्षा दिलेल्या मुलीचे पालक आयआयटीच्या प्रवेश परीक्षेसाठी असलेल्या कोचिंग क्लासला भेटून आले होते. या शिकवणी वर्गाच्या संचालकांनी, त्यांच्या क्लासमध्ये जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेईई)ची जय्यत तयारी करून दिली जात असल्याने, १०० टक्के यशाची हमीच दिली. प्रत्येकच शिकवणी वर्गाचे संचालक किंवा आता जनसंपर्क अधिकारी असंच सांगतात. ही परीक्षा दिली तर राज्य शासनाच्या सीईटीचीही तयारी होऊन जाते, असेही ठासून सांगतात.

जेईई प्रवेशपरीक्षा शिकवणी वर्गाच्या संचालकांना भेटून आलेल्या पालकांना, महाराष्ट्रातीलच अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्येच मुलीला टाकायचे आहे. त्यातही त्यांची पहिली पसंती ही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. त्यांनी तसे शिकवणी वर्ग संचालकांना स्पष्टही केले. महाराष्ट्रातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रवेश जेईईने शक्य असल्याची संचालक महोदयांनी माहिती दिली. खरे तर त्या संचालकाने वस्तुनिष्ठ माहिती द्यायला हवी होती.

जेईई मेनच्या किंवा जेईई ॲडव्हान्स्डच्या गुणांवर राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश दिला जात नाही. राज्यातील खासगी शिक्षण संस्थांमधील १५ ते २० टक्के जागा या जेईई मेनमधील गुणांवर भरल्या जातात. पण या जागा केवळ महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राखीव नसतात. त्याचे स्वरूप हे अखिल भारतीय असते. म्हणजे या जागांवर देशातील कोणत्याही राज्यातील विद्यार्थी अर्ज करू शकतो. महाराष्ट्रातील मुलेही इतर राज्यांतील खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १५ ते २० टक्के प्रवेशाचा पर्याय निवडू शकतात.

जेईई- मेनच्या गुणांवर नागपूर येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी (एनआयटी) या संस्थेत प्रवेश मिळतो. पण ही केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी संस्था आहे. देशातील सगळ्याच राज्यांतील एनआयटीतील प्रवेश हे जेईई- मेनच्या गुणांवर होतात. नागपूर एनआयटीमध्ये ५० टक्के जागा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असल्या तरी त्यांची संख्या ३५० ते ३७५ च्या आसपास असते. त्यातही पुन्हा वेगवेगळ्या संवर्गासाठी राखीव जागा असतात. जेईई ॲडव्हान्स्डचे गुण केवळ आयआयटीच्या प्रवेशासाठी ग्राह्य धरले जातात. या सगळ्या बाबी शिकवणी वर्गचालकांनी पालकांना स्पष्ट करून सांगितल्या पाहिजेत.

## सीईटीचे महत्त्व

ज्या पालकांना आपल्या मुलाला किंवा मुलीला राज्यातील शासकीय आणि दर्जेदार खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये टाकावयाचे असेल, त्यांच्यासाठी, कॉमन एन्ट्रस टेस्ट (सीईटी)चा पर्याय सर्वोत्तम ठरतो. ही सीईटी शासनाच्या सीईटी सेलमार्फत घेतली जाते. या परीक्षेची काठिण्य पातळी, जेईई परीक्षेसारखीच असल्याचे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे. तथापि सीईटीचा संपूर्ण अभ्यासक्रम हा ११ वी आणि १२ वीच्या, उच्च माध्यमिक बोर्डाच्या क्रमिक पुस्तकातील विषय घटकांवर आधारित असतो. त्यामुळे हा अभ्यास समजून उमजून केलेल्या विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षेत चांगले गुण मिळू शकतात. या परीक्षेत निगेटिव्ह गुणांकन नाही. हीसुद्धा एक जमेची बाजू आहे. त्यामुळे जेईईच्या अभ्यासातच सीईटीचाही अभ्यास होऊन जातो, असे सांगणाऱ्या शिकवणी वर्गाच्या संचालकांकडे दुर्लक्ष केलेले चांगले असले तरी हा निर्णय ज्याचा त्यानेच घ्यावयाचा आहे.

महाराष्ट्रातीलच अभियांत्रिकी महाविद्यालयातच प्रवेश घेण्याचे एकदाचे मनात पक्के ठरवल्यावर जेईईच्या वाटेने जाण्याचा विचारसुद्धा करू नये. जेईईऐवजी सीईटीच्या तयारीवर संपूर्ण लक्ष केंद्रित केल्यास अधिक फायद्याचे ठरू शकते.

काही चतुर पालक आणि विद्यार्थी हा मार्ग स्वीकारतात. त्याचे फळ त्यांना चांगले मिळते. जेईईसाठी प्रचंड अभ्यास केलेल्या विद्यार्थ्याला जेईईमध्ये विशिष्ट गुण मिळाले नाही तर त्याला चांगली एनआयटी अथवा आयआयआयटी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) मिळत नाही. दोन्ही चाळणी परीक्षेच्या अभ्यासक्रमांचा दर्जा आणि परीक्षा पद्धती वेगळी असल्याने बऱ्याचदा अशा विद्यार्थ्याची सीईटी चांगली जात नाही, त्यामुळे त्याला महाराष्ट्रातील शासकीय वा इतर टॉपच्या खासगी महाविद्यालयात प्रवेश मिळणे कठीण जाते. याउलट सीईटीवर लक्ष केंद्रित केलेली मुले, व्हीजेटीआय, सीईओपी, अमरावती कराड व इतर ठिकाणची शासकीय महाविद्यालये आणि सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयासारखी शासन अनुदानित महाविद्यालये व गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागात असलेल्या नामवंत खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयात सुलभतेने प्रवेश मिळवतात.

## गोंधळ टाळा

त्यामुळेच कोणती चाळणी परीक्षा द्यायची आणि कशासाठी द्यायची, हे पालक व पाल्यांनी आधी स्वयंस्पष्ट करून घ्यायला हवे. त्यामुळे कोणताही गोंधळ राहणार नाही. तयारीची दिशा नेमकी माहीत असल्याने, सीईटीच्या अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करता येईल. अनावश्यक महागडे शिकवणी वर्ग लावण्याची गरज भासणार नाही. या वर्गातील जाण्यायेण्यासाठीचा वेळही वाचेल. सीईटीचा अभ्यास आणि १२ वी बोर्डाचा अभ्यास हा समांतररीत्या होऊ शकतो. त्यामुळे दोन्ही परीक्षेत चांगले गुण मिळू शकतात.

## स्वतःची क्षमता जोखा

जेईईची परीक्षा नेमकी कशासाठी द्यायची, हेसुद्धा पालक आणि पाल्यांनी आपल्या मनात स्पष्ट करून घ्यायला हवे. आयआयटीतील प्रवेश हेच स्वप्न असल्यास त्यासाठी कसून मेहनत हा एक भाग झाला. पण स्वतःच्या बौद्धिक क्षमतेचा पारदर्शकपणे विचार करूनच ही मेहनत केल्यास त्याचे फ़ळ मिळू शकेल. अन्यथा अपयशाचे दार आपणच उघडू, हे पक्के समजावे. आपल्या बौद्धिक कुवतीचा अंदाज आल्यावर जेईई- मेनवरच लक्ष केंद्रित करून एनआयटी, आयआयआयटीसारख्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवता येऊ शकेल.

कोणत्या एनआयटी किंवा आयआयआयटीमध्ये प्रवेश मिळवायचा, याचीही स्पष्टता मनात केलेली बरी. कारण काही एनआयटी आणि आयआयआयटीमधील प्रवेशासाठी जेईई- मेनमध्ये बरेच गुण लागतात. विशेषतः नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) या शैक्षणिक संस्थांच्या गुणानुक्रमांच्या सर्वेक्षणात, सर्वोच्च क्रमांक मिळवणाऱ्या एनआयटी आणि आयआयआयटी संस्थेत प्रवेशासाठी अधिक चुरस असते. त्यासाठी अधिक गुण मिळवावे लागतात. त्यामुळे आपल्याला कोणत्या संस्थेत प्रवेश मिळवायचा, हे लक्षात ठेवून जेईई-मेनच्या तयारीवर लक्ष केंद्रित करावे लागते. यासाठी गेल्या वर्षीच्या वेगवेगळ्या संवर्गांतील कटऑफ किती होते, याची माहिती घेतल्यास प्रवेशासाठी असणारी स्पर्धा लक्षात येऊ शकते.

एनआयआरएफ २०२४-२०२५ मध्ये अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान घटकामध्ये, टॉप १० मध्ये असणाऱ्या एनआयटी- (१) एनआयटी तिरुचिरापल्ली- एनआरआयएफ क्रमांक- ९, (२) (२) एनआयटी सुरतकल कर्नाटक, एनआरआयएफ क्रमांक- १७, (३) एनआयटी रुरकेला, ओडिशा- एनआरआयएफ क्रमांक- १९, (४) एनआयटी वरंगल तेलंगाणा- एनआरआयएफ क्रमांक- २१, (५) एनआयटी कालिकत, कोझिकोड, केरळ- एनआरआयएफ क्रमांक- २५, (६) विश्वेश्वरय्या एनआयटी नागपूर- एनआरआयएफ क्रमांक- ३९, (७) एनआयटी सिल्चर, आसाम- एनआरआयएफ क्रमांक- ४०, (८) पंडित मदनमोहन मालवीय एनआयटी जयपूर, राजस्थान- एनआरआयएफ क्रमांक- ४३, (९) एनआयटी दुर्गापूर, पश्चिम बंगाल- एनआरआयएफ क्रमांक- ४४, (१०) एनआयटी दिल्ली- एनआरआयएफ क्रमांक- ४५, (११) एनआयटी पाटणा- एनआआरआयएफ क्रमांक- ५५

या क्रमवारीत दरवर्षी बदल होत राहतो. एक दोन किंवा चार क्रमांकांनी या क्रमांकात बदल होतो. त्यामुळे या एनआयटीच्या गुणवत्ता आणि दर्जामध्ये खूप फरक पडेल, असे काही होत नाही. ही क्रमवारी कोणत्या संस्थेत प्रवेशासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे, यासाठी दिशादर्शक ठरु शकते. अशाच प्रकारची क्रमवारी आयआयआयटीच्या बाबतही लक्षात घेतली जावी.

कोणत्याही संस्थेत प्रवेश मिळाला तरी चालू शकते, अशी भावना ठेवल्यास प्रयत्न कमी पडू शकतात. सर्वच एनआयटी आणि आयआयआयटी यांना केंद्र शासनाने, नॅशनल इन्स्टिट्यूशन ऑफ इम्पॉर्टन्सचा दर्जा दिला असला तरी या संस्थांबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेले पर्सेप्शन (धारणा/ समज/ आकलन), प्लेसमेंटसाठी येणाऱ्या कंपन्या, औद्योगिक घटकांसोबत असलेली संपर्क साखळी, संशोधन सुविधा आदी बाबींचाची क्रमवारी काढताना विचार केला जातो. जेईई-मेन परीक्षेतील गुणांचा आधार घेऊन, मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या शासकीय संस्थेतील बॅचलर ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमाच्या एकूण ७५ जागा असून त्यापैकी ७० टक्के जागा सीईटीने आणि ३० टक्के जागा या अखिल भारतीय स्वरूपाचा असल्याने जेईईने भरल्या जातात. त्यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसह देशातील सर्वच राज्यातील विद्यार्थी अर्ज करू शकतात.

– सुरेश वांदिले

टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.75%*
ज्येष्ठ नागरिक
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# ‘द्रोणाचार्यां’चे प्रशिक्षण!

**सध्या इंडियन** प्रीमियर लीग म्हणजेच आयपीएलचे सामने देशात सुरू आहेत. इतर क्रीडाप्रकारातील सामनेही देशात आणि परदेशात सुरू आहेत. या सामन्यांमध्ये भारतीय क्रीडापटू चांगली कामगिरी बजावताहेत. आयपीएल किंवा इतर क्रीडाप्रकारांमध्ये खेळांडूसोबतच क्रीडाप्रशिक्षकांचीही चर्चा होते. क्रीडापटूंच्या यशात, त्यांचे प्रशिक्षक किंवा गुरू मोठा हातभार लावतात. दरवर्षी भारत सरकार एका प्रशिक्षकाला द्रोणाचार्य पुरस्कार देऊन सन्मानित करते.

क्रीडा प्रशिक्षकाच्या माध्यमातून उत्तम करिअर घडू शकते, ही बाब ध्यानात घेऊन, नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स या संस्थेने डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग आणि इतर अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

भारत सरकारच्या युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणारी ही स्वायत्त संस्था आहे. भारतीय क्रीडाविश्वाला, शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि इतर साहाय्य करून या संस्थेने उभारी दिली आहे.

## • डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग

या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली असून, अर्ज करण्याची शेवटची तारीख दि. २६ एप्रिल २०२५ आहे.

या अभ्यासक्रमात एक्झरसाइज फिजिओलॉजी आणि स्पोर्ट्स मेडिसिन, स्ट्रेंग्थ अ‍ॅण्ड कंडिशनिंग, डिजिटल लर्निंग, कोचिंग डायनॅमिक्स, स्पोर्ट्स सायकॉलॉजी, स्पोर्ट्स न्युट्रिशन आणि बायोकेमिस्ट्री, बायोमेकॅनिक्स आणि स्पोर्ट्स अँथ्रॉपॉमेट्री, प्रोफेशनल डेव्हलपमेंट अशासारख्या विषयघटकांचा समावेश आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष.

## प्रवेश प्रकिया

(१) कॅटेगरी अ (थेट प्रवेश)- या उमेदवारांनी क्रीडा क्षेत्रात पुढील कामगिरी बजावलेली असावी- (अ) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व, (ब) वरिष्ठ जागतिक स्पर्धा सहभाग, (क) कॉमनवेल्थ किंवा आशियाई क्रीडा स्पर्धेत कोणतेही पदक.

(२) कॅटेगरी ‘अ’ दोन (आंतरराष्ट्रीय क्रीडापटूंसाठी)- १२ वी उत्तीर्ण आणि ऑलिम्पिक स्पर्धा, वरिष्ठ जागतिक स्पर्धा, आशियाई स्पर्धा, कॉमनवेल्थ स्पर्धा, युवा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग.

(३) कॅटेगरी ब - पदवी आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय महत्त्वाच्या क्रीडा स्पर्धेत सहभाग

## कॅम्पस आणि क्रीडाप्रकार प्रशिक्षण

(अ) पतियाळा कॅम्पस- (१) बॉक्सिग, (२) सायकलिंग, (३) फेन्सिग, (४) हँडबॉल, (५) हॉकी, (६) ज्युडो, (७) वेटलिफ्टिग, (८) कुस्ती, (९) वुशू, (१०) योग, (११) अ‍ॅथेलिटिक्स

(ब) बेंगळूरु कॅम्पस- (१) बॅडमिंटन, (२) बास्केटबॉल, (३) हॉकी, (४) कबड्डी, (५) खोखो, (६) शूटिंग, (७) स्विमिंग, (८) टेनिस, (९) व्हॉलीबॉल, (१०) तायक्वोंदो, (११) अ‍ॅथलेटिक्स,

(क) कोलकता कॅम्पस- (१) आर्चेरी, (२) अ‍ॅथेलिटिक्स, (३) फूटबॉल, (४) जिम्नॅस्ट, (५) टेबल टेनिस,

(ड) थिरुवनंतपूरम कॅम्पस- (१) कॅनोइंग अ‍ॅण्ड कायाकिंग, (२) रोविंग.

## अशी असेल परीक्षा

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन चाळणी परीक्षा देशातील विविध केंद्रांवर घेतली जाते. यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर या केंद्रांचा समावेश आहे.

पेपरमध्ये सामान्यज्ञान- १० गुण, सर्वसामान्य संगणकीय ज्ञान- ५ गुण, भाषा आणि संवाद कौशल्य- १० गुण, तार्किक क्षमता आणि क्रीडा कल -१० गुण, स्पेशलाइज्ड स्पोर्ट्स थिअरी- २५ गुण असलेले वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात. शैक्षणिक कामगिरी १० गुण, मुलाखत १० गुण, क्रीडा कामगिरीला २० गुण दिले जातात.




## • एम.एस्सी इन स्पोर्ट्स कोचिंग-

या अभ्यासक्रमाला अर्ज करण्याची शेवटची तारीख दि. २ मे २०२५.

हा अभ्यासक्रम पतियाळा येथील कॅम्पसमध्ये चालवला जातो. या अभ्यासक्रमात सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांचा समावेश करण्यात आलाय. प्रशिक्षणाच्या विविध पद्धती, शारीरिक विकास, नेतृत्व विकास, क्रीडा विज्ञान, क्रीडा मानसशास्त्र या विषयघटकांचा समावेश आहे. कालावधी- दोन वर्षे.

प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना (१) अ‍ॅथेलेटिक्स, (२) बॉस्केटबॉल, (३) फूटबॉल, (४) जिम्नॅस्टिक्स, (५) हॉकी, (६) स्विमिंग, (७) व्हॉलीबॉल, (७) वेटलिफ्टिग आणि (८) कुस्ती या खेळांचे प्रशिक्षण दिले जाते.

निवड प्रक्रिया पतियाळा येथे पार पाडली जाते. क्रीडा विज्ञानावर आधारित लेखी चाळणी आणि त्यानंतर मुलाखत घेतली जाते. मुलाखतीमध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्ञान, व्यक्तिमत्त्व, अभिव्यक्तीचा दर्जा यांची चाचपणी केली जाते.

अर्हता- कोणत्याही विषयातील पदवीसोबत नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स (पतियाळा) चा डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेतील डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेतील चार वर्षे कालावधीचा बीएस्सी इन स्पोर्ट्स कोचिंग किंवा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग. उमेदवारांना किमान ५५ टक्के गुण मिळायला हवेत.

## • पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम-

या संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेल्या सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना अर्ज करण्याची शेवटची तारीख दि.२ मे २०२५.

(१) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स परफॉर्मन्स अ‍ॅनॅलिसिस- या अभ्यासक्रमामध्ये खेळाडूच्या कामगिरीचे विश्लेषण करण्याचे तंत्र आणि कौशल्याचे ज्ञान प्रदान केले जाते. प्रभावी संवाद कौशल्य वाढीसाठी प्रयत्न केले जातात. मोठमोठ्या कंपन्या किंवा कॉर्पोरेट तसेच राष्ट्रीय संस्थांच्या टीमच्या निवडीच्या निर्णय प्रकियेत महत्त्वाची भूमिका बजवावी लागते.

## काय शिकाल?

(१) सरावातील कामगिरीचे विश्लेषण, (२) कामगिरी मापनाची निदर्शके (इंडिकेटर्स), (३) उपयोजित क्रीडा विज्ञान, (४) क्रीडा कामगिरी विश्लेषण आणि मूल्यमापनाच्या पद्धती, (५) उपयोजित क्रीडा कामगिरी विश्लेषण, (६) व्यावसायिकदृष्ट्या क्रीडा कामगिरीचे विश्लेषण, (७) संशोधन, (८) माहितीचे विश्लेषण आणि आराखडा बांधणे.

## अर्हता-

कोणत्याही विषयातील पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण.

(२) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स न्युट्रिशन, अर्हता- पुढीलपैकी कोणत्याही एका विषयात पदवी- (१) न्युट्रिशन, (२) लाइफ सायंस, (३) स्पोर्ट्स सायन्स, (४) फिजिकल एज्युकेशन अ‍ॅण्ड स्पोर्ट्स, (५) मेडिकल अ‍ॅण्ड अलाइड हेल्थ सायन्स, (६) फिजिकल एज्युकेशन, (७) कोणत्याही विषयातील पदवीसोबत डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग. पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.

(३) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्ट्रेंग्थ अ‍ॅण्ड कंडिशनिंग- क्रीडा क्षेत्रात या विषयाला सध्या महत्त्व मिळू लागलेय. यामध्ये खेळाडूंच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतावृद्धीचे तंत्रकौशल्य, पद्धती यांचा ढोबळमानाने समावेश होतो. नेतृत्व विकासावरही लक्ष केंद्रित केले जाते. पोषण आहार आणि क्रीडा पुनर्वसन यांचाही समावेश करण्यात आल्याने उमेदवारांना प्रगत आणि वैविध्यपूर्ण विषयांचे ज्ञान प्राप्त होते. उमेदवारांच्या प्रात्यक्षिकांच्या कौशल्यात वाढ व्हावी, त्यांनी भविष्यात या विषयात संशोधनाचे कार्य करावे, यावर लक्ष केंद्रित केले जाते.

अर्हता- पुढीलपैकी कोणत्याही एका विषयात पदवी- (१) फिजिओथेरपी, (२) स्पोर्ट्स सायन्स, (४) फिजिकल एज्युकेशन अ‍ॅण्ड स्पोर्ट्स, (५) फिजिकल एज्युकेशन, (६) कोणत्याही विषयातील पदवीसोबत डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग. उमेदवारांना पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.

(४) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स सायकॉलॉजी, अर्हता- पुढीलपैकी कोणत्याही एका विषयात पदवी- (१) सायकॉलॉजी, (२) स्पोर्ट्स सायन्स, (४) फिजिकल एज्युकेशन अ‍ॅण्ड स्पोर्ट्स, (५) मेडिकल अ‍ॅण्ड अलाइड हेल्थ सायन्स, (६) फिजिकल एज्युकेशन, (७) कोणत्याही विषयातील पदवीसोबत डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग. उमेदवारांना पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.

(५) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन एक्झरसाइज फिजिऑलॉजी. अर्हता- पुढीलपैकी कोणत्याही एका विषयात पदवी- (१) ह्युमन फिजिऑलॉजी, (२) स्पोर्ट्स सायन्स, (३) फिजिकल एज्युकेशन अ‍ॅण्ड स्पोर्ट्स, (४) फिजिकल एज्युकेशन, (५) फिजिऑलॉजी, (६) लाइफ सायन्स, (७) स्पोर्ट्स फिजिऑलॉजी, (८) स्पोर्ट्स न्युट्रिशन अ‍ॅण्ड फिजिऑलॉजी, (९) स्ट्रेंग्थ अ‍ॅण्ड कंडिशन (१०) मेडिकल सायन्स, (११) पॅरॅमेडिकल सायन्स फिजिकल एज्युकेशन. उमेदवारांना पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.

सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. यामध्ये ८० गुण लेखी परीक्षेला आणि २० गुण मुलाखतीला दिले जातात. चाळणी पेपरचा विस्तृत अभ्यासक्रम संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आला आहे.

सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी एक वर्ष.

संपर्कः- नेताजी सुभाष नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स, ओल्ड मोतीबाग, पतियाळा- १४७००१, दूरध्वनी- ०१७५-२३०६१७१, फॅक्स- २२१२०७०, संकेतस्थळ- https://sportsauthorityofindia. nic. in आणि www. dipsc. nsnis. in, ईमेल- nsnisacademics@gmail. com, हेल्पलाइन-०१७५ -२३९४२६१

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.35%* द.सा. पासून

*अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# पीसीएम की पीसीबी?

**११ वीमध्ये** विज्ञानशाखेत प्रवेश घेताना, भौतिकशास्त्र, गणित रसायनशास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स-पीसीएम) की भौतिकशास्त्र, जीवशास्त्र रसायनशास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री, बॉयलॉजी- पीसीबी) या दोन गटांपैकी कोणत्या गटाचा स्वीकार करावा याबाबत बऱ्याच पालकांमध्ये गोंधळ दिसून येतो. काही पालकांमध्ये स्पष्टता असते. काही विद्यार्थ्यांच्या मनातही स्पष्टता असते. पण, बरेच विद्यार्थी पालकांच्या मतानुसार आपले मत बनवून, त्यांच्या मताप्रमाणे ११ वीमध्ये अभ्यास विषयाचा गट निवडतात.

## पीसीबीचे महत्व

दोन्ही विषय गटांचे महत्व वेगवेगळे आहे. पीसीबी हा गट घेतल्यावर, ज्या ज्या अभ्यासक्रमासाठी गणित विषय आवश्यक असतो, त्या सर्व ज्ञानशाखांमधील प्रवेशाचा मार्ग बंद होतो. उदा- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या सर्व शाखा, काही आयआयटीमधील बॅचलर ऑफ डिझाइन अभ्यासक्रम, बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, एनडीए (हवाई दल आणि नौदल), भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटरने सुरू केलेल्या, संशोधन कार्यावर भर देणाऱ्या इंटिग्रेटेड एमएस्सी इन मॅथेमॅटिक्स, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन (आयसर) मधील बीएस-एमएस इन मॅथेमॅटिक्स, बीएस-एमएस इन इकॉनॉमिक्स, बीएससी अॅव्हिएशन, बीटेक इन मरीन इंजिनीअरिंग, बीटेक इन नेव्हल आर्किटेक्चर अॅण्ड ओशन इंजिनीअरिंग, बीएससी इन नॉटिकल सायन्स, बॅचलर इन कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, साऊंड इंजिनीअरिंग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायंसे मधील बीएस इन मॅथेमॅटिक्स, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या बीएससी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स, बीएससी (ऑनर्स) इन स्टॅटिस्टिक्स, चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटच्या बीएससी ऑनर्स, कमर्शिअल पायलट ट्रेनिंग, पॉलिटेक्निक आदी अभ्यासक्रमापासून वंचित व्हावे लागते. उपरोक्त नमूद या महत्त्वाच्या संस्था असून त्यामध्ये प्रवेश मिळाल्यास उत्तम करिअर घडणे शक्य होते.

पीसीबी हा गट घेतलेल्या विद्यार्थ्यांना, एमएमबीएस, बीडीएस, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी, बॅचलर ऑफ आक्युपेशनल थेरपी, विविध पॅरामेडिकल अभ्यासक्रम, नर्सिंग, बॅचलर ऑफ मेडिकल टेक्नॉलॉजी, एनडीए (भूदलशाखा), आयसर मधील बीएस-एमएस इन बायोलॉजी, बीएस-एमएस इन फिजिक्स, बीएस-एमएस इन केमिस्ट्री, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायस एज्युकेशन अॅण्ड रिसर्च (नायसर) मधील इंटिग्रेटेड एमएस्सी इन फिजिक्स, इंटिग्रेटेड एमएस्सी इन बायोलॉजी, इंटिग्रेटेड एमएससी इन केमिस्ट्री, काही आयआयटीमधील डिझाइन कोर्स, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी मधील बॅचलर ऑफ डिझाइन कोर्स अशा सारखे अभ्यासक्रम करता येतात. याचा अर्थ असा की पीसीबी गट घेतल्यास करिअरचे अर्धे पर्याय दूर जातात. सध्याच्या आत्यंतिक स्पर्धेच्या काळात असे होणे एका दृष्टिने योग्य नाही. पण, ज्या पीसीबी गट घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात पहिला करिअर पर्याय हा एमबीएबीएस प्रवेशाचाच असतो. त्यासाठी 'नीट' परीक्षेच्या अभ्यासावर



पूर्ण लक्ष केंद्रित केले जाते. हा अभ्यास कितीही केला तरी शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील एकूण संख्या लक्षात घेता, २५ लाखाच्या आसपास बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी साधारणतः १ लाखाच्या आसपासच विद्यार्थ्यांना एमबीबीएस, बीडीएस या अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकतो. तेव्हा, पीसीबी या गटावर आधारित इतर अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाल्यास, या पर्यायाकडे दुय्यम श्रेणिचे न बघता, त्यांचा आनंदाने स्वीकार करायला हवा. आपल्याला वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळाला नाही, म्हणजे आपली पात्रता नाही, असा निराशावादी दृष्टिकोन ठेवण्यात हशील नाही.

**निराशा टाळा**

या विषय गटाच्या आधारे प्रवेश मिळालेल्या इतर ज्ञानशाखांमध्ये प्रवेश घेऊन पुढील काहीवर्षे मनापासून अभ्यासात घालवली तर करिअरच्या उत्तम दिशा आपोआपच गवसू लागतात. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायंस एज्युकेशन अॅण्ड रिसर्च (आयसर), नायसर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ संस्थांमधील अभ्यासक्रम हे संशोधनास प्रोत्साहन देणारे आहेत. त्यांना प्रवेश घेतल्यास, दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण संस्थेमध्ये शिकण्याची, संशोधन करण्याची संधी मिळते. पॅरामेडिकलच्या विविध विषयांमधील अभ्यासक्रमांमुळे वेगवेळ्या प्रकारचे कौशल्य हस्तगत करता येते. सध्या अशा कौशल्यप्राप्त उमेदवारांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मिळतात.

पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात पीसीबी गटाबाबत कोणताही गोंधळ नसेल आणि त्यांनी अगदी ठामपणे याच विषय गटाला स्वीकारण्याचा निर्णय घेतला असेल तर, त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या ज्ञानशाखांमध्ये पुढील पदवी, पदव्युत्तर पदवी शिक्षण घेऊन उत्तम करिअर घडवता येऊ शकते. मात्र हे करताना, पुढील चारपाच वर्षे झोकून देऊन ज्ञानार्जन करणे आवश्यक ठरते.

## पीसीएमचे महत्व

पीसीएम हा गट घेतलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान शाखेतील वेगवेगळ्या शाखांमध्ये शिक्षण घेऊन करिअरच्या वाटा निश्चित करता येतात. पीसीबी गटामुळे मिळणाऱ्या करिअर संधींपासून अशा विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागते. मात्र, पीसीएम हा गट जाणीवपूर्वक घेतल्यास, दुसऱ्या पर्यायांचा विचार करण्याची गरज नाही. त्यांची खंतही वाटून घेण्याची गरज नाही.

मात्र, त्यासाठी अतिशय कखणरपणे ११ वी प्रवेशाच्या वेळी निर्णय घ्यायला हवा. त्यात स्पष्टता हवी. मग पुढे जाऊन, दोनही गट घेतले असते तर बरे झाले असते वगैरे, असे वाटून घेऊ नये. असा गोंधळ पालकांनीही ठेऊ नये आणि पाल्यांनाही त्यासाठी भरीस घालू नये.

भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या चार विषयातील गती, आवड, रस, संकल्पनांमधील स्पष्टता आणि विद्यार्थ्याने स्वतःची बौध्दिक क्षमता, या बाबी लक्षात घेऊन दोन्ही गट घ्यायचे की एकच घ्यायचे हे ठरवायला हवे. गणितामध्ये गती नसेल, संकल्पना समजून घेणे आणि त्याचा प्रश्न सोडवताना उपयोग करणे, जमायला कठीण जात असल्यास गणिताचा अट्टाहास करण्यात हशील नाही. कितीही इंजिनीअर व्हावे वाटले तरी, गणित हाच इंजिनीअरिंगचा पाया असतो, हे लक्षात ठेवायला हवे. हा पायाच भुसभुशित असल्यास, इंजिनीअरिंगची पदवी मिळेल पण त्यात करिअर घडणे कठीण राहील. सध्या अभियांत्रिकी/तंत्रज्ञान शाखेला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी २० ते ३० टक्क्यांच्याच आसपास विद्यार्थी, अभियांत्रिकीचे ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करु शकतात असे वेगवेगळ्या सर्वेक्षणात आढळून आले आहे.

जीवशास्त्रामध्ये ज्याला फार रस नसेल तर, या विषयाचा अभ्यास न केलेलाच बरा. जीवशास्त्राचा अभ्यास थातूरमातूर पध्दतीने करणे योग्य नाही, ही बाब लक्षात ठेवायला हवी. वैद्यकीय शाखेकडे जाण्याची महत्वाकांक्षा ठेवणाऱ्यांनी जीवशास्त्रावर लक्ष केंद्रित करावे.

मात्र, ज्या विद्यार्थ्यांना चारही विषयात समान गती असेल आणि आवडही असेल, त्यांनी दोन्ही गटातील विषयघटकांचा अभ्यास करायला काहीच हरकत नाही. त्यांना दोन्ही गटातील करिअरचे सर्व पर्याय उपलब्ध होतात. भौतिकशास्त्र, गणित, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र या चारही विषयांचा अभ्यास उत्तम रितिने केल्यास, नीट, जेईई, आयसर अॅडमिशन टेस्ट, नायसर अॅडमिशन टेस्ट- नेस्ट (नॅशनल इलिजिबिलीटी कम एन्ट्रन्स टेस्ट), अशासारख्या चाळणी परीक्षा उत्तम रितिने देता येतात. गणिताचा पाया पक्का असेल तर, विधि शाखेतील बीए-एलएलबी, बीबीए-एलएबी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी, कॉमन लॉ अॅडमिशन टेस्ट, इंदौर, रोहतक, बोधगया, रांची, जम्मू या आयआयएममधील १२ वीनंतरच्या इंटिग्रेटेगेट एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या जिपमॅट (जॉईंट इंटिग्रेटेड प्रोग्रम इन मॅनजमेंट अॅडमिशन टेस्ट) सारख्या परीक्षेत चांगले गुण मिळवता येऊ शकतात. एनडीए परीक्षाही उत्तम रितीने उत्तीर्ण होण्याची शक्यता अधिक वाढते. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीतील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेणाऱ्या येणाऱ्या चाळणी परीक्षेत सर्वसाधारण गणितावर आधारित प्रश्न विचारले जातात, ते सोडवणे सोपे जाऊ शकते. आयसर अॅडमिशन टेस्टही तुलनेने सुलभ जाऊ शकते. नेस्ट परीक्षेत गणित, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र या चारही विषयांवर आधारित प्रश्न विचारले जातात. नेस्ट परीक्षा व्यवस्थापनाने चारही विषयांचे प्रश्न सोडवण्याची सूचना केली आहे. गुणवत्ता यादी तयार करताना कोणत्याही तीन विषयातीलच गुण ग्राह्य धरले जातात. त्यामुळे चारपैकी कोणत्याही तीन विषयात सर्वोच्च गुणच गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी वापरले जातात.

अशा सर्व बाबींचा साधकबाधक विचार करुन दोन्ही गटांचा पर्याय घेण्याबाबतचा निर्णय घ्यायला हवा.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)



M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# फूड प्रॉडक्शन, बेकरी, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग

**इन्स्टिटय़ूट ऑफ** हॉटिल मॅनेजमेंट कॅटेरिंग टेक्नॉलॉजी अॅण्ड अॅल्पाइड न्युट्रिशन, मुंबई ही आतिथ्यशीलता आणि हॉटिल व्यवस्थापन क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील महत्वाची संस्था. भारत सरकारच्या पर्यटन विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या, या संस्थेने कौशल्य विकासाला प्राधान्य देणारे काही पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना करता येतात. हे अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार आणि स्वयंरोजगाराची संधी सहज आणि सुलभतेने मिळावी या अनुषंगाने या अभ्यासक्रमांची संरचना करण्यात आली आहे. हे अभ्यासक्रम प्रात्यक्षिकांवर अधिकाधिक भर देणारे आहेत. या संस्थेकडे उत्तम अशी प्रयोगशाळा किंवा किचन आहे. आधुनिक उपकरणे आहेत. ही सर्व उपकरणे विद्यार्थ्यांना हाताळायला मिळतात.

पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश सूचना नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थी विद्यार्थीनींना १२ वी नंतर, या क्षेत्रात यायचे असेल, त्यांनी या पर्यायाचा विचार करायला हरकत नाही. कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो. या उमेदवारांनी १२ वीमध्ये इंग्रजीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची १२ वीतील गुणांनुसार गुणवत्ता यादी तयार केली जाते. या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. त्यानंतर अंतिम निवड केली जाते. पदविका अभ्यासक्रमांना अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ जून आहे.

सर्व पदविका अभ्यासक्रमांचा कालावधी दीड वर्षे आहे. यापैकी एक वर्षे संस्थेत, सैध्दांतिक अभ्यासक्रम शिकवला जातो. त्यानंतर वेगळ्या कंपन्या/ औद्योगिक घटक यामध्ये प्रात्यक्षिक करावे लागते.

## पदविका अभ्यासक्रम

१) डिप्लोमा इन फूड प्रॉडक्शन- हा अभ्याक्रम केलेल्या उमेदवारांना हॉटिल रेस्टॉरंट, फास्ट फूड आऊटलेट, रिसॉर्ट, रेल्वे खानपान सेवा, एअरलाइन्स खानपान सेवा, जलवाहतूक खानपान सेवा आणि तत्सम क्षे‍े या क्षेत्रात करिअर संधी मिळू शकते. या अभ्यासक्रमामध्ये पोषण मूल्ये, खाद्य पदार्थांचे मूल्य/किमती, स्वयंपाकशास्त्र, अन्नपदार्थांची साठवणूक, स्वच्छता, आरोग्यदायक काळजी, वस्तू आणि पदार्थ, या विषय घटकांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमात वाणिज्यिक (कमर्शिअल) स्वरुपाच्या अन्न पदार्थांच्या पाककृती निर्मितीचे तंत्र आणि कौशल्य शिकवले जाते. यामध्ये सर्वप्रकारच्या भारतीय, चायनीज आणि कॉन्टिनेंटल खाद्यपदार्थ्यांच्या निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, आणि मांस कापणे, फळे आणि भाज्या सजवून त्या ग्राहकांना देण्याचे प्रशिक्षण देऊन त्याचा सराव केला जातो. कोठार व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते.

२) डिप्लोमा इन बेकरी अॅण्ड कन्फेक्शनरी- बेकरी उत्पादनाशी संबंधित विषयाचे सखोल ज्ञान या अभ्यासक्रमात दिले जाते. यामध्ये ब्रेडची निर्मिती, पेस्ट्रीची निर्मिती, केक डेकोरेशन, चॉकलेट डेकोरेशन या विषय घटकांचा या अभ्यासक्रमात समावेश आहे. शिवाय व्यवसाय/ स्वयंरोजगारासाठी आवश्यक असणारे संवाद कौशल्य, संगणकीय ज्ञान प्रदान केले जाते. हा अभ्यासक्रम केलेल्या उमेद्रवारांना बेकर्स, पॅस्ट्री शेफ, चॉकलेटिअर्स, डेझर्ट स्पेशॅलिस्ट अशा सारख्या करिअर संधी मिळू शकतात.

३) डिप्लोमा इन फूड अॅण्ड बिव्हेरेजेस सर्व्हिस - या अभ्यासक्रमात अन्नपदार्थ आणि खाद्य-पेये सेवा क्षेत्रासाठी लागणारे तंत्र आणि कौशल्य शिकवले जाते. यामध्ये अन्नपदार्थ सेवा, विविध पेय सेवा, अन्न आणि पेये नियंत्रण, स्वच्छता आणि आरोग्य, व्यवसाय संवाद संप्रेषण, रेस्टॉरंट व्यवस्थापन, बार व्यवस्थापन आणि कार्यान्वयन या विषय घटकांचा समावेश आहे.



४) डिप्लोमा इन हाऊसकीपिंग- या अभ्यासक्रमात आतिथ्यसेवा केंद्र (हॉटिल/ गेस्ट रुम/ निवासस्थाने इत्यादी) यांच्या दैनंदिन देखभालीची कार्यपध्दती, अंतर्गत सजावट, देखभाल- दुरुस्ती सेवा, स्वच्छता आणि आरोग्य, व्यवसाय संवाद संप्रेषण या बाबींचा समावेश आहे.

५) डिप्लोमा इन फ्रंट ऑफिस ऑपरेशन- या अभ्यासक्रमात आतिथ्यसेवेच्या कार्यालयाचे कामकाज, कार्यपध्दती, लेखा विषयक बाबी, हॉटिलचे लेखा, व्यवसाय संवाद संप्रेषण, संगणकाचा उपयोग या बाबी शिकवल्या जातात.

क्रॉफ्ट कोर्स इन प्रोफेशनल बारटेंडिंग- या अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने आहे. कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. १२ वीमध्ये इंग्रजी विषयाचा अभ्यास केलेला असावा. १२ वीतील गुण आणि मुलाखत यावर आधारित या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. पंचतारांकित हॉटेलमध्ये, अशा प्रकारच्या कौशल्यप्राप्त उमेदवारांना रोजगाराची संधी मिळू शकते.

## रोजगार से हुनर

आतिथ्य सेवा उद्योगास मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या कौशल्ययुक्त मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी या संस्थेने केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या सहकार्याने, 'रोजगार से हुनर' या उपक्रमांतर्गत अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. सर्व अभ्यासक्रमांसाठी किमान अर्हता आठवी उत्तीर्ण आहे. हे अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहेत -

(१) बेकरी – कालावधी- आठ आठवडे/ वयोमर्यादा- १८ ते २८ वर्षे. (२) फूड अॅण्ड बिव्हरेज– कालावधी- सहा आठवडे/ वयोमर्यादा- १८ ते २८ वर्षे, (३) फूड प्रॉडक्शन- कालावधी- आठ आठवडे / वयोमर्यादा- १८ ते २८ वर्षे, (४) हाऊसकीपिंग युटिलीटी - कालावधी- सहा आठवडे/ वयोमर्यादा-१८ ते २८ वर्षे.

## प्रशिक्षण सुविधा

औद्योगिक प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि प्लेसमेंटच्या संधी पुढील संस्थांमध्ये मिळतात- द लीला, मॅरिऑट, हिल्टन, फोर सिझन, नोंव्होटे, आयटीसी, हयात, ताज ओबेरॉय, ट्रायडंट, मेरिडियन, रॅडिसन, फेअरमॉंट, ताज, हॉलिडे इन, सॉफिटेल, इंटरकॉंटिनेन्टल इत्यादी

संपर्क - इन्स्टिटय़ूट ऑफ हॉटिल मॅनेजमेंट, कॅटेरिंग टेक्नॉलॉजी अॅण्ड अॅप्लाइड न्युट्रिशन, वीर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम) - मुंबई- ४०००२८, दूरध्वनी- ०२२-४५२८४१००, ईमेल- admission@ihmctan. edu, संकेतस्थळ - ihmctan. edu,

## सर्वोत्कृष्ट संस्था

नवी दिल्लीस्थित इन्स्टिटय़ूटऑफ हॉटिल मॅनेजमेंट कॅटेरिंग अॅण्ड न्युट्रिशन ही, पर्यटन मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणारी संस्था आहे. आतिथ्यशीलता, हॉटिल व्यवस्थापन या विषयांमध्ये शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी ही आपल्या देशातील सर्वोत्कृष्ट संस्था आहे.

या संस्थेतही कौशल्य विकासास प्राधान्य देणारे पुढील अभ्यासक्रम करता येतात. (१) डिप्लोमा इन बेकरी अॅण्ड कन्फेक्शनरी- या अभ्यासक्रमाला १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो, (२) डिप्लोमा इन फूड अॅण्ड बेव्हरेजेस सर्व्हिस झ्या अभ्यासक्रमाला ७० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. (३) डिप्लोमा इन फूड प्रॉडक्शन- १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

तिन्ही पदविका अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी दीड वर्षे आहे. दीड वर्षांपैकी एक वर्षे संस्थेत प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित सहा महिने औद्योगिक घटकांमध्ये प्रात्यक्षिकाचे प्रशिक्षण दिले जाते. कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळू शकतो. या अभ्यासक्रमासाठी चाळणी परीक्षा घेतली जात नाही. प्रवेशासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची १२ वीतील गुणांनुसार गुणवत्ता यादी तयार केली जाते आणि त्याप्रमाणे प्रवेश दिला जातो. अभ्यासक्रमाचा प्रारंभ ऑगस्टमध्ये होतो.

## प्रशिक्षण संधी

पुढील संस्थांमध्ये औद्योगिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात- डिवाइन बेकरी, कॅफे दिल्ली, क्राउन प्लाझा, फोर सिजर, गझल रेस्टॉरंट, ग्रॅंड हयात, हॉलिडे इन, हयात रिजन्सी, आयटीसी ग्रॅंड, आयटीसी मोर्य, आयटीसी शेरेटन, जे डब्ल्यू मॅरिऑट, ली मेरिडियन, निर्वान, ओबेरॉय मेडन, प्राइड प्लाजा, रेडिसन ब्ल्यू, शांग्रिला, ताज सिटी सेंटर, ताजमहल, ताजपॅलेस, द ललित, लिला पॅलेस, ओबेरॉय राज विलास, ओबेरॉय उदय विलास, पार्क, द ग्रॅंड ,विवांता, वेलकम, वाईल्ड फ्लावर, रेनेसॉं, इत्यादी.

**संपर्क** - इन्स्टिटय़ूट ऑफ हॉटिल मॅनेजमेंट, लायब्ररी अव्हेन्यू, पुसा कॉम्पलेक्स, नवी दिल्ली ११००१२, दूरध्वनी- ०११-२४८४१४११, संकेतस्थळ- www. ihmpusa. net, ईमेल- ihmpusa@rediffmail. com

## राज्यशासनाची संस्था

स्वामी समर्थ महाराष्ट्र इंस्टिटय़ूट ऑफ हॉटिल मॅनिजमेंट- सोलापूर येथे असलेली ही संस्था राज्यशासनाच्या अखत्यारितील आहे. या संस्थेत पुढील पदविका अभ्यासक्रम करता येतात-

(१) डिप्लोमा इन बेकरी अॅण्ड कन्फेक्शनरी, (२) डिप्लोमा इन फूड अॅण्ड बेव्हरेजेस सर्व्हिस, (३) डिप्लोमा इन फूड प्रॉडक्शन. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी. प्रवेश १२ वीच्या गुणांवर दिला जातो.

संपर्क- ए १६०, कंबर तलावाजवळ, वैजापूर रोड, ३० सोलापूर- ४१३००४

**सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा



आता हाऊसिंग लोन
₹3.00 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध



S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# गणिताची गोडी !

**मानवी मेंदूचा** विश्लेषणात्मक विकास करण्यात आणि त्याला अधिक सक्षम करण्यात गणिताची मदत होत असल्याचे, स्टॅनफोर्ड विद्यापीठातील संशोधक डॉ. तान्या इव्हान्स यांनी त्यांच्या संशोधनाव्दारे दाखवून दिले. गणितावर प्रभुत्व मिळवल्यास कोणतीही समस्या सोडवण्याचे कौशल्य हे अधिकाधिक प्रगत होत असल्याचे अभ्यासकांना दिसून आलेय. गणितज्ज्ञ जेव्हा समस्या सोडवतात, तेव्हा त्यात स्पष्टता असते. अधिक चांगल्या तऱ्हेच्या कार्यपध्दतीसुध्दा यातून विकसित होतात.

गणितीय कौशल्यामुळे विविध व्यामिश्र समस्या अधिक साकल्याने समजून घेणे सुलभ जाते. विश्वाची रहस्ये शोधून काढण्यासाठी गणितीय सूत्रे आणि सिध्दांताचा सर्वाधिक उपयोग झाला आहे. गणित ही एकमेव वैश्विक भाषा असल्याचे समजले जाते. कोणताही देश-भाषा- प्रांत-संस्कृती यामध्ये गणितीय सूत्रे आणि सिध्दांत आणि व्याख्या बदलत नाहीत, त्यामुळे गणितज्ज्ञ कोणत्याही देशात आणि प्रांतात सहजतेने कार्यरत राहू शकतो.

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करण्यात गणिताने सर्वाधिक महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गणितीय सूत्रांचा वापर करुन नवे शोध लावले जात आहेत. चंद्रावरील स्वारी पासून ते मंगळावर यान उतरवण्यापर्यंतची किमया गणितीय सूत्रे/ प्रमेय/ सिध्दांत यांच्या मदतीनेच मानवास शक्य होऊ शकली. जगातील सर्व उंच इमारतीचा पाया, हा गणितीय सिध्दांतांनी सिध्द केल्यावरच पक्का होऊ शकला. संगणक, विमान वाहतूक, स्कॅनिंग, कोडिंग, सॉफ्टवेअर, कृत्रिम बुध्दिमत्ता आदी क्षेत्रांचा विस्मयकारक विकास हा गणितामुळेच होऊ शकला.

गणितीय सूत्रांना समजून त्यांचा वापर वेगवेगळया उत्तरासाठी शोधण्यात कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्ती प्रत्यक्ष जीवनातील अनेक जटील समस्यांना वस्तुनिष्ठपणे हाताळू शकतात. या समस्या सोडवण्यासाठी अचुकतेपर्यंत पोहचणारे उपाय सुचवू शकतात. त्यामुळेच अधिकाधिक विद्यार्थ्यांनी याविषयाकडे वळावे यासाठी जगभरात विशेष प्रयत्न केले जातात. अमेरिकेत एप्रिल महिना, गणित जाणिवजागृतीचा महिना म्हणून साजरा केला जातो. अमेरिकेचे माजी राष्ट्रपती रोनाल्ड रिगन यांनी १९८६ साली या संदर्भातील निर्णय घेतला होता. गणिताचे हे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन, भारतातही प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी या विषयाकडे वळायला हवे.

## करिअर संधी

गणितावर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तीला करिअरच्या विविध संधी मिळतात. वित्त (फायनांस), निर्मिती ( मॅन्युफॅक्चुरिंग), विमा प्रंबधन (ॲक्चुरिज), अभियांत्रिकी (इंजिनीअरिंग), दळणवळण (कम्युनिकेशन), व्यवसाय (बिझिनेस), विज्ञान (सायन्स) या क्षेत्रात यशस्वी करिअर करण्यासाठी गणितातील प्रभुत्व किंवा उत्तम आकलन महत्वाचे ठरते. ही क्षेत्रे परस्पर विरोधी दिसत असली तरी त्यांचा पाया गणितीय कौशल्य असतो, हे लक्षात ठेवायला हवे.

## काही महत्त्वाच्या संस्था

१) आयआयटी दिल्लीच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स या विभागाने बी.टेक ॲण्ड डयुएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग (मॅक) हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. जेइइ (जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) ॲडव्हान्स्ड परीक्षेतील गुणांवर आधारित या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमाच्या वैशिष्ट्यपूर्ण विषयघटकांमुळे, हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील अनेक कंपन्यांमध्ये नोकरीच्या उत्त्मोत्तम संधी सातत्याने मिळल्या आहेत. यामध्ये फायनांस (वित्त), ॲनॅलिटिक्स (विश्लेषण), कंसल्टिग (सल्ला-सेवा), क्रिप्टोग्रॅफी (डिजिटल डेटा सुरक्षितरीत्या पाठवण्याचे तंत्र किंवा भाषा. यामुळे पाठवणारा आणि स्वीकारणाराच ही माहिती वाचू/पाहू शकतो.) आधारित सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञान आदी कंपन्यांचा समावेश आहे.
**संपर्क- https:// maths. iitd. ac. in/**

२) आयआयटी गुवाहाटीच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्सने बी.टेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरु करण्यात, या आयआयटीने आघाडी घेतली.
**संपर्क- https:// www. iitg. ac. in**

३) मुंबई आयआयटीमध्ये बीएस इन मॅथेमॅटिक्स चार वर्षे कालावधीचा अभ्याक्रम करता येतो. दोन पध्दतीने प्रवेश दिला जातो- (१) जेईई ॲडव्हान्सड गुण. (२) यंदा १२ वी (गणित विषयासह विज्ञान) ची परीक्षा दिलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी, इंडियन नॅशनल मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाड कनिष्ठ किंवा वरिष्ठ अर्हता प्राप्त केली असेल ते, 'बीएस एन्ट्रन्स एक्झामिनेशन' व्दारे या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवू शकतात.
**संपर्क - math. iitb. ac. in**

४) आयआयटी इंदौर- बीटेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग सायंस.
**संपर्क- iiti. ac. in**

५) आयआयटी कानपूरच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्सने पुढील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. (१) बी.एस (बॅचलर ऑफ सायन्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक कॉम्प्युटेशन. अभ्यासक्रमाचा कालावधी - चार वर्षे. (२) बी.एस- एम.एस-(बॅचलर ऑफ सायन्स- मास्टर ऑफ सायन्स) इन मॅथेमॅटिक्स. अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षे.
**संपर्क- https:// www. iitk. ac. in/ math/ bs- ms**

६) आयआयटी वाराणसी (बनारस हिंदू विद्यापीठ) च्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्सने, डयुएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. कालावधी पाच वर्षांचा. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार औद्योगिक जगतात या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम संधी मिळत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओढा या अभ्यासक्रमाकडे दिसून येतो. या अभ्यासक्रमाला जेईई- ॲडव्हान्स्ड परीक्षेतील गुणांवर आधारित प्रवेश दिला जातो.
**संपर्क- https:// www. iitbhu. ac. in/ dept/ math**

७) आयआयटी रोपर बी.टेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग.
**संपर्क- iitpr. ac. in/ math**

८) आयआयटी कानपूर- बीएस - एमएस इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक कॉम्प्युटिंग हा इंटिग्रेटेड आणि बीएस इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक कॉम्प्युटिंग,
**संपर्क- iitk. ac. in/ maths**

९) एनआयटी( नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) सुरत - या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲण्ड ह्युमॅनिटिज मार्फत पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड एम.एस्सी इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम चालवला जातो. प्रवेशासाठी जेइइ- मेनचे गुण ग्राह्य धरले जातात.
**संपर्क- https:// www. svnit. ac. in**

१०) एनआयटी रुरकेला- इंटिग्रेटेड एम.एस्सी इन मॅथेमॅटिक्स हा पाच वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो.
**संपर्क- https:// nitrkl. ac. in/**

११) एनआयटी अगरताळा- या संस्थेमध्ये, बी.एस-एम.एस ड्युएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. कालावधी पाच वर्षे.
**संपर्क- https:// www. nita. ac. in.**

१२) एनआयटी पाटणा- इंटिग्रेटेड एम.एस्सी इन मॅथेमॅटिक्स या विषयामध्ये अभ्यासक्रम करता येतो. **संपर्क- http:// www. nitp. ac. in/**

१३) बेंगळुरु स्थित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे, बी.एस (बॅचलर ऑफ सायन्स-रिसर्च) इन मॅथेमॅटिक्स हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाच्याा प्रवेशासाठी, जेईई मेन/ ॲडव्हान्स्ड परीक्षा आणि आयसर (इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायंस एज्युकेशन ॲण्ड रिसर्च ) ॲडमिशन टेस्टचे गुण ग्राह्य धरले जातात.
संपर्क- ug. iisc. ac. in/ math.

१४) कोलकाता स्थित इंडियन स्टॅस्टिकल इन्स्टिट्यूट या संस्थेचा, बॅचलर ऑफ मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम बेंगळुरु कॅम्पस यथे करता येतो. तीन वर्षे कालावधीच्या या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा पाच हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. निवड- संस्थेच्या चाळणी परीक्षेव्दारे.
संपर्क- isical. ac. in/ admission,

१५) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकशेन ॲण्ड रिसर्च या संस्थेतील बीएस-एमएस या इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांतर्गत स्पेशलायझेशनसाठी गणित हा विषय निवडता येतो.
**संपर्क- iiser. ac. in,**

१६) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकशेन ॲण्ड रिसर्च भूवनेश्वर या संस्थेतील इंटिग्रेटेड एमएस्सी या अभ्यासक्रमांतर्गत गणित विषयात स्पेशलायझेशन करता येते.
**संपर्क- niser. ac. in,**

१७) मुंबई विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलंस इन बेसिक सायंस या अभ्यासक्रमांतर्गत गणित विषयात स्पेशलायझेशन करता येते.
**संपर्क- cbs. ac. in**

१८) चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूट येथे बीएस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स, बी.एस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स आणि बी.एस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड फिजिक्स हे प्रत्येकी तीन वर्षे कालावधीचे अभ्यासक्रम करता येतात. निवड चाळणी परीक्षेव्दारे.

१९) इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲण्ड ॲप्लिकेशन भूवनेश्वर- या संस्थेत, बीएस्सी (ऑनर्स)इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड ॲप्लिकेशन हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. यंदा ही परीक्षा २० जून २०२५ रोजी घेण्यात येईल. अर्ज करण्याची शेवटची तारीख ९ मे २०२५ ही आहे. परीक्षेचे एक केंद्र मुंबई येथे आहे. अर्हता- बारावी मध्ये गणित आणि इंग्रजी विषयांचा अभ्यास केला असावा. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या १५ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना, भारत सरकारच्या, नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स मार्फत वार्षिक ६० हजार रुपयांची, शिष्यवृत्ती दिली जाते.
**संपर्क- https:// iomaorissa. ac. in**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा १२

तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# संशोधनाची दिशा

## एक

**विज्ञान विषयातील** संशोधन कार्याला सर्वोच्च प्राधान्य देणारी, सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्स, ही संस्था मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये आहे. या संस्थेची स्थापना २००७ साली केंद्र सरकारचा अणुउर्जा विभाग आणि मुंबई विद्यापीठाने संयुक्तपणे केली.

या संस्थेत पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड एम.एससी अभ्यासक्रम, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांमध्ये करता येतो. शिवाय पीएचडी करण्याचीही सुविधा आहे. अत्याधुनिक, लवचिक अशा विषयघटकांचा समावेश इंटिग्रेटेड अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. याचा मुख्य भर प्रात्यक्षिकांवर असून विश्लेषणात्मक आणि समस्यांचे निर्धारण करणारे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे, यासाठी विषयघटकांची संरचना करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी मुंबई विद्यापीठ, आयआयटी, भाभा अणुसंधान केंद्र, टाटा मुलभूत संशोधन संस्थांमधील सर्वोत्कृष्ट अध्यापकांना बोलावले जाते. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने, या अभ्यासक्रमांची रचना करण्यासाठी साहाय्य केले आहे. ही संस्था स्वायत्त आहे.

भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये मूलभूत संशोधनास चालना आणि प्रोत्साहन देण्यासाठी, अणुऊर्जा विभागाने भुवनेश्वर येथे, मुंबईतील संस्थेसारखीच, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (नायसर), या संस्थेची स्थापना केली नायसरमध्येही पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम चालवला जातो. नायसर संस्थेचा अभ्यासक्रम होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूटशी संलग्नित आहे तर सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस या संस्थेचा अभ्यासक्रम मुंबई विद्यापठाशी संलग्नित आहे.

विज्ञान शाखेत संशोधन कार्यात आत्यंतिक रस, तीव्र आवड आणि गती असणाऱ्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी या दोन्ही संस्थांमधील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवर्जून प्रयत्न करायला हवेत.

या दोन्ही संस्थांमध्ये जागतिक दर्जाच्या प्रयोगशाळा, संगणक केंद्रे, उत्कृष्ट ग्रंथालये आहेत. विद्यार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त अशा वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

पाच वर्षाच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना विविध शाखांचे ज्ञान प्रज्ञान केले जाते. ते करताना आंतरज्ञानशाखीय शैक्षणिक प्रणालीचे तत्व अंगिकारले जाते. विद्यार्थ्याला संशोधन प्रकल्पावर कार्य करावे लागते. अनुभवी प्राध्यापक आणि संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मूळ (ओरिजनल) विषयावर संशोधन करण्याची संधी दिली जाते.

हा अभ्यासक्रम यशस्वीपणे करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील संधी मिळू शकतात- (१) भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या प्रशिक्षणासाठी थेट मुलाखतीस निवड केली जाते. (२) देश विदेशातील नामांकित संस्थांमध्ये पीएचडी अभ्यासक्रमासाठी सुलभतेने निवड होऊ शकते. (३) भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरमध्ये, वैज्ञानिक म्हणून कार्य करु शकतात. (४) पीएचडी प्राप्त केल्यावर नामांकित राष्ट्रीय संस्थांमध्ये अध्यापनाची संधी मिळू शकते. (५) कॉर्पोरेट सेक्टरमध्ये काम करण्याची संधी मिळते.

### प्रवेश प्रकिया

दोन्ही संस्थांमधील, अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, नॅशनल एन्ट्रन्स फॉर स्क्रिनिंग टेस्ट (नेस्ट) ही परीक्षा घेतली जाते.

ही संगणकाधारित, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ पध्दतीची परीक्षा आहे. पेपरमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र, या चार विषयांचे चार विभाग असतात. प्रत्येक विभागात ६० प्रश्न विचारले जातात. प्रत्येक प्रश्नाला चार गुण दिले जातात. प्रत्येक विभागात काही चुकलेल्या उत्तरांसाठी गुण कपात (निगेटिव्ह मार्किंग)केली जाते. एकूण गुण १८०.



या परीक्षेतील कोणतेही तीन विभाग सोडवता येतात. मात्र नेस्ट व्यवस्थापनाने, चारही विभाग सोडवण्याची सूचना केली आहे. ज्या कोणत्या तीन विभागात सर्वोच्च गुण मिळतात, तेच अंतिम गुणांकनासाठी ग्राह्य धरले जातात. गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्राचे प्रश्न हे ११ वी आणि १२ वीच्या एनसीइआरटी - (नॅशनल काऊन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग/ सीबीएसई- सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन) अभ्यासक्रमांवर आधारित असतात. महाराष्ट्राच्या उच्च माध्यमिक बोर्डाचा ११ वी व १२वीचा अभ्यासक्रम साधारणतः असाच आहे. ज्या विषयघटकांचा समावेश या अभ्यासक्रमात नसेल, त्याचा अभ्यास मात्र एनसीइआरटी/सीबीएसईच्या पुस्तकांतून करावा. विषयघटकांची यादी नेस्ट परीक्षेच्या माहितीपत्रकात देण्यात आली आहे. ती एकदा नजरेखालून घालणे योग्य ठरेल. ६६६. ल्ली२३ी७. ल्न या संकेतस्थळावर नेस्ट परीक्षेच्या प्रत्येक विषयाचे घटक बघता येतात. हा अभ्यासक्रम उच्च श्रेणीचा असल्याने त्याच्या प्रवेशासाठी चुरस असते. विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयाच्या मूलभूत ज्ञानाच्या आकलनाची पातळी जोखणारी ही परीक्षा आहे. त्यामुळेच एनसीईआरटी/सीबीएसइ किंवा राज्यशासनाच्या १२ वी बोर्डाचा विज्ञान विषयांचा समजून-उमजून अभ्यास करणे आवश्यक ठरते. विज्ञान विषयातील सर्व घटकांच्या संकल्पना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**कालावधी**- साडेतीन तास. महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रे- मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, रत्नागिरी, जळगाव, कोल्हापूर, सोलापूर आणि नागपूर

### अर्हता आणि पात्रता

२०२३ आणि २०२४ साली १२ वी विज्ञानशाखेतील परीक्षा ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण विद्यार्थी, नेस्ट परीक्षा देऊ शकतात. यंदा नेस्ट परीक्षा २२ जून २०२५ रोजी होणार आहे. २०२३ आणि २०२४ दोन्ही वर्षाच्या १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना समजा चांगल्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळाला नसल्यास, त्यांनी या परीक्षेचा अभ्यास करुन, त्यात चांगले गुण मिळवण्याचा प्रयत्न करायला हवा. यंदा १२ वी विज्ञान शाखेत असणारे विद्यार्थीसुध्दा ही परीक्षा देऊ शकतात. मात्र त्यांना ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि दिव्यांगासाठी गुणांमध्ये ५ टक्क्यांची सूट. ही परीक्षा देण्यासाठी उच्च वयाची अट ठेवण्यात आलेली नाही. अर्ज करण्याची शेवटची तारीख ९ मे २०२५ आहे. सरावासाठी मॉक टेस्ट १६ मे २०२५ रोजी घेतली जाईल.

### दिशा शिष्यवृत्ती

या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास दरवर्षी ६० हजार रुपयांची, 'दिशा' (डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी-इन्सेंटिव्ह स्किम फॉर होलिस्टिक सायन्स एज्युकेशन ॲण्ड ऑगमेंटेशन) शिष्यवृत्ती दिली जाते. याशिवाय दरवर्षी उन्हाळी संशोधन प्रकल्पासाठी २० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य केले जाते.

प्रवेश मिळालेल्या पहिल्यावर्षीच ही शिष्यवृत्ती लागू होते. मात्र पुढील वर्षांमध्ये, परीक्षेतील निर्धारित गुणांकांचा दर्जा राखला नाही तर, त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती योजनेपासून बाद केले जाते. मात्र, हा विद्यार्थी पुढील वर्षी निर्धारित गुणांकांच्या परिघात आल्यास, त्याला पुन्हा शिष्यवृत्ती लागू केली जाते.

## दोन

या परीक्षेव्दारे नायसर येथे २०० विद्यार्थ्यांना आणि यूएम-डीइ-सीइबीएस येथे ५७ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. शासनाच्या नियमानुसार विविध संवर्गासाठी जागा राखीव ठेवल्या जातात.

संपर्क- (१) चीफ कुआर्डिनेटर, नेस्ट २०२१, एनआयएसईआर, भुवनेश्वर, पोस्ट ऑफिस, जतनी खुर्दा- ७५२०५०, ओडिशा, ईमेल- nest- exam@niser. ac. in, (२) यूएएम-डीएई-सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस, नालंदा, नॅनो सायन्स इमारतीच्या विरुध्द बाजूला, मुंबई- ४०००९८, दूरध्वनी- ०२२-२६५३२१३२, ईमेल- nfo@cbs. ac. in, संकेतस्थळ- cbs. ac. in

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणांरी, इंडियन असोशिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायंस, ही स्वायत्त संस्था, संशोधन कार्यास प्राधान्य देणारा, इंटिग्रेटेड बॅचलर्स-मास्टर्स प्रोग्रॅम इन सायंस (बीएस-एमएस), हा अभ्यासक्रम चालवत असते. हा पाच वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम असून तो भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र, संगणकशास्त्र या विषयांमध्ये करता येतो.

पहिल्या तीन सत्रांमध्ये, या विषयांच्या मुलभूत बाबी शिकवल्या जातात. चौथ्या सत्रापासून विद्यार्थ्यांना या विषयांपैकी एक मुख्य विषय अध्ययनासाठी निवडता येतो. सातव्या सत्रापासून थेट संशोधन कार्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ८ जून २०२५ रोजी, युजी प्री इंटव्ह्यू स्क्रीनिंग टेस्ट (युपीएसटी) घेतली जाईल. या परीक्षेतील गुणांवर आधारित मुलाखतीसाठी उमेदवारांची निवड केली जाते. त्यानंतर या अभ्यासक्रमासाठी ८० विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

अर्हता - या परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने १२ वीमध्ये गणिताचा अभ्यास केलेला असावा. १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० एप्रिल २०२५.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार या अभ्यासक्रमातून पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या वर्षी बाहेर पडता येते. त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी प्रदान केली जाते.

संपर्क - २ ए आणि २ बी, राजा एस.सी मल्लिक रोड, कोलकाता– ७०००३२, ईमेल- helpdesk@iacs. res. in, संकेतस्थळ- www. iacs. res. in, दूरध्वनी-०३३-२४७३४९७१

सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
प्रस्तुत



आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%* द.सा. पासून

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# ‘सागरा’चे बोलावणे !

सागरी क्षेत्रातील व्यापारी आणि प्रवासी वाहतुकीचा, भारताच्या आर्थिक सामाजिक विकासात मोठा सहभाग आहे. जहाजांचे पुनर्वापर (शिप रिसायकलिंग) मध्ये, भारताचा जगात दुसरा क्रमांक, मेरिटाइम (सागरी) क्षेत्रात मनुष्यबळ पुरवठा करण्यात ५ वा क्रमांक आणि जहाजबांधणी किंवा निर्मितीमध्ये २१ वा क्रमांक लागतो. पोर्ट, शिपिंग आणि वाटरवेज (बंदरे, जहाज वाहतूक, जलमार्ग) मंत्रालयाने, मेरिटाइम व्हिजन २०३० तयार केले आहे. त्यानुसार भारताला मेरिटाइम क्षेत्रात, जागतिक क्षेत्रावर आघाडी घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या व्हिजनमध्ये, जागतिक स्तराच्या दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण मेरिटाइम शिक्षण-प्रशिक्षण आणि संशोधनाला ठळक स्थान देण्यात आल्याने, भारताला या क्षेत्रात जागतिक पातळीवर आपले स्थान मजबूत करणे शक्य होईल. ही बाब लक्षात ठेऊन पुढील काळात, मेरिटाइम क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या भारतीय तरुण-तरुणींना, कॅप्टन, इंजिनीअर, शिप बिल्डर, डिझायनर, पोर्ट मॅनेजर, लॉजिस्टिक एक्सपर्ट अशासारख्या करिअर संधी मिळू शकतात.

इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटीने (आयएमयू) या क्षेत्रातील उद्योगांची गरज, सक्षमतेने भागवू शकणाऱ्या मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी दर्जेदार अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील उद्योगामध्ये उत्तमोत्तम संधी मिळाल्या आहेत.

भारत सरकारच्या पोर्ट, शिपिंग आणि वॉटरवेज मंत्रालयाच्यां अंतर्गत कार्यरत असणाऱ्या या संस्थेला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. या संस्थेची स्थापना २००८ साली करण्यात आली. या संस्थेचे मुख्यालय व मुख्य कम्पस चेन्नई येथे असून कोची, कोलकाता, मुंबई बंदर, नवी मुंबई, विशाखापट्टणम येथे इतर कॅम्पस आहेत. या संस्थेत पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रम करता येतात.

खडतर परिश्रम करण्याची तयारी, सागरावरील कोणतेही आव्हान स्वीकारण्याची मानसिकता असलेल्या तरुणांसाठी सागरी वाहतुकीच्या क्षेत्रात उत्कृष्ट करिअर घडवता येते. आयएमयू मार्फत वेगवेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, आयएमयू सीइटी, दरवर्षी घेतली जाते. डायरेक्टरेट जनरल ऑफ शिपिंगने, मान्यता प्रदान केलेल्या इतर सर्व मेरिटाइम प्रशिक्षण संस्थांनी, आयएमयू सीईटीच्याच गुणांवरच प्रवेश देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## आयएमयूचे पदवी अभ्यासक्रम

(१) बी.एससी इन नॉटिकल सायन्स (चेन्नई, नवी मुंबई आणि कोची कॅम्पस), (२) बीटेक- मरिन इंजिनीअरिंग (चेन्नई कोलकता, मुंबई पोर्ट ट्रस्ट कॅम्पस), (३) बीटेक - नेव्हल आर्किटेक्चर ॲण्ड शिप बिल्डिग इंजिनीअरिंग, (विशाखापटट्टणम कॅम्पस) (४) बीटेक- नॅव्हल आर्किटेक्चर ॲण्ड ओशन इंजिनीअरिंग, (विशाखापटट्टणम कॅम्पस), (५) डिप्लोमा इन नॉटिकल सायन्स (चेन्नई, नवी मुंबई आणि कोची कॅम्पस), (६) बीबीए लॉजिस्टिक्स, रिटेलिंग ॲण्ड ई-कॉमर्स, (चेन्नई आणि कोची कॅम्पस), (७) बीबीए लॉजिस्टिक्स (एक वर्षाच्या इंटर्नशीपसह) विशाखापट्टणम

### प्रवेश प्रक्रिया

बी.टेक इन (मरिन इंजिनिअरिंग, नेव्हल आर्किटेक्चर ॲण्ड ओशन इंजिनीअरिंग, नॅव्हल आर्किटेक्चर ॲण्ड शिप बिल्डिग), बी.एस्सी इन नॉटिकल सायन्स आणि डिप्लोमा इन नॉटिकल सायन्स या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दरवर्षी मे किंवा जून महिन्यात, कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटी-सीइटी-आयएमयू-सीईटी) देशभरातील विविध शहरांमध्ये घेतली जाते.यंदा ही परीक्षा २४ जून २०२५ रोजी मुंबई, नागपूर, नासिक, सोलापूर आणि पुणे या केंद्रांवर घेतली जाईल. अर्ज भरण्याची शेवटची तारीख २ मे २०२५.

(सेंट्रल युनिव्हर्सिटी एन्ट्रस टेस्ट- अंडर ग्रॅज्युएट, ही परीक्षा दिलेल्या उमेदवारांना बीटेक अभ्यासक्रमांमध्ये मर्यादित स्वरुपात प्रवेशाची संधी दिली जाते. तिसऱ्या फेरीनंतर जागा शिल्लक राहिल्यास अशा उमेदवारांना प्रवेश दिला जातो.)

बीबीए अभ्यासक्रमाला प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश, या तत्वावर प्रवेश दिला जातो. प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ वीतील कोणत्याही शाखेत किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.



पदवी अभ्यासक्रमाच्या, चाळणी परीक्षेत बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या २०० प्रश्नांचा समावेश असतो. या प्रश्नांमध्ये १२ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित इंग्रजी, सामान्य कलचाचणी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या विषयांचे प्रश्न विचारले जातात. पेपरचा दर्जा हा १२ वीचा असतो.

मरिन इंजिनिअरिंग आणि नॉटिकल सायन्स हे अभ्यासक्रम करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ असणे आवश्यक आहे. या उमेदवारांना सागरी पर्यावरणात काम करायचे असते. हे पर्यावरण अत्यंत बेभरवशाचे असून त्यात कोणत्याही क्षणी अनपेक्षित बदल घडण्याची शक्यता कायम लक्षात ठेवावी लागते. सागरी प्रवास हा मोठ्या कालावधीचा असतो. त्यामुळे अनेकदा बरेच दिवस वा महिने सागरावर राहावे लागते. त्यादृष्टीने शारीरिक क्षमतेची मानके डायरेक्टोरट जनरल ऑफ शिपिंग यांनी निर्धारित केली आहेत. या मानकांच्या विस्तृत माहितीसाठी संपर्क संकेतस्थळ– http:// www. dgshipping. gov. in/ Content/ MaritimeHealthBranch. aspx.

## बी.एससी इन नॉटिकल सायन्स

हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना सी-फेअरर्स या पदनामापासून सुरू होणारी करिअर संधी मिळते. जहाजाचा प्रवास सुरू असताना, जहाजाचे कार्यान्वयन, देखभाल, दुरुस्ती, स्वच्छता, जहाजावरील खानपान व्यवस्थापन, इतर कर्मचारी आणि कामगार यांची तरतूद आदी कामे· या उमेदवारांना करावी लागतात. भारतीय सी-फेअरर्सची कार्यक्षमता, गुणवत्ता आणि दर्जा उत्कृष्ट असल्याने त्यांना जगभरातून मोठी मागणी आहे. या उमेदवारांना मालवाहू जहाजांच्या संनियंत्रणाचे काम, सागरावरील दळवळणासाठी आवश्यक असलेले कौशल्य शिकवले जाते.

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील करिअर संधी मिळतात- (१) मरिन ऑपरेशन्स मॅनेजर, (२) मरिन इन्श्युरन्स स्पेशॅलिस्ट, (३) मरिन टर्मिनल मॅनेजर, (४) शिपिंग एजंट, (५) डेक ऑफिसर, (६) मरिन पायलट, (७) मरिन टेक्निशिअन

### अर्हता

(१) बी.एस्सी इन नॉटिकल सायन्स- खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना १२ वी विज्ञान परीक्षेत, भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयासह ६० टक्के गुण मिळणे आवश्यक. १० वी आणि १२ वीमध्ये इंग्रजी विषयात किमान ५० टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांना एकूण गुणांमध्ये ५ टक्के सूट. इंग्रजी विषयासाठी ही अट लागू नाही. कालावधी- तीन वर्षे.

(२) डिप्लोमा इन ॲप्लाइड नॉटिकल सायन्स - १२ वी विज्ञान परीक्षेत, भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयासह ६० टक्के गुण मिळणे आवश्यक किंवा ६० टक्के गुणांसह भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयासह बी.एस्सी किंवा ६० टक्के गुणांसह बी.एस्सी इन इलेक्ट्रॉनिक्स. तीन वर्षांच्या या अभ्यासक्रमात एका वर्षी भौतिकशास्त्राचा अभ्यांस केलेला असावा किंवा मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थेतील ५० टक्के गुणांसह बी.ई/बी.टेक पदवी. १० वी आणि १२ वीमध्ये इंग्रजी विषयात किमान ५० टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांना एकूण गुणांमध्ये ५ टक्के सूट. इंग्रजी विषयासाठी ही अट लागू नाही. कालावधी -एक वर्ष.

## बी.टेक इन मरिन इंजिनिअरिंग

मर्चंट नेव्हीच्या क्षेत्रात, व्यापारी व प्रवासी जहाजाचे संनियंत्रण करणाऱ्या कप्तानाचे महत्व फार मोठे असते. अशा जहाजाची, सुरक्षा - देखभाल-दुरुस्ती आणि सुव्यवस्थित व्यवस्थापनाचे कौशल्य, प्राप्त केलेल्या उमेदवारांना चांगली मागणी आहे.

या अभ्यासक्रमात मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि मरिन इंजिनिअरिंगचे सैध्दांतिक आणि प्रात्यक्षिक ज्ञान प्रदान केले जाते. याद्वारे व्यापारी जहाजाच्या यंत्रसामग्रीची हाताळणी, देखभाल आणि दुरुस्ती करणे सुलभ जाते. जहाजाची यंत्रसामग्री, इंजिन यांची देखभाल दुरुस्ती, जहाजाचे सुरळित कार्यान्वयन करणे, अशासारखी कामे मरिन इंजिनीअरला करावी लागतात. त्यामुळे ही यंत्रणा सुरक्षित आणि सुव्यस्थित ठेवण्याचे कौशल्य आणि ज्ञान असणे गरजेचे आहे. ही गरज, बी.टेक इन मरिन इंजिनिअरिंग, हा अभ्यासक्रम पूर्ण करतो. या अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षे आहे.

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर संबंधित उमेदवाराचे करिअर, मर्चंट किंवा व्यापारी जहाजावर ज्युनिअर इंजिनीअर म्हणून सुरु होते. या जहाजावर विशिष्ट कालावधी घालवल्यानंतर आणि डायरोक्टोरेट जनरल ऑफ शिपिंग, यांच्या वतिने घेण्यात येणारी परीक्षा द्यावी लागते. त्यानंतर हा अभियंता, जहाजाचा मुख्य अभियंता बनण्यासाठी पात्र ठरतो.

करिअर संधी- (१) मरिन इंजिनीअर, (२) प्रोजेक्ट मॅनेजर, (३) ऑपरेशन मॅनेजर, (४) मरिन सर्व्हेअर, (४) कंसलटंट, (५) रिसर्चर

संपर्क- आयएमयू, इस्ट कोस्ट रोड, सेम्मेनचेरी, चेन्नई-६००११९, दूरध्वनी- ०४४-२४५३ ९०२०, इमेल- academicscell@imu. ac. in,संकेतस्थळ- imu. ac. in

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.35%* द.सा. पासून

*अटी लागू

S. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# फॅशन डिझाइन ग्लॅमर आणि संधी

**भारतीय फॅशन** उद्योगाला वेगळ्या उंचीवर नेण्याची कामगिरी गेल्या ३५ वर्षांत, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या बॅचलर ऑफ डिझाइन इन फॅशन डिझाइन । अभ्यासक्रम केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी केली आहे. हा अभ्यासकम बेंगळुरु, चेन्नई, गांधीनगर, हैद्राबाद, कानपूर, कोलकाता , मुंबई, नवी दिल्ली, पाटणा, रायबलेरी, शिलाँग, कांग्रा, जोधपूर, भुवनेश्वर, आणि श्रीनगर येथे शिकवला जातो. या कॅम्पसमध्ये ७१९ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

सध्याचे फॅशन प्रवाह आणि त्याअनुषंगाने भविष्यातील विविधांगी जागतिक फॅशन कल, प्रवाह आणि शक्यतांचा सर्जनशील विचार करण्याची क्षमता या अभ्यासक्रमातील विषय घटकांव्दारे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी अभ्यासक्रमात सातत्याने बदल, नव्या तंत्रज्ञानाचा वापर आणि या क्षेत्रातील उद्योगांसोबत सहकार्य या तीन बाबींचा अवलंब करण्यात येतो. सध्याचे फॅशन कल आणि प्रवाह, आयात-निर्यात आणि उद्योगाच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन विषय घटक निर्धारित केले जातात.

बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग हा एनआयएफटीचा फ्लॅगशिप म्हणजेच सर्वात महत्त्वाचा अभ्यासक्रम समजला जातो. सतत नाविन्याचा ध्यास घेतलेल्या या क्षेत्रासाठी बहुआयामी सर्जनशीलता असलेल्या मनुष्यबळाचा पुरवठा गेली तीन दशकांपासून ही संस्था करत आहे. हा अभ्यासक्रम केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी देशासोबतच परदेशातही मोठे नाव कमावले आहे.

## काय शिकाल?

या अभ्यासक्रमात- (१) डिझाइन अ‍ॅण्ड इलस्ट्रेशन, (२) अ‍ॅपिरल डेव्हलपमेंट विथ पॅटर्न मेकिंग, (३) ड्रेपिंग अ‍ॅण्ड गार्मेंट कन्स्ट्रक्शन या मुख्य विषयांचा समावेश आहे. याशिवाय फॅशनचा इतिहास आणि समकालीन फॅशन, समकालीन सांस्कृतिक सामाजिक विषयांचा फॅशन प्रवाहावर पडणारा परिणाम, उद्योगांच्या विविध गरजा आदी विषय घटकांचाही समावेश केला जातो. विविध स्तरातील ग्राहकांच्या गरजेनुसार फॅशन डिझाइन करता येणे शक्य व्हावे यासाठी तंत्रकुशलता वाढवली जाते. प्रात्यक्षिकांसाठी खास सॉफ्टवेअर प्रोग्रॅम तयार करण्यात आले असून त्यामुळे सर्जनशील कल्पनांचा विस्तार करणे आणि सादरीकरणाचे तंत्र हस्तगत करणे शक्य होते.

आंतरराष्ट्रीय फॅशन प्रवाह आणि कल यांचा सूक्ष्म अभ्यास विद्यार्थ्यांना या अभ्यासांतर्गत करायला मिळतो. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाची कक्षा वैश्विक स्वरुपाची होते. विद्यार्थ्यांना भारतीय पारंपारिक शिवणकाम कला, कौशल्य व तंत्राचेही ज्ञान प्राप्त करुन दिले जाते. त्यामुळे आधुनिकता आणि पारंपरिकता यांचा सुयोग्य संयोग साधणे सहजसुलभ ठरते.

या अभ्यासक्रमामध्ये - (१) अभिकल्प प्रक्रिया, (२) व्यावसायिक पध्दती, (३) फॅशन अभ्यास, (४) फॅशन आरेखन आणि अभिकल्प, (५) पोर्टफोलिओ डेव्हलपमेंट, (६) पॅटर्न मेकिंग, (७) मेन्सवेअर डिझाइन अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ड्रेपिंग, (८) आंत्रप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट, (९) गार्मेंट कन्स्ट्रक्शन, (११) सर्फेस डेव्हलमेंट टेक्निक, (१२) रिसर्च मेथड्स, (१३) एलिमेंट्स ऑफ टेक्सटाइल्स, (१४) क्राफ्ट क्लस्टर स्टडी, (१५) हिस्ट्री ऑफ डिझाइन अ‍ॅण्ड फॅशन कोट्युर(ग्राहकाच्या विशिष्ट आवश्यकता आणि मोजमापानुसार फॅशन कपड्यांची रचना), डिझाइन, (१६) डिजिटल इलस्ट्रेशन अ‍ॅण्ड प्रेझेंटेशन, (१७) थिएटर कॉस्चुम्स अ‍ॅण्ड डिझाइन, (१८) मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस, (१९) मार्केटिंग, (२०) डिझाइन कलेक्शन हे विषय घटक शिकवले जातात.

या संस्थेच्या सर्व कॅम्पसमध्ये पॅटर्न मेकिंग, ड्रेपिंग आणि गार्मेंट कन्स्ट्रक्शन या विषयांसाठी अत्याधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्ज अशा प्रयोगशाळांची सुविधा आहे. अंतिम सत्रात उद्योगांशी संबंधित व त्यांनी प्रायोजित केलेल्या प्रकल्पावर काम करावे लागते किंवा स्वतःच्या सर्जनशीलतेने विविध डिझाइनची निर्मिती करावी लागते. वस्त्रोद्योग मंत्रालयामार्फत दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनात पदवीधरांच्या डिझाइन्स ठळरित्या प्रदर्शित केल्या जातात.

या अभ्यासक्रमांतर्गत (१) लक्झरी अ‍ॅण्ड कोट्युर, २) फॅशनिंग इंटरसेक्शन, इमेज अ‍ॅण्ड स्टायलिंग, (३) ग्लोबल रिटेल फॅशन बिझनेस, (४) फॅशन इनोव्हेशन या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

## करिअर संधी

हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना (१) अ‍ॅथलेश्युअर डिझायनर,(२) डिझायनर्स फॉर स्पेशल नीड्स, (३) इंडस्ट्रिअल डिझायनर, (४) फॅशन मर्कडायझर, (५) व्हिज्युएल मर्कडायझर, (६) रिटेल/एक्स्पोर्ट आंत्रप्रिन्युर, (७) आर्टिसनल फॅशन डिझायनर, (७) कन्सलटंट, (८) पर्सनल शॉपर, (९) स्टायलिस्ट, (१०) कॉस्चुम डिझायनर, (११) वार्डरोब मॅनेजर, (१२) नवीन फॅशन प्रवाह भविष्यवक्ते, (१३) फॅशन रेखाटन तज्ज्ञ, अशा विविध संधी मिळू शकतात.

## प्लेसमेंट

हा अभ्यासक्रम केलेल्या बहुतेक सर्वच विद्यार्थ्यांना पुढील कंपन्यांमध्ये उत्तमोत्तम करिअर संधी मिळत असते. प्लेसमेंटची प्रकिया दिल्ली येथील कॅम्पसमध्ये राबवली जाते.

(१) रिटेल क्षेत्र- रिलायन्स रिटेल, रेमंड्स, तनैरा, टीसीएनएस, पँटलून्स, ब्लॅक बेरी, लँडमार्क, गूडअर्थ, आदित्य बिर्ला फॅशन अ‍ॅण्ड रिटेल, (२) टेक्स्टाईल मिल- अरविंद, रेमंडस, कलाकुसर क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्था, (३) ई कॉमर्स क्षेत्र- अ‍ॅमेझान, मायंत्रा, एजिओ, फर्स्ट सिटी, टाटा क्लिक, (४) फॅशन प्रवाह भविष्यवेत्या कंपन्या- डब्ल्यूजीएसएन, पॅटर्न बँक, (५) फॅशन डिझायनर्स- गौरव गुप्ता, सब्यासाची मुखर्जी, राजेश प्रताप सिंग, रितू बेरी, तरुण तहलियानी, संदीप खोसला, मनीष मल्होत्रा, अमित अग्रवाल, सुकेतू धीर, राहूल मिश्रा, अनिता डोंगरे, अबू जानी, (६) आयात निर्यात कंपनी- ओरिएंट क्रॅफ्ट, स्पॅन इंडिया, मॉडेलामा एक्स्पोर्टस, ली अ‍ॅण्ड फंग, टायबर्ग अ‍ॅण्ड इम्पल्स,

## उद्योजकतेला प्रोत्साहन

हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची कास धरावी यासाठी संस्थेमार्फत प्रोत्साहन दिले जाते. हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी, स्वतःचा फॅशन बँड विकसित करुन, व्यवसायात उतरु शकतात. चित्रपटातील नट/नट्या, मोठे उद्योजक, इतर क्षेत्रातील वलयांकित व्यक्ती (सेलिब्रिटिज), इव्हेंट्स, फॅशन शोज आदीसांठी फॅशन स्टायलिस्ट म्हणून स्वतंत्ररित्या काम करण्याची संधी मिळू शकते. नाटक/ चित्रपट/ टीव्ही कार्यक्रम यातील शेकडो पात्रांसाठी लागणाऱ्या पोषांखाचे डिझाइन करण्याची फार मोठी संधी गेल्या काही वर्षात निर्माण झाली आहे. ऐतिहासिक/धार्मिक कार्यक्रमांच्या संख्येत वाढ झाल्याने यातील पात्रांसाठी बहुढंगी/बहुरंगी पोषांखाची मागणीही वाढली आहे.

## नवा अभ्यासक्रम

एनआयएफटीमध्ये बॅचलर ऑफ डिझाइन हा अभ्यासक्रम, फॅशन डिझायनिंग, निटवेअर डिझयनिंग, टेक्स्टाइल डिझायनिंग, डिझयनिंग, लेदर डिझायनिंग, फॅशन कम्युनिकेशन या विषयांमध्ये करता येतो. २०२५ च्या शैक्षणिक वर्षापासून, बॅचलर ऑफ डिझायनिंग इन फॅशन इंटेरिअर हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

या अभ्यासक्रमांतर्गत (१) लक्झरी डिझाइन, (२) एक्झिबिशन डिझाइन आणि (३) व्हर्न्याक्युलर डिझाइन या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

## काय शिकाल?

(१) फंडामेंटल्स ऑफ फॅशन, (२) फॅशन फिलॉसॉफी, (३) इंटेरिअर डिझाइन स्टुडिओ, (३) रेसिडेंशिअल, कर्मशिअल अ‍ॅण्ड पब्लिक स्पेसेस, (४) डिझाइन रिप्रेझेंटेशन, (५) डिजिटल कम्युनिकेशन, (६) ऑगमेंटेड रिअ‍ॅलिटी, व्हर्च्युअल रिअ‍ॅलिटी, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (७) इनोव्हेटिव्ह मटेरिअल, (८) फिटिंग फर्निचर आणि फिक्चर, (९) एन्व्हिरॉन्मेंटल डिझाइन, (११) मटेरिअल स्किन अ‍ॅण्ड फर्निशेस, (१२) प्रोफेशनल प्रॅक्टिसेस, (१३) एस्टिमेशन अ‍ॅण्ड कॉस्टिंग, (१४) डिझाइन रिसर्च, (१५) पेपर मेकॅनिक्स, (१६) फॅब्रिक इन इंटेरिअर, (१७) कलर इन इंटेरिअर.

## करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) इंटिरिअर स्टायलिस्ट (कॉर्पोरेट /रिटेल/ हॉस्पिटॅलिटी/ हेल्थ केअर), (२) सेट डिझायनर, (३) इव्हेंट डिझायनर, (४) लक्झरी डिझायन, (५) क्रॅफ्ट डेकॉर डिझायनर, (६) लायटिंग स्टायलिस्ट, (७) फर्निचर स्टायलिस्ट, (८) इंटिरिअर लँडस्केप स्टायलिस्ट, (९) कलर कन्सलटंट, (१०) व्हिज्युअल मर्कडायजिंग

हा अभ्यासक्रम यंदा श्रीनगर कॅम्पसमध्येच करता येईल.

संपर्क- https:// nift. ac. in/ admission

## शिष्यवृत्ती

एनआयएफटीमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे साहाय्य केले जाते. आर्थिक विवंचनेमुळे विद्यार्थी एनआयएफटीच्या शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी, 'सार्थक' ही शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक संवर्गातील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. यासाठी विहित नमुन्यात आणि आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा लागतो.

या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांना, या संवर्गासाठी असलेली राष्ट्रिय शिष्यवृत्ती दिली जाते. याची विस्तृत माहिती, scholarship. gov. in या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर ठेवण्यात आली आहे. या पोर्टलच्या माध्यमातूनच दोन्ही संवर्गातील उमेदवारांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा लागेल. एनआयएफटीची सर्व १९ कॅम्पसेस या पोर्टलशी जोडली गेली आहेत.

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



@9.25%* द.सा.पासून
ॲसेट बॅक्ड क्रेडिट
तुमच्या व्यवसायवृद्धीसाठी सदैव तत्पर
कर्जाची रक्कम ₹ 1 कोटी* पर्यंत
वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने *

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# पायलट व्हा !

**भारतीय** नागरी हवाई वाहतूक उद्योग, हा अतिशय गतीने वाढणार उद्योग ठरला आहे. या उद्योगामध्ये देशांतर्गत व परदेशातील नागरी विमान सेवा, मालवाहतूक सेवा (एअर कार्गो), एअर टॅक्सी ऑपरेशन, चार्टर्ड विमान सेवा यांचा समावेश होतो. कोविडच्या धक्क्यातून हा उद्योग पूर्णपणे सावरला आहे. जागतिक पातळीवर भारत हा देशांतर्गत हवाई वाहतुकीमध्ये तिसऱ्या क्रमांकाचा देश ठरला आहे. इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत भारत, जगातील सर्वाधिक हवाई प्रवासी वाहतूक करणारा देश ठरण्याची शक्यता आहे.

या क्षेत्राची मागणी लक्षात घेऊन विमानांची संख्या वाढवली जात आहे. २०२७ पर्यंत विमानांची संख्या ११शे पर्यंत जाऊ शकते. गेल्या वर्षभरात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशी संख्येत साडेतेरा टक्क्यांनी वाढ झाली आहे. या वाढीमुळे २०३८ पर्यंत २३८० वाणिज्यिक (कमर्शिअल) विमानांची गरज भासू शकते.

या सर्वबाबी लक्षात घेता, हवाई वाहतूक क्षेत्रासाठी तज्ज्ञ मनुष्यबळाची गरजही सारखी वाढत आहे. यामध्ये विशेषतः पायलट म्हणजेच वैमानिकांची गरज अधिकाधिक लागणार आहे. उत्कृष्ट वैमानिकांना कोणतीही विमानसेवा तत्काळ उत्तम करिअरची संधी देते. वैमानिकाचे शिक्षण-प्रशिक्षण घेऊन ठेवल्यास, उत्कृष्ट करिअर घडवण्यासाठी ते उपयुक्त ठरु शकते.

## इंदिरा गांधी राष्ट्रीय उडाण ॲकॅडमी

हवाई क्षेत्रातील करिअरच्या संधी लक्षात घेऊन भारत सरकारने, इंदिरा गांधी राष्ट्रीय उडाण ॲकॅडमी, ही या क्षेत्रासाठी आवश्यक असणारे शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी संस्था सुरू केली. ही आपल्या देशातील आणि दक्षिण आशियातील दर्जेदार आणि नामवंत प्रशिक्षण संस्था होय. गेल्या दोन दशकांपासून केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणारी ही स्वायत्त संस्था आहे.या संस्थेकडे, जागतिक दर्जाची अत्याधुनिक साधनसामग्री आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामवंत विमानसेवांमध्ये वैमानिक म्हणून संधी मिळाली आहे.

## कमर्शिअल पायलट लायसन्स कोर्स

या संस्थेचा अभ्यासक्रम, ॲब इनिशिओ टू कमर्शिअल पायलट लायसन्स कोर्स, या नावाने ओळखला जातो. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा आहे.या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरु झाली आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख दि. २ मे २०२५ आहे. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन चाळणी परीक्षा दि. २४ मे २०२५ रोजी घेतली जाईल.

**अर्हता-** (१) हा अभ्यासक्रम करु इच्छिणाऱ्या खुल्या संवर्गातील विद्यार्थ्याला १२ विज्ञान परीक्षेत गणित, भौतिकशास्त्र आणि इंग्रजी या विषयांमध्ये सरासरीने ५० टक्के गुण मिळणे आवश्यक ठरते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांना ४५ टक्के गुण मिळायला हवेत. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या संवर्गापेक्षा ५ टक्के गुणांची सूट दिली जाते. मात्र ही सूट दिल्यानंतरही या संवर्गातील विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकले नाहीत, तर तेवढ्या जागा खुल्या संवर्गाला दिल्या जातात.

(२) विद्यार्थ्याने वयाची किमान १७ वर्षे पूर्ण केली असावित. केंद्रशासनाच्या नियमानुसार कमाल वयोमर्यादा पुढीलप्रमाणे - खुला संवर्ग- २८ वर्षे, नॉन क्रिमिलेयर इतर मागास संवर्ग- ३१ वर्षे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती संवर्ग- ३३ वर्षे.

## निवड प्रक्रिया

(१) या अभ्यासक्रमाच्या निवडीसाठी देशातील विविध केंद्रांवर चाळणी परीक्षा घेतली जाते. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर आणि पुणे, या केंद्रांचा समावेश आहे. चाळणी परीक्षेच्या ऑनलाइन पेपरमध्ये सामान्य इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र, रिझनिंग-(कार्यकारणभाव), करंट अफेअर्स(चालू घडामोडी) या विषयांवर प्रश्न विचारले जातात. पेपरचा दर्जा बारावीच्या पातळीचा असतो. प्रश्न बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ पध्दतीचे असतात. लेखी परीक्षेच्या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते.



(२) मुलाखती- गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांच्या मुलाखती, संस्थेच्या रायबरेली कॅम्पसमध्ये घेतल्या जातात.

(३) पायलट ॲप्टिट्यूड टेस्ट- मुलाखतीनंतर निवडक विद्यार्थ्यांना पायलट ॲप्टिट्यूड टेस्ट आणि सायकोमेट्रिक (मानसशास्त्रीय) चाचणीसाठी बोलावले जाते. या चाचणीमध्ये राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणांमध्ये कोणतीही सूट दिली जात नाही.

चाळणी परीक्षेचे शुल्क खुला संवर्ग व इतर मागास वर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी बारा हजार रुपये आहे. अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेचे शुल्क भरावे लागत नाही. मुलाखत आणि पायलट ॲप्टिट्यूड टेस्टसाठी निवड झालेल्या अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या श्रेणीचे रेल्वेचे प्रवासभाडे दिले जाते.

या प्रशिक्षणात जमीनवरील आणि हवेतील प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना, कमर्शिअल पायलट लायसन्स प्रदान केले जाते.या अभ्यासक्रमाच्या कालावधीत विविध प्रकारची आणि इंजिन क्षमता असलेली विमाने हाताळता येतात.

या अभ्यासक्रमाला एकूण १२५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. यामध्ये ५० विद्यार्थी खुल्या गटातील, १९ अनुसूचित जाती, ९ अनुसूचित जमाती आणि ३४ इतर मागास वर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## प्रशिक्षणाचे शुल्क

या अभ्यासक्रमाची फी ४५ लाख हजार रुपये आहे. याशिवाय गणवेष, अभ्यासाचे साहित्य, नेविगेशन कॉम्प्युटर, हेडफोन,परीक्षा आणि पायलट परवाना फी यासारख्या बाबींसाठी आणखी २ लाख रुपये भरावे लागतात. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या राहण्यासाठी संस्थेने वसतीगृहाची व्यवस्था केली आहे. मुलींसाठी स्वंतत्र होस्टेल आहे. या वसतिगृह आणि भोजन खर्च दर महिन्याला पंधरा हजार रुपये असून एका खोलीत दोन विद्यार्थ्यांना राहावे लागते.

## इतर अभ्यासक्रम

(१) एअरक्राफ्ट मेंटनन्स इंजिनीअरिंग या संस्थेने, हा तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रमही सुरु केला आहे. या अभ्यासक्रमाला चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो. अर्हता- भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयांसह १२ वीमध्ये ५० टक्के गुण (खुला संवर्ग), ४५ टक्के गुण राखीव संवर्ग.

(२) बीएससी -एव्हिएशन

बॅचलर ऑफ सायन्स इन एव्हिएशन या अभ्यासक्रमाचा पर्याय, वैमानिक प्रशिक्षणासोबतच विद्यार्थी स्वीकारु शकतात. या तीन वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमाला ४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.(यंदाच्या शैक्षणिक वर्षात ही संख्या ८० पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.) राम मनोहर लोहिया विद्यापीठ अवध, मार्फत पदवी प्रदान केली जाते.

**संपर्क-** द डायरेक्टर, इंदिरा गांधी राष्ट्रीय उड्डाण ॲकॅडेमी, फुरसतगंज एअर फिल्ड- २२९३०२,जिल्हा अमेठी, दूरध्वनी-०५३५ - २४६१५३७०, संकेतस्थळ- www. igrua. gov. in, ई-मेल- admissions@igrua. in

## बॉम्बे फ्लाईंग क्लब

बॉम्बे फ्लाईंग क्लबने, वैमानिक प्रशिक्षण आणि एअरक्रॉफ्ट दुरुस्ती देखभालीचे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या संस्थेला भारत सरकारची मान्यता मिळाली आहे.या क्षेत्रातील शिक्षण- प्रशिक्षण देणारी सर्वाधिक जुनी संस्था आहे.

## अभ्यासक्रम

(१) कमर्शिअल पायलट लायसन्स हा अभ्यासक्रम २०० तासांचा आहे. त्याचा कालावधी हा साधारणतः ८ ते १० महिन्यांचा भरतो. भौतिकशास्त्र आणि गणित विषयात १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास हा अभ्यासक्रम करता येतो. या दोन्ही विषयात किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत.इंग्रजीवर प्रभुत्व असल्यास उत्तम.

(२) बॅचरल ऑफ सायन्स इन एव्हिएशन - या अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षे आहे. अर्हता-भौतिकशास्त्र, गणित आणि इंग्रजी विषयांसह १२ वी उत्तीर्ण. या अभ्यासक्रमात जमिनीवरील प्रशिक्षण, हवाई प्रशिक्षण आणि हवामानशास्त्राचा समावेश आहे. कमर्शिअल लायसन्स पायलटचा परवाना मिळण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता या अभ्यासक्रमामुळे प्राप्त होते. हा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे. हवाई प्रशिक्षण जुहू (मुंबई) आणि धुळे इथे दिले जाते.

(३) बॅचरल ऑफ सायन्स इन एरोनॉटिकल इंजिनीअरिंग - या अभ्यासक्रमाचा कालावधी -३ वर्षे आहे. अर्हता-भौतिकशास्त्र, गणित आणि इंग्रजी विषयांसह १२ वी उत्तीर्ण. हा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे.

(४) एअरक्राफ्ट मेन्टनन्स इंजिनीअरिंग इन एव्हिऑनिक्स ॲण्ड मेकॅनिकल- या अभ्यासक्रमाचा कलावधी ३ वर्षाचा आहे. एअरक्रॉफ्ट मेन्टनन्स इंजिनीअरने प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही विमानास उड्डाण भरता येत नाही. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्हता- भौतिकशास्त्र, गणित आणि इंग्रजी विषयांसह १२ वी उत्तीर्ण. हा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे.

**संपर्क -** द बॉम्बे फ्लाईंग क्लब, जुहू एरोड्रम, जुहू विले पार्ले, मुंबई- ४०००५६, संकेतस्थळ- www. bfcaviation. com/ www. thebombayflyingclub. com, दूरध्वनी-०२२-२६१०१०२७, ईमेल- pilotinfo@ bfcaviation. com

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
आता हाऊसिंग लोन
₹3.00 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध





S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# ‘गतिशक्ती’ आणि डिफेन्स इन्स्टिट्यूट

**परिवहन आणि** मालवाहतुकीच्या अनुषंगाने शिक्षण-प्रशिक्षण आणि या क्षेत्रातील आंतरज्ञानशाखीय संशोधनास प्राधान्य देणाऱ्या, ‘गतिशक्ती’ विद्यापीठाची स्थापना २०२२ मध्ये करण्यात आली. ही आपल्या देशातील अशा प्रकारची पहिली संस्था आहे. या केंद्रीय संस्थेला रेल्वे मंत्रालयाने प्रायोजित केले आहे. या संस्थेच्या वतीने पुढील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत-

## पदवी अभ्यासक्रम

(१) बीटेक इन सिव्हिल इंजिनीअरिंग (स्पेशलायझेशन इन रेल इंजिनीअरिंग) - या अभ्यासक्रमात रेल्वेसाठी उपयुक्त ठरेल असे अभियांत्रिकी अभिकल्प (डिझाइन), बांधकाम, देखभाल आदी विषयांचे ज्ञान प्रदान केले जाते. (२) बीटेक इन इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग (स्पेशलायझेशन इन रेल इंजिनीअरिंग) - या अभ्यासक्रमात इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन, सिग्नलिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, परिवहनातील सुरक्षा (कवच, सायबर सिक्युरिटी, परिवहन नियंत्रण) अशा बाबींचे ज्ञान प्रदान केले जाते. (३) बीटेक इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग (स्पेशलायझेशन इन रेल इंजिनीअरिंग) - या अभ्यासक्रमात हायस्पीड रेल सिस्टीम, रेल ऑपरेशन, रेल व्हील इंटरअ‍ॅक्शन, रेल्वे रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग, रेल मॅन्युफॅक्च्युरिंग प्रोसेस, रेल मशीन टूल आदी विषय घटकांचे ज्ञान प्रदान केले जाते. (४) बीटेक इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग (स्पेशलायझेशन इन रेल इंजिनीअरिंग) - इलेक्ट्रिक लोको, इलेक्ट्रिक व्हेइकल्स अशासारख्या विद्युत आधारित परिवहन क्षेत्रातील साधनांचे डिझाइन, विश्लेषणाचे कौशल्य आणि सक्षमता या अभ्यासाच्या माध्यमातून निर्माण केली जाते. (५) बीटेक इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (स्पेशलायझेशन इन ट्रान्स्पोर्ट अ‍ॅण्ड लॉजिस्टिक्स) - या अभ्यासक्रमात परिवहन क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकेल अशा आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अ‍ॅण्ड डाटा सायन्स विषयातील आधुनिक तंत्रज्ञानाचे कौशल्य मिळवून दिले जाते. हा अभ्यासक्रम केल्यावर डाटा सायंटिस्ट, बिझिनेस अ‍ॅनॅलिस्ट अशा करिअर संधी मिळू शकतात. मशीन लर्निंग, डाटा व्हिज्युलायझेशन, स्टॅटिस्टिक्स या क्षेत्रात उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष जगातील समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे संशोधन करण्याची संधी मिळू शकते. आयबीएम कंपनीच्या सल्ल्यानुसार अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. (६) बीटेक इन एव्हिएशन इंजिनीअरिंग - या अभ्यासक्रमात विमानाचे डिझाइन, विमान देखभाल, एरोस्पेस इंजिनीअरिंग ड्रोन आदी विषयांचे ज्ञान प्रदान केले जाते.

## प्रवेश प्रकिया

या सर्व अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी चार वर्षे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन- मेन (जेईई-मेन) परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. जेईई- मेन परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी संस्थेच्या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल.

## पदव्युत्तर पदवी व्यवस्थापन शाखा

या संस्थेने व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी/तंत्रज्ञान या शाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू केले असून, या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ यामुळे उपलब्ध झाले आहे.

(१) एमबीए (लॉजिस्टिक्स अ‍ॅण्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट), (२) एमबीए (पोर्ट्स अ‍ॅण्ड लॉजिस्टिक्स). या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कॅट (कॉमन अ‍ॅडमिशन टेस्ट)/ मॅट (मॅनेजमेंट अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट)/ झॅट (झेव्हियर अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट)/ सीयूईटी-पोस्ट ग्रॅज्युएट (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट) या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात.



## पदव्युत्तर पदवी तंत्रज्ञान शाखा

(१) एमटेक इन इंटेलिजन्ट ट्रान्स्पोर्ट सिस्टीम, (२) एमटेक इन रेल्वे इंजिनीअरिंग, (३) एमटेक इन ब्रीज अ‍ॅण्ड टनेल इंजिनीअरिंग, (४) एमटेक इन रोड्स अ‍ॅण्ड हायवे इंजिनीअरिंग.

## आर्थिक साहाय्य

या अभ्यासक्रमासाठी अर्ज केलेल्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये असेल, त्यांना शिक्षण शुल्कातून १०० टक्के आणि वसतिगृह शुल्कातून ५० टक्के सूट दिली जाते. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक आणि ३ लाख रुपयांपर्यंत असेल त्यांना शिक्षण शुल्कातून ५० टक्के आणि वसतिगृह शुल्कातून २५ टक्के सूट दिली जाते. एअरबस कंपनीमार्फत ४० विद्यार्थ्यांना, शिक्षण आणि वसतिगृह शुल्कातून १०० टक्के सूट मिळवून दिली जाते. प्लॅसर इंडिया या कंपनीमार्फत १० विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि वसतिगृह शुल्कातून १०० टक्के सूट मिळवून दिली जाते. सिमेन्स कंपनीमार्फत पात्र विद्यार्थ्यांना अशाच प्रकारची सूट मिळवून दिली जाते.

## प्लेसमेंट आणि इंटर्नशिप

या अभ्यासक्रमांमध्ये संबंधित उद्योगांना लागणारे कौशल्य आणि तंत्रज्ञानावर अधिक भर दिला जातो. विद्यार्थ्यांना अशा उद्योगांमध्ये इंटर्नशिपच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांची संधी उपलब्ध करून दिली जाते.

पुढील कंपन्यांमध्ये प्लेसमेंट आणि इंटर्नशिपची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे- (१) व्होल्वो, (२) आयआरपी इंफ्रा टेक, (३) हिंद रेक्टिफायर, (४) श्रीराम सिमेंट, (५) ट्रान्सवर्ल्ड, (६) फ्लिपकार्ट, (७) टीसीआय, (८) इ २ इ रेल, (९) कॉगपोर्ट, (१०) डीपी वर्ल्ड, (११) टीव्हीएस सप्लाय चेन, (११) वंडर सिमेंट, (१२) अल्ट्रा टेक, (१३) एक्स्प्रेस ग्लोबल लॉजिस्टिक्स, (१४) ओम लॉजिस्टिक्स, (१५) ऑल कार्गो लॉजिस्टिक्स, (१६) महिंद्रा लॉजिस्टिक्स, (१७) डिलिव्हरी, (१८) जेएसडब्ल्यू, (१९) डीएचएल, (२०) जेएम बक्सी, (२१) इंडी कोल्ड, (२२) आदित्य बिर्ला अल्ट्राटेक

या संस्थेने पुढील काही संस्थांसोबत सहकार्य करार केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्लेसमेंट, इंटर्नशिप, शिष्यवृत्ती, संशोधन, शैक्षणिक भेटी, अशा संधी उपलब्ध होतात- (१) दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशन, (२) नोकिया, (३) रेल टेल, (४) कर्मयोगी भारत, (५) कॉनकॉर, (६) पाटील ग्रुप, (७) एअरबस, (७) मोंटाश युनिव्हर्सिटी, (८) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, ट्रेनिंग, रिसर्च भोपाळ, (९) महाराज सयाजीराव गायकवाड युनिव्हर्सिटी बडोदा, (११) इंडियन चेम्बर्स ऑफ कॉमर्स

संपर्क - लालबाग वडोदरा, ३९०००४, ईमेल- admissions@gsv. ac. in, संकेतस्थळ- gsv. ac. in

## डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी

भारत सरकारच्या सैन्य मंत्रालय आणि डिफेन्स रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंटअंतर्गत कार्यरत असणाऱ्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी या संस्थेमार्फत पुढील महत्त्वाचे पदव्युत्तर पदवी स्तरीय अभ्यासक्रम सुरू केले आहेत. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखांमधील पदवीधरांनी आपल्या पुढील रोडमॅपमध्ये या अभ्यासक्रमाचा समावेश करायला हवा. लष्करी शिस्तीतील या दर्जेदार संस्थांमधील हे अभ्यासक्रम या विद्यार्थ्यांना भविष्यात उत्तम करिअर संधी मिळवून देऊ शकतात. अत्याधुनिक प्रयोगशाळेमध्ये प्रात्यक्षिक करण्याची संधी मिळते. अनुभवी प्राध्यापकांमुळे ज्ञानकक्षा चौफेर होण्यास साहाय्य मिळते.

एम टेकचे स्पेशलायझेशन (१) एरोस्पेस इंजिनीअरिंग- गायडेड मिसाइल, (२) मॉडेलिंग अ‍ॅण्ड सिम्युलेशन, (३) कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड इंजिनीअरिंग- आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (३) इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग- सेमिकंडक्टर चिप डिझाइन, सिग्नल प्रोसेसिंग अ‍ॅण्ड आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, रडार अ‍ॅण्ड कम्युनिकेशन, डिफेन्स अ‍ॅण्ड स्पेस इलेक्ट्रॉनिक्स, (४) टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट, (५) डाटा सायन्स, (६) सायबर सिक्युरिटी, (७) रिन्युएबल एनर्जी, (८) नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, (९) क्वांटम कॉम्प्युटिंग, (१०) सेन्सर टेक्नॉलॉजी/ लेसर अ‍ॅण्ड इलेक्ट्रो ऑप्टिक्स, (११) मेकॅनिकल इंजिनीअरिंग - मरिन इंजिनीअरिंग, आर्मामेंट अ‍ॅण्ड कोम्बॅट व्हेइकल, मेकॅनिकल सिस्टीम डिझाइन, (१३) मटेरिअल इंजिनीअरिंग, (१४) ऑटोमेशन अ‍ॅण्ड रोबोटिक्स.

एम.एस्सी. इन (१) फूड टेक्नॉलॉजी. हा अभ्यासक्रम डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी आणि डिफेन्स रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ) म्हैसूरु यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. (२) अप्लाइड फिजिक्स- फोनोटिक्स, (३) मटेरिअल सायन्स, (४) डाटा सायन्स, (५) अ‍ॅप्लाइड केमिस्ट्री, (६) एमएस्सी टेक- फोनोटिक्स एमटेक अभ्यासक्रमांना गेट (ग्रॅज्युएट अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनीअरिंग) परीक्षेतील गुणांवर आधारित प्रवेश दिला जातो. तर एमएस्सी अभ्यासक्रमांना जॅम (जॉइंट अ‍ॅडमिशन टेस्ट फॉर मास्टर्स) परीक्षेतील गुणांवर प्रवेश दिला जातो. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

## प्लेसमेंट

हे अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना डीआरडीओ येथे प्लेसमेंटची संधी मिळू शकते. देशातील आघाडीच्या उद्योगांमध्येही चांगली करिअर संधी मिळते. क्रॅनफिल्ड युनिव्हर्सिटी येथे मास्टर अभ्यासक्रम आणि जॉर्ज मॅसॉनं युनिव्हर्सिटी येथे सॉफ्टवेअर इंजिनीअरिंग या विषयात ड्युएल डिग्री अभ्यासक्रम करण्याची संधी मिळू शकते. हे अभ्यासक्रम केलेल्या ९५ टक्केंपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्या आणि उद्योगांमध्ये करिअर संधी मिळत असते.

संपर्क - गिरीनगर, पुणे ४११०२५, ईमेल- jr@diat. ac. in
संकेतस्थळ- www. diat. ac. in

**सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)



S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# गुन्ह्यांच्या शोधाचे विज्ञान, तंत्र आणि कौशल्य

**फॉरेन्सिक सायन्स या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस गुन्हे घडलेल्या ठिकाणी पुरावे गोळा करण्याचे तंत्र आत्मसात करणे आवश्यक ठरते. गुन्हे घडलेल्या ठिकाणच्या वस्तूंची ने-आण करण्याची प्रक्रिया आणि या वस्तू सुरक्षित ठेवण्याची पद्धती समजून घ्यावी लागते.**

**भारत सरकारने** न्यायवैद्यकशास्त्र (फॉरेन्सिक सायन्स) आधारित शोधाला न्यायदान प्रक्रियेत सामावून घेण्याचे ठरवले आहे. त्यामुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या सध्याच्या ५० टक्के दरात आणखी वाढ होऊ शकेल. कायदेविषयक गुन्ह्यांमध्ये न्यायवैद्यकशास्त्राचे पुरावे आवश्यक ठरवण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेण्याच्या कार्यात न्यायवैद्यकशास्त्राचा महत्त्वाचा सहभाग असतो. सध्या बहुतेक सर्वच बँकांना, फ्रॉड (फसवणूक शोध) डिपार्टमेंटसाठी न्यायवैद्यकशास्त्राशी निगडित प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज भासते. कॉर्पोरेट क्षेत्रातही संभाव्य फ्रॉड थोपवण्यासाठी या मनुष्यबळाची गरज भासू लागली आहे. त्यामुळे या क्षेत्रात अधिकाधिक प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज भासू लागली आहे. प्रत्येक राज्य सरकारने न्यायवैद्यकशास्त्राच्या प्रयोगशाळा उघडल्या आहेत.

अधिकाधिक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, गुन्हेगार करू लागल्याने न्यायवैद्यकशास्त्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यामुळेच भारत सरकारने, नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीची स्थापना २०२० मध्ये केली असून या संस्थेचे कॅम्पसेस गुजरात- गांधीनगर, दिल्ली, त्रिपुरा, भोपाळ, पुणे, गौहाटी, मणिपूर, गौहाटी, धारवाड येथे उघडण्यात आले आहेत. भुवनेश्वर, जयपूर, रायपूर, नागपूर आणि चेन्नई येथे यंदाच्या (२०२५) शैक्षणिक वर्षापासून कॅम्पसेस उघडण्याचे प्रस्तावित आहे. या संस्थेला, इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्सचा दर्जा देण्यात आला आहे. न्यायवैद्यक, डिजिटल न्यायवैद्यक, सायबर सुरक्षा, वर्तणूक (बिहेव्हियरल) शास्त्र या विषयात शिक्षण, प्रशिक्षण देणारी आणि संशोधनास चालना देणारी, ही आपल्या देशातील एकमेक संस्था आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या या संस्थेमार्फत ७० हून अधिक देशात, या क्षेत्रातील क्षमता बांधणी केली जात आहे. भारताची न्यायवैद्यक क्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट या संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेमार्फत न्यायवैद्यक प्रयोगशाळांचा दर्जा उंचावण्याचा कार्यक्रम राबवला जाईल. प्रत्येक जिल्ह्याला सर्व यंत्रसामग्रीने सुसज्ज अशी मोबाइल शोध वाहने पुरवली जातील. या क्षेत्रातील विविध घटकांच्या अनुषंगाने, सेंटर ऑफ एक्सलेन्सची उभारणी केली जाईल. शोधकार्याच्या गुणवत्तेत देशभरात एकसमानता राहावी यासाठी गृह मंत्रालाने लक्ष केंद्रित केले आहे.

या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास गुन्हे घडलेल्या ठिकाणी पुरावे गोळा करण्याचे तंत्र आत्मसात करणे आवश्यक ठरते. गुन्हे घडलेल्या ठिकाणाच्या वस्तूंची ने-आण करण्याची प्रक्रिया आणि या वस्तू सुरक्षित ठेवण्याची पद्धती समजून घ्यावी लागते. न्यायवैद्यकशास्त्र प्रयोगशाळेत प्रत्यक्ष काम करताना या बाबींचे तंत्र समजून घेणे शक्य होऊ शकते. अशा गुन्ह्यांमध्ये केवळ तपासाचा अहवाल सादर करणे अपेक्षित नसून गुन्ह्यांची सामाजिक कारणे कोणती आणि त्याच्या संभाव्य उपाययोजना, याचे सूतोवाच करणे अपेक्षित असते.

नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीच्या अंतर्गत विविध ज्ञानशाखांच्या स्कूल्सची निर्मिती करण्यात आली आहे. या स्कूल्समध्ये न्यायवैद्यकशास्त्राशी निगडित विविध पैलूंना स्पर्श करणारे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे अभ्यासक्रम पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरचे आहेत. याशिवाय, व्यावसायिक कौशल्य निर्माण करणाऱ्या काही पदविका अभ्यासक्रमांचाही समावेश आहे. काही इंटिग्रेटेड अभ्यासक्रम पांच वर्षे कालावधीचे असून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम करता येतात. पदव्युत्तर पदवी आणि पदवी अभ्यासक्रम हे विज्ञान, कला, विधि या शाखेतील आहेत. त्यामुळे यंदा करिअरच्या रोडमॅपमध्ये या संस्थेच्या विविध अभ्यासक्रमांचाही विचार विद्यार्थ्यांनी व पालकांना करायला हवा. नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीच्या, अभ्यासक्रमांना नॅशनल फॉरेन्सिक ॲडमिशन टेस्ट (एनएफएटी) - २०२५ द्वारे प्रवेश दिला जातो. या प्रवेश परीक्षेला अर्ज करण्याची शेवटची तारीख ५ मे २०२५ ही आहे. ही परीक्षा देशभरातील विविध केंद्रांवर दि. ७ आणि ८ जून २०२५ रोजी घेण्यात येईल.

## स्कूल्स आणि अभ्यासक्रम

(कंसामध्ये अभ्यासक्रम असलेले कॅम्पस)

- **स्कूल ऑफ फॉरेन्सिक सायन्स** (१) बी.एस्सी. - एम.एस्सी. इन फॉरेन्सिक सायन्स (गांधीनगर, दिल्ली, गोवा, त्रिपुरा, धारवाड, भोपाळ), (२) एम.एस्सी. इन फॉरेन्सिक सायन्स (गांधीनगर, दिल्ली, गोवा, त्रिपुरा, भोपाळ), (३) एम.एस्सी. इन फॉरेन्सिक बायोटेक्नॉलॉजी (गांधीनगर), (४) एम.एस्सी. इन मल्टिमीडिया फॉरेन्सिक (गांधीनगर), (५) एम.ए. इन फॉरेन्सिक मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम-स्पेशलायझेशन इन फॉरेन्सिक जर्नालिझम (गांधीनगर), (६) प्रोफेशनल डिप्लोमा इन फिंगरप्रटिं सायन्स (दिल्ली), (७) प्रोफेशनल डिप्लोमा इन फॉरेन्सिक डॉक्युमेंट एक्झामिनेशन (गांधीनगर, दिल्ली), (८) प्रोफेशनल डिप्लोमा इन क्राइम सिन मॅनेजमेंट (गांधींनगर, दिल्ली, गोवा, त्रिपुरा भोपाळ, गौहाटी धारवाड, पुणे, मणिपूर, रायपूर, जयपूर, नागपूर, भुवनेश्वर, चेन्नई), ऑनलाइन प्रोफेशनल डिप्लोमा इन फॉरेन्सिक जर्नालिझम (गांधीनगर), (९) प्रोफेशनल डिप्लोमा इन फॉरेन्सिक बॅलिस्टिक्स (गांधीनगर), (१०) प्रोफेशनल डिप्लोमा इन कॅनाइन फॉरेन्सिक (दिल्ली)
- **स्कूल ऑफ मेडिको-लिगल स्टडी**
  (१) प्रोफेशनल डिप्लोमा इन फॉरेन्सिक ऑर्किऑलॉजी (गांधीनगर), (२) एम.एस्सी. इन टॉक्सिकॉलॉजी(गांधीनगर) (२) स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज
  (१) बीबीए- एमबीए (स्पेशलायझेशन- (अ) फॉरेन्सिक अकाउंटिंग ॲण्ड फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन, (ब) फायनांशिअल मॅनेजमेंट, (क) बिझिनेस ॲनॅलिटिक्स ॲण्ड इन्व्हेस्टिगेशन, (ड) हॉस्पिटल ॲण्ड ॲण्ड हेल्थकेअर मॅनेजमेंट) (गांधीनगर, दिल्ली), (२) एमबीए इन (अ) फॉरेन्सिक अकाउंटिंग ॲण्ड फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन, (ब) बिझिनेस ॲनॅलिटिक्स ॲण्ड इन्व्हेस्टिगेशन, (क) हॉस्पिटल ॲण्ड ॲण्ड हेल्थकेअर मॅनेजमेंट, (ड) सायबर सिक्युरिटी मॅनेजमेंट) (गांधीनगर)
- **स्कूल ऑफ बिहेव्हियरल फॉरेन्सिक्स**
  (१) एम.एस्सी.. फॉरेन्सिक सायकॉलॉजी (गांधीनगर), (२) एम.एस्सी.. न्युरो सायकॉलॉजी (गांधीनगर), (३) एम.एस्सी. क्लिनिकल सायकॉलॉजी (गांधीनगर), (४) एम.ए. क्रिमिनॉलॉजी- स्पेशलायझेशन- फॉरेन्सिक सायकॉलॉजी (गांधीनगर, दिल्ली), (५) एम.ए. क्रिमिनॉलॉजी (गांधीनगर, दिल्ली), (६) बीएस्सी. क्रिमिनालॉजी ॲण्ड फॉरेन्सिक सायन्स- (गांधीनगर, दिल्ली), (७) प्रोफेशनल डिप्लोमा इन सायबर सायकॉलॉजी (गांधीनगर), (८) प्रोफेशनल डिप्लोमा इन इन्व्हेस्टिगेटिव्ह सायकॉलॉजी (गांधीनगर)
- **स्कूल ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी**
  (१) एम.एस्सी.- नॅनोटेक्नॉलॉजी (स्पेशलायझेशन- फॉरेन्सिक नॅनोटेक्नॉलॉजी) (गांधीनगर), (२) एम.एस्सी.- फूड टेक्नॉलॉजी (स्पेशलायझेशन- फॉरेन्सिक फूड ॲनॅलिसीस)(गांधीनगर), (३) एम.टेक- सिव्हिल इंजिनीअरिंग (स्पेशलायझेशन- फॉरेन्सिक स्ट्रक्चरल इंजिनीअरिंग) (गांधीनगर)
- **स्कूल ऑफ पोलीस सायन्स ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज**
  (१) एम.एस्सी.- होमलॅण्ड सिक्युरिटी (गांधीनगर), (२) एम.ए.- पोलीस ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज (गांधीनगर), (३) प्रोफेशनल डिप्लोमा इन सिक्युरिटी स्टडीज (गांधीनगर)
- **स्कूल ऑफ लॉ, फॉरेन्सिक्स जस्टिस ॲण्ड पॉलिसी स्टडीज**
  (१) एलएलएम (सायबर लॉ ॲण्ड सायबर क्राइम इन्व्हेस्टिगेशन) (गांधीनगर, भुवनेश्वर), (२) एलएलएम (क्रिमिनल लॉ ॲण्ड क्रिमिनल जस्टिस ॲडमिनिस्ट्रेशन) (गांधीनगर, दिल्ली), (३) बीएस्सी-एलएलबी (ऑनर्स) (गांधीनगर), (४) बीबीए-एलएलबी (ऑनर्स) (दिल्ली), (५) प्रोफेशनल डिप्लोमा इन सायबर लॉ (गांधीनगर),
- **स्कूल ऑफ फार्मसी** (१) एम.फार्म इन फॉरेन्सिक फार्मसी (गांधीनगर, धारवाड), (२) एम.फार्म इन फॉर्मासिक्युटिकल क्वालिटी ॲश्युरन्स (गांधीनगरं), (३) एम.एस्सी. इन केमिस्ट्री (स्पेशलायझेशन - फॉरेन्सिक ॲनॅलिटिकल केमिस्ट्री) (गांधीनगर), (४) एम.एस्सी. इन एनव्हिरॉन्मेंटल सायन्स (स्पेशलायझेशन- एनव्हिरॉन्मेंटल फॉरेन्सिक) (गांधीनगर), (५) एम.एस्सी. इन फॉर्मासिक्युटिकल केमिस्ट्री (गांधीनगर), (६) प्रोफेशनल डिप्लोमा इन इंडस्ट्रिअल सेफ्टी, हायजिन ॲण्ड एनव्हिरॉन्मेंटल मॅनेजमेंट (गांधीनगर),
- **स्कूल ऑफ सायबर सिक्युरिटी ॲण्ड डिजिटल फॉरेन्सिक्स**
  (१) एम.टेक इन सायबर सिक्युरिटी (गांधीनगर), (२) एम.टेक इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स (स्पेशलायझेशन - सायबर सिक्युरिटी) (गांधीनगर, गोवा), (३) एम.एस्सी. इन सायबर सिक्युरिटी (गांधीनगर, गोवा, भोपाळ, नागपूर, चेन्नई), (४) एम.एस्सी. इन डिजिटल फॉरेन्सिक्स ॲण्ड इन्फॉर्मेशन सिक्युरिटी (गांधीनगर, दिल्ली, गोवा, भोपाळ, रायपूर, जयपूर, भुवनेश्वर), (८) बीटेक- एम.टेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग (सायबर सिक्युरिटी) (गांधीनगर, दिल्ली, त्रिपुरा, धारवाड, गौहाटी), (९) प्रोफेशनल डिप्लोमा इन सेमिकंडक्टर सिक्युरिटी ॲण्ड फॉरेन्सिक इन्व्हेस्टिगेशन (गांधीनगर), (२) प्रोफेशनल डिप्लोमा इन सायबर क्राइम इन्व्हेस्टिगेशन (गांधीनगर). संपर्क संकेतस्थळ - nfsu. ac. in/ admission, ईमेल- info@nfsu. ac. in, दूरध्वनी- ०७९- २३९७७१०३ `

## राज्य शासनाच्या संस्था

महाराष्ट्रात, राज्य शासनाने, (१) छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) ( https:// gifsa. ac. in/ programmes/ ), (२) नागपूर ( https:// ifscnagpur. in/ ) आणि (३) मुंबई ( https:// ifsm. ac. in/ ) येथे गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्सची स्थापना केली आहे. या संस्थांमध्ये, बीएस्सी. इन फॉरेन्सिक सायन्स आणि एमएस्सी. इन फॉरेन्सिक सायन्स हे अभ्यासक्रम करता येतात. प्रत्येक संस्थेने वेगवेगळे पदविका अभ्यासक्रमही सुरू केले आहेत.

**सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
आता हाऊसिंग लोन
₹3.00 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध
*अटी लागू.



S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507



# ‘अभ्यास’ सुविधा, ॲप वापराविषयी मार्गदर्शन

**नॅशनल टेस्टिंग** एजन्सी (राष्ट्रीय परीक्षा संस्था) - एनटीए, या संस्थेची स्थापना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने केली आहे. या संस्थेमार्फत, आयटीआय (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी), एनआयटी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी), आयआयआयटी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), एनआयएफटी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी), एआयआयएमएस (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स) केंद्रिय विद्यापीठे, इतर शासकीय संस्थांमधील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, चाळणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमधील गुण बऱ्याच खासगी संस्थाही, प्रवेशासाठी ग्राह्य धरतात. या परीक्षांना देशभरातील लाखो विद्यार्थी बसतात. सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना, या परीक्षा देणे अधिक सोईचे आणि सुलभ जावे यासाठी संस्थेने, ‘अभ्यास ॲप’ विकसित केले आहे. हे ॲप, गूगल स्टोअरवरून डाऊनलोड करता येते. सध्या या, ॲपवर वैद्यकीय (नीट- नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट) आणि अभियांत्रिकी/तंत्रज्ञान (जेईई- जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) या परीक्षांची अभिरूप (मॉक टेस्ट) चाचणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## कृत्रिम प्रज्ञेचा वापर

या ॲपमध्ये कृत्रिम प्रज्ञेचा (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) वापर करण्यात आला आहे. या ॲपद्वारे विद्यार्थी चाळणी परीक्षांची मॉक टेस्ट देऊ शकतात. या चाचणीचा निकाल त्वरित दिला जातो. या ॲपमधील कृत्रिम प्रज्ञेद्वारे विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील कमकुवत बाजूंना तात्काळ निदर्शनास आणले जाते. त्यामुळे पुढील चाळणी परीक्षेमध्ये सुधारणा करता येणे शक्य होऊ शकते. स्वयंअध्ययन आणि स्वयंसुधारणेसाठी हे ॲप उपयुक्त ठरू शकते.

नीट आणि जेईई, या परीक्षांच्या तयारीसाठी हे ॲप उपयुक्त ठरू शकते. या ॲपमध्ये, या दोन्ही परीक्षांच्या संपूर्ण अभ्यासक्रमांवर (सिलॅबस) आधारित प्रश्नपत्रिका दिल्या जातात. या प्रश्नपत्रिका तज्ज्ञांनी तयार केल्या असतात. या प्रश्नपत्रिका, ‘एआय’च्या मदतीने तपासल्या जात असल्याने संबंधित विद्यार्थी, कोणत्या टॉपिकवरील प्रश्नांमध्ये अडखळतात किंवा अडचणीत येतात, ही बाब लक्षात येते. त्यानुसार तज्ज्ञांमार्फत सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

## ॲपचे फायदे

या ॲपचा काळजीपूर्वक वापर केल्यास पुढील, चार प्रकारे फायदा होऊ शकतो. (१) निष्काळजीपणामुळे होणाऱ्या चुकांमध्ये लक्षणीय घट होते, (२) वेळेचे व्यवस्थापन सुधारते किंवा वेळेचा अधिक अचूकपणे वापर करता येतो, (३) प्रश्न सोडवण्याची गती आणि अचूकतेत वाढ होते, (४) परीक्षा देण्याच्या व्यूहनीतीत प्रभावीपणे बदल करण्याची क्षमता प्राप्त होते. ‘अभ्यास ॲप,’ कसे डाऊनलोड करायचे? त्याचा वापर कसा करायचा? याविषयी एक व्हिडीओ https:// nta. ac. in/ Abhyas या संपर्क साखळीवर उपलब्ध आहे. तो स्वयंस्पष्ट असून त्याचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास, या ॲपचा प्रभावीपणे वापर करता येणे शक्य आहे. हे ॲप कोणत्याही अँड्रॉइड मोबाइलवर डाऊनलोड करता येते. https:// nta. ac. in/ abhyas/ help आणि https:// nta. ac. in/ Abhyas/ started- या संपर्कसाखळीवर, या ॲपविषयी, विस्तृत माहिती देण्यात आली आहे.




सराव केंद्रे एनटीएच्या परीक्षा या कॉम्प्युटरबेस्ड म्हणजेच संगणकाधारित असल्याने, त्या सर्वच विद्यार्थ्यांना सुलभतेने देणे शक्य होणार नाही, ही बाब लक्षात घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने एनटीएला, देशात सर्वत्र आणि विशेषतः ग्रामीण भागात, टेस्ट केंद्रे उभारणे बंधनकारक केले आहे. या केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाधारित परीक्षांच्या सरावाची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली जाते. या सरावात, लॉग इन करणे, संगणकावरील विस्तृत माहिती नजरेखालून घालणे, प्रत्यक्ष पेपरची स्क्रीनवर हाताळणी, माऊसचा वापर करून एका प्रश्नावरून दुसऱ्या प्रश्नावर जाणे, उत्तरे दुरुस्त करणे, पुनर्तपासणी करणे या बाबींचा समावेश आहे. या सरावामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पेपर सोडवण्यासाठी आत्मविश्वास प्राप्त होऊ शकतो.

इच्छुक विद्यार्थी nta.ac.in या संकेतस्थळावर जाऊन, अशा केंद्रासाठी नोंदणी करू शकतो किंवा गूगल प्लेस्टोअरवर जाऊन, एनटीए स्टुडंट ॲप डाऊनलोड करू शकतो. या ॲपवर सराव केंद्रासाठी नोंदणी करण्याच्या सर्व सूचना देण्यात आल्या आहेत. सरावाची सुविधा मोफत असल्याने कोणत्याही सराव केंद्राला विद्यार्थ्याकडून शुल्क आकारता येणार नाही. या सराव केंद्रावर जाऊन कितीही वेळा सराव परीक्षा देता येते. विद्यार्थी त्याच्या सोयीनुसार वेळ निर्धारित करू शकतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या नजीक असलेल्या केंद्रावर ही सुविधा उपलब्ध करून देण्याचा शक्यतो प्रयत्न केला जातो. प्रत्येक सराव केंद्र, एनटीए संकेतस्थळ- nta. ac.in/ Central/Login शी लॉगइन करून सराव परीक्षेचे साहित्य मिळवू शकतात.

या केंद्रामधून सराव परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना एसएमएस किंवा इमेलद्वारे त्याचा टाइम स्लॉट (पेपरचा वेळ) २४ किंवा ४८ तास आधी कळवला जातो. या अनुषंगाने काही अडचणी आल्यास पुढील ईमेल आणि भ्रमणध्वनीवर संपर्क साधता येतो. ईमेल- tpcntaexams@gmail. in आणि भ्रमणध्वनी- tpc@nta.ac.in, दूरध्वनी-०११-४०७५९०००,संकेतस्थळ- https:// nta.ac.in/ TPC

## पेपर सराव सुविधा

nta.ac.in/Quiz या संपर्कसाखळीवर एनटीएने घेतलेल्या वेगवेगळ्या परीक्षांचे प्रत्यक्ष पेपर ठेवण्यात आले आहेत. यामध्ये जेईई (मेन), नीट, कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स एक्झामिनेशन- अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट (सीयूईटी यूजी आणि पीजी), कॉमन मॅनेजमेंट ॲडमिशन टेस्ट, जॉइंट इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट (जीपमॅट), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲडमिशन टेस्ट (एनआयएफटी), ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टिट्यूड टेस्ट (जीपॅट), नॅशनल कौन्सिल ऑफ हॉटेल मॅनेजमेंट टेस्ट (एनसीएचएम) अशासारख्या परीक्षांमधील आहेत. हे पेपर डाऊनलोड करून विद्यार्थी याचा उपयोग सरावासाठी करू शकतात. यामुळे पेपरपद्धती, प्रश्नांचे प्रकार, प्रश्नांची काठिण्यता यांचा परिचय होतो. दिलेल्या वेळेत किती प्रश्न अचूकतेने सोडवता येतात, हे कळते. हे पेपर महाविद्यालयातील किंवा कोचिंग क्लासच्या अध्यापकांकडून तपासून घेतल्यास विषयघटकातील नेमक्या चुका कळतात. त्या घटकांवर अधिक भर देता येणे शक्य होते. संकल्पना अधिक स्पष्ट करून घेता येतात.

या प्रश्नपत्रिका केवळ सरावासाठी असून, यातील कोणतेही प्रश्न पुन्हा, जसेच्या तसे विचारले जात नाहीत, ही बाब लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमातील प्रत्येक टॉपिक, महत्त्वाचा असल्याचे, हे पेपर सोडवल्यावर लक्षात येऊ शकते. त्यामुळे, एखाद्या वर्षी एखाद्या टॉपिकवर प्रश्न विचारले नसतील, तर त्याच टॉपिकवर दुसऱ्या वर्षी प्रश्न विचारले जातीलच, असे ठामपणे सांगता येत नाही. त्याचबरोबर, याच टॉपिकवरचे प्रश्न येऊही शकतात, ही बाब ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. या पेपरची उत्तरतालिका मिळाली तरी, त्याचा उपयोग करू नये. त्यामुळे सरावाचा मूळ उद्देश साध्य होणार नाही.

हा सराव पेपर घरीच सोडवायचा असल्याने, तो दिलेल्या वेळेत अगदी प्रत्यक्ष परीक्षेसारखाच द्यायला हवा. घरी असलेले कोणतेही अभ्यास साहित्य, मोबाइल आणि शिक्षकांची मदत अजिबात घेतली जाऊ नये. याच संपर्कसाखळीवर, मॉक टेस्टही देण्यात आली आहे. याचा उद्देश प्रत्यक्ष परीक्षेची तोंडओळख होण्यासाठी आहे. यातील एकही प्रश्न, मूळ परीक्षेत विचारला जाईल याची शक्यता नसते. त्यामुळे पाठांतराच्या भानगडीत न पडलेले बरे. ही मॉक टेस्टसुद्धा प्रत्यक्ष परीक्षेच्या गांभीर्यानेच देणे आवश्यक आहे. तरच सरावाचा मूळ उद्देश साध्य होईल.

## व्हिडीओ लेक्चर्स

एनटीएने जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (मेन) आणि नीट परीक्षेचा अभ्यास करणे सुलभ जावे म्हणून, आयआयटी-पाल (IIT- PAL- प्रोफेसर असिस्टेड लर्निंग) व्हिडीओ लेक्चर्स (अध्यापन)ची सुविधा, उपलब्ध करून दिली आहे. एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमांवर भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांतील विविध घटकांवर हे व्हिडीओ लेक्चर्स आहेत. हे व्हिडीओ आयआयटीचे अध्यापक आणि विषयतज्ज्ञांकडून तयार करण्यात आले आहेत. अकरावी आणि बारावीतील विद्यार्थ्यांना वेगवेगळे घटक उत्तम रीतीने समजून घेण्यासाठी आणि स्वयंअध्ययनासाठी ही लेक्चर्स उपयोगी ठरू शकतात. ही लेक्चर्स केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या, स्वयंप्रभा या वाहिनीवर आणि दूरदर्शनच्या डीटीएच वाहिनी २२ वरही बघता येतात. या लेक्चर्ससाठी नोंदणी केलेले विद्यार्थी त्यांचे प्रश्न किंवा न आकलन झालेल्या घटकांविषयी शंका विचारू शकतात. आयआयटी-पालच्या चमूमधील तज्ज्ञ या शंकेचे निरसन करतात. निवडक प्रश्नांची उत्तरे संकेतस्थळावर ठेवली जातात. नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ही उत्तरे बघता येतात.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library



# विज्ञान आणि अर्थशास्त्राची सांगड

**कोणत्याही कारणाने** का होईना २०२३ किंवा २०२४ मध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना, मनाजोगती शाखा किंवा शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळाला नसल्यास त्यांना, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अॅण्ड रिसर्च (आयसर) या महत्त्वाच्या संस्थेत यंदा प्रवेश मिळवता येऊ शकतो. या विद्यार्थ्यांना त्यासाठी, 'आयसर अॅडमिशन टेस्ट' द्यावी लागेल. ही टेस्ट दि. २५ मे २०२५ रोजी देशभरातील विविध केंद्रांवर घेतली जाईल. महाराष्ट्रातील परीक्षा केंद्र पुणे आहे. पुढील काही दिवस, झोकून अभ्यास केल्यास यश मिळू शकते. त्यासाठी अतिशय काटेकोरपणे, आयसर अॅडमिशन टेस्टसाठी निर्धारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाची तयारी करावी लागेल. हा सिलॅबस किंवा अभ्यासक्रम, एनसीइआरटी (नॅशनल काउंसिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग)च्या अभ्यासक्रमावर आधारित असतो. तथापि, १२वी बोर्डाच्या भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांतील सर्व घटक पुन्हा एकदा अभ्यासल्यास, ही परीक्षा यशस्वीरीत्या देता येऊ शकेल. या टेस्टसाठी निर्धारित अभ्यासक्रमातील जे घटक १२ वी बोर्डाच्या पुस्तकात नसतील, त्यांची तयारी मात्र एनसीईआरटीच्या पुस्तकातून करावी लागेल. नवे अभ्यासक्रम (१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स रिसर्च अॅण्ड एज्युकेशन कोलकता, येथे २०२५ च्या शैक्षणिक वर्षापासून, बॅचलर ऑफ सायन्स-मास्टर ऑफ सायन्स (बीएस-एमएस) इन कॉम्प्युटेशनल डाटा सायन्स, हा नवा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. हा आंतरज्ञानशाखीय अभ्यासक्रम आहे. संगणकशास्त्र आणि प्रत्यक्ष जगातील शास्त्रीय आव्हानांमधील दरी सांधण्यासाठी या अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोग्रॅमिंग, डाटा अॅनॅलिसिस, मशिन लर्निंग, उच्च कार्यक्षमतचे संगणकीय ज्ञान यांचे प्रशिक्षण दिले जाते. नैसर्गिक शास्त्रातील व्यामिश्र समस्या सोडवण्यासाठी हे कौशल्य विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकते. सैद्धांतिक ज्ञान आणि प्रात्यक्षिक यांच्या सुयोग्य मेळ या अभ्यासक्रमात साधला जातो. त्यामुळे हा अभ्यास म करण्याऱ्या विद्यार्थ्यांना विविध उद्योग, संशोधन संस्था, अध्यापन आदी क्षेत्रात उत्तमोत्तम संधी मिळू शकतात. संगणकशास्त्रातील भविष्यातील आव्हाने पेलू शकणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची निर्मिती, या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अपेक्षित आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षाचा आहे. (२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स रिसर्च अॅण्ड एज्युकेशन, तिरुपती येथे २०२५ च्या शैक्षणिक वर्षापासून, बॅचलर ऑफ सायन्स (बीएस) - इन इकॉनॉमिकल अॅण्ड स्टॅटिस्टिकल सायन्सेस, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. संशोधनाला प्राधान्य विज्ञानशाखेतील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयांतील आंतरज्ञानशाखीय अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी प्राधान्य द्यावे यासाठी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅण्ड रिसर्च (आयसर) या संस्थेची स्थापना भारत सरकारने केली. या संस्थेला नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्पॉर्टन्सचा दर्जा



भारत सरकारने दिला आहे. या संस्थेचे पुणे, तिरुपती, भोपाळ, कोलकता, थिरुवंतपूरम, मोहाली, बेहरामपूर या ठिकाणी कॅम्पसेस आहेत.

**अभ्यासक्रम**

(१) आयसरच्या सर्व सातही कॅम्पसमध्ये बीएस - एमस या पाच वर्षे कालावधीचा ड्युएल डिग्री अभ्यासक्रम शिकवला जातो. (२) आयसर भोपाळ कॅम्पसमध्ये प्रत्येकी चार वर्षे कालावधीचे (अ) बीटेक इन डाटा सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (ब) बीटेक इन केमिकल इंजिनीअरिंग, (क) बीटेक इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग, (ड) बीएस- इकॉनॉमिक्स हे अभ्यासक्रम करता येतात. आयसरच्या अभ्यासक्रमात पहिल्या दोन वर्षांत मूलभूत विज्ञानशाखेतील सर्व विषय शिकवले जातात. त्यानंतर विद्यार्थी त्यांच्या स्पेशलायझेशनचा विषय निवडू शकतो.

**डाटा सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग**

भोपाळ आयसरमधील या अभ्यासक्रमात (१) डीप लर्निंग, (२) मशिन लर्निंग, (३) आर्टिफिशिल इंटेलिजन्स, (४) नॅचरल लँग्वेज प्रोसेस, (५) कॉम्प्युटर व्हिजन, (६) डाटा सायन्स इन प्रॅक्टिस, (७) अॅल्गॉरिदम, (८) अॅडव्हान्स्ड प्रोग्रॅमिंग, (९) डाटाबेस्ड मॅनेजमेंट सिस्टिम, (१०) डाटा स्ट्रक्चर अॅण्ड लॅबॉरेटरी, (११) डाटा स्ट्रक्चर अॅण्ड अॅल्गॉरिदम, अशासारख्या विषय घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

बीएस- इकॉनॉमिक्स आयसर भोपाळचा, हा अभ्यासक्रम विज्ञान केंद्रीभूत आहे. विज्ञान आणि समाज यांच्यातील संबंध अधिक सुदृढ करण्याच्या अनुषंगाने या अभ्यासक्रमांची संरचना करण्यात आली आहे. अर्थशास्त्रातील मुख्य विषय घटकांसोबत इतर ज्ञानशाखांचेही घटक या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी अध्यापन, उद्योग, निर्णय प्रकिया आणि इतर क्षेत्रांत उत्तम करिअर करू शकतात.

**आयसर अॅडमिशन टेस्ट-**

ही परीक्षा संगणकाधारित (कॉम्प्युटर बेस्ड) आहे. या पेपरमधील प्रश्न बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ट पद्धतीचे असतात. जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि भौतिकशास्त्र या विषयावर आधारित प्रश्न विचारले जातात. प्रत्येक विषयाचे १५, असे एकूण ६० प्रश्न असतील. प्रत्येक अचूक उत्तरास ४ गुण दिले जातात. अशा प्रकारे एकूण २४० गुणांचा हा पेपर असेल. चुकलेल्या उत्तरासाठी एक गुण कपात केला जातो. परीक्षेचा कालावधी - तीन तास.

आयसर अॅडमिशनच्या वेबपोर्टलवर यंदाच्या परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम ठेवण्यात आला आहे. २०१७ पासून ते २०२४ पर्यंतच्या परीक्षेचे पेपर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे पेपर सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यामुळे प्रश्नांची नेमकी जाण येऊ शकते, त्यानुसार अभ्यासाची दिशाही ठरवता येते. लवकरच सरावासाठी पेपरही उपलब्ध करून देण्यात येईल.

**अर्हता -**

(१) सर्व आयसरमधील बीए-एस -एमएस - भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यापैकी कोणतेही तीन विषय घेऊन १२ वी उत्तीर्ण. (२) कोलकता येथील बीएस- एमएस इन कॉम्प्युटेशनल डाटा सायन्स, आयसर भोपाळ येथील बीटेक आणि बीएस- इकॉनॉमिक सायन्सेस , आयसर तिरुपती येथील बीएस- इकॉनॉमिक अॅण्ड स्टॅटिस्टिकल सायन्सेस - १२ वीमध्ये गणित विषयाचा अभ्यास केलेला असावा.

या परीक्षेत खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना किमान ६० टक्के तर राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुण मिळायला हवे. १२ वीमध्ये गुणांची टक्केवारी काढताना सर्व विषयांचे गुण धरले जातील. २०२४ मध्ये १२ वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही कारणाने, २०२५ मध्ये पुन्हा एक किंवा दोन विषयांसाठी परीक्षा दिली असल्यास, या दोन वर्षांतील ज्या विषयात सर्वोच्च गुण मिळाले असतील ते गुण ग्राह्य धरले जातील.

विज्ञान शाखेत ज्या विद्यार्थ्यांनी गणिताऐवजी जीवशास्त्र आणि जीवशास्त्राऐवजी गणित घेतले असेल त्यांनासुद्धा ही परीक्षा देता येते. मात्र या दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांना संबंधित विषयाचे प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

**एकूण जागा**

या सर्व कॅम्पसमध्ये (१) बीएस-एमएस अभ्यासक्रमाला २१३८ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. यामध्ये आयसर कोलकता- ३१०, आयसर भोपाळ आणि आयसर बेहरामपूर प्रत्येकी ३००, आयसर मोहाली २७०, आयसर पुणे २८८, थिरुवनंतपूरम- ३२०, तिरुपती- ३५०, अशा जागांचा समावेश आहे. (२) बीटेक/बीएस अभ्यासक्रमाच्या २२५ (आयसर भोपाळ- बीटेक- १४०, बीएस इकॉनॉमिकल सायंस- ४०, आयसर तिरुपती- बीएस इकॉनॉमिकल अॅण्ड स्टॅटिस्टिकल सायन्स ५०) अशा जागांचा समावेश आहे. यामध्ये शासनाच्या निर्णयानुसार राखीव जागांचा समावेश आहे. दिव्यांगांसाठी ५ टक्के जागा राखीव आहेत. आयसरमधील प्रवेश पुढील घटकांवर अवलंबून असतो- (१) सर्व आयसरमधील एकूण जागा, (२) आयसर अॅडमिशन टेस्टमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेली श्रेणी, (३) उमेदवाराने दिलेला आयसरचा प्राधान्यक्रम, (४) उमेदवारांचा संवर्ग. सर्व कॅम्पसच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश प्रकिया राबवण्यात येत असल्याने एकच अर्ज भरावा लागतो.

**शिष्यवृत्ती**

या अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या काही उमेदवारांना दरमहा ५ हजार रुपयांची इन्स्पायर (इनोव्हेशन इन सायन्स पर्स्युइट फॉर इन्स्पायर्ड रिसर्च) शिष्यवृत्ती दिली जाते. हा संपूर्णपणे निवासी स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना सर्व सोईंनी युक्त वसतिगृह उपलब्ध करून दिले जाते.

**संपर्क-** (१) प्रवेश प्रकिया संकेतस्थळ- https://iiseradmission.in/ (२) पुणे कॅम्पस - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, डॉ. होमी भाभा रोड ,पाषाण पुणे- ४११००८, दूरध्वनी- ०२०- २५९०८०००, ई-मेल- admissions@iiserpune/ ac. in, संकेतस्थळ - www.iiserpune.ac.in

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत



आता हाऊसिंग लोन
₹ 3.00 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध



S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# टॉय स्टोरी!

**भारतातील खेळणी** उद्योगाची पाळेमुळे थेट सिंधू संस्कृतीच्या काळापर्यंत पोहचलेली दिसतात. त्या काळातील खेळणी- शिट्टीच्या आकाराचा पोपट, माकड, लहान आकारातील बैलगाडी, या स्वरूपातील आढळून येतात. ही खेळणी बांबूच्या काड्या, गवत, माती, दगड, तंतूपासून बनवलेले कापड यासारख्या नैसर्गिक साहित्यापासून तयार केली जात. आधुनिक काळातील तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणामुळे भारतीय खेळण्यांचा चेहरामोहरा बदलला. नावीन्यपूर्ण कल्पना वापरून खेळण्यांची निर्मिती सुरू झाली.

२०२५ ते २०३० या कालावधीत भारतीय खेळणी उद्योग हा जागतिक स्तरावरील, सर्वात मोठा उद्योग ठरावा, असे उद्दिष्ट भारत सरकारने ठेवले आहे. २०२८ सालापर्यंत भारतीय खेळणी उद्योगातील उलाढाल तीन बिलियन डॉलर्सपर्यंत पोहचू शकते. ही वाढ दरवर्षी १२ टक्के अशी अपेक्षित आहे. खेळण्यांची निर्मिती आणि उत्पादनाच्या क्षेत्रात ४०००च्या आसपास सूक्ष्म, लघू आणि मध्यम श्रेणीतील उद्योग आहेत. त्यांना सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योजकता (मायक्रो, स्मॉल, मीडियम एंटरप्रायझेस) उद्योजकता मंत्रालयामार्फत विविध प्रकारची प्रोत्साहने आणि आर्थिक सवलती दिल्या जातात.

भारतात ० ते १४ या वयोगटांतील लोकसंख्या २५ टक्के आहे. या गटाच्या विविध स्तरांतील आवडनिवड, क्रयशक्ती, शिक्षण, लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर खेळण्यांची निर्मिती केली जाते. भारत सरकारने, नॅशनल अॅक्शन प्लॅन फॉर टॉइज- एनएपीटी (राष्ट्रीय खेळणी कृती आराखडा) तयार केला असून, व्होकल फॉर लोकल या उपक्रमावर भर दिला आहे. याद्वारे स्थानिक खेळणी अधिकाधिक खरेदी करा, यासाठी जाणीवजागृती केली जात आहे. यामध्ये केंद्रीय २० मंत्रालये / विभाग सामील झाले आहेत. परदेशांतून भारतात येणाऱ्या खेळण्यांवर ७० टक्केपर्यंत कस्टम ड्युटी लावण्यात येत आहे.

१४ वर्षे वयोगटापर्यंतच्या खेळण्याच्या सुरक्षिततेकडे अधिक लक्ष दिले जाते. ही सुरक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. स्वस्त दर्जाच्या खेळण्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. सूक्ष्म औद्योगिक घटकांकडे परीक्षण सुविधा नसताना, त्यांना एक वर्षासाठी परवाना देण्याचा निर्णय, इंडियन ब्युरो ऑफ स्टँडइर्सने घेतला आहे. स्वतःच्या औद्योगिक घटकात परीक्षण सुविधा स्थापन करण्यासाठी तीन वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. देशी खेळणी उद्योगाला साहाय्य करण्यासाठी समूह स्वरूपातील (क्लस्टर आधारित) १९ खेळणी औद्योगिक घटकांना, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योजकता मंत्रालयामार्फत अर्थसाहाय्य केले जाते. भारतीय बनावटीच्या खेळण्यांना प्रोत्साहन देणे आणि या क्षेत्रातील नावीन्यतेला उत्तेजन देण्यासाठी, इंडियन टॉय फेअर २०२१ (भारतीय खेळणी मेळा) टॉयकॅथॉन यांसारखे उपक्रम राबवण्यात येत आहेत. नॉयडा येथे टॉय पार्कची उभारणी करण्यात आली आहे. या पार्कमध्ये निर्यातक्षम दर्जेदार खेळणी, इलेक्ट्रॉनिक खेळणी, सॉफ्ट टॉइज, प्लास्टिक खेळणी, क्रीडांगणासाठी आवश्यक असणारे साहित्य, लाकडी खेळणी, बोर्ड गेम यांचा समावेश आहे.

अमेरिकेने सुरू केलेल्या आयात शुल्क धोरणामुळेही भारतीय खेळण्यांचे मार्केट विस्तारण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या बाबी लक्षात घेऊन, टॉय डिझाइन क्षेत्रात उत्तमोत्तम करिअर संधी निर्माण होऊ शकतात. या क्षेत्रात करिअर करण्याची सर्जनशील इच्छा आणि तीव्र आवड असल्यास विद्यार्थ्यांनी, बॅचलर ऑफ डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन हा अभ्यासक्रम करायला हवा. या अभ्यासक्रमामध्ये थ्रीडी मॉडेलिंग, साहित्याची निवड, उपयोगकर्त्याच्या दृष्टिकोनातून अभिकल्पाची संरचना आदी बाबी दर्जेदार आणि सुरक्षित खेळणी निर्मितीसाठी आवश्यक ठरतात.



संस्था आणि अभ्यासक्रम

(१) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (एनआयडी)मध्ये बॅचलर ऑफ डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी डिझाइन ॲप्टिट्यूड टेस्ट (डीएटी) प्राथमिक आणि मुख्य चाळणी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेद्वारे एनआयडी अहमदाबाद, एनआयडी भोपाळ, एनआयडी जोरहट आसाम, एनआयडी कुरुक्षेत्र हरयाणा, एनआयडी आंध्र प्रदेश येथील बी. डिझाइन अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या वस्तूंच्या डिझाइन (अभिकल्प) चे शिक्षण प्रशिक्षण दिले जाते. या डिझाइनच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण केले जाते. कोणत्याही वस्तूच्या डिझाइन आणि निर्मितीसाठी आवश्यक असणारी डिझाइनची मूलभूत तत्त्वे, वस्तूंच्या आकाराचे ज्ञान, लागणारे साहित्य, तंत्र आणि सौंदर्यदृष्टी प्रदान केली जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रकल्पांवर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. ग्राहककेंद्री दृष्टिकोनाचे महत्त्व शिकवले जाते. त्याच्या प्रभावी वापराचे तंत्र शिकवले जाते. वेगवेगळ्या आर्थिक स्तरांच्या गरजा आणि आवश्यकता लक्षात घेऊन, वस्तूचे अभिकल्प तयार करणे आणि प्रत्यक्ष वस्तू निर्मितीसाठी साहाय्य करणे, या दोन्ही बाबींवर हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी प्रभुत्व मिळवतात. ''फक्त मनोरंजनासाठी खेळणे'', या संकल्पनेच्या पलीकडे जाऊन, आधुनिक खेळणी, शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्यसुविधा, कला, डिझाइन थिंकिंग या क्षेत्रामध्ये महत्त्वाचा सहभाग देत आहेत. या अभ्यासक्रमात विद्यार्थी खेळणी डिझाइन किंवा गेम निर्मितीचा स्वतःचा प्रकल्प स्वतःच ठरवू शकतो. यामध्ये डिजिटल गेम, खेळणी, प्ले स्पेसेस, डिजिटल आणि बोर्ड गेम्स, शैक्षणिक खेळणी आदींचा समावेश असतो.

## मास्टर ऑफ डिझाइन- टॉय डिझाइन

एनआयडीने, पदव्युत्तर पदवी स्तरावर, मास्टर ऑफ डिझाइन टॉय ॲण्ड गेम डिझाइन, हा अडीच वर्षे कालावधीचा स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम, खेळण्यांच्या नावीन्यपूर्ण अभिकल्पावर भर देणारा आहे. आधुनिक खेळण्यांचा उपयोग आता मुलांचा चौफेर विकास होण्यासाठी केला जात असल्याने, हे क्षेत्र बहुशाखीय असे झाले आहे. नव्या युगातील खेळणी या अधिक आकर्षक असतातच, शिवाय ती मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणारी, चालना देणारी आणि त्यांना नवे काहीतरी करण्याची प्रेरणा व ऊर्जा देणारी ठरली आहेत. सध्याची खेळणी अधिकाधिक इंटरॲक्टिव्ह असून त्यामुळे मुलांच्या विचारक्षमतेचा अधिकाधिक विस्तार करणारी ठरत आहेत.

या अभ्यासक्रमाला, चार वर्षे कालावधीच्या बॅचलर ऑफ डिझाइन या पदवीसह कोणत्याही विषयातील चार वर्षे कालावधीच्या पदवीधरास विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकतो किंवा ४ वर्षे कालावधीचा फाइन आर्ट, ॲप्लाइड आर्ट, डिझाइन, आर्किटेक्चर या विषयांपैकी कोणत्याही विषयातील पदविकाधारक आणि कोणत्याही विषयातील ३ वर्षे कालावधीची पदवी प्राप्त विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी पात्र ठरतात. प्रवेशासाठी एनआयडी डिझाइन ॲप्टिट्यूड टेस्ट घेतली जाते.

• **संपर्क**- https:// nid. edu

(२) सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन या संस्थेने, बॅचलर ऑफ डिझाइन (बी.डिझाइन) इन प्रॉडक्ट डिझाइन अभ्यासक्रम सुरू केला आहे. कालावधी चार वर्षे. कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण हा अभ्यासक्रम करू शकतो. प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते.

• **संपर्क**- https:// www. sid. edu. in

(३) आयआयटी मुंबईच्या स्कूल ऑफ डिझाइनच्या, बी. डिझाइन या अभ्यासक्रमात प्रॉडक्ट डिझाइन या विषयघटकाचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला चाळणी परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो. कला, वाणिज्य किंवा विज्ञान यापैकी कोणत्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ही परीक्षा देऊ शकतात.

• **संपर्क**- https:// www. idc. iitb. ac. in

(३) एमआयटी एटीडी (आर्ट डिझाइन ॲण्ड टेक्नॉलॉजी) युनव्हर्सिटीमार्फत बी.डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन आणि एम.डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन हे अभ्याक्रम चालवले जातात. दोन्ही अभ्यासक्रमांना चाळणी परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो.

• **संपर्क**- https:// mituniversity. ac. in

(४) पारुल युनिव्हर्सिटीच्या, स्कूल ऑफ डिझाइनमार्फत बी.डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन हा अभ्यासक्रम करता येतो.

• **संपर्क**- https:// paruluniversity. ac. in/ pid/ bachelors- in- product- design/

(५) पर्ल ॲकॅडेमी या संस्थेने बॅचलर ऑफ डिझाइन इन प्रॉडक्ट डिझाइन, हा चार वर्षे कालवधीचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्हता - कोणत्याही विषयातील १२ वी. याच विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डिझाइन) सुद्धा या संस्थेत करता येते.

या अभ्यासक्रमांमध्ये, डिझाइन थिंकिंग, प्रॉडक्ट इनोव्हेशन, डिझाइन मॅनेजमेंट, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अशासारख्या विविध कौशल्यसंचाचा विकास होईल याकडे लक्ष पुरवले जाते. मोठ्या संख्येने विविध वस्तूंची निर्मिती, सेवा, कार्यप्रणाली यांची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी, या डिझायर्नसच्या सर्जनशीलतेचा उपयोग होऊ शकतो. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणत्याही प्रकारची आव्हाने स्वीकारण्याची क्षमता या अभ्यासक्रमाद्वारे निर्माण केली जाते.

• **संपर्क** https:// www. pearlacademy. com/ programs/ bachelors- degree/ product/ bdes- product- design

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# स्मार्ट मशीनच्या जगात

**सध्या आर्टिफिशिअल** इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम प्रज्ञा या विषयास खूप महत्त्व आले आहे. सगळीकडे त्याचाच बोलबाला. प्रत्येक दिवसागणिक एआय आणि मशीन लर्निंगची मागणी वाढतच चाललीय. काही तज्ज्ञांच्या मते एआयमुळे जगातील १.७ दशलक्ष नोकऱ्यांवर गदा येऊ शकते पण, त्याचबरोबर वेगळ्या भूमिकेतील नव्या संधीही निर्माण होण्याचीही दुप्पट शक्यता वर्तवली गेलीय.

मशीन लर्निंग, हा विषय केवळ माहिती तंत्रज्ञान कंपन्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. मनोरंजन, आरोग्य सुविधा, वित्त, परिवहन अशा क्षेत्रातही मशीन लर्निंगने हातपाय पसरले आहेत. त्यामुळेच, मशीन लर्निंग या विषयाचे शिक्षण-प्रशिक्षण घेतल्यास, करिअरच्या अनेक संधीचे दार उघडले जाऊ शकते. आयबीएम, अॅमेझॉन, अक्सेंच्युअरसारख्या कंपन्यांनी, मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आघाडी घेतली आहे.

### मशीन लर्निंग

मशीन लर्निंग तंत्रामुळे, संगणकाला स्वतःहून शिकणे शक्य होतेय. मशीन लर्निंग, ही एआयची एक शाखा आहे. मशीन लर्गिंनसाठी विशिष्ट स्वरूपाचे अल्गॉरिदम किंवा गणितीय भाषा तयार केली जाते. त्याव्दारे दिलेल्या माहितीचा वापर करून, संगणक स्वतः शिकतो. या शिकण्यातून त्याला निष्कर्ष काढण्याची आणि निर्णयसुद्धा घेण्याची क्षमता प्राप्त होते. आर्थिक व्यवहारातील घोटाळे ते ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर विविध वस्तूंची शिफारस करणे, अशा अनेक क्षेत्रात, मशीन लर्निंगचा उपयोग होऊ लागलाय. २०२७ पर्यंत एआयच्या क्षेत्रातील वार्षिक उलाढाल २६७ बिलीयन डॉलर्सपेक्षा अधिक राहण्याची शक्यता, या क्षेत्रातील तज्ज्ञांनी वर्तवलीय. या क्षेत्रातील बाजारपेठ वार्षिक ३७ टक्के या दराने वाढत असून ही वाढ २०३० पर्यंत कायम राहील. त्यामुळेच जागतिक अर्थकारणातील एआयचा वाटा १५.७ ट्रिलियन डालर्सपर्यंत राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मानवी बुद्धिमत्तेची अनेक पारंपरिक कामे एआय सध्या करू लागला आहे. संगणकाकडून कामे करून घेण्यासाठी विशिष्ट अॅल्गोरिदमची निर्मिती, मशीन लर्निंगव्दारे केली जाते. यामुळे मानवी उत्पादकता वाढण्यास साहाय्य होणार आहे. विविध क्षेत्रातील सर्जनशील नावीन्यतेमध्ये वाढ अपेक्षित आहे. एआय तंत्रज्ञान, झपाट्याने उत्क्रांत होत असून त्यामुळे पुढील करिअर संधी निर्माण होऊ शकतात, याकडे याक्षेत्रातील तज्ज्ञ, रोनाल्ड व्हॅन लून यांनी लक्ष वेधले आहे.

**(१) मशीन लर्निंग** - कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून, यंत्रे (संगणक/रोबो) मागील अनुभवावरून शिकते. शिवाय पुढील काळात लक्षणीय सुधारणासुद्धा करते.

**(२) मशीन इंटेलिजन्स**- अधिक प्रगत अल्गोरिदमचा वापर करून यंत्रे, मानवासारखा विचार करू लागतील आणि अधिक गतीने व प्रभावीपणे कोणतीही समस्या सोडवू शकतील.

**(३) मशीन कॉंशियसनेस**- हा भविष्यातील टप्पा असून या टप्प्यात, यंत्रांना शिकण्यासाठी कोणत्याही बाह्य डाटा किंवा माहितीची गरज




भासणार नाही, ते स्वतःहून आवश्यक त्या गोष्टी अनुभवातून शिकू शकतील.

### महत्त्वाचे घटक

मशीन लर्निंगच्या क्षेत्रात पुढील काही विषयघटक महत्त्वाचे ठरतात-

**(१) न्युरल नेटवर्क**- माणसाच्या मेंदूतील मज्जारज्जूंच्या जाळ्यांसारखे, हे जाळे असते. मज्जारज्जूप्रमाणेच त्याचे कार्य अपेक्षित आहे. यामुळे कोणत्याही प्रकारच्या क्लिष्ट डाटाचे विश्लेषण शक्य होऊन यंत्रांना अत्याधिक अचूकतेने निष्कर्ष काढणे किंवा निर्णय घेणे शक्य होते.

**(३) नॅचरल लॅंग्वेज प्रोसेस**- यामध्ये मानवी भाषा समजून घेण्याची क्षमता संगणक किंवा स्मार्ट यंत्र प्राप्त करतो. यामुळे, आपण संगणक किंवा स्मार्ट यंत्रासोबत संवाद करू शकतो. आपले सांगणे ओळखून, संगणक योग्य ते प्रतिसाद देऊ शकतो. जसेजसे, या तंत्रज्ञानात सुधारणा होत जाईल, तसे स्मार्ट यंत्रासोबतचा आपला संवाद अधिकाधिक नैसर्गिक होत जाईल.

**(४) डीप लर्निंग** - ही मशीन लर्निंगची पुढची पायरी. यामध्ये स्मार्ट यंत्रे, अधिक गुंतागुंतीचे किंवा व्यामिश्र प्रश्न अथवा समस्या स्वतःहून सोडवण्यासाठी सक्षम होतील. यामध्ये न्युरल नेटवर्कच्या साखळीतून डाटावर प्रकिया होऊन यंत्रांना गतीने शिकता येईल. त्वरित निर्णयही घेता येईल. चित्रे, आवाज, संहिता( टेक्स्ट )यांच्यावर प्रकिया करून निष्कर्ष आणि निर्णयाप्रप्त पोहचणारे हे तंत्रज्ञान आहे.

याक्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ पुढील क्षेत्रांना मोठ्या संख्येने लागणार आहे.

**(१) मनोरंजन**- स्ट्रिमिंग आणि गेमिंग कंपन्यांनी, मशीन लर्निंग तंत्राचा वापर करून प्रेक्षकांच्या आवडीनिवडीनुसार कार्यक्रम किंवा कंटेट निर्मिती सुरु केली आहे. त्यामुळे मनोरंजक कार्यक्रम बघण्याचा ग्राहकांचा वेळ वाढला आहे. त्यांच्या समाधान आणि आनंदाच्या पातळीतही वाढ झाली आहे.

**(२) ऑटोमोटिव्ह**- वाहनांमध्ये सेन्सरचा उपयोग करुन, त्यांना अधिकाधिक माहिती पुरवली जाते. त्यामुळे संभाव्य देखभाल दुरुस्तीच्या सूचना, वाहनातील बिघाडीचे अचुक विश्लेषण शक्य होत असून, भविष्यात अधिकाधिक वाहने, स्वयंचिलतच राहतील अशी चिन्हे आहेत.

**(३) रिटेल**- कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून ग्राहकांची वर्तणूक, आवडनिवड यांचे विश्लेषण केले जाते. खरेदीप्रक्रिया अधिक सुलभ, गतीने आणि आनंददायी अनुभव देणारी करण्याकडे लक्ष पुरवले जाते.

**(४) रिअल इस्टेट**- जागा किंवा इमारतीचे मूल्यांकन, भविष्यसूचक विश्लेषण, विक्री आणि खरेदीची अत्यंत सुलभ अशी प्रकिया करण्यासाठी मशीन लर्निंग तंत्राचा वापर केला जातो.

**(५) टेलिकम्युनिकेशन**- नेटवर्कची कामगिरी कायम अडथळाविरहित आणि गतिमान राहण्यासाठी, चॅटबॉट आणि आभासी साहाय्यक ( व्हर्च्युअल असिस्टंट ) यांच्या साहाय्याने ग्राहकांना तत्काळ प्रतिसाद दिला जातो.

**(६) कृषी** - पिकाच्या उत्पादनाची अचूक आकडेवारी, कीटकांच्या धाडीचे भाकीत, खतांची अचूक मात्रा आदी बाबींमध्ये निर्णय घेण्यासाठी मशीन लर्निंग तंत्राचा वापर करून शेतीचे उत्पादन आणि उत्पन्न वाढीसाठी उपयोग केला जातो.

**(७) पुरवठा साखळी** - ही साखळी अधिकाधिक सुरक्षित होण्यासाठी स्वंयनियोजन, मागणीनुसार पुरवठ्याचे संनियंत्रण, प्रभावी वाहतूक व्यवस्थापन यासाठी, मशीन लर्निंगचा उपयोग केला जातो.

**(८) वित्त** - आर्थिक व्यवहारातील धोके आणि फसवणूक टाळण्यासाठी, मशीन लर्निंग तंत्राचा वापर करून सुरक्षेचे कवच निर्माण केले जाते.

**(९) आरोग्यसुविधा (हेल्थ केअर)**- रुग्णांना अधिक उत्तम सेवा मिळावी म्हणून आरोग्य प्रशासन, आरोग्य सुविधा व्यवस्थापन याकडे लक्ष पुरवले जाते.

### अपेक्षित कौशल्य

या क्षेत्रात येण्यासाठी उत्कृष्ट अशा संवादकौशल्याची गरज आहे. त्यामुळे प्रभावीपणे , सर्जनशीलह कल्पना मांडता येतात. या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचा गणिताचा विशेषतः सांख्यिकी आणि लिनिअर अंकगणित यांचा पाया पक्का करायला हवा. पायथॉन किंवा सी प्लससारख्या संगणकीय भाषेवर प्रभुत्व मिळवायला हवे. अल्गोरिदमच्या संकल्पना स्पष्ट होणे, अत्यावश्यक ठरते. प्रोग्रॅमर म्हणून सध्या काम करत असणाऱ्यांनी एआयमध्ये येण्यासाठी अल्गोरिदम आणि कोडिंगचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील. पायथॉन, या भाषेवरही प्रभुत्व मिळवायला हवे. डाटा सायंटिस्टना या क्षेत्रात येण्यासाठी प्रोग्रॅमिंगचे कौशल्य अधिक वाढवावे लागेल. डाटा व्हिज्युलायझेशन टूल्सवर प्रभुत्व मिळवल्यास, या क्षेत्रात अधिक प्रगती करणे शक्य होऊ शकेल. एआय सतत उन्नत होत असल्याने या क्षेत्रात असलेल्या किंवा येऊ इच्छिणाऱ्यांना सतत कौशल्यवृद्धी करत राहणे गरजेचे आहे. अन्यथा एआयच्या गतीशी स्पर्धा करणे कठीण जाईल. शिवाय या क्षेत्रात टिकणेही कठीण होईल. काही अभ्यासक्रम

(१) बिट्स पिलानी या संस्थेने, वर्क इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्रॅम या उपक्रमांतर्गत, बीटेक इन स्मार्ट मॅन्युफॅक्चर हा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

- **संपर्क**- https:// bits- pilani- wilp. ac. in

(२) के. जे. सोमय्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग, मुंबई- बीटेक इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड डाटा सायन्स.

- **संपर्क**- https:// kjsce. somaiya. edu/ en/ programme/ btech- in- artificial- intelligence- data- science/

(३) डीजे संघवी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, मुंबई- (अ) बीटेक कॉम्प्युटर सायंस अॅण्ड इंजिनअरिंग इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड मशीन लर्निंग, (ब) बीटेक कॉम्प्युटर सायंस अॅण्ड इंजिनअरिंग इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड डाटा सायन्स.

- **संपर्क**- https:// www. djsce. ac. in/

(४) मुकेश पटेल स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (एनएमआयएमएस युनिव्हर्सिटी) मुंबई- (अ) बीटेक इन डाटा सायंस, (ब) बीटेक इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स.

- **संपर्क**- https:// engineering. nmims. edu,

(६) थडोमल साहणी इंजिनीअरिंग कॉलेज, मुंबई - बीटेक इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड डाटा सायंस.

- **संपर्क**- https:// tsecadmission. org/

(७) सिम्बॉयसीस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,पुणे- बीटेक इन आर्टिफिशिअल टेक्नॉलॉजी अॅण्ड मशिन लर्निंग.

- **संपर्क**- https:// www. sitpune. edu. in/ btech- AI

(८) डीवाय पाटील युनिव्हर्सिटी,पुणे- (अ) बीटेक इन आर्टिफिशिअल टेक्नॉलॉजी अॅण्ड मशीन लर्निंग, (ब) बीटेक इन आर्टिफिशिअल टेक्नॉलॉजी अॅण्ड डाटा सायंस.

- **संपर्क**- https:// dypatiluniversitypune. edu. in/ bachelor- of- technology- pune. php

**- सुरेश वांदिले**

तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466
Bharose

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# कॉर्पोरेट रुग्णालयांचे व्यवस्थापक

**आपल्या देशात** कॉर्पोरेट रुग्णालयांच्या सतत वाढत चाललेल्या साखळीमुळे या क्षेत्राचे रूपांतर आता मोठ्या व्यवसायात किंवा उद्योगात झाले आहे. या क्षेत्रात नवेनवे गुंतवणूकदार किंवा उद्योजक उतरत आहेत. या कॉर्पोरेट रुग्णालयांमध्ये व्यावसायिक कार्यक्षमता वाढण्यासाठी, बिग डेटा अॅनॅलिटिक्स, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सुविधा /सेवांचा समावेश केला जात आहे. हे क्षेत्र झपाट्याने आंतरज्ञानशाखीय बनले आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या सुव्यवस्थित व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरजही मोठ्या प्रमाणावर भासू लागली आहे. ही गरज रुग्णालय व्यवस्थापन किंवा प्रशासन (हॉस्पिटल मॅनेजमेंट/ अॅडमिनिस्ट्रेशन) हा अभ्यासक्रम भागवू शकेल. या अनुषंगाने पुढील काही अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतात-

(१) टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या, स्कूल ऑफ हेल्थ सिस्टीम स्टडीज मार्फत, दोन वर्षे कालावधीचा, मास्टर ऑफ हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन, हा अभ्यासक्रम चालवला जातो. कॉर्पोरेट किंवा व्यावसायिक रुग्णालयांमध्ये दिवसेंदिवस व्यामिश्र स्वरूपाच्या आणि तांत्रिक बाबी हाताळणाऱ्या कौशल्ययुक्त शेकडो व्यक्तींचा वावर वाढला आहे. या सर्व मनुष्यबळास कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी आणि रुग्णांचे विविध स्वरूपाचे प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी या मनुष्यबळाचा उपयोग होतो. रुग्णांच्या थेट जीवनमरणाचा प्रश्न असल्याने रुग्णालयाच्या व्यवस्थापनासाठी उत्तम दर्जाच्या नेतृत्वाची गरज असते. असे कौशल्य या अभ्यासक्रमाव्दारे प्रदान केले जाते.

**काय शिकाल?**

सर्वसाधारणतः पुढील क्षेत्राचे ज्ञान हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले जाते. आरोग्याशी संबंधित अर्थकारण किंवा अर्थशास्त्र, वित्तीय व्यवस्थापन, संस्थात्मक वर्तणूक, रुग्णालय व्यवस्थापनाची तत्त्वे, रुग्णालयांसाठी संशोधन पद्धती, संस्था आणि साहाय्यकारी कर्मचारी/ कामगार सेवा, संस्था आणि वैद्यकीय व सुपर स्पेशॅलिटी (अतिविशेषज्ञ) सेवांचे प्रशासन, वैद्यकीय साहित्य आणि वैद्यकीय तंत्रज्ञान व्यवस्थापन, जैवसांख्यिकीची तोंडओळख, रुग्णालय माहिती सेवा, रुग्णालय नियोजन आणि कार्यक्रम व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि कामगार कायदे, रुग्णालयांशी संबंधित नैतिक बाबी, रुग्णालय किंवा आरोग्य व्यवस्थेचे गुणवत्ता व्यवस्थापन, व्यवस्थापकीय विश्लेषण आणि कार्यपद्धतीचे विश्लेषण, रुग्णालयाच्या व्यावसायिक बाबींच्या कायदेशीर चौकटी, विपणन (मार्केटिंग) व्यवस्थापन आणि व्यवसाय विकासवाढीच्या व्यूहनीती, आरोग्यविमा आणि जोखीम व्यवस्थापन, नागरी आरोग्य, व्यूहात्मक व्यवस्थापन आणि संस्थात्मक विकास, आरोग्य व्यवस्थेतील उद्योजकता, सेवा व्यवस्थापन.

**करिअर संधी**

हा अभ्यासक्रम केलेल्या उमदेवारांना कॉर्पोरेट क्षेत्रातील वा सार्वजनिक क्षेत्रातील रुग्णालयांमध्ये वेगवेगळ्या विभागांचे संनियंत्रण करणे, रुग्णालयातील नव्या सेवा किंवा नव्या रुग्णालयांचे डिझाइन आणि नियोजन करणे आदी जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात.

रुग्णालये सल्लागार कंपन्या (हॉस्पिटल कन्सलटन्सी फर्म्स), आरोग्यविमा क्षेत्र, आरोग्य सुविधा माहिती तंत्रज्ञान क्षेत्र (हेल्थकेअर आयटी इंडस्ट्री) या क्षेत्रातही रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

**अर्हता-** या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कला, वाणिज्य, विज्ञान, कृषी, वैद्यकीय, पशुवैद्यकीय, औषधीनिर्माण शास्त्र, विधि अशा कोणत्याही शाखेतील पदवीधरास अर्ज करता येतो. यंदा पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा देणारे विद्यार्थीही अर्ज करू शकतात. या अभ्यासक्रमाला, कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स एक्झामिनेशन (सीयूईटी-पोस्ट ग्रॅज्युएट)व्दारे प्रवेश दिला जातो. यंदा सीयूईटीपीजी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी एक चांगला करिअर पर्याय म्हणून या अभ्यासक्रमाची निवड करायला हरकत नाही. सीयूईटी-पीजी या परीक्षेच्या गुणांवर आधारित, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे.



**संपर्क - टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, व्ही. एन. पुरव मार्ग देवनार, मुंबई- ४०००८८, दूरध्वनी- ०२२-२५५२५००० आणि २५५२५२५२,**

**संकेतस्थळ- https:// admissions. tiss. edu/**

(२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, बोधगयाने दोन वर्षे कालावधीचा एमबीए इन हॉस्पिटल मॅनेजमेंट अॅण्ड हेल्थ केअर मॅनेजमेंट, हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी. खुला संवर्ग ५० टक्के राखीव संवर्ग ४५ टक्के. कॉमन एन्ट्रन्स एक्झामिनेशन (कॅट) चे गुण, मुलाखत आणि रिटन अॅबिलिटी टेस्टमधील गुणांवर आधारित अंतिम प्रवेश दिला जातो. संपर्क- **ttps:// iimbg. ac. in/ mba- hospital- healthcare- management/**

(३) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, जम्मूने दोन वर्षे कालावधीचा, एमबीए इन हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन अॅण्ड हेल्थ केअर मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. **https:// www. iimj. ac. in/**

(४) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोलकता येथे पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट कोर्स इन हेल्थ केअर मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम करता येतो. या क्षेत्रासाठी आवश्यक सैद्धांतिक ज्ञान आणि प्रात्यक्षिकांचा या अभ्यासक्रमात समावेश आहे. एखादे मोठे रुग्णालय, हेल्थकेअर संस्था येथे प्रात्यक्षिकांची संधी उपलब्ध करून दिली जाते. देशातील दर्जेदार आरोग्य सुविधा/सेवा पुरवणाऱ्या संस्थांचे सहकार्य अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने घेतले जाते. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा आहे.

**अर्हता-** या अभ्यासक्रमाला एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, जैवतंत्रज्ञान किंवा जैव वैद्यकीय (बायोमेडिकल) विषयातील पदवी प्राप्त उमेदवार प्रवेश घेऊ शकतात. तथापि आरोग्य व्यवस्था/सेवा क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असणाऱ्या कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधरसुद्धा या अभ्यासक्रमासाठी पात्र ठरतात. पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी चाळणी परीक्षेतील गुण, शैक्षणिक अर्हता, अनुभव, मुलाखत या घटकांना अवलंबण्यात येते.

**संपर्क- https:// www. iimcal. ac. in/ ldp**

(५) मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अॅण्ड डेव्हलपमेंट या संस्थेने, एक वर्ष कालावधीचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन. हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. कोणत्याही विषयातील पदवीधरास हा अभ्यासक्रम करता येत असला तरी, बी.एस्सी, एमबीबीएस, बीएएमएस, बी.फार्म, एमबीए या पदव्या घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. प्रवेशासाठी संस्थेमार्फत चाळणी परीक्षा घेतली जाते.

**करिअर संधी** - हा अभ्यासक्रम केल्यावर रुग्णालयाचे फ्रंट ऑफिस, बिलिंग, अकाऊंट, वित्त, माहिती व्यवस्थापन सेवा, मनुष्यबळ व्यवस्थापन, साहित्य/ वस्तू व्यवस्थापन, विपणन, पुरवठा व्यवस्थापन, डाक्युमेंटशन आदी विभागांमध्ये संधी मिळू शकतात.

संपर्क- विद्यानगरी, सांताक्रुज पूर्व, मुंबई-४०००९८, दूरध्वनी- ८१०४४१२०७१, फॅक्स-०२२-२६५३०२६३, ईमेल- gicedenquiry@giced. mu. ac. in, संकेतस्थळ- giced. mu. ac. in

(६) इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटल मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च- दिल्ली येथे पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन हॉस्पिटल अॅण्ड हेल्थकेअर मॅनेजमेंट, हा दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम चालवला जातो. या अभ्यासक्रमांतर्गत, हॉस्पिटल मॅनेजमेंट, हेल्थ मॅनेजमेंट आणि हेल्थ इन्फॉर्मेशन सिस्टीम या तीन विषयांमध्ये स्पेशलायझेशनची सुविधा आहे.

या अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाची मान्यता प्राप्त आहे. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी- खुला संवर्ग ५० टक्के गुण, राखीव संवर्ग ४५ टक्के गुण. रुग्णालयाला भेडसावणाऱ्या व्यवस्थापकीय समस्यांचे निराकरण करणे, आरोग्यसुविधा पुरवणाऱ्या संस्थांचे नियोजन, बांधणी आणि नियोजनाचे कौशल्य प्रदान करणे, नागरी आणि ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा पुरवठा करणाऱ्या मनुष्यबळाचे प्रशिक्षण व अशा मनुष्यबळाचा विकास करणे आदी बाबींचे सैद्धांतिक ज्ञान या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना दिले जाते. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी, बिझिनेस स्कूलच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या. कॅट/ मॅट/ झॅट/ जीमॅट/ सीमॅट/ एटीएमए यापैकी कोणतीही एक परीक्षा देणे आवश्यक आहे. या परीक्षेतील गुण प्रारंभिक निवडीसाठी ग्राह्य धरले जातात. या गुणांवर आधारित निवडक विद्यार्थ्यांना मुलाखत आणि समूह चर्चेसाठी बोलावले जाते. या दोन्ही बाबींमधील कामगिरी आणि चाळणी परीक्षेतील गुणांवर आधारित अंतिम निवड केली जाते. या अभ्यासक्रमाला अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० जून २०२५ ही आहे.

**संपर्क- आयआयएचएमआर, प्लॉट नंबर ३, सेक्टर १८ ए, व्दारका, फेज टू, न्यू दिल्ली- ११००७५, दूरध्वनी-०११- ३०४१८९००, ईमेल- info. delhi@iihmrdelhi. edu. in, संकेतस्थळ- iihmrdelhi. edu. in**

(६) इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटल मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, जयपूर येथे एमबीए इन हॉस्पिटल अॅण्ड हेल्थकेअर मॅनेजमेंट, हा दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम चालवला जातो.

**अर्हता-** कोणत्याही विषयातील पदवी-खुला संवर्ग ५० टक्के गुण, राखीव संवर्ग ४५ टक्के गुण. या अभ्यासक्रम प्रवेशासाठी कॅट/ मॅट/ झॅट/ जीमॅट/ सीमॅट/ एटीएमए आणि सीयूईटीपीजी २०२५ या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. यापैकी कोणतीही परीक्षा दिली नसल्यास विद्यार्थ्यास या संस्थेमार्फत घेण्यात येणारी मॅनजेमेंट अॅप्टिट्यूड टेस्ट द्यावी लागते. अंतिम निवड, समूह चर्चा आणि मुलाखतीनंतर केली जाते.

**संपर्क- https:// iihmr. edu. in**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)
*अटी लागू.

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# स्मार्ट पोशाखांचे कौशल्य

**अमेरिका सरकारने** जगातील अनेक देशांवर आयात शुल्क लागू केल्याने बराच हाहाकार माजला आहे. तथापि या संकटातही संधी असल्याचे काही अर्थतज्ज्ञांना वाटते. विशेषतः अमेरिकेला तयार कपडे निर्यात करणाऱ्या अनेक देशांपैकी भारत हाही एक देश आहे. भारतीय वस्त्रप्रावरणावरील आयात शुल्क इतर देशांपेक्षा कमी आहे. त्यामुळे भारतात तयार करण्यात आलेली वस्त्रे इतर देशांच्या तुलनेने स्वस्त पडून अमेरिकेन बाजारपेठेत अधिक विकली जातील, असे तज्ज्ञांना वाटते. असे घडेल किंवा नाही, हे काळच ठरवेल. पण वस्त्रप्रावरणांच्या संदर्भातील कौशल्यनिर्मितीचे अभ्यासक्रम केल्यास, या क्षेत्रात सध्या उपलब्ध असलेल्या आणि अमेरिकेच्या धोरणांमुळे नजीकच्या काळातील संभाव्य करिअर संधीचा लाभ मिळू शकतो. या संधी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संदर्भातील राहतील.

फॅशनेबल वस्त्रप्रावरणांचे डिझाइन, विक्री, विपणन, ई कॉर्मस, आदी क्षेत्रांत कौशल्यनिर्मिती करणारे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी या संस्थेने सुरू केले आहेत. या अभ्यासक्रमांचा कालावधी, सहा महिने ते दोन वर्षे असा आहे. प्रात्यक्षिकांवर अधिकाधिक भर असलेल्या या अभ्यासक्रमांमुळे करिअर करणे सुलभ जाते. हे अभ्यासक्रम निरंतर शिक्षण या प्रणालीतील आहेत. ते सोईप्रमाणे म्हणजे सध्यांकाळी किंवा सुटीच्या दिवशी करता येतात. फॅशन उद्योगांशी संबंधित उद्योजक आणि या क्षेत्रातील अभ्यासक यांच्या सल्ल्याने हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. या क्षेत्रातील उद्योगांना आवश्यक असणारे तंत्रकौशल्य उमेदवारांमध्ये निर्माण व्हावे या हेतूने अशा अभ्यासक्रमांमधील विषय घटक निश्चित करण्यात आले आहेत. प्रात्यक्षिकांवर भर असलेल्या या अभ्याक्रमांच्या पूर्ततेनंतर रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी मिळू शकतात. हे अभ्यासक्रम केल्यावर, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी या संस्थेचे प्रमाणपत्र दिले जाते.

फॅशन ज्ञानशाखेशी निगडित वेगवेगळ्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेले विद्यार्थी या संस्थेतील अल्प कालावधीचे कौशल्यनिर्मितीचे अभ्यासक्रम करू शकतात.

## मुंबई एनआयएफटी कॅम्पसमधील अभ्यासक्रम

**(१) डिप्लोमा इन फॅशन फिट अ‍ॅण्ड स्टाइल**

राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावरील आधुनिक फॅशन प्रचलित कल, संभाव्य कल लक्षात घेऊन दर्जेदार स्मार्ट फॅशनेबल डिझायनर्स पोशाखाची निर्मिती करण्याची कला, कौशल्य आणि तंत्र या अभ्यासक्रमात शिकवले जाते. हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी मिळू शकतात. (१) डिझाइनर्स, (२) फ्रीलान्स डिझाइन कन्सलटंट, (३) डिझाइन मॅनेजर्स, (४) स्टायलिस्ट, (५) फोरकास्टिंग अ‍ॅण्ड फॅशन ट्रेंड ऑर्गनायझर, (६) कॉस्च्युम डिझाइनर, (६) इलुस्ट्रेटर, (७) पॅटर्न इंजिनीअर, (८) आंत्रप्रिन्युरर्स.

या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षे असून कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी उत्तीर्ण उमेदवारास तो करता येतो.

**(२) एक वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम**

(१) फॅशन क्लोदिंग टेक्नालॉजी, (२) फॅशन रिटेल मॅनेजमेंट, (३) लक्झरी प्रॉडक्ट डिझाइन, दोन्ही अभ्यासक्रमांसाठी अर्हता - कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी उत्तीर्ण.

**(३) सहा महिने कालावधीचे अभ्यासक्रम**

(१) फॅशन मर्कंडायजिंग मॅनेजमेंट, कॉस्टिंग, मॅन्युफॅक्चुरिंग अ‍ॅण्ड रिटेल, (२) कंटेम्प्ररी ब्रायडल (समकालीन किंवा सध्याच्या काळातील नववधूचा पोशाख) डिझाइन, (३) क्रिएटिव्ह फॅशन स्टायलिंग, (४) क्रिएटिव्ह पॅटर्न मेकिंग, (५) व्हिज्युअल मर्कंडायजिंग,

**(४) सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम**

(१) अ‍ॅपेरल मॅन्युफॅक्चुरिंग अ‍ॅण्ड मॅर्कंडायजिंग मॅनेजमेट, कालावधी-चार महिने, (२) ई -कॉमर्स अ‍ॅण्ड सोशल मीडिया मार्केटिंग, कालावधी-तीन महिने, (३) युझर एक्सपिरिअन्स डिझाइन, कालावधी- तीन महिने, (४) नॅचरल डायिंग अ‍ॅण्ड प्रींटिंग, फॉर सस्टनेबल फॅशन बिझिनेस, कालावधी-तीन महिने, (अ,ब आणि क अभ्यासक्रम अर्हता- कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण)

### क्रिएटिव्ह फॅशन स्टायलिंग

या अभ्यासक्रमात समकालीन फॅशनच्या संकल्पना, छायाचित्रणाचे तंत्र, सादरणीकरण तंत्र, पोशाखांचा कल, हेअर आणि मेकअप तंत्र, साहित्याची उपलब्धता, मॉडेल कास्टिंग आदी बाबींचे ज्ञान प्रदान केले जाते. कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी हा अभ्यासक्रम करू शकतो. फॅशन स्टायलिंग आणि प्रतिमा संवर्धन कंपन्यांमध्ये करिअरची संधी मिळू शकते. भविष्यात स्वतंत्ररीत्या कार्य करता येणे शक्य होते. कालावधी- सहा महिने.

### लक्झरी प्रॉडक्ट डिझाइन

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील संधी मिळू शकतात- (१) लक्झरी प्रॉडक्ट डिझाइनर, (२) डिझाइन मॅनेजर्स, (३) प्रॉडक्ट स्टायलिस्ट, (४) पॅकेजिंग डिझाइनर्स, (५) कम्युनिकेशन डिझाइनर्स, (६) व्हिज्युअल मर्कंडायझर, (७) ब्रँड मॅनेजर, (८) प्रॉडक्ट मर्कंडायझर, (९) युझर एक्सपिरियन्स डिझाइनर, (१०) डिझाइनर आंत्रप्रिन्युरर्स,

### काय शिकाल?

(१) प्रॉडक्ट डिझाइनिंगची तंत्रे आणि तत्त्वे, (२) ग्राहक आणि विशिष्ट ब्रँडबद्दलची जाणीवजागृती, (३) दागिने/आभूषणे डिझाइनची नवी परिमाणे आणि नवा दृष्टिकोन, (४) फॅशन अ‍ॅक्सेसरीजसाठी वापरण्यात येणारे साहित्य, (५) प्रात्यक्षिकांवर भर, (६) संशोधन, (७) कला-संस्कृती-डिझाइन यासंदर्भातील आखीव पर्यटन. कालावधी- एक वर्ष, अर्हता- कोणत्याही विषयातील १२वी.

### कंटेम्प्ररी ब्रॉयडल डिझाइन

या अभ्यासक्रमात वधू पोशाखाच्या डिझाइनच्या अनुषंगाने रंगसंगती, पोत, आकार, साहित्य या बाबींचे प्रशिक्षण दिले जाते. संबंधित वधूची इच्छा आणि आवड, तिचे आकारमान, तिचा कल या बाबी लक्षात घेऊन या पोशाखाचे नमुने किंवा साचे तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. भारतीय, पाश्चिमात्य आणि समकालीन फ्युजन वधू पोशाख निर्मितीच्या सर्व तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम केल्यावर फॅशन डिझायनर, उद्योजक, फॅशनेबल पोशाखांची विक्री केंद्र चालक आदी संधी मिळू शकतात. हा अभ्यासक्रम सहा महिने कालावधीचा आहे.

### प्रवेश प्रक्रिया-

या सर्व अभ्यासक्रमांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळ्या मुलाखती घेतल्या जातात. मुलाखतीमध्ये उमेदवारांचा संबंधित विषयाच्या अनुषंगाने असलेला कल, या क्षेत्राविषयी असलेली माहिती, शैक्षणिक गुणवत्ता आणि अभ्यासाव्यतिरिक्त इतर कार्यातील सहभाग, संवादकौशल्य, सामान्य ज्ञान आणि सर्जनशील विचार करण्याची क्षमता याची चाचपणी केली जाते. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे दाखवावी लागतात. तात्पुरत्या स्वरूपात प्रवेश मिळालेल्या उमेदवारांचा प्रवेश, मूळ प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय अंतिम केला जात नाही. मुलाखतीचा निकाल संकेतस्थळावर जाहीर केला जातो. तसेच उमेदवारांना ई-मेलद्वारेही कळवला जातो. अंतिम निवड झाल्यावर उमेदवारांना डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात शिकवणी शुल्क आणि वाचनालय शुल्क तातडीने भरावे लागते. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळे शुल्क आकारले जाते.

**संपर्क संकेतस्थळ- https:// nift. ac. in/ mumbai/ continuing- education**

## दिल्ली एनआयएफटी कॅम्पस

(१) सर्टिफिकेट इन फॅशन क्लोदिंग टेक्नॉलॉजी - फॅशन रेखांकने आणि तांत्रिक चित्रांकन, पॅटर्न विकास आणि शिवण कौशल्य, पाश्चिमात्य आणि इंडो-वेस्टर्न पोशाख, बाजार सर्वेक्षण, टेक्सटाइल विज्ञान, संसाधने, आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(२) सर्टिफिकेट इन फॅशन रिटेल मॅनेजमेंट- फॅशन विपणन, किरकोळ खरेदी, व्यापार, ग्राहक संबंधाचे व्यवस्थापन, नाममुद्रा (ब्रँड) व्यवस्थापन, विक्री व्यवस्थापन, आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(३) सर्टिफिकेट इन मॅनेजमेंट ऑफ फॅशन बिझनेस- निर्मिती व्यवस्थापन, किरकोळ व्यवस्थापन ,संस्थात्मक कार्याचं कौशल्य, धाग्यांचे ज्ञान, फॅशन प्रकियेचे ज्ञान आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(४) सर्टिफिकेट इन गार्मेंट एक्स्पोर्ट मर्कंडायजिंग मॅनेजमेंट- व्यापार, निर्यात, फॅशनेबल वस्त्रप्रावरणांसाठी लागणारे साहित्य, वस्त्र निर्मिती आणि गुणवत्ता नियंत्रण, आंतरराष्ट्रीय व्यापार पद्धती, प्रकिया आणि व्यवस्थापन आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(५) सर्टिफिकेट इन ब्युटिक अ‍ॅपेरल अ‍ॅण्ड अ‍ॅक्सेसरी- फॅशन रेखांकने (इलुस्ट्रशेन), बुटिक व्यवस्थापन, डिझाइनचा विकास, वस्त्रनिर्मिती, पृष्ठभागावरील सखोल नक्षीकाम/शिवणकाम, एम्ब्रॉयडरी, मूल्यनिर्धारण, आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(६) सर्टिफिकेट इन क्रिएटिव्ह थिंकिंग अ‍ॅण्ड डिझाइन डेव्हलपमेंट- डिझाइन कौशल्य आणि विकास, फॅशन चित्रांकन, पॅटर्न डेव्हलपमेंट, आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

(७) सर्टिफिकेट इन स्पोर्ट्सवेअर- खेळाडूंसाठी असलेल्या वस्त्रप्रावरणांच्या डिझाइन (अभिकल्प), पॅटर्न (साचा) तयार करणे, निर्मिती आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना, स्पोर्ट्सवेअर डिझाइनर, टेक्निकल डिझाइनर,फॅशन स्टायलिस्ट, प्रॉडक्ट डेव्हलपर, ब्रँड मॅनेजर, सस्टेनेबिलिटी स्पेशॅलिस्टं, अ‍ॅथेलेश्युअर ट्रेंड अ‍ॅनॅलिस्ट, उद्योजक अशासारख्या करिअर संधी मिळू शकतात.

या सर्व अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी एक वर्ष. अर्हता कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण.

**संपर्क- https:// www. nift. ac. in/ delhi/ continuing- education**

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.25%* द.सा. पासून



*अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# मजबूत पाया, उत्तम करिअर

**माहिती तंत्रज्ञान,** कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन, डाटा सायन्स या विषयांमध्ये उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमधील प्रवेशाचा विचार विद्यार्थ्यांनी प्राधान्याने करायला हवा. या संस्थांमधील चार किंवा पाच वर्षे कालावधीतील ज्ञानार्जनामुळे विद्यार्थ्यांचा सैद्धांतिक पाया मजबूत होतो. आजच्या आत्यंतिक स्पर्धात्मक काळात, असा पाया मजबूत असल्यासच करिअरच्या विविधांगी संधीचे प्रवेशद्वार उघडू शकते.

## अशा काही संस्था पुढीलप्रमाणे आहेत -

(१) इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी- या संस्थेने पाच वर्षे कालावधीचा इंटिटिग्रेटेड एमटेक अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर बीटेक - एमटेक विथ ड्युएल डिग्री ही पदवी दिली जाते. याअंतर्गत (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग आणि (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग या दोन शाखांमध्ये ज्ञानार्जन करता येते. कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग या ड्युएल डिग्री अभ्यासक्रमात आठव्या सत्रापर्यंत सैद्धांतिक ज्ञानावर भर दिला जातो. ९ व्या सत्रात विद्यार्थ्याला एखाद्या प्रकल्पावर संस्थेत काम करावे लागते, किंवा हा विद्यार्थी आणखी प्रगत अभ्यासक्रम करू शकतो. १० व्या सत्रात विद्यार्थी शोधप्रबंध किंवा नामवंत संस्थेमध्ये इंटर्नशिप यापैकी कोणतीही बाब स्वीकारू शकतो. या अभ्यासक्रमात कॉम्प्युटर आर्किटेक्चर, ऑटोमेशन थिअरी, डिजिटल डिझाइन, कॉम्प्युटर नेटवर्किंग, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, रिअल टाइम ऑपरेटिंग सिस्टिम्स अशासारख्या आजच्या काळासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या विषयांचे ज्ञान प्रदान केले जाते. या अभ्यासक्रमात इंग्रजी, तांत्रिक संवादसंप्रेषण (कम्युनिकेशन), इकॉनॉमिक्स अशा विषयांचाही समावेश असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्याचा लाभ होतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पुढील पाचपैकी एका क्षेत्रात संबंधित विद्यार्थ्याला विशेष ज्ञान प्राप्त होते- (१) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड मशीन लर्निंग, (२) थिअरी अॅण्ड सिस्टिम्स फॉर कॉम्प्युटिंग अॅण्ड डाटा, (३) नेटवर्किंग अॅण्ड कम्युनिकेशन, (४) डिजिटल सोसायटी, (५) व्हीएलएसआय सिस्टम्स.

ही ड्युएल डिग्री घेतलेल्या विद्यार्थ्यांना गूगल, अॅमेझान, फ्लिपकार्ट अशा कंपन्यांमध्ये उत्तमोत्तम संधी मिळाल्या आहेत. संशोधनाकडे वळू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना हार्वर्ड, कॉर्नेट या विद्यापीठांमध्ये संशोधनाची संधी मिळाली आहे.

बीटेक-एमटेक हा ड्युएल डिग्री अभ्यासक्रम इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग या विषयातही करता येतो.

**संस्थेचे इतर अभ्यासक्रम**

बीटेक इन (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (३) डाटा सायन्स अॅण्ड आर्टिफिशिअल इंटेलिजन्स

(२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग (आयआयआयटीडीएम), कांचिपूरम- बीटेक -एमटेक ड्युएल डिग्री इन (१) कॉम्प्युटर सन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेशन इन व्हीएएलएसआय डिझाइन, (३) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेशन इन सिग्नल प्रोसेसिंग, (४) मेकॅनिकल इंजिनीअरिंग

**इतर अभ्यासक्रम -**

बीटेक- कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग इन (१) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेशन इन डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग, (३) मेकॅनिकल इंजिनीअरिंग,

**संपर्क- www. iiitdm. ac. in/**

(३) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग (आयआयआयटीडीएम), कुरनूल- बीटेक-एमटेक हे ड्युएल डिग्री इन - (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग आणि (२) मेकॅनिकल इंजिनीअरिंग.

**इतर अभ्यासक्रम-**

बीटेक इन (१) मेकॅनिकल इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेन इन डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग, (२) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड डाटा सायन्स (३) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेन इन डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग.

http:// www. iiitdmkl. ac. in

(४) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, डिझाइन अॅण्ड मॅन्युफॅक्चुरिंग (आयआयआयटीडीएम), जबलपूर- बीटेक इन (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (३) डिझाइन, (४) मेकॅनिकल इंजिनीअरिंग, (५) स्मार्ट मॅन्युफॅक्चुरिंग.

हे अभ्यासक्रम केल्यावर, ऑटोमोबाइल सेक्टर, एरोस्पेस अॅण्ड डिफेन्स सेक्टर, इंडसट्रिअल मशिनरी सेक्टर, इंजिनीअरिंग सर्व्हिस सेक्टर, हायटेक इलेक्ट्रॉनिक्स, कन्झ्युमर ड्युरेबल्स/ लाइफ स्टाइल प्रॉडक्ट्स या क्षेत्रामध्ये कार्य करण्यासाठी संबंधित विद्यार्थी सक्षम होतो.

**संपर्क-** http:// www. iiitdmj. ac. in

(५) ग्वाल्हेर आयआयआयटी- इंटिग्रेटेड पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्रॅम इन (१) बीटेक-एमटेक इन इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी. (२) बीटेक-एमबीए.

बीटेक-एमबीए, हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना डाटाबेस मॅनेजमेंट सिस्टिम, कॉम्प्युटर नेटवर्किंग, सॉफ्टवेअर इंजिनीअरिंग, मल्टिमीडिया अॅप्लिकेशन अशासारख्या करिअर संधी मिळतात. बीटेक-एमबीए हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना, तंत्रज्ञान व्यवस्थापक म्हणून करिअरच्या संधी मिळतात. माहिती तंत्रज्ञान आणि व्यवसाय यांचे प्रभावी संमीलीकरण करण्याची क्षमता या विद्यार्थ्यांनी प्राप्त केली असते. त्यामुळे या दोन्ही बाबींमध्ये उद्भवणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण प्रभावीरीत्या करू शकतात. या विद्यार्थ्यांना विपणन, वित्त, मनुष्यबळ संसाधन, व्यवसाय क्रियान्वयन, पुरवठा साखळी, उद्योजकता संसाधन नियोजन, ग्राहक संबंध व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान व्यूहनीती, ई-कॉमर्स या बाबीतले ज्ञान प्राप्त होते.

**इतर अभ्यासक्रम**

बीटेक इन (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (२) इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग, (३) मॅथेमॅटिक्स अॅण्ड सायंटिफिक कॉम्प्युटिंग,

**संपर्क- www. iiitm. ac. in**

(६) हैदराबाद आयआयआयटी- ड्युएल डिग्री अभ्यासक्रम (१) बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड मास्टर ऑफ सायन्स इन कॉम्प्युटिंग अॅण्ड ह्युमन सायन्स बाय रिसर्च, (२) बीटेक अॅण्ड मास्टर ऑफ सायन्स इन इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग/ कॉम्प्युटर सायन्स इंजिनीअरिंग बाय रिसर्च (३) बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड मास्टर ऑफ सायन्स इन कॉम्प्युटेशनल नॅचरल सायन्स बाय रिसर्च, (४) बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड मास्टर ऑफ सायन्स इन कॉम्प्युटेशनल लिंग्युस्टिक्स बाय रिसर्च, संशोधनास प्राधान्य देणारे, हे अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना संशोधनाशी निगडित उद्योगांमध्ये करिअर संधी मिळू शकते.

**संपर्क- https:// www. iiit. ac. in/ academics/ undergraduate/ dual- degree/**

(७) अलाहाबाद आयआयआयटी - बीटेक इन (१) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विथ स्पेशलायझेशन इन बिझिनेस इन्फॉर्मेटिक्स (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (३) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी.

**संपर्क- https:// www. iiita. ac. in**

(८) आयआयआयटी दिल्ली- बीटेक इन (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (२) अॅप्लाइड मॅथेमॅटिक्स, (३) डिझाइन, (४) सोशल सायन्स, (५) बायोसायन्स, (६) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (७) इकॉनॉमिक्स, बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड (१) काम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (२) व्हीएलएसआय इंजिनीअरिंग

**संपर्क- https:// iiitd. ac. in/ academics/ btech**

(९) नागपूर आयआयआयटी (अ) बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग, (ब) बीटेक इन (कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग) इन (१) ह्युमन कॉम्प्युटर इंटरअॅक्शन अॅण्ड गेमिंग टेक्नॉलॉजी, (३) डाटा सायन्स अॅण्ड अॅनॅलिटिक्स, (४) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅण्ड मशिन लर्निंग. बीटेक इन (१) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ स्पेशलायझेशन इन इंटरनेट ऑफ थिंग्ज

**प्लेसमेंट्स-**

पुढील काही कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले आहे - (१) इन्फोसिस, (२) अॅक्सेंच्युर फॉर गर्ल्स, (३) अमेरिकन एक्स्प्रेस, (४) सी- डॉट, (५) कार्बनशेल्फ, (६) सिस्को, (७) केफिनटेक, (८) फ्युचर फर्स्ट, (९) इंडिया मार्ट, (१०) नेटवर्क १८, (११) केपीएमजी, (१२) रिलायन्स जिओ इन्फोकॉम, (१३) मीडिया डॉट नेट, (१४) टीसीएस एनक्यूटू, (१५) टेस्को, (१६) जीई डिजिटल,

**संपर्क- iiitn. ac. in**

(१०) पुणे आयआयआयटी- बीटेक इन (१) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग , (२) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग. या संस्थेने उपरोक्त दोन विषयांमध्ये पुढीलप्रमाणे ऑनर्स पदवी घेण्याची सुविधा उपलब्ध केली आहे- (अ) कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग विथ ऑनर्स इन (१) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (२) डाटा सायन्स, (ब) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग विथ ऑनर्स इन (१) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि (२) डाटा सायन्स.

**प्लेसमेंट**

विद्यार्थ्यांना पुढील कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाले आहे- (१) मॅक्स सेक्युरी, (२) एनव्हिदिया, (३) सिमेन्स, (४) अॅमेझान, (५) कॉग्निझंट, (६) इंटेल, (७) आयबीएम, (८) केपजेमिनी, (९) अपग्रेड, (१०) सिमेन्स, (११) सॅमसंग आरएनडी, (१२) पेटीएम, (१३) रिलायन्स जिओ, (१४) क्लायमेट कनेक्ट, (१५) बॉश इत्यादी

**संपर्क- http:// www. iiitp. ac. in**

या सर्व संस्थांमधील अभ्यासक्रमांना, जेईई-मेन परीक्षेतील गुणांवर प्रवेश दिला जातो.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

लोकसत्ता मार्ग यशाचा २५

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# आयआयटीत बीएससी बीएड

**राष्ट्रीय शिक्षण** धोरण २०२० च्या अनुषंगाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयआयटी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी) आणि केंद्रीय साहाय्यता मिळणाऱ्या इतर संस्थांमध्ये दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांच्या निर्मितीसाठी, इंटिग्रेटेड टीचर एज्युकेशन प्रोग्रॅम (आयटीइपी) इन बीएससी बीएड, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला, नॅशनल कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (एनसीइटी) मार्फत प्रवेश दिला जातो. ही परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत घेतली जाते. यंदा या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी २०३० मध्ये शिक्षण बनण्यासाठी पात्र ठरतील. नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना तीन वर्षांनंतर हा अभ्यासक्रम सोडता येतो. त्यांना बीएससी ही पदवी दिली जाते. इंटिग्रेटेड अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना, शिक्षण (एज्युकेशन किंवा संबंधित मुख्य विषय (भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी करण्याचीही सुविधा उपलब्ध होते.

## प्रमुख संस्था

(१) आयआयटी रोपर

येथे इंटिग्रेटेड बीएससी- बीएड अभ्यासक्रम करता येतो. भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या तीन विषयांपैकी एक विषय अभ्यासक्रमाचा मुख्य विषय म्हणून निवडता येतो.

**संपर्क - https:// www. iitrpr. ac. in/ bsc- bed**

(२) आयआयटी जोधपूर

या संस्थेने भावी शिक्षकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी स्वतःचे प्रारुप (मॉडेल) तयार केले आहे. यामध्ये या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान दिले जाईल. त्यांचे तांत्रिक ज्ञान उन्नत केले जाईल. स्वयंसुधारणेसाठी प्रेरित केले जाईल. प्रभावी संवादकौशल्य शिकवले जाईल. शैक्षणिक कार्य करताना नावीन्यतेला अधिकाधिक प्राधान्य देण्यासाठी प्रेरित केले जाईल. नैतिक मूल्ये, जीवनशैलीचा भाग बनावी यासाठी प्रेरित केले जाईल. आयुष्यभर सखोल अध्ययनाचा अंगिकार करण्याची मनोवृत्ती निर्माण केली जाईल. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची प्रेरणा दिली जाईल.

**संपर्क- https:// www. iitj. ac. in/ itep/**

(३) आयआयटी खरगपूर

या संस्थेत, इंटिग्रेटेड बीएससी बीएड हा अभ्यासक्रम भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयात करता येतो. १२ वी मध्ये भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र हे विषय घेतलेले विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरतात.

**संपर्क- https:// www. iitkgp. ac. in/ studyprogrammes/ view/29**

(४) आयआयटी भुवनेश्वर-

या संस्थेत इंटिग्रेटेड बीएससी बीएड हा अभ्यासक्रम भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयात करता येतो. या इंटिग्रेटेड अभ्यासक्रमात भौतिकशास्त्र हा विषय घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा. रसायनशास्त्र हा विषय घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने १२ वी मध्ये रसायनशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा. गणित हा विषय घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने १२ वी मध्ये गणिताचा अभ्यास केलेला असावा. अर्थशास्त्र हा विषय घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने १२वी मध्ये गणिताचा अभ्यास केलेला असावा.

१२ वीमध्ये खुला संवर्ग आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल संवर्ग विद्यार्थ्यास ६० टक्के, इतर मागास संवर्ग विद्यार्थ्यास ५५ टक्के, अनुसूचित जाती, जमाती, दिव्यांग संवर्ग विद्यार्थ्यास ५० टक्के, गुण मिळायला हवेत.

**संपर्क- https:// itep. iitbbs. ac. in/**

(५) एनआयटी तिरुचिरापल्ली

या संस्थेत, बीएस्ससी बीएड (गणित) हा चार वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम करता येतो.

**संपर्क- एनआयटी, तिरुचिरापल्ली - ६२००१५, टेलेफॅक्स- ०४३१-२५००१३३, संकेतस्थळ- https:// www. nitt. edu**

(६) एनआयटी अगरताळा

या संस्थेत इंटिग्रेटेड ड्युएल डिग्री बीएससी- बीएड हा अभ्यासक्रम करता येतो. अर्हता- विद्यार्थ्याने १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्राचा अभ्यास केलेला असावा.

**संपर्क- एनआयटी अगतराळा, बरजाला, जिरानिया, त्रिपुरा- ७९९०४६, संकेतस्थळ- https:// www. nita. ac. in. दूरध्वनी-०३८१-२५४८५३७**

(७) एनआयटी पुद्दीचेरी

, एनआयटी कालिकत, एनआयटी वरंगल येथेही इंटिग्रेटेड बीएससी बीएड हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

आयआयटी, एनआयटी या संस्थांमध्ये तंत्रज्ञान व अभियांत्रिकीसाठी असलेल्या पायाभूत सुविधा, प्राध्यापक, उत्कृष्ट ग्रंथालये, शिष्यवृत्ती, प्लेसमेंट, वसतिगृह, आर्थिक साहाय्य, अत्याधुनिक यंत्रसामग्री व उपकरणांसह सुसज्ज अशा प्रयोगशाळा आणि आआयटी/एनआयटी ब्रँडचा लाभ, हे अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

## एनआयटीमधील इतर अभ्यासक्रम

**एनआयटी तिरुचिरापल्ली**

(१) या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ ह्युमॅनिटीज ॲण्ड सोशल सायन्स, मार्फत एम.ए. इन इंग्लिश लँग्वेज ॲण्ड लिटरेचर हा अभ्यासक्रम चालवला जातो. भाषा आणि साहित्य यांचा समन्वय साधणारा हा एक महत्त्वाचा अभ्यासक्रम समजला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या सर्जनशील कौशल्य निर्मितीसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. अर्हता - इंग्रजी विषयातील पदवी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाकाठी संस्थेमार्फत चाळणी परीक्षा आणि मुलाखत घेतली जाते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीयुइटी - पीजी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट पोस्ट ग्रॅज्युएट) या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात.

(२) या संस्थेने भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांमध्ये प्रत्येकी दोन वर्षे कालावधीच्या, एम.एससी अभ्यासक्रमाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. अर्हता- संबंधित विषयातील पदवी प्राप्त उमेदवारास या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो.

**एनआयटी रुरकेला**

(१) या संस्थेतील मानव्यशास्त्र विभागाने, एम.ए इन डेव्हलपमेंट स्टडीज, हा अभ्यासक्रम सुरू केला आहें. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी. कालावधी दोन वर्षे. इंग्रजी, मानसशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांमध्ये पीएचडी करण्याची सुविधासुध्दा या संस्थेत आहे.

(२) या संस्थेत १२ वी विज्ञानशाखेतील विद्यार्थी पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड एम.एससी इन लाइफ सायन्स हा अभ्यासक्रम करु शकतात. लाइफ सायन्स किंवा जैविक विज्ञानशाखेत सूक्ष्मजीवजंतू, वनस्पती, प्राणी आणि मनुष्य प्राणी यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यात येते. याच अनुषंगाने जैव-वैद्यकीय तंत्रज्ञान, जैव-माहितीशास्त्र, जैव-भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्रतिकारशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, रेणीव जीवशास्त्र, पेशी जीवशास्त्र, जैव-रसायनशास्त्र, अनुवंषशास्त्र आदी विषयघटकांतील प्रगत ज्ञान विद्यार्थ्यांना प्रदान केले जाते. या अभ्यासक्रमाला जेईई (जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन)- मेनमधील गुणांवर आधारित प्रवेश दिला जातो.

(३) या संस्थेत इंटिग्रेटेड एम. एससी इन फिजिक्स हा अभ्यासक्रमही करता येतो. जेईई मेन परीक्षेतील गुणांवर आधारित प्रवेश दिला जातो.

(४) दोन वर्षे कालावधीचे एम. एससी अभ्यासक्रम पुढील विषयांमध्ये करता येतात. (१) फिजिक्स, (२) केमिसर्ट्री, (३) जिऑलॉजी, (४) ॲटमोस्फेरिक सायन्स. अर्हता- संबंधित विषयातील पदवी. या अभ्यासक्रमांना जॉईंट ॲडमिशन फॉर मास्टर्स, या परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो.

**एनआयटी सुरत**

या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ फिजिक्स मार्फत इंटिग्रेटेड एम.एससी इन फिजिक्स, डिपार्टमेंट ऑफ केमिस्ट्री मार्फत इंटिग्रेटेड एम.एससी इन केमिस्ट्री हे अभ्यासक्रम चालवले जातात. कालावधी- प्रत्येकी पाच वर्षे. अर्हता- भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र विषयासह १२वी विज्ञानशाखेची परीक्षा उत्तीर्ण

**संपर्क- सरदार वल्लभभाई इंजिनीअरिंग कॉलेज रोड, अथवालाईन्स, अथवा, सुरत, गुजरात-३९५००७, संकेतस्थळ- https:// www. svnit. ac. in**

**एनआयटीत एमबीए**

एनआयटी मेंगलोर, एनआयटी रुरकेला, एनआयटी अलाहाबाद, एनआयटी अगरताळा, एनआयटी तिरुचिरापल्ली, एनआयटी वरंगल, एनआयटी दुर्गापूर, एनआयटी सिलचर, एनआयटी जयपूर, एनआयटी जालंदर यांच्या अंतर्गत डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट किंवा स्कूल ऑफ मॅनेजमेंटची स्थापना करण्यात आली आहे. सध्याच्या काळात औद्योगिक जगतासाठी आवश्यक असणारे व्यवस्थापकीय तंत्र, कौशल्य आणि सुयोग्य अशा ॲटिट्यूडच्या व्यवस्थापकांची निर्मिती व्हावी या अनुषंगाने एमबीए अभ्यासक्रमांची संरचना करण्यात आली आहे.

अर्हता- या अभ्यासक्रमांना कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधारकांना प्रवेश मिळू शकतो. तथापि त्याने व्यवस्थापन अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या, कॅट- कॉमन ॲडमिशन टेस्ट/ मॅट- मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट/ सीमॅट- कॉमन मॅनेजमेंट ॲडमिशन टेस्ट/ जीमॅट- ग्रॅज्युएट मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट यापैकी कोणतीही एक परीक्षा देणे आवश्यक आहे. या परीक्षेत चांगले गुण मिळवणे आवश्यक आहे. प्रत्येक एनआयटी, एमबीए प्रवेशाची प्रकिया स्वतंत्रपणे राबवत असते. प्रारंभिक निवड यादी साठी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये मिळालेले गुण ग्राह्य धरले जातात. या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते. उपलब्ध जागांनुसार विशिष्ट प्रमाणात/संख्येत मुलाखत आणि समूहचर्चेसाठी उमेदवारांना बोलावले जाते. त्यानंतर अंतिम निवड केली जाते. या संस्थांमधील प्लेसमेंट सेलमार्फत करिअर संधी मिळवून देण्यासाठी साहाय्य केले जाते. एनआयटी ब्रँडचा प्लेसमेंटच्या वेळी उपयोग होऊ शकतो. सर्व संस्थांमध्ये भारत सरकारच्या राखीव जागांचे निकष पाळले जातात.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%*
द.सा. पासून
अटी लागू



S. M. D. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# कलेतून संवाद

**इंडियन इन्स्टिट्यूट** ऑफ क्राफ्ट अ‍ॅण्ड डिझाइन, या संस्थेने, क्राफ्ट कम्युनिकेशन, हा नावीन्यपूर्ण असा अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम पदवी (बॅचलर ऑफ डिझाइन), पदव्युत्तर पदवी (मास्टर ऑफ डिझाइन) या स्तरावर करता येतो.

### काय शिकाल?

(१) हस्तकलेच्या क्षेत्रात अभिकल्प आणि तंत्रज्ञान आणण्याचे कौशल्य या स्पेशलायझेशनमध्ये शिकवले जाते. (२) डिझाइन कौशल्य शिकणारे विद्यार्थी आणि हस्तकारागिर यांच्यातील दुवा साधण्याचे कौशल्य प्रदान केले जाते. (३) हस्तकलेसाठी लागणाऱ्या साहित्याची संस्कृती, प्रथा, परंपरा, कथाकथन, पौराणिक कथा या अनुषंगाने संवाद साधणे सुलभ जाते. (४) या विद्यार्थ्यांना संवादसंप्रेषण अभिकल्पातील प्रमुख कौशल्याचे तंत्र ठळकपणे शिकवले जाते. (५) दृष्यात्मक संवादसंप्रेषण (व्हिज्युअल कम्युनिकेशन)व्दारे विविध माध्यमांसाठी उपयुक्त ठरणारे अत्यंत प्रभावी व आकर्षक तंत्रकौशल्य प्रदान केले जाते. (६) या क्षेत्रात कार्यरत विविध पार्श्वभूमीच्या हस्तकारागिरांससोबत सुलभतेने कार्य करता येणे शक्य होण्यासाठीचे मानवीय कौशल्य प्रदान केले जाते, (६) हस्तकला वस्तुनिर्मितीसाठी उपयोगात आणल्या गेलेल्या, आता उपयोग आणल्या जात असलेल्या आणि भविष्यात उपयोगात आणल्या जाऊ शकणाऱ्या वस्तू किंवा साहित्याचे महत्त्व जाणून घेण्याचे कौशल्य प्रदान केले जाते.

### अभ्यासक्रमाचा उद्देश

(१) संवादसंप्रेषण (कम्युनिकेशन) आणि हस्तकला यांचा, हाताने तयार केलेल्या कलाकृतींएवढाच सखोल संबंध असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे सांगणे आहे. (२) कोणत्याही आकार आणि प्रकारातील हस्तकलेव्दारे निर्मित कलाकृती, कोणती ना कोणती भावना व्यक्त करते. काही वस्तू थेट व्यक्त होतात तर काही सूक्ष्मपातळीवर व्यक्त होतात. (३) कम्युनिकेशन डिझाइनच्याव्दारे हस्तकलेचे विश्लेषण करता येते. ही प्रकिया डिझाइन थिकिंगमध्ये अंतर्भूत होते. (४) हस्तकलेच्या अनुषंगाने, (अ) कथन ही प्रक्रिया- पब्लिकेशन डिझाइनमध्ये, (ब) विक्री प्रकिया- सोशल मीडिया आणि ई कॉमर्समध्ये, (क) प्रोत्साहन प्रकिया- ब्रँडिगमध्ये, (ड) संरक्षण प्रकिया- पॅकेज डिझाइनमध्ये, (इ) डॉक्युमेंट प्रकिया- पॅकेज डिझाइनमध्ये समाविष्ट होते.

### करिअर संधी

हे स्पेशलायझेशन केलेले विद्यार्थी (१) संशोधन, (२) विपणन, (३) प्रभाव आणि नावीन्यता/इनोव्हेशन, (४) दस्तावैजीकरण, (५) सक्षमीकरण, (६) समानुभूती (इम्पॅथी) आदी क्षेत्रात कार्य करु शकतात.

### इतर अभ्यासक्रम

(१) बॅचलर ऑफ डिझाइन इन फॅशन क्लॉथिंग डिझाइन - या अभ्यासक्रमात, पारंपरिक भारतीय आणि पाश्चिमात्य पोषाखांच्या डिझाइनचे कौशल्य शिकवले जाते. डिझाइन थिकिंग, शास्वतता, विपणन या बाबींचेही ज्ञान प्रदान केले जाते.

(२) बॅचलर ऑफ डिझाइन इन ज्वेलरी डिझाइन - हा अभ्यासक्रम इंडियन इंस्टिट्यूट ऑफ ज्वेलरी डिझाइन या संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात पारंपरिक, आदिवासी आणि समकालीन दागिण्यांच्या डिझाइनचे तंत्र आणि कौशल्य शिकवले जाते. दागिन्यांच्या निर्मितीसाठी लागणारे साहित्य, साधने, तंत्रज्ञान, निर्मिती प्रकिया आणि फिनिशिंग, विपणन यांचेही ज्ञान प्रदान केले जाते.

(३) बॅचलर ऑफ डिझाइन इन इंटेरिअर डिझाइन - या अभ्यासक्रमात पारंपरिक कलाकौशल्य आणि आधुनिक इंटेरिअर डिझाइनचे तंत्र यांचा समन्वय साधला जातो. हा अभ्यासक्रम २०२५ च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला आहे.

सर्व बॅचलर ऑफ डिझाइन, अभ्यासक्रमांचा कालावधी चार वर्षाचा आहे.

**अर्हता** - कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण उमेदवार.

### प्रवेश प्रक्रिया

या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अखिल भारतीय स्तरावर ऑनलाइन क्रिएटिव्ह अ‍ॅबिलिटी टेस्ट घेतली जाते. (नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ डिझाइन या संस्थेची चाळणी परीक्षा,युसीड (अंडरग्रॅज्युएट कॉमन एन्ट्रन्स एक्झामिनेशन फॉर डिझाइन,नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलाजी या संस्थेची चाळणी परीक्षा आणि सीड (कॉमन एन्ट्रन्स एक्झामिनेशन फॉर डिझाइन) या परीक्षा दिलेले व त्यात विशिष्ट गुण मिळवलेले विद्यार्थीसुध्दा, प्रवेशासाठी अर्ज करु शकतात. या विद्यार्थ्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रॉफ्ट अ‍ॅण्ड डिझाइन या संस्थेची चाळणी परीक्षा द्यावी लागत नाही. त्यांना केवळ मुलाखतीचा टप्पा पार पाडावा लागेल.)

**संपर्क- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रॅफ्ट आणि डिझाइन, जे-८, झालना इन्स्टिटयुशनल एरिया, जयपूर ३०२००४, राजस्थान, दूरध्वनी - ०१४१-२७०१२०३, फॅक्स- २७००१६०, ई-मेल-, nfo@iicd. ac. in आणि admissions@iicd. ac. in, संकेतस्थळ - www. iicd. ac. in.**

### क्रिएटिव्ह कम्युनिकेशन

प्रत्येक व्यक्तीमध्ये एक सर्जनशील मन असते. या मनाची मशागत करुन विविध संकल्पनांना जन्मास घालणे आणि त्यातून उत्तम कलाकृतीच्या निर्मितीसाठीचे तंत्र आणि कौशल्य, पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट प्रोग्रम इन क्रॅफ्टिंग क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, या अभ्याक्रमामध्ये शिकवले जाते. हा अभ्यासक्रम, मुद्रा इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, या संस्थेमार्फत चालवला जातो. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी रणनीतिकार (स्ट्रॅटेजिस्ट), कला दिग्दर्शक (आर्ट डायरेक्टर), अभिकल्पकार (डिझायनर), अ‍ॅनिमेटर्स, चित्रपट निर्माति या क्षेत्रात नाव कमावले आहे.

### काय शिकाल?

(१) संकल्पना निर्मितीचे तंत्र (आयडिया जनरेशन टेक्निक), (२) कथाकथन (स्टोरी टेलिंग), (३) प्रतिमा निर्मिती (ब्रँडिंग), (४) संहिता लेखन (कॉपी रायटिंग), (५) कला दिग्दर्शन (आर्ट डायरेक्शन), (६) सजर्नशील नोंद लेखन (रायटिंग क्रियेटिव्ह ब्रिफ्स), (७) दूरचित्रवाणी वाणिज्यिक/ जाहिरात निर्मिती नियोजन (टेलिव्हिजन कर्मशिअल प्लॅनिंग), (८) प्रचार/प्रसिध्दी मोहीम (कॅम्पेन प्लॅनिंग), (९) चिन्हविज्ञान- (सेमिऑटिक्स), (१०) डिजिटल संवादसंप्रेषन (डिजिटल कम्युनिकेशन), (११) छायाचित्रण (फोटोग्रॅफी), (१२) दृष्टीक्षेप (वेज ऑफ सीईंग) - आपल्या अवतीभवती असणारे विविध घटक/ पात्रे/ घटना अशा बाबींपासून सर्जनशील प्रेरणा कशी घ्यावी? याचे प्रशिक्षण, (१३) जाहिरात व्यवस्थापन (अ‍ॅडव्हर्टायजिंग मॅनेजमेंट), (१४) नवी माध्यमे आणि अनुभवात्मक विपणन (न्यू मीडिया अ‍ॅण्ड एक्सपिरेंशिअल मार्केटिंग) - नव्या माध्यमांचा वापर करुन पारंपरिक जाहिरातीपेक्षा नावीन्यपूर्ण पध्दतीने जाहिरात करण्याचे तंत्र/कौशल्य या विषय घटकात शिकवले जाते. (१५) ग्राहक केंद्रित संवाद संप्रेषण (कस्टमरसेंट्रिक कम्युनिकेशन), (१६) डिजिटल जाहिराती, (१७) रेडियो, (१८) ब्रँडिग, (१९) साधनांचे शिक्षण (टूल लर्निंग) उदा- अडॉब फोटोशॉप, इल्युस्ट्रेटर, इन डिझाइन, प्रिमिअर प्रो, आफ्टर इफेक्ट्स, (२०) अनिमेशन अ‍ॅण्ड स्टॉप मोशन- वाळू, प्रकाश, माती, कठपुतळे, चित्रे, पेपरचे तुकडे अशा साहित्याच्या मदतीने चित्रपटांची निर्मिती, (२१) चित्रपट आस्वाद/ समीक्षा (फिल्म अ‍ॅप्रिशिएशन), (२२) चित्रपट निर्मिती.

**कोणत्याही विषयातील पदवीधरास या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो. अभ्यासक्रमाचा कालावधी- दहा महिने.**

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील संधी मिळू शकतात-

(१) मॅनेजमेंट ट्रेनी, (२) क्रिएटिव्ह ट्रेनी, (३) मॅनेजर- ब्रँड स्ट्रॅटिजी, (४) सिनीयर मॅनेजर-ब्रँड स्ट्रॅटिजी, (५) कंटेट क्रिएटर, कॉपी रायटर, सिनियर कॉपी रायटर, (६) सिनिअर एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, (७) आर्ट डायरेक्टर, (८) व्हिज्युएलायजर, (९) सोशल मीडिया स्ट्रॅटिजिस्ट, (१०) असोशिएट क्रिएटिव्ह पार्टनर, (११) आर्ट डायरेक्टर, (१२) ग्रॅफिक डिझायनर, (१३) क्रिएटिव्ह आर्ट डायरेक्टर

जाहिरात, ब्रँडिग, कॉर्पोरेट कम्युनिकेशन, व्युहनीती, डिजिटल मार्केटिंग या सारख्या क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या व्यक्तीस आपली प्रतिभा आणि सृजनशीलता प्रभावीरीत्या व आधुनिक पध्दतीने वापरता यावी यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरु शकतो. एखाद्या नामवंत जाहिरात संस्थेत एक महिन्याची इंटर्नशीपची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

**संपर्क- https:// www. mica. ac. in/ academic-centres/ mudra-institute- of- communications- research**

### ऑनलाइन अभ्यासक्रम

या संस्थेने (१) डिजिटल मार्केटिंग अ‍ॅण्ड कम्युनिकेशन विथ स्पेशलायझेशन, (२) ब्रँड कम्युनिकेशन मॅनेजमेंट, (३) स्ट्रॅटेजिक ब्रँड मॅनेजमेंट अ‍ॅण्ड कम्युनिकेशन, (४) डिजिटल स्ट्रेटेजी अ‍ॅण्ड मार्केटिंग अ‍ॅनॅलिटिक्स, हे ऑनलाइन अभ्यासक्रम सुरु केले आहेत. हे अभ्यासक्रम ब्रँडिंग, जनसंपर्क, कॉर्पोरेट कम्युनिकेशन, व्यवसायवृध्दीसाठी ठरवण्यात येणाऱ्या सृजनशील व्युहनीती, जाहिराती, डिजिटल मार्केटिंग यासारख्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी उपयुक्त ठरु शकतात.

### कम्युनिकेशन मॅनेजमेंट

स्ट्रॅटेजिक मार्केटिंग (व्युहात्मक विपणन) आणि कम्युनिकेशन या विषयाचे अभ्यासक्रम चालवणारी मुद्रा इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, ही आपल्या देशातील एकमेव संस्था आहे. या संस्थेचा, पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट (कम्युनिकेशन), हा दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम कोणत्याही विषयातील पदवीधर करु शकतात. या अभ्यासक्रमांतर्गत पुढील विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते- (१) अ‍ॅडव्हर्टायजिंग अ‍ॅण्ड ब्रँड मॅनेजमेंट, (२) डिजिटल कम्युनिकेशन मॅनेजमेंट, (३) बिझिनेस अ‍ॅनॅलिटिक्स (४) मीडिया अ‍ॅण्ड एंटरटेनमेंट मॅनेजमेंट.

**संपर्क - मुद्रा इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन ( MICA) शेला, अहमदाबाद - ३८००५८, संकेतस्थळ- www. mica. ac. in,**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# अर्थकारणाचे महत्त्व

**अमेरिकेच्या राष्ट्रपतींनी,** समसमान ह्यआयातशुल्कह्ल बॉम्ब सोडून दिल्याने, सगळ्या जगाचे अर्थकारण ढवळून निघाले आहे. या बॉम्बमुळे भारतीय शेअर मार्केटसह अनेक देशातील शेअर मार्केट आपटले. गुंतवणूकदारांचे काही लाख लाख कोटी रुपये (आभासी कां होईना) अक्षरक्षः पाण्यात गेले. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असली तरी, सध्या सगळ्या राष्ट्रांचे जनजीवन किंवा अर्थव्यवस्था या, ह्यआयात करह्ल बॉम्बभोवती फिरत असल्याचे दिसून येते. इतर कोणत्याही घटकांपेक्षा अर्थकारण किंवा अर्थशास्त्रच सर्वात महत्त्वाचे असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.

२०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षात, मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील, प्रवेशाचे विश्लेषण करणाऱ्या बातमीनेही अर्थशास्त्राला मध्यवर्ती भूमिकेत आणले होते. या शैक्षणिक वर्षात मुंबई आयआयटीत प्रवेश घेणाऱ्या देशातील सर्वोच्च प्रज्ञावंतांनी चौथ्या क्रमांकाची पसंती इकॉनामिक्स अर्थातच अर्थशास्त्राला दिली. (पहिलो पसंती कॉम्प्युटर सायंस, दुसरी इलेक्ट्रिकल आणि त्यानंतर मेकॅनिकल या शाखांना होती.)

आयआयटीमधील प्रज्ञावंत जेव्हा एखाद्या विषयाला किंवा शाखेला अशी पसंती देतात, तेव्हा वारे कोणत्या दिशेने वाहताहेत हे लक्षात येते.

आयआयटीत, बॅचलर ऑफ सायंस इन इकॉनॉमिक्स, हा अभ्यासक्रम करता येतो. जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेइइ)- ॲडव्हान्स्ड, या कठीणतम परीक्षेत अत्युकृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. मुंबई आयआयटीत, अर्थशास्त्र या शाखेला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या ५०० किंवा ६०० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांपेक्षा फारतर दोन किंवा तीन गुण कमी पडलेले आहेत. या विद्यार्थ्यांनी ठरवले असते तर इतर शाखा किंवा इतर टॉपच्या आयआयटीत कोणत्याही शाखेत सुलभतेने त्यांना प्रवेश मिळाला असता. पण, त्यांनी अर्थशास्त्राला प्रवेश घेऊन, पुढील काळात या ज्ञानशाखेस मिळणारे अत्याधिक महत्व अधोरेखित केले.

या अभ्यासक्रमामध्ये वित्तीय आणि विश्लेषणात्मक कौशल्य, सादरीकरण किंवा संवादसंप्रेषण कौशल्याला महत्त्व देण्यात आलेय. त्यामुळे विविधांगी करिअर संधी उपलब्ध होत असल्याचे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले आहे. हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना आघाडीच्या वित्तीय आणि गुंतवणूक सल्लागार संस्था, खा,गी क्षेत्रातील बँकामध्ये तत्काळ मोठ्या पदावर आणि मोठ्या वार्षिक पॅकेजसह सामावून घेतले जाते.

आयआयटीत अर्थशास्त्र शिकवला जातो नि विद्यार्थी त्याला पसंती देतात म्हणूनच काही अर्थशास्त्राचे महत्व आहे, अशातला भाग नाही. अर्थशास्त्र ही कायमच महत्त्वाची ज्ञानशाखा राहिली आहे. अर्थशास्त्रात उच्च प्रशिक्षित असणारे डॉ. मनमोहन सिंह हे आधी रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर आणि पुढे देशाचे पंतप्रधान झाले. अर्थशास्त्र, या ज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांना अशा मोठमोठ्या संधी कायम मिळत आल्या आहेत. प्रत्येक देशातील राज्यप्रमुखांच्या मदतीला एक किंवा अनेक अर्थसल्लागार असतात. (महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कार्यालयात नुकतीच मुख्य आर्थिक सल्लागार पदाची निर्मिती केली आहे.) बहुतेक सर्वच मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये फायनान्स कंट्रोलर किंवा वित्तीय नियंत्रक अशा मोठ्या पदावर अर्थकारणीच विराजमान आहेत. सगळ्या जगाच्या नाड्या राजकीय सत्ताधीशांच्या हातात असल्याचे दिसत असल्या तरी सारे राजकारण, समाजकारण धर्मकारण हे अर्थसत्तेभोवतीच फिरत असल्याने, अर्थशास्त्रातील तज्ज्ञांचे महत्व लक्षात यावे.



आपल्याकडील प्रज्ञावंत मुले किंवा मुली अजुनही बहुदा इंजनीअरिंग किंवा मेडिकल या शाखांच्या पलिकडे बघत नाहीत किंबहुना त्यांचे पालकही या दोन शाखांच्या पलिकडील तिसरी शाखा नाइलाजानेच स्वीकारताना दिसतात. अर्थशास्त्राचे हे सध्याचे आणि भविष्यातील महत्व लक्षात घेऊन प्रज्ञावंत मुलामुलींना आपला पहिला पर्याय अर्थशास्त्र ठेवायला हवा.

याचा अर्थ कुणीही अर्थशास्त्र या ज्ञानशाखेत प्रवेश घेऊ नये, हे स्पष्टच आहे. जसे, केवळ प्रवेश सुलभतेने मिळतो म्हणून इंजिनीअरिंग करण्याला काहीही अर्थ नसतो, तसेच कोणत्याही महाविद्यालयात अर्थशास्त्राला प्रवेश घेऊन पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी केल्यास करिअर घडवण्यासाठी फार उपयोग होत नाही. अर्थशास्त्र हा विषय सांख्यिकी विश्लेषण आणि त्यावर आधारित निष्कर्ष याच्याशी निगडित असल्याने गणित 'आणि सांख्यिकी या विषयात चांगली गती असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच पुढे अभ्यासक्रमाच्या कालावधीत आणि नंतर करिअरमध्ये उत्तम कामगिरी करता येते.

**या बाबी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःला प्रामाणिकपणे आणि पारदर्शकतेने जोखावे आणि या ज्ञानशाखेला स्वीकारावे. प्रत्येक विद्यार्थ्याला आयआयटीतच प्रवेश मिळेल, हे तर शक्य नाही. मात्र, आपल्या देशात अर्थशास्त्राचे दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी निश्चित प्रयत्न करायलाच हवा. अशा काही संस्था पुढीलप्रमाणे आहेत-**

**(१) गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स -**

या संस्थेने गेली अनेक दशके आपली गुणवत्ता आणि दर्जा टिकवून ठेवला आहे. सामाजिक हिताचे विविध प्रश्न आणि समस्यांवर सखोल संशोधन केले आहे. अर्थशास्त्र विषयात पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधन अशा तिनही क्षेत्रात ही संस्था कार्यरत आहे.

**अभ्यासक्रम-**

(१) बीएस्सी इन इकॉनॉमिक्स, कालावधी तीन वर्षे, (२) बीएस्सी (ऑनर्स) इन इकॉनॉमिक्स, कालावधी चार वर्षे.

मुख्य अर्थशास्त्रीय संकल्पनांचा पाया मजबूत करणे, सध्याचे प्रश्न आणि समस्यांच्या निराकरणासाठी अर्थशास्त्रीय सिध्दांतांचा उपयोग, विविध समस्यांकडे बघण्यासाठी विश्लेषणात्मक दृष्टीचा विकास ही प्रमुख उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत.

**अर्हता -** कोणत्याही विषयातील ५० टक्के गुणांसह १२ वी उत्तीर्ण. राखीव संवर्गासाठी ४५ टक्के.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सेंट्रल युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट-अंडर ग्रॅज्युएट (सीयूइटी-यूजी) या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात.

प्लेसमेंट- या संस्थेत पुढील कंपन्या / विभाग प्लेसमेंटसाठी येत असतात- (१) एडेलविस म्युच्युअल फंड, (२) टाटा स्टिल, (३) निल्सेन, (४) रिलायंस, (५) निती आयोग, (६) भारत सरकारचा वित्त विभाग, (७) एसबीआय, (८) एसबीआय म्युच्युअल फंड, (९) इंडियन ऑइल, (१०) बिर्ला सन लाइफ, (११) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, (१२) केपिएमजी, (१४) फिक्की, (१५) मॉर्गन स्टॅन्ले, (१६) जे.पी.मॉर्गन, इत्यादी.

यंदा १२ वीत असणाऱ्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी, या संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आयआयटी जेइइ ॲडव्हान्स परीक्षेपेक्षा, सीयूइटी-अंडर ग्रॅज्युएट किंवा सीयूइटी-पोस्ट ग्रॅज्युएट तुलनेने परीक्षा सोपी असते, ही बाब लक्षात ठेवायला हवी.

**संपर्क - ८४६ शिवाजी नगर डेक्कन, पुणे ४११००४, ईमेल- gokhleinstitute@ gipe. ac. in संकेतस्थळ- https:// gipe. ac. in, दूरध्वनी-०२०-२५६८३३००**

**(२) डॉ.बी.आर आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स युनिव्हर्सिटी**

दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण अर्थशास्त्रीय शिक्षणासोबतच धोरण निर्धारणासाठी भविष्यात मदत व्हावी, या हेतूने बेंगळुरु येथे, लंडन स्कूल ऑफ बिझनेसच्या धर्तीवर, डॉ.बी.आर आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स युनिव्हर्सिटी या संस्थेची स्थापना करण्यात आली. अर्थशास्त्र विषयातील ज्ञान प्रदान करणारी देशातील सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून ही संस्था विकसित केली जाणार आहे.

या संस्थेत पाच वर्षे कालावधीचा एम.एस्सी इन इकॉनॉमिक्स हा अभ्यासक्रम करता येतो.

अर्थशास्त्राचा सर्वसमावेशक अभ्यास करताना विद्यार्थ्यांना समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, नैतिकमूल्ये आदी सामाजिक शास्त्रातील विषय घटकांचे ज्ञान प्रदान केले जाते. अर्थशास्त्रातील नव्या प्रवाहांबाबत विद्यार्थ्यांना शिकवले जाते व स्वतंत्र विचार करण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले जातात. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना इंटर्नशीप करणे अत्यावश्यक करण्यात आले आहे.

या अभ्यासक्रमामध्ये आता नव्या शैक्षणिक धोरणानुसार वेगवेगळ्या सत्रानुसार क्रेडिट (श्रेयांक) आणि प्रमाणपत्र/पदविका देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दुसऱ्या सत्रानंतर सर्टिफिकेट इन इकॉनॉमिक्ससाठी, चौथ्या सत्रानंतर डिप्लोमा इन इकॉनॉमिक्ससाठी, सहाव्या सत्रानंतर बीएस्सी इन इकॉनॉमिक्स या पदवीसाठी, आठव्या सत्रानंतर बीएस्सी(ऑनर्स) इन इकॉनॉमिक्स या पद्वीसाठी पात्र ठरवले जाते.

**अर्हता-** या अभ्यासक्रमाला कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. तथापि या विद्यार्थ्यांनी १२ वीमध्ये गणित आणि इंग्रजी या विषयांचा अभ्यास करणे आवश्यक. विद्यार्थ्यांना १२ वी परीक्षेत किमान ६५ टक्के गुण मिळणे आवश्यक. राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना किमान ६० टक्के गुण. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, सेंट्रल युनिव्हर्सिटी कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीयुइटी-अंडरग्रॅज्युएट), देणे आवश्यक. संपर्क - ६६६. [illegible]

**संपर्क - जनाभारती मेन रोड, नागरभावी पोस्ट, बेंगळुरु- ५६००७२, दूरध्वनी - ८० - २३९९८५००, ईमेल- info@base. ac. in, संकेतस्थळ- base. ac. in**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
एका समृद्ध ग्रीन भविष्याची करू सुरुवात
टीजेएसबी ग्रीन कार लोन सोबत
व्याजदर 8.15% द.सा. पासून
₹150 लाखांपर्यंत कर्ज
आजच आपली इ-कार घरी घेऊन या !
Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466 | www.tjsbbank.co.in



S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507



# एनडीए - उत्कृष्ट करिअरचा राजमार्ग !

**२०२१ मध्ये** सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानंतर नॅशनल डिफेन्स अ‍ॅकॅडेमी (राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी)मध्ये मुलींच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. अवघ्या काही वर्षांत मुलींनी, एनडीएत आपला ठसा उमटवायला सुरुवात केली. यंदा नुकत्याच जाहीर झालेल्या एनडीए परीक्षा निकालात पुण्याच्या ऋतुजा व्हऱ्हाडे या मराठी मुलीने सर्व उमेदवारांमध्ये तिसरा क्रमांक मिळवून, इतिहास रचला. या वर्षी १.५ लाख मुलींनी एनडीएची परीक्षा दिली होती. त्यामधून ऋतुजाचा पहिला क्रमांक आला. ऋतुजा नववीत असताना सर्वोच्च न्यायालायाचा निर्णय आला. तेव्हापासून तिने एनडीएत जाण्याची खूणगाठ बांधली. ११ वीत गेल्यानंतर तिने एनडीए परीक्षेच्या तयारीसाठी झोकून दिले. चिकाटी, अथक परिश्रम, सातत्य, शारीरिक क्षमता वाढीकडे दिलेले लक्ष, या बळावर तिने हे यश मिळवले. ऋतुजाचे हे यश मुलींसाठी प्रेरणादायी आहे. १२ वीनंतर एनडीएतील प्रवेश, हा करिअर उत्कृष्ट राजमार्ग ठरतो.

नॅशनल डिफेन्स अ‍ॅकॅडेमी आणि नॅवॅल अ‍ॅकॅडेमी (एनडीए) (खडकवासला), येथील प्रवेशासाठी संघ लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी ठरलेल्या वेळापत्रकानुसार दोन वेळा चाळणी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेव्दारे साधारणतः ३०० ते ४०० उमेदवारांची निवड केली जाते.

नॅशनल डिफेन्स अ‍ॅकॅडेमीसाठीची प्रवेश परीक्षा आणि सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डामार्फत घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेतून तावूनसुलाखून निघालेल्या उमेदवारांची थलसेना, वायुसेना आणि नौदलासाठी निवड केली जाते. या उमेदवारांचे प्रारंभिक शिक्षण आणि शारीरिक प्रशिक्षण हे तीन वर्षाचे असून ते एनडीए (खडकवासला) येथे दिले जाते. पहिल्या अडीच वर्षाचे शिक्षण/प्रशिक्षण हे तिनही दलातील उमेदवारांसाठी समान असते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर उमेदवारांना जवाहरलाल नेहरु विद्यापीठाची पदवी प्रदान केली जाते. थलसेना, वायुसेना आणि नौदलासाठी ज्या उमेदवारांची, बी.एस्सी/ बी.एस्सी (कॉम्प्युटर) /बी.ए या पदवी अभ्यासक्रमासाठी निवड झाली असेल त्यांना ही पदवी, संबंधित अभ्यासक्रम, शारीरिक आणि सेवा प्रशिक्षण, एनडीए येथे पूर्ण केल्यावर प्रदान केली जाते. नौदल आणि वायुदलातील ज्या उमदेवारांची बी.टेक अभ्यासक्रमासाठी निवड झाली असेल, त्यांना ही पदवी नियुक्तीपूर्वीच्या प्रशिक्षणा (विमान/जहाज/संस्था) नंतर दिले जाते.

एनडीए मधून उत्तीर्ण झाल्यावर थल सेनेतील उमेदवारांना इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडेमी देहरादून येथे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी पाठवले जाते. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना लेफ्टनंट या पदावर नियुक्ती दिली जाते. नौदलातील कार्यकारी शाखेसाठी निवड झालेल्या उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी नेव्हल अ‍ॅकॅडेमी एजिमाला येथे पाठवले जाते. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्यांना सब-लेफ्टनंट या पदावर नियुक्ती दिली जाते.

वायु दलातील उड्डाण शाखा (एअरफोर्स कॅडेट्स) आणि जमिनीवरील (ग्राउंड ड्युटी) विविध कार्यासाठी आवश्यक अतांत्रिक (नॉन टेक्निकल) शाखेतील उमेदवारांना एअर फोर्स अ‍ॅकॅडेमी हैदराबाद



येथे पाठविले जाते. उड्डाण शाखेतील उमदेवारांचा प्रशिक्षण कालावधी दीड वर्षाचा असून एका वर्षानंतर त्यांना फ्लाईंग ऑफिसरचा तात्पुरता दर्जा दिला जातो. पुढील सहा महिन्याचे प्रशिक्षण आणि एक वर्षाचे प्रोबेशन संपल्यावर कायमस्वरुपी नियुक्ती दिली जाते.

तांत्रिक शाखेतील ग्राउंड ड्युटी उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी एअर फोर्स टेक्निकल कॉलेज बेंगळुरु येथे पाठवले जाते. ग्राऊंड ड्युटी (तांत्रिक/अतांत्रिक) या प्रशिक्षणाचे एक वर्ष पूर्ण झाल्यावर उमेदवारांना फ्लाईंग ऑफिसरचा तात्पुरता दर्जा दिला जातो. एक वर्षाच्या प्रोबेशननंतर कायस्वरुपी नियुक्ती दिली जाते. या प्रशिक्षणकाळात निवास/भोजन, पुस्तके, पोषाख, वैद्यकीय उपचार आणि सर्व खर्च शासनामार्फत केला जातो.

## अशी असते परीक्षा

एनडीएच्या लेखी चाळणी परीक्षेत, गणित आणि सामान्य क्षमता चाचणी (जनरल अ‍ॅबिलिटी टेस्ट) या दोन पेपरचा समावेश असतो. गणिताचा पेपर ३०० गुणांचा आणि सामान्य क्षमता चाचणी पेपर ६०० गुणांचा असतो. दोन्ही पेपरचा कालावधी प्रत्येकी अडीच तासांचा असतो. प्रश्न वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टिव्ह) पध्दतीचे असतात. सामान्य क्षमता चाचणी पेपरमधील, पार्ट-ए, इंग्रजीचा असतो, त्याचे गुण २०० असतात. पार्ट- बीमध्ये सामान्य ज्ञानावर प्रश्न विचारले जातात. त्याचे गुण ४०० असतात. पार्ट-बी मधील प्रश्न भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, सामान्य विज्ञान, सामाजिक अभ्यास, इतिहास/स्वातंत्र्याचा लढा, भूगोल आणि चालू घडामोडी या विषयांवर विचारले जातात.

या पेपरमधील चार उत्तरांपैकी एका अचुक उत्तराचे वर्तुळ काळ्या शाईनेच पूर्ण भरावे लागते. एकापेक्षा अधिक अचूक उत्तर असल्यास, त्यापैकी जे उत्तर सर्वाधिक अचूक आहे, त्याचेच वर्तुळ पूर्ण भरावे लागेल. दोन्ही अचूक उत्तराची नोंद केल्यास, गुण दिले जाणार नाहीत.

दोन्ही पेपरचा विस्तृत अभ्यासक्रम माहितीपत्रकात देण्यात आला आहे. या अभ्यासक्रमातील सर्व विषयघटकांचा समजून उमजून अभ्यास केल्यास, लेखी परीक्षेत चांगली कामगिरी करता येऊ शकते.

एसएसबी (सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड-सेवा निवड मंडळ) मुलाखत/ बुध्दिमत्ता चाचणी/ व्यक्तिमत्व विकास- गुण ९०० असतात.

## निवड प्रकिया

एनडीए परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी संघ लोकसेवा आयोगामार्फत किमान पात्रता गुण ठरविण्यात येतात. हे गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची यादी एसएसबीकडे पाठवण्यात येते. या बोर्डामार्फत व्यक्तिमत्व आणि बुध्दिमत्ता चाचणी परीक्षा घेतली जाते. मानसशास्त्रीय आणि बुध्दिमत्ता चाचणीवर आधारित निवड प्रकिया दोन टप्प्यात राबवली जाते. यासाठी, निवड केंद्र/ हवाई दल निवड मंडळ/ नौदल निवड मंडळासमोर उमेदवारांना हजर व्हावे लागते.

या, अधिकारी क्षमता चाळणी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान पात्रता गुण, एसएसबीमार्फत ठरवले जातात. हवाईदल आणि या दलातील उड्डाण शाखेसाठी संबंधित उमेदवारांनी नमूद केलेले प्राधान्य, दिलेला पर्याय आणि अर्हतेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना कॉम्प्युटराइज्ड पायलट सिलेक्शन सिस्टिम टेस्ट (वैमानिक कल चाचणी) द्यावी लागते. ही चाचणी एकदाच देता येते. त्यामुळे या चाळणीत मिळालेले चांगले गुण/श्रेणी, हे या उमेदवारासाठी, पुन्हा हवाई दलातील निवड मंडळातील मुलाखतीसाठी ग्राह्य धरले जातात. मात्र ही टेस्ट/चाळणी अनुत्तीर्ण झाल्यास अशा उमेदवारांना एनडीएच्या हवाई दलातील उड्डाण शाखेसाठी किंवा हवाई वाहतूक शाखा किंवा सामान्य सेवा (पायलट/वैमानिक) किंवा नौदलातील हवाई शाखेतील प्रवेशासाठी अर्ज करता येत नाही. यानंतर, लेखी परीक्षेतील गुण आणि एसएसबीच्या परीक्षेत गुणांवर आधारित सर्व उमेदवारांची एकत्रित यादी तयार केली. त्यानंतर अर्हता, वैद्यकीय पात्रता, गुणवत्ता, उमदेवाराने दिलेला पर्याय आणि उपलब्ध जागा लक्षात घेऊन अंतिम निवड यादी तयार केली जाते.

शैक्षणिक अर्हता- थल सेना - १२ वी उत्तीर्ण, नौदल, हवाई दल - गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रासह १२ वी उत्तीर्ण. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डा (सेवा निवड मंडळ) ने - (एसएसबी) ठरविलेल्या मानकांनुसार उमेदवार वैद्यकीय आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम (मेडिकली फिट) असणे आवश्यक ठरते.

(लष्करातील कोणत्याही दर्जाच्या अधिकारी/ कर्मचारी यास कोणत्याही क्षणी युध्दभूमीवर जावे लागू शकते. त्यामुळे तो शारीरिक, मानसिक आणि वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे असल्याचे, स्पष्ट करण्यात आले आहे. शारीरिक व वैद्यकीय फिटनेसची काही माणके निर्धारित करण्यात आली आहेत. त्यात आपण बसतो किंवा नाही, याचा विचार उमेदवारांनी करायला हवा. त्यानुसार तशी तयारी करायला हवी. ऋजुता कऱ्हाडे हिनेसुध्दा एनडीए परीक्षेच्या तयारीसोबत शारीरिक क्षमता वाढीसाठी विशेष प्रयत्न केल्याचे, तिच्या मुलाखतीत स्पष्ट केले आहे.)

**संपर्क** (१) थल सेना पर्याय दिलेल्या उमेदवारांसाठी - आर्मी हेडक्वार्टर्स, एजी ब्रँच, आरटीजी (एनडीए एन्ट्री), वेस्ट ब्लॉक - ३, विंग-१, आर. के. पुरम, नवी दिल्ली - ११००६६, दूरध्वनी - ०११-२६१७५४७३ किंवा joinindianarmy. nic. in, (२) नौदल /नॅव्हॅल अ‍ॅकॅडेमी पर्याय दिलेल्या उमेदवारांसाठी- नॅव्हॅल हेडक्वार्टर्स, डायरेक्टोरेट ऑफ मॅनपॉवर अ‍ॅण्ड रिक्रुटमेंट, ओ.आय अ‍ॅण्ड आर सेक्शन, रुम नंबर - २०४, सी विंग, सेना भवन, नवी दिल्ली - ११००११, दूरध्वनी-२३०१००९७,ईमेल - officer-navy@nic. in किंवा joinindiannavy. gov. in, (३) वायुदलाचा पर्याय दिलेल्या उमेदवारांसाठी - एअर हेडक्वार्टर्स, डायरोक्टोरेट ऑफ पर्सोनेल (ऑफिसर), पीओ ३ (ए), रुम नंबर १७, जे, ब्लॉक, वायूभवनच्या विरुध्द दिशेला, मोतीलाल नेहरू मार्ग, नवी दिल्ली - ११०१०६, दूरध्वनी -०११-२३०१०२३१, किंवा संकेतस्थळ- ६६६. careerindianairforce. cdac. in

संघ लोकसेवा आयोगाचे दूरध्वनी क्रमांक-०११-२३३८५२७१,२३३८११२५

**–सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
घर तुमच्या स्वप्नातले पूर्तता आमच्या साथीने
मर्यादा ₹3 करोड*
टीजेएसबी गृह कर्ज
8.25
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466



S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# लष्करात थेट भरती

**नुकताच जॉईंट** एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेईई)- मेन परीक्षेचा निकाल घोषित झाला. जेईई मेन परीक्षेच्या गुणांवर आधारित नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, (आयआयआयटी), इतर केंद्रीय अभियांत्रिकी/तंत्रज्ञान संस्थेत प्रवेश दिला जातो. त्याच बरोबर जेईई-मेन गुणांच्या आधारावर भारतीय नौदल आणि भारतीय थल सेनेत, थेट प्रवेशाची सुवर्णसंधी उपलब्ध होते. सैन्यामध्ये उच्चश्रेणीचे करिअर करण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या व प्रज्ञावंत, शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि मानसिकदृष्ट्या कणखर तरुण/तरुणींनी तरुण/तरुणींनी या पर्यायाचा अवश्य विचार करायला हवा.

वेगळे करिअर आणि दर्जेदार जीवनशैली जगण्याची संधी यामुळे मिळू शकते. नागरी सेवांपेक्षा अधिक सुविधा, व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी, निवृत्तीनंतर उत्तम आयुष्य जगण्यासाठी करण्यात येणारे साहाय्य, देशात आणि देशाबाहेरही नियुक्ती, उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, मुलांच्या शिक्षणासाठी साहाय्य, ही काही या सेवेची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## नौदलात थेट भरती

भारतीय नौदलामार्फत १० २ (बी.टेक) कॅडेट एन्ट्री स्किम (योजना) राबवली जाते. यासाठी मुलांसोबत मुलीनांही अर्ज करता येतो. बीटेक पदवी जवाहरलाल नेहरु युनिव्हर्सिटीमार्फत दिली जाते.

या योजनेमधून निवड झालेल्या उमेदवारांना कायमस्वरुपी नियुक्ती (कमिशन) दिले जाते. त्यांना नॅव्हल ॲकॅडेमी, एजिमाला (केरळ) येथे चार वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते. या उमेदवारांची शैक्षणिक आणि कार्यकारी, अभियांत्रिकी आणि विद्दूत शाखेसाठी निवड केली जाते. यासाठी, जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन (जेईई) - मेन या परीक्षेतील गुण आणि प्राधान्यक्रम या बाबींचा आधार घेतला जातो. पहिल्या प्रिफरंसमधील शाखा मिळाली नाही तर, जागा उपलब्ध असल्यास उमेदवाराचा विचार दुसऱ्या शाखेसाठी केला जाऊ शकतो. उमेदवाराने केवळ एकच शाखा निवडल्यास, गुणवत्ता यादित येऊनही दुसऱ्या शाखेसाठी त्याचा विचार केला जात नाही.

या योजनेंतर्गत अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारास १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणितात सरासरीने ७० टक्के आणि १२ वी किंवा दहावीत इंग्रजीमध्ये किमान ५० टक्के/गुण मिळणे आवश्यक ठरते.

## निवड प्रक्रिया

प्राथमिक निवड यादितील उमेदवारांना एसएसबी(सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड- सेवा निवड मंडळ)च्या केंद्रांमध्ये मुलाखती/ चाळणी परीक्षेसाठी बोलावले जाते. चाळणी परीक्षेचे दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात बुध्दिमत्ता चाचणी, चित्रांचे अवलोकन/ बोध, समूह चर्चा या बाबींचा समावेश असतो. या टप्प्यात अयशस्वी झालेल्या उमेदवारांना त्याच दिवशी परत पाठवले जाते. दुसऱ्या टप्प्याची चाळणी/मुलाखती चार दिवस चालतात. यामध्ये समूह चर्चा, मानसशास्त्रीय चाचणी आणि मुलाखतीचा समावेश असतो. यात यशस्वी झालेल्या उमदेवारांना वैद्यकीय चाचणीला सामोरे जावे लागते. ही चाचणी साधारणतः तीन ते पाच दिवस चालते. यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवड, नौदलाच्या गरजेनुसार, ॲप्लाइड इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इंजिनीअरिंग, मेकॅनिकल इंजिनीअरिंग किंवा इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग या चार वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी केली जाते. या काळातील संपूर्ण खर्च नौदलामार्फत केला जातो.

● **संपर्क-** www.joinindiannavy. gov. in

## लष्करात थेट प्रवेश

भारतीय लष्करात थेट प्रवेशासाठी, १० २ टेक्निकल एन्ट्री स्किम, ही योजना राबवली जाते. यासाठी केवळ पुरुष उमेदवारच अर्ज करु शकतो.

**अर्हता-** (१) जेईई मेन परीक्षा, (२)१२ वी विज्ञानशाखेत गणित, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयामध्ये सरासरीने ६० टक्के गुण मिळवणारे उमेदवार यासाठी पात्र ठरतात. (३) वयोमर्यादा साडेसोळा वर्षे ते साडे एकोणवीस वर्षे.

या योजनेंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना चार वर्षे कालावधीचे अभियांत्रिकी शिक्षण दिले जाते. हा कालावधी संपल्यावर त्यांना, लेफ्टनंट या पदावर नियुक्ती दिली जाते.

**या योजनेंतर्गत प्रशिक्षणाचे टप्पे-** (१) मुलभूत लष्करी प्रशिक्षण - याचा कालावधी एक वर्षाचा असून ते ऑफिसर प्रशिक्षण केंद्र गया, येथे दिले जाते. (२) फेज वन (टप्पा एक) - नियुक्तीपूर्व प्रशिक्षण - याचा कालावधी तीन वर्षाचा असून ते कॉलेज ऑफ मिलिटिरी इंजिनीअरिंग पुणे किंवा मिलिटरी कॉलेज ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड मेकॅनिकल इंजिनीअरिंग सिंकदराबाद किंवा मिलिटरी कॉलेज ऑफ टेलिकम्युनिकेशन महू येथे दिले जाते. (३) नियुक्तीनंतरचे प्रशिक्षण - याचा कालावधी एक वर्षाचा असून ते सुध्दा कॉलेज ऑफ मिलिटिरी इंजिनीअरिंग पुणे किंवा मिलिटरी कॉलेज ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड मेकॅनिकल इंजिनीअरिंग सिंकदराबाद किंवा मिलिटरी कॉलेज ऑफ टेलिकम्युनिकेशन महू येथे दिले जाते.

अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर विद्यार्थ्यांना जवाहरलाल नेहरु युनिव्हर्सिटीची अभियांत्रिकी पदवी प्रदान केली जाते. या उमेदवारांना लेफ्टनंट म्हणून नियुक्ती मिळाल्यावर दोन वर्षात कॅप्टन या पदावर पदोन्नती दिली जाते. पुढे टप्प्याटप्प्याने पदोन्नत्ती होत राहते.



अभ्यासक्रम/प्रशिक्षणाचे तीन वर्षे पूर्ण झाल्यावर दरमहा ५६,१०० रुपये विद्यावेतन दिले जाते. चौथ्या वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर या उमेदवारांना लेफ्टनंट पदाचे संपूर्ण वेतन, भत्त्यासह लागू केले जाते.

## निवड प्रक्रिया

या योजनेअंतर्गत निवडीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची, १२ वीमध्ये गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रात मिळालेल्या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते. यासाठी विशिष्ट कटऑफ गुण निर्धारित करण्यात येतात. निवडलेल्या उमेदवारांना सर्व्हिसेस सिलेक्शन (एसएसबी)बोर्डापुढे मुलाखती/चाळणी परीक्षा द्यावी लागते. ही चाळणी मानसोपचार तज्ज्ञ, समूह चाळणी अधिकारी आणि मुलाखत घेणारे अधिकारी यांच्याव्दारे घेतली जाते.

प्रत्येक उमदेवारास दोन टप्प्यातील निवड प्रकियेतून जावे लागते. पहिल्या टप्प्यात यशस्वी झालेल्या उमेदवारासच दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र ठरवले जाते. पहिल्या टप्प्यात अयशस्वी झालेल्या उमेदवारांना लगेच परत पाठवले जाते. चाळणी परीक्षा पाच दिवस चालते. दुसऱ्या टप्प्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाळणी घेतली जाते. एसएसबीने निवडलेल्या आणि वैद्यकीय बोर्डाने, वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त ठरवलेल्या उमदेवारांना नियुक्तीचे पत्र दिले जाते. अंतिम गुणवत्ता यादी (मेरिट लिस्ट) तयार करताना एसएसबीच्या मुलाखतीमधील गुण आणि जेईई-मेन मधील गुण, यावर तयार केली जाते. या दोन्हींचे वेटेज निवड मंडळामार्फत ठरवले जाते.

या चाळणी परीक्षेत काही अपघात किंवा जखम झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जात नाही.

● **संपर्क-** www.joinindiaarmy. nic. in

## अग्निपथ योजना

लष्करातील तिनही दलातील भरतीसाठी केंद्रसरकारने, अग्निपथ ही योजना कार्यान्वित केली आहे. साडेसतरा ते २१ वर्षे वयोगटातील १०वी/१२वी उत्तीर्ण मुले या योजनेंतर्गत अर्ज करू शकतात. चार वर्षासाठी या उमेदवारांची निवड केली जाते. त्यांना सर्व प्रकारचे लष्करी प्रशिक्षण दिले जाते. पहिल्या वर्षी त्यांना ४ लाख ७६ लाख रुपयाचे पॅकेज दिले जाईल. चौथ्या वर्षापर्यंत या पॅकेजमध्ये ६ लाख ९२ हजार रुपयांपर्यतची वाढ होईल. चार वर्षानंतर सेवानिधीच्या स्वरुपातील, १० लाख ४ हजार रुपये दिले जातील. शिवाय यामध्ये व्याजाची रक्कम समाविष्ट केली जाईल. सेवानिधीच्या रक्कमेला आयकर लागणार नाही. निवड झालेल्या अग्निविरांमधून २५ टक्के अग्निविरांना त्यांच्या गुणवत्तेनुसार पुढे सेवेत कायम केले जाईल. काही राज्यसरकार आणि वेगवेगळ्या शासकीय आस्थापनांनी, या उमेदवारांना सामावून घेण्याचे ठरवले आहे. या अग्निवीरांना लष्करी शिस्तीतील प्रशिक्षण मिळाल्याने, चार वर्षाच्या कालावधीत अग्निवीरांचे रुपांतर, सक्षम, समर्थ आणि आधुनिक कौशल्यप्राप्त केलेल्या उमेदवारांमध्ये होणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्याला विविध प्रकारच्या संधीही उपलब्ध होऊ शकतात.

● **संपर्क** : https:// www. mygov. in/ campaigns/ agniveer/

(१) **अग्निवीर** - अग्निवीर जनरल ड्युटी- १० वी उत्तीर्ण, अग्निवीर टेक्निकल- १२ वी (भौतिकशासत्र, गणित, रसायनशास्त्र), अग्निवीर क्लार्क/ स्टोअरकीपर- कोणत्याही शाखेतील १२वी, अग्निवीर ट्रेडसमन- १० वी, अग्निवीर जनरल ड्युटी (महिला पोलीस)- १० वी.

● **संपर्क-** https:// joinindianarmy. nic. in/ eligibility-criteria- for- agniveer- recruitment- process. htm

(२) **वायूसेना-** अग्निवीर वायू नॉन कोम्बॅटंट- १० वी,

● **संपर्क-** https:// agnipathvayu. cdac. in/

(३) **नौसेना-** अग्निवीर एसएसआर (सिनिअर सेकंडरी रिक्रुट)- १२ वी- भौतिकशास्त्र, गणित किंवा ३ वर्षे कालावधीची अभियांत्रिकी पदवी, एमआर (मॅर्टिक रिक्रुट)- १०वी.

● **संपर्क-** https:// www. joinindiannavy. gov. in

(इथे दिलेली माहिती सर्वसाधारण स्वरुपाची आहे. १० २ टेक्निकल एन्ट्री किंवा १० २ नौदल एन्ट्री आणि अग्निवीर निवडीबाबतच्या विविध टप्पे आणि शैक्षणिक, वैद्यकीय अर्हता, प्रशिक्षण, वेतन, पदोन्नती, याची विस्तृत माहिती जाणून घेण्यासाठी संबंधित दलाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.)

**-सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)



S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# टूर निघाली

**अमेरिकेच्या राष्ट्रपतींच्या** वेगवेगळ्या धोरणे आणि निर्णयांमुळे सध्या जग ढवळून निघाले आहे. गेल्या काही दिवसात अमेरिकेला जाणाऱ्या अनेक देशांच्या प्रवशांच्या संख्येत मोठी घट झाली. याला अपवाद एक देश ठरला तो म्हणजे भारत. याकाळात भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या पर्यटक पवाशांच्या संख्येत चांगलीच वाढ झाल्याचे निदर्शनास आले. भारतातून अमेरिकेत (उदा- मुंबई ते सॅनफ्रान्सिस्को) थेट विमानसेवेचे तिकिट दरही लक्षणीयरित्या घटल्याचे दिसून आले. याचा अर्थ असाच की भारतीय पर्यटकांना, पर्यटनाचा मनोसक्त आनंद घेणे महत्वाचे वाटते. कोण काय निर्णय घेते किंवा धोरणे आखते, हे काही त्यांच्या पर्यटन आनंदाला ग्रहण लावू शकत नाही.

आता, पहलगाम प्रकरणानंतर काही काळ काश्मीर पर्यटनाला खिळ बसण्याची शक्यता आहे. (तसे घडेलच असे नाही.) पहलगाम घटनेनंतर, पर्यटकांनी लगेच दुसऱ्या पर्यायाचा शोध घेण्यास सुरू केल्याच्या बातम्या यायला सुध्दा लागल्या. याचा अर्थ असा की, पर्यटक आता, अनामिक भीतिने घरी बसून राहणार नाहीत. खरेतर पर्यटन उद्योगासाठी हे सुचिन्हच आहे.

गेल्या दोन-तीन वर्षात भारतीय पर्यटन आणि आतिथ्यशीलता उद्योगाने मोठीच झेप घेतली आहे. करोनाकाळात झालेले सर्व नुकसान भरून काढत, या उद्योगाने आता चांगला नफा मिळवायला सुरुवात केली आहे. २०२८ पर्यंत या उद्योगाची उलाढाल ५ लाख १२ हजार कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. याच कालावधीत परकीय पर्यटकांची संख्या ३० दशलक्ष या आकड्याला पार करण्याची शक्यता आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालायच्या अनुमानानुसार पुढील दशकात या क्षेत्राची वार्षिक वाढ २० टक्केंच्या आसपास राहील.

२०२५-२६ केंद्रीय अर्थसंकल्पात पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी २५४१.०६ कोटींची तरतूद करण्यात आली. पायाभूत सुविधांचा विकास, कौशल्य विकासाला प्राधान्य, ५० सर्वोच्च पर्यटन केंद्राचा विकास, होम स्टे सारख्या स्वयंरोजगार संकल्पनेचा अंगिकार करण्यासाठी, मुद्रा कर्जाची सुविधा, इ व्हिसा सुविधेला चालना, दळणवळण आणि संपर्क यंत्रणेला अधिक सक्षम करणे आदी बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या अर्थसंकल्पताच स्वदेश दर्शन योजना दोन, भारतातच उपचार (हिल इन इंडिया)या संकल्पनेसह वैद्यकीय पर्यटनास चालना, धार्मिक पर्यटन, ज्ञान भारतम मिशनव्दारे वारसा स्थळांची जपणूक या घटकांना साहाय्य केले जाणार आहे. यामुळे विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

या सर्व बाबी लक्षात घेतल्यास, पर्यटन क्षेत्राला वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज लागणार आहे. ही गरज भागवण्याचे काम, इंडियन इन्स्टिट्यूटट ऑफ टुरिझम आणि ट्रॅव्हल मॅनेजमेंट (आयआयटीएम) ही संस्था करत असते. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणारी ही स्वायत्त संस्था असून या संस्थेचे ग्वाल्हेर, नॉयडा, भूवनेश्वर , गोवा, आणि नेल्लोर या ठिकाणी कॅम्पस आहेत.

संस्थेच्या वतिने (१) बॅचलर ऑफ अ‍ॅडमिनिस्ट्रेशन (बीबीए) इन टुरिझम अ‍ॅण्ड ट्रॅव्हल, (२) मास्टर ऑफ अ‍ॅडमिनिस्ट्रेशन (एमबीए) इन टुरिझम अ‍ॅण्ड ट्रॅव्हल हे दोन अभ्यासक्रम चालवण्यात येतात.

या दोन्ही अभ्यासक्रमांच्या, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाची, प्रक्रिया सुरु झाली आहे. या अभ्यासक्रमांना चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो. यंदा ही परीक्षा ८ जून २०२५ रोजी घेण्यात येईल. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ४ जून २०२५ ही आहे.

एमबीए आणि बीबीए अभ्यासक्रम जवाहरलाल नेहरु युनिव्हर्सिटी, दिल्लीशी संलग्नित करण्यात आले आहेत.



बॅचलर ऑफ बिझनेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन (बीबीए) इन टुरिझम अ‍ॅण्ड ट्रॅव्हल- कालावधी तीन वर्षे. या अभ्यासक्रमाला कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकतो. खुल्या सवंर्गातील उमेदवारास ५० टक्के आणि राखीव संवर्गातील उमेदवारांना ४५ टक्के गुण मिळायला हवेत. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील जागा रिक्त राहिल्यास त्या जागा, याच संवर्गातील ज्या उमेदवारांनी चाळणी परीक्षा दिली असेल, त्यांच्यामधून भरल्या जातात.

## प्रवेश प्रकिया

**या अभ्यासक्रमाला दोन पद्धतीने प्रवेश दिला जातो.**

**(१) आयआयटीएम अ‍ॅडमिशन टेस्ट-** ही परीक्षा ग्वाल्हेर, भुवनेश्वर, गोवा, नोएडा आणि इतर काही केंद्रावर घेण्यात येईल. चाळणी परीक्षेत विशिष्ट गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मुलाखत आणि समूहचर्चेसाठी बोलावण्यात येईल. तिन्ही घटकांच्या कामगिरीवर आधारित अंतिम निवड केली जाईल. त्यासाठी या प्रवेश परीक्षेतील किंवा सीयुइटी परीक्षेतील कामगिरीला ७० टक्के वेटेज आणि समूहचर्चा व मुलाखतीसाठी प्रत्येकी १५ टक्के वेटज दिले जाते. ही परीक्षा वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी पध्दतीची आहे. एकूण गुण १००. या पेपरमध्ये सामान्य अध्ययनाचे ५० प्रश्न, भाषिक कौशल्याचे २५ प्रश्न आणि सांख्यिकी कौशल्याचे २५ प्रश्न विचारले जातात. प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून निगेटिव्ह गुण नाहीत. पेपरचा दर्जा १२वी परीक्षेचा असतो. या अभ्यासक्रमाच्या एकूण ३७५ जागा आहेत.

**किंवा**

(२) सीयुइटी- युजी २०२५ (सेंट्रल युनिर्व्हसिटी एन्ट्रस टेस्ट- अंडर ग्रॅज्युएट)

(२) एमबीए इन टुरिझम अ‍ॅण्ड ट्रॅव्हल. या क्षेत्राशी संबंधित हा महत्वाचा अभ्यासक्रम समजला जातो. या उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन, विद्यार्थ्यांमध्ये सर्व प्रकारची आव्हानं स्वीकारण्याचं कौशल्य आणि तंत्र प्रदान केलं जातं. एकूण ७५० जागा भरल्या जातात.

**अर्हता** - विद्याशाखेतील ५० टक्के गुणांसह पदवी. राखीव संवर्गातील उमेदवारांना गुणांमध्ये ५ टक्क्यांची सूट. यंदा पदवीची अंतिम परीक्षा दिलेले विद्यार्थी ही चाळणी परीक्षा देऊ शकतात. मात्र त्यांचा निकाल ३० सप्टेबर २०२५ पर्यंत लागायला हवा.

## प्रवेश प्रक्रिया

**प्रवेशासाठी दोन पध्दती अवलंबण्यात येतात-**

**(१) आयआयटीएम अ‍ॅडमिशन टेस्ट-** ही परीक्षा ग्वाल्हेर, नोएडा, भुवनेश्वर, नेल्लोर आणि इतर केंद्रांवर घेतली जाईल.

ही परीक्षा वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी पद्धतीची आहे. एकूण गुण १००. या पेपरमध्ये सामान्य अध्ययनाचे ५० प्रश्न, भाषिक कौशल्याचे २५ प्रश्न आणि सांख्यिकी कौशल्याचे २५ प्रश्न विचारले जातात. प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून नकारात्मक गुण नाहीत. पेपरचा दर्जा हा पदवी परीक्षेचा असतो. ही परीक्षा किंवा उपरोक्त नमूद परीक्षेतील गुणांवर आधारित निवड विद्यार्थ्यांना मुलाखत आणि समूह चर्चेसाठी बोलावलं जाते. अंतिम निवड करताना प्रवेश चाळणी परीक्षेतील कामगिरीला ७० टक्के वेटेज आणि समूहचर्चा व मुलाखतीसाठी प्रत्येकी १५ टक्के वेटज दिले जाते.

**किंवा**

पुढील चाळणी परीक्षेपैकी कोणतीही एक परीक्षा दिलेली असावी- (१) मॅट- मॅनेजमेंट अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट, (२) कॅट- कॉमन अ‍ॅडमिशन टेस्ट, (३) सीमॅट- कॉमन मॅनेजमेंट अ‍ॅडमिशन टेस्ट, (५) झॅट- झेवियर अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट , (६) जीमॅट- ग्रॅज्युएट मॅनेजमेंट अ‍ॅडमिशन टेस्ट, (७) असोसिएशन ऑफ इंडियन मॅनेजमेंट स्कूल मार्फत घेतली जाणारी एआयएमएस टेस्ट फॉर मॅनेजमेंट अ‍ॅडमिशन. (८) सीयुइटी- पीजी २०२५ (सेंट्रल युनिर्व्हसिटी एन्ट्रस टेस्ट- पोस्ट ग्रॅज्युएट)

## शिष्यवृत्ती

भारत सरकारच्या वेगवेगळया संस्थांमार्फत विविध संवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या शिवाय अनुसूचित जाती, जमाती, दिव्यांग, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना राज्य आणि केंद्र सरकारमार्फत शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो. साधारणतः १५० विद्यार्थ्यांना यांचा लाभ मिळतो.

## प्लेसमेंट

संस्थेने दिलेल्या माहितीनुसार (१) मेक माय ट्रिप, (२) थॉमस कूक, (३) ली पॅसेज टू इंडिया, (४) टीयूआय डॉट इन, (५) द रिट्ज कार्लटॉन, (६) कुओनी, (७) यात्रा डॉट कॉम, (८) हॉलिडे इन, (९) आयआरसीटीसी, (९) केरला हॉलिडे मार्ट, (१०) शेरॅटॉन हॉटिल्स अ‍ॅण्ड रिसॉर्टस, (११) बनयन टूर अ‍ॅण्ड ट्रॅव्हल, (१३) मॅरिऑट हॉटिल्स रिसॉर्ट, (१४) बाल्मर लॅवरी ट्रॅव्हल आणि व्हॅकेशन, (१५) पॅलेस ऑन व्हील्स, (१६) इंडियन हॉरिजॉन-इंडियन ट्रॅव्हल एजन्सी, (१७) जिंजर, (१८) अ‍ॅडव्हेंचर ट्रॅव्हल, (१९) ग्रीन अ‍ॅडव्हेंचर्स, (२०) अ‍ॅडव्हेंचर टुर्स इंडिया, (२१) हॅप्पी टूर-कॉर्पोरेट ट्रॅव्हल मॅनिजमेंट, (२२) राजविलास जयपूर आदी कंपन्यांमध्ये हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळालं आहे.

- **संपर्क -** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अ‍ॅण्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट, गोविंदपुरी, ग्वाल्हेर- ४७४०११, दूरध्वनी- ०७५१-२४३७३००,
- **ईमेल-** admissions@iittm. ac. in,
- **संकेतस्थळ -** www. iittm. ac. in

**-सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत
तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466
Bharose

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

लोकसत्ता मार्ग यशाचा ३१

# पर्यटन स्टार्टअपः कौशल्य आणि संधी

**इंडियन इन्स्टिट्यूट** ऑफ ट्रॅव्हल अ‍ॅण्ड टुरिझम या संस्थेने, पर्यटन, यात्रा, सहल या क्षेत्रांतील रोजगार आणि स्वयंरोजगारास उपयुक्त ठरु शकतील, असे कौशल्य निर्मितीचे ऑनलाइन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी पाच दिवस आहे. हे प्रशिक्षण सोमवार ते शुक्रवार, दररोज दोन तास, ऑनलाइन दिले जाते. पर्यटन उद्योगाशी संबंधित विविध बाबींची माहिती या प्रशिक्षणात संस्थेच्या अनुभवी अध्यापककांडून दिली जाते. हे प्रशिक्षण इंटरअ‍ॅक्टिव्ह असून, प्रशिक्षणार्थीला प्रत्यक्ष चर्चेत सहभागी होता येते. प्रत्येक अभ्यासक्रमाचे शुल्क प्रत्येकी ५ हजार रुपये आहे. अभ्यासक्रमपूर्ण केल्यावर संस्थेचे प्रमाणपत्र दिले जाईल. मात्र त्यासाठी किमान ८० टक्के उपस्थिती आवश्यक राहील. एखाद्या प्रशिक्षणार्थीला मध्येच प्रशिक्षण सोडायचे असल्यास शुल्क परत केले जाणार नाही.

### प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये

(१) टुरिझम स्टार्टअप सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य, तंत्र आणि ज्ञान विकसित होण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होईल. (२) विक्रीचे मुलभूत तत्वे, प्रभावी संवाद कौशल्य, पर्यटन व्यवसायातील आधुनिक प्रवाहांबद्दल प्रशिक्षणार्थींना अवगत केले जाईल. (३) या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध रोजगार आणि स्वयंरोजगार संधींची माहिती दिली जाईल. (४) व्यावसायिक स्वरुपाची व्यवस्थापकीय कौशल्य निर्मिती होईल, (५) सांस्कृतिक, नैतिक, सामाजिक जबाबदारीची भान असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी प्रशिक्षणातील घटक उपयुक्त ठरतील. (६) पर्यटन आणि यात्रा क्षेत्राशी संबंधित भविष्यातील, अभ्यास संधीबाबत अवगत केले जाईल.

### प्रशिक्षणाचे विषय

(१) चित्रपट पर्यटन (फिल्म टुरिझम), (२) पर्यटनातील पुरवठा साखळी व्यवस्थापन (सप्लाय चेन मॅनेजमेंट इन टुरिझम), (३) टुर ऑपरेटर कसे व्हाल?, (४) शाश्वत पर्यटनातील आव्हाने (चॅलेंजेस इन सस्टनेबल टुरिझम), (५) पर्यटन व्यवस्थापन कंपनीची स्थापना (इस्टॅब्लिशिंग टुरिझम डेस्टिनेशन मॅनेजमेंट कंपनी), (६) पर्वतीय आणि साहसी पर्यटन (माउंटेनिरिंग अ‍ॅण्ड अ‍ॅडव्हेन्चर टुरिझम), (७) माहिती तंत्रज्ञानाचा पर्यटनात वापर, (८) सांस्कृतिक पर्यटन, (९) पर्यटनातील संशोधन, (१०) पर्यटनातील रसद पुरवठा आणि मालवाहतूक (लॉजिस्टिक्स अ‍ॅण्ड कार्गो इन टुरिझम), (११) विदेशी चलन व्यवस्थापन (फोरेक्स मॅनेजमेंट), (१२) एकमेकांना छेद देणारी सांस्कृतिक वर्तणूक (क्रॉस कल्चर बिहेव्हिअर), (१३) मंदिरांचा अन्वयार्थ (टेम्पल इंटरप्रिटेशन), (१४) पर्यटन उद्योजकता आणि व्यवसाय विकास, (१५) ग्रामीण भागातील पर्यटन क्षमता, (१६) भारतीय वारसा बांधकामातील प्रतिमाशास्त्र/मूर्तीशास्त्राचा अन्वयार्थ (इंटरप्रिटेटिंग ऑयकॉनॉग्रॅफी ऑफ इंडियन बिल्ड हेरिटेज), (१७) प्रवाशाच्या दिनक्रमाचे नियोजन आणि पर्यटन संस्थेची स्थापन कशी करणार? (इटिनेरीरी प्रिपरेशन अ‍ॅण्ड हाऊ टू ओपन ट्रॅव्हल एजन्सी), (१८) कृषी पर्यटन.

संपर्क : कोर्स को-ऑर्डिनेटर, भ्रमणध्वनी-९७७०४९०१८४, संकेतस्थळ : https:// www.iittm.ac.in

### महापर्यटन

महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग आणि व्यवसायाला आणखी चालना मिळावी म्हणून, राज्यशासनाने काही महिन्यांपूर्वी नवे पर्यटन धोरण जाहीर केले. या धोरणाची काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत- (१) सागरी किनाऱ्यासाठी क्रुझ पर्यटनावर भर दिला जाईल. बारमाही नद्यांवर परवडणारे क्रुझ पर्यटन विकसित केले जाईल. (३) नद्यांमध्ये हाऊसबोट्सना प्रोत्साहन दिले जाईल. कोकण, नाशिक, पुणे आणि नागपूर विभागातील प्रमुख व मध्यम धरणांचा जलपर्यटनाच्या अनुषंगाने विकास केला जाईल. छोट्या व मध्यम आकाराच्या नद्यांमध्ये पर्यटन सुविधा निर्माण व्हाव्यात म्हणून प्रयत्न केले जातील. (४) पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन दिले जाईल. या अनुषंगाने देश विदेशातील पर्यटन/ ट्रॅव्हल/ टुरिझम प्रदर्शनी/मार्टमध्ये सहभागी होण्यासाठी पर्यटन व्यावसायिकांना प्रोत्साहन दिले जाईल. ग्रामीण पर्यटन मेळावे आयोजित केले जातील. वार्षिक मेळावा आयोजनासाठी प्रति १५ लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहन साहाय्य दिले जाईल. मुद्रांक आणि नोंदणी शुल्कात सूट दिली जाईल. कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल. पर्यटन/आदरातिथ्य उद्योग/व्यवसायातील संशोधनासाठी १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य केले जाईल. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान सक्षमीकरणासाठी १० लाख रुपयांपर्यंत साहाय्य केले जाईल. दुर्मीळ कला, संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत साहाय्य केले जाईल. नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सेवांसाठी ५० हजार रुपयांपर्यंत साहाय्य केले जाईल. अपंगांना रोजगार देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. कृषी, कॅरव्हॅन, साहसी पर्यटनासाठी प्रोत्साहन दिले जाईल. (५) अतिरिक्त चटई क्षेत्र, (६) सीजीएसटी कराचा परतावा, (७) वीजदरात सवलत, (८) व्याज व अनुदान प्रोत्साहन, (९) महिला उद्योजक, अनुसूचित जाती आणि जमाती यांना अतिरिक्त प्रोत्साहन, (१०) सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन दिले जाईल.




महाविशेष पर्यटनस्थळ विकास- या कार्यक्रमांतर्गत ५० पर्यटन स्थळांचा विकास केला जाईल. हा विकास करताना (१) संस्कृती आणि वारसा, (२) आध्यात्मिक पर्यटन, (३) साहसी पर्यटन, (४) इको टुरिझम, (५) वेलनेस टुरिझम, (६) साहसी पर्यटन, (७) ग्रामीण पर्यटन अशा संकल्पनांचा वापर केला जाईल.

महाराष्ट्रात अनेक मोठ्या पर्यटक कंपन्या कार्यरत आहेत. मात्र छोट्या कंपन्याही त्यांच्या त्यांच्या मर्यादित व्यवसाय करताना दिसतात. या छोट्या कंपन्या बहुतेक मराठी माणसांच्याच आहेत. अशा कंपन्यांनी व या क्षेत्रात नव्याने येऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे धोरण व्यवसायवाढीसाठी उपयुक्त ठरणारे आहे.

### महिलांना प्रोत्साहन

पर्यटन क्षेत्रात महिलांचं सक्षमीकरण करण्यासाठी ह्यआईह्न योजना राबवण्यात येत आहे. या क्षेत्रात महिलांचे नेतृत्व गुण विकसित करणे व उद्योजकता वाढवणे यावर या योजनेमध्ये भर देण्यात देतो.

### पुढील पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन दिले जाते.

(१) कॅरव्हन, बिचशॅक, (२) साहसी पर्यटन- जमीन, हवा, जल, (३) पर्यटक सुविधा केंद्र, (४) कृषी पर्यटक केंद्र, (५) होम स्टे, (६) हॉटेल, (७) मोटेल, (८) हाऊस बोट, (९) रिसॉर्ट, (१०) टेंट, (११) ट्री हाऊस, (१२) पर्यटन व्हीला, (१३) व्होकेशनल हाऊस, (१४) पॉड्स, (१५) वूडन कॉटिज, (१६) रेस्टॉरेंट, (१७) उपहार गृह, (१८) कॅफे, (१९) महिला चलित कॉमन किचन, (२०) फास्ट फूड, (२१) टूर ऑपरेटर, (२२) ट्रॅव्हल एजंट, (२३) टूर मार्गदर्शक, (२४) क्रुज, (२५) टूर अ‍ॅण्ड ट्रॅव्हल एजंसी, (२६) आर्ट अ‍ॅण्ड क्रॉफ्ट व्हीलेज, (२७) टुरिस्ट ट्रांसपोर्ट ऑपरेटर, (२८) मेडिकल पर्यटन, (२९) वेलनेस सेंटर, (३०) योग केंद्र (३१) आदिवासी/ निसर्ग पर्यटन केंद्र.

अटी व शर्ती- (१) संबंधीत महिला महाराष्ट्राची निवासी असावी, (२) या व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्या महिलांच्या मालकीचा पर्यटन व्यवसाय असावा. (३) या व्यवसायाची नोंदणी पर्यटन संचालनालयाकडे केलेली असावी. (४) या व्यवसायामध्ये व्यवस्थापकीय व इतर कर्मचाऱ्यांमध्ये महिलांची संख्या ५० टक्के असणे बंधनकारक आहे. (५) पर्यटन व्यवसायासाठी आवश्यक सर्व परवानग्या व परवाने असायला हवेत. (६) लाभार्थ्यांचे कर्ज खाते आधार कार्डशी जोडलेले असावे. (७) पर्यटन स्थळातील महिला व्यावसायिकांना योजनेचा लाभ देताना प्राधान्य दिले जाईल.

### अर्ज प्रक्रिया

(१) कर्ज परताव्यासाठी विहित नमुन्यात किंवा पर्यटन संचालनालयाच्या वेबपोर्टलवर अर्ज करावा लागतो. (२) अर्ज मंजूर झाल्यावर लाभार्थ्यास ऑफलाइन किंवा ऑनलाइन, (काही अटी व शर्तीसह) हेतू पत्र (लेटर ऑफ इंटेट)/ मंजुरी पत्र दिले जाईल. या मंजुरी पत्राच्या आधारे बँक कर्जासाठी अर्ज करता येईल. (३) कर्ज परताव्या अंतर्गत, बँकेकडून घेतलेल्या, १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याज शासनामार्फत परत केले जाईल. (४) या योजनेंतर्गत सध्या कार्यरत उद्योग व्यवसायाची वृद्धी वा क्षमतावाढ करावी लागेल. (५) बँकेकडून घतलेल्या व्याजाची रक्कम पुढील प्रमाणे भरली जाईल- (अ) १२ टक्के दराने लाभार्थ्याच्या खात्यात, कर्जाची समाप्ती होईपर्यंत भरली जाईल किंवा (ब) सात वर्षेपर्यंत भरली जाईल किंवा (क) ४.५ लाखाच्या मर्यादेत भरली जाईल. या तीन पर्यायापैकी सर्वात आधी ज्या पर्यायाची परीपूर्ती होईल, तो लाभ दिला जाईल. (व्याज सोडून इतर कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.)

संपर्क- पर्यटन संचालनालय, १५६/१५७, १५ वा माळा,
नरिमन भवन, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१,
दूरध्वनी- ०२२-६९१०७६००
ईमेल- connect. dot- mh@gov. in ,
संकेतस्थळ- https:// maharashtratourism.gov.in

– सुरेश वांदिले

बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

S. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# हवाई दलातील करिअर संधी

**जगातील सर्वोत्कृष्ट** हवाई दलांमध्ये भारतीय हवाई दलाचा समावेश होतो. हवाई दलाने गेल्या अनेक दशकात, विविध युद्ध आणि इतर आणिबाणिच्या प्रसंगात अतुलनीय कामगिरी बजावली आहे. हवाई दलामध्ये विविध प्रकारच्या कार्यासाठी दरवर्षी नियमितपणे भरती केली जाते. महत्त्वाकांक्षी आणि पराक्रम गाजवू इच्छिणाऱ्या तरुण इ तरुणींनी, या करिअर पर्यायाचा अवश्य विचार करायला हवा.

एफसीएटी (एफकॅट)- एअर फोर्स कॉमन अॅडमिशन टेस्ट- ही परीक्षा भारतीय हवाई दलामार्फत दरवर्षी फेब्रुवारी आणि ऑगस्ट महिन्यात, अशी दोनदा विविध गटांतर्गतील भरतीसाठी घेतली जाते. त्याव्दारे लघु सेवा (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) प्रकारातील नियुक्ती केल्या जातात.

१) ग्राउंड ड्युटी (अतांत्रिक) - (अ) एज्युकेशनल (शैक्षणिक) - किमान अर्हता- एमबीए/एमसीए किंवा एमए/एमएस्सी - इंग्रजी/ भौतिकशास्त्र/ गणित/ रसायनशास्त्र/ सांख्यिकी/ आंतरराष्ट्रीय अभ्यास- इंटरनॅशनल स्टडीज / आंतरराष्ट्रीय संबंध- इंटरनॅशनल रिलेशन्स/ डिफेन्स स्टडीज- सुरक्षा अभ्यास/ मानसशास्त्र/ संगणकशास्त्र/ माहिती तंत्रज्ञान- इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी/व्यवस्थापन/ मास कम्युनिकेशन/ पत्रकारिता/ जनसंपर्क, या विषयातील पदव्युत्तर पदवी, किमान ५० टक्के गुण आवश्यक. ज्या अभ्यासक्रमातून कोणत्याही टप्प्यावर बाहेर पडता येत नाही अथवा प्रवेश घेता येत नाही अशी, एकल (सिंगल) इंटिग्रेटेड पदवी. पदवी परीक्षेत किमान ६० टक्के गुण आवश्यक. उमेदवारांचे वय २० ते २६ वर्षे असावे. (ब) अकांउट्स (लेखा)- ६० टक्के गुणांसह बी.कॉम किंवा वित्त(फायनान्स) या विषयाच्या स्पेशलायझेशनसह बॅचलर ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन (बीबीए) किंवा, बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस) किंवा बॅचलर ऑफ बिझनेस स्टडीज (बीबीएस) पदवी, किंवा सीए (चार्टर्ड अकाउंटंट)/ सीएमए (सर्टिफाइड मॅनेजमेंट अकाउंटंट)/ सीएस (कंपनी सेक्रेटरी) /सीएफए (चार्टर्ड फायनांशिअल अॅनॅलिस्ट). उमेदवारांचे वय २० ते २६ वर्षे असावे, (ड) अॅडमिनिस्ट्रेशन (प्रशासन) आणि लॉजिस्टिक्स (साधनसामग्री) - ६० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील तीन वर्षे कालावधीची पदवी, उमेदवारांचे वय २० ते २६ वर्षे असावे.

(तांत्रिक पदे आणि ग्राउंड ड्युटी (अतांत्रिक) अॅडमिनिस्ट्रेशन (प्रशासन), यासाठी ६० टक्के गुणांसह असोशिएट मेंबरशिप ऑफ इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स अथवा एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाची ए आणि बी परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास, ही अहर्ताही ग्राह्य धरली जाते. तांत्रिक पदांसाठी एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाची ए आणि बी परीक्षा उत्तीर्ण, ही अर्हताही ग्राह्य धरली जाते. मात्र या परीक्षेला विद्यापीठाची मान्यता प्राप्त हवी. त्याची विस्तृत माहिती संकेतस्थळावर देण्यात आली आहे.)

(२) हवाई शाखा (फ्लाईंग ब्रँच) - अर्हता - कोणत्याही विषयातील ६० टक्के गुणांसह पदवी आणि १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत, किंवा ६० टक्के गुणांसह बीई/ बीटेक उमेदवाराचे वय २० ते २४ वर्षे असावे.

३) ग्राउंड ड्युटी (तांत्रिक) - एरोनॉटिकल इंजिनीअर (इलेक्ट्रॉनिक्स) - अर्हता- बीई/ बीटेक आणि १२वी मध्ये भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये किमान ६० टक्के गुण मिळालेले हवेत. उमेदवारांचे वय २० ते २६ वर्षे असावे.

४) ग्राउंड ड्युटी (तांत्रिक)- एरोनॉटिकल इंजिनीअर (मेकॅनिकल)- अर्हता- १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये किमान ६० टक्के गुण आवश्यक. बीई/ बीटेक किंवा इंटिग्रेटेड पोस्ट ग्रॅज्युएट इन इंजिनीअरिंग/ टेक्नॉलॉजी.



(मेटिऑरॉलॉजी शाखा- अर्हता- पुढील शाखांमधील पदव्युत्तर पदवी- गणित/ सांख्यिकी/ भूगोल/ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन/ एन्व्हायर्नमेंट सायन्स/ अॅप्लाइड फिजिक्स/ अॅग्रिकल्चरल मेटिऑरॉलॉजी/ इकॉलॉजी अॅण्ड एन्व्हायर्नमेंट, एन्व्हायर्नमेंटल बॉयलॉजी, जिओ फिजिक्स. पदव्युत्तर पदवीच्या सर्व पेपरमध्ये सरासरीने किमान ५० टक्के गुण मिळणे आवश्यक. पदवी स्तरावर भौतिकशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा. या पेपरमध्ये किमान ५५ टक्के गुण मिळायला हवेत किंवा ६० टक्के गुणासंह पुढील विषयातील बीई- कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, काम्प्युटर इंजिनीअरिंग/टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर इंजिनीअरिंग अॅण्ड अॅप्लिकेशन, कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग/टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल अॅण्ड कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल इंजिनीअरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्प्युटर सायंस, इत्यादी.)

५) एनसीसी स्पेशल एन्ट्री योजना (फ्लाईंग ब्रँच)- अर्हता- ६० टक्के गुणांसह कोणत्याही शाखेतील बीई किंवा बीटेक किंवा कोणत्याही विषयातील पदवी आणि १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये किमान ५० टक्के गुण आवश्यक. एनसीसी सिनिअर डिव्हिजन विंग मधील सी प्रमाणपत्र आवश्यक. विशिष्ट कालावधीत हे प्रमाणपत्र मिळालेले असावे. या गटातील उमेदवारांना लेखी परीक्षा देण्याची गरज नसते. ते थेट मुलाखतीच्या टप्प्यासाठी पात्र ठरतात. उमेदवाराचे वय २० ते २४ वर्षे असावे.

**अशी असते परीक्षा**

ही परीक्षा वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असते. ही परीक्षा ऑनलाइनच द्यावी लागते. कालावधी दोन तास. या परीक्षेत १०० प्रश्नांचा समावेश असतो. प्रत्येक अचुक उत्तरासाठी तीन गुण दिले जातात. उत्तर चुकल्यास एक गुणाची कपात केली जाते. जे प्रश्न सोडवण्यात येत नाहीत, त्याला गुण दिले जात नाहीत.

या परीक्षेत (१) संख्यात्मक कौशल्य क्षमता (न्युमरिकल अॅबिलिटी), (२) इंग्रजी शब्द क्षमता (व्हर्बल अॅबिलिटी इन इंग्लिश), (३) सर्वसाधारण माहिती/जाणीव (जनरल अवेअरनेस), (४) कार्यकारणभाव (रिझनिंग), (५) लष्कर कल चाचणी (मिलिटरी अॅप्टिट्यूड टेस्ट), या विषय घटकांवर प्रश्न विचारले जातात. न्युमरिकल अॅबिलिटी या घटकाचे प्रश्न, दहावीच्या स्तरावरील असतात. इतर विषयघटकांचे प्रश्न, पदवीस्तरीय असतात. (या परीक्षेचा विस्तृत अभ्यासक्रम संकेतस्थळावर देण्यात आला आहे.)

https://careerindianairforce.cdac.in/ आणि https://afcat.cdac.in/AFCAT/ या संकेतस्थळावर सरावासाठी प्रश्न उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पेपरचा अभ्यास केल्यास, कशा प्रकारचे प्रश्न विचारले जाऊ शकतात, याची कल्पना येऊ शकते.

**इतर टप्पे**

ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, एअर फोर्स सिलेक्शन बोर्ड टेस्टिंग, हा दुसरा टप्पा पार पाडावा लागतो. याअंतर्गत दोन टप्पे आहेत.

पहिला टप्पा- ऑफिसर इंटेलिजन्स रेटिंग टेस्ट. दुसरा टप्पा- पिक्चर पर्सेप्शन अॅण्ड डिस्कशन टेस्ट. पहिल्या टप्प्यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच दुसऱ्या टप्प्यासाठी संधी दिली जाते. पहिल्या टप्प्यात अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना त्वरित घरी पाठवले जाते. टप्पा दोनची परीक्षा/चाळणी चार ते पाच दिवस चालते. यामध्ये पुढील बाबिंचा समावेश असतो. (१) लेखी मानसशास्त्रीय (सॉयकॉलॉजिकल टेस्ट) चाचणी- ही परीक्षा मानसोपचार तज्ज्ञामार्फत घेतली जाते, (२) समूह (ग्रुप टेस्ट) चाचणी- यामध्ये बाह्य (आऊटडोर) बौध्दिक आणि शारीरिक कृतींचा समावेश असतो, (३) मुलाखत (इंटरव्ह्यू)- मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यामार्फत व्यक्तिगत संवाद साधला जातो, (४) फ्लाईंग ब्रँचसाठी निवड झालेल्या उमेदवारांना संगणकीय वैमानिक निवड प्रक्रिया चाळणी (कॉम्प्युटराईज्ड पायलट सिलेक्शन सिस्टिम टेस्ट) द्यावी लागते.)

तिसरा टप्पा- (वैद्यकीय चाळणी/मेडिकल एक्झामिनेशन)- दुसऱ्या टप्प्यात, निवड मंडळाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांना, वैद्यकीय चाळणीस सामोरे जावे लागते.

चौथा टप्पा (अखिल भारतीय गुणवत्ता यादी)- वैद्यकीय चाळणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची विविध शाखांमध्ये उपलब्ध जागांनुसार अखिल भारतीय गुणवत्ता यादी तयार केली जाते.

महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रे- छ. संभाजी नगर, पुणे, कोल्हापूर, मुंबई, नाशिक, नागपूर

हवाई दलातील अधिकाऱ्यांवर आपल्या देशाच्या सीमा रक्षणाची मोठी जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पाडत असतानाच उत्तम आणि दर्जेदार आयुष्य जगण्याची संधीही उपलब्ध होते. हवाई दलातले करिअर अधिकाऱ्यांना जसे विविध आव्हाने देते, त्याचबरोबर साहस गाजवण्याची संधी देते. मान, सन्मान, प्रतिष्ठा, आत्मसन्मान, समाधानी कौटुंबिक आयुष्य, स्वतःची आणि कुटुंबियांची सुरक्षा यांची हमी मिळते. शिवाय देशाच्या नागरिकांचे प्रेम, सामाजिक दर्जा, आदर मिळतो. मातृभुमिच्या सेवेची संधी आणि अभिमान वाटेल अशी सन्मानजक कारकीर्द गाजवण्याची/कामगिरी करण्याची संधी मिळते. मनोरंजन, क्रीडा, शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय सुविधा अशा विविध सुविधा दिल्या जातात. कुटुंबासोबत आशयघन वेळ घालवता येतो, आपल्या सहकाऱ्यांसमवेत सामाजिक नातेबंध दृढ करता येतात.

संपर्क- एफसीएटी सेल,
दूरध्वनी-०२०-२५५०३१०५, ईमेल- afcatcell@cdac. in

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी
ऑटो लोन संगे
व्याजदर
8.25%*
द.सा. पासून

*अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# आयआयएमचा राजमार्ग

**इंडियन इन्स्टिट्यूट** मॅनजमेंट ( आयआयएम ) या संस्थांनी, गेल्या काही वर्षात नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या संस्थांमध्ये पूर्वी केवळ पदवी अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाई. आता काही, आयआयएमनी १२ वी नंतर, प्रवेशाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या संधीचा लाभ मुलांनी घ्यायला हवा. आयआयएम ब्रँडचा लाभ मिळून या विद्यार्थ्यांना, पुढील चार ते पाच वर्षात खात्रीशिररित्या चांगले करिअर घडवता येऊ शकते.

**(१) आयआयएम कोझिकोड**

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ( २०२५ ) आयआयएम कोझिकोडने, बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ( ऑनर्स विथ रिसर्च ), हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू के ा आहे. उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रातील सर्व घटकांना उपयुक्त ठरणाऱ्या, नव्या वैश्विक विचासरणीला अंगिकारणाऱ्या आणि नावीन्यतेला प्राधान्य देणाऱ्या मनुष्यबळ निर्मितीसाठी, हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल.

या अभ्यासक्रमात व्यवस्थापन ज्ञानशाखेच्या विस्तृत विषय घटकांसोबत इतर आंतरज्ञानशाखीय विषय घटकांचाही समावेश करण्यात आल्याने, विद्यार्थ्यांचा चौफेर व्यक्तिमत्त्व विकास अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना, अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरणे ( पब्लिक पॉलिसी ), आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि मशिन लर्निंग, मानसशास्त्र आणि वर्तणूकशास्त्र ( बिव्हेरिअयल सायन्स ), वित्त आणि बिग डाटा, लिबरल स्टडीज इन मॅनेजमेंट, विपणन, विक्री आणि डिजिटल प्रमोशन, अशासारखे विषयही अभ्यासता येतील. इंटर्नशीप, संशोधन सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जातील.

अर्हता- कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण किंवा १० वीनंतर, कोणत्याही विषयातील शासनमान्य पदविका.

**निवड प्रक्रिया** - या अभ्यासक्रमाच्या निवडीसाठी, शैक्षणिक कामगिरी, चाळणी परीक्षेतील गुण आणि मुलाखत, हे तीन घटक विचारात घेतले जातील.

**चाळणी परीक्षा-** या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला, ( आयआयएम कोझिकोड- बीएमएस ॲप्टिट्यूड टेस्ट ( आयआयएमके- बीएमएस- एटी ) चाळणी परीक्षा द्यावी लागेल. या चाळणी परीक्षेव्दारे विध्यार्थ्याच्या भाषिक ( व्हर्बल ॲबिलिटी ) आणि संख्यात्मक ( क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी ) क्षमतेची चाचणी घेतली जाईल. ही संगणकाधारित बहुपर्यायी वस्तुनिष्ठ पध्दतीची परीक्षा असेल.

जेईई-मेन परीक्षेत, सुयोग्य गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षा द्यावी लागणार नाही. जेईई-मेनमध्ये मिळालेल्या गुणांवर आधारित, त्यांची पुढील टप्प्यासाठी निवड केली जाईल. या टप्प्यात निवडलेल्या उमेदवारांच्या मुलाखती मुंबई, बेंगळुरु, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, कोझिकोड, नवी दिल्ली येथे घेतल्या जातील. या प्रक्रियेत उमेदवारांची सर्वधारण आणि सामाजिक जाणीव, शैक्षणिक कामगिरी, व्यक्तित्व, संवादकौशल्य, वृत्ती ( ॲटिट्यूड ), अभ्यासक्रमासाठीची सक्षमता या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाईल. मुलाखतीचा कालावधी साधारणतः १५ मिनिटे राहील.

या अभ्यासक्रमाला अर्ज करण्याची शेवटची तारीख २२ मे २०२५ आहे. चाळणी परीक्षा २२ जून २०२५ रोजी होईल.

संपर्क- आयआयएम कॅम्पस कोझिकोड- ६७३५७०, भ्रमणध्वनी- ९५१३२५२०९९ , **संकेतस्थळ-** https:// iimk. ac. in, **ईमेल-** bmsathelpdesk@iimk. ac. in

**(२) आयआयएम इंदौर**

पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट ( आयपीएम ) हा अभ्यासक्रम सुरू करणारी, आयआयएम इंदौर ही आपल्या देशातील पहिली आयआयएम ठरली. व्यवस्थापकीय नेतृत्व करण्यासाठी महत्वाकांक्षा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण पध्दतीने संरचना करण्यात आली. हा अभ्यासक्रम २०११ साली सुरू करण्यात आला. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर, ''बॅचलर ऑफ आर्ट्स- बीए ( फाउंडेशन ऑफ मॅनेजमेंट ) ॲण्ड मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन- एमबीए,'' ही पदवी प्रदान केली जाते. ३ वर्षानंतर विद्यार्थ्याला अभ्यासक्रमातून बाहेर पडता येते. त्याला बीए ( फाउंडेशन ऑफ मॅनेजमेंट ) ही पदवी प्रदान केली जाते.



या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तीन वर्षात, अर्थशास्त्र, सांख्यिकी, गणित, मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, राज्यशास्त्र, विधि आणि सार्वजनिक धोरणे, या विषयांमध्ये विद्यार्थ्यांचा पाया पक्का केला जातो. माहिती तंत्रज्ञानाचे कौशल्य विकसित केले जाते. यामुळे व्यवसाय उद्योगातील वास्तवतेला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सक्षम बनतो. चौथ्या आणि पाचव्या वर्षी, वित्त, कार्यान्वयन, मनुष्यबळ आणि व्युहनीती ( स्ट्रॅटिजी ), माहिती तंत्रज्ञान विपणन, हे एमबीएचे मुख्य विषय शिकवले जातात. या विद्यार्थ्यांना सामाजिक इंटर्नशीप, उन्हाळी इंटर्नशीप, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अदलाबदल योजना, आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट ( आयपीमॅट ) ही चाळणी परीक्षा घेतली जाते. ही संगणकाधारित ( कॉम्प्युटर बेस्ड ) परीक्षा आहे. महाराष्ट्रात नागपूर, पुणे, मुंबई ही परीक्षा केंद्रे आहेत.

अर्हता- ( अ ) कोणत्याही शाखेतील १२ वी, पास श्रेणीत उत्तीर्ण. ( ब ) दहावी पास श्रेणीत उत्तीर्ण.

**परीक्षा आणि निवड प्रकिया**

या अभ्यासक्रमासाठी निवड, ( १ ) कल चाचणी ( ॲप्टिट्यूड टेस्ट ) आणि ( २ ) मुलाखत या दोन घटकांवर आधारित केली जाते. कलचाचणीच्या पेपरमध्ये तीन विभाग ( सेक्शन ) असतात ( १ ) संख्यात्मक क्षमता ( क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी )- बहुपर्यायी प्रश्न ( मल्टिपल चॉ स ), ( २ ) क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी - लघुउत्तरी प्रश्न ( शॉर्ट ॲन्सर ). क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटीच्या भागात अलजेब्रा, मॉर्डन मॅथेमॅटिक्स, लॉजिकल रिझनिंग, जॉमेट्री, डाटा ॲनॅलिसिस, ॲरिथमॅटिक यावरील प्रश्नांचा समावेश असतो, ( ३ ) भाषा क्षमता ( व्हर्बल ॲबिलिटी ) बहुपर्यायी प्रश्न ( माल्टिपल चॉ स )- या भागात व्हर्बल रिझनिंग, रिडिंग कॉमफ्रिहेन्शन, एरर्स इन युसेज, या घटकांवर प्रश्न विचारले जातात. प्रत्येक अचुक उत्तरास चार गुण दिले जातात आणि प्रत्येक चुकलेल्या उत्तरासाठी एक गुण वजा केला जातो. ( क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी सेक्शन ( शॉर्ट ॲन्सर ) साठी निगेटिव्ह गुण नाहीत. ) परीक्षेचा कालावधी दोन तास. प्रत्येक सेक्शनसाठी प्रत्येकी ४० मिनिटांचा कालावधी दिला जातो. उमेदवारांना पेपरमध्ये ठरवून दिलेल्या सेक्शनच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावे लागतात. या तिनही भागांसाठी विशिष्ट असा कटऑफ ( किमान गुण ) ठरवण्यात येतो. तो कटऑफ प्राप्त करणे आवश्यक आहे. हे किमान गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचीच निवड मुलाखतीसाठी केली जाते. ( प्रत्येक संवर्गासाठी हे किमान गुण वेगवेगळे राहतात. प्रत्येक संवर्गासाठीची मेरिट यादी वेगवेगळी तयार केली जाते. )

कलचाचणी सोबतच मुलाखतीमध्ये चांगली कामगिरी करणे आवश्यक आहे. अशाच उमेदवारांची निवड अंतिम

निवड यादीसाठी केली जाते. कलचाचणीस ६५ टक्के वेटेज आणि मुलाखतीस ३५ टक्के वेटेज दिले जाते. अंतिम यादित ज्या उमेदवारांची निवड होत नाही, त्यांना कळवले जात नाही.

संपर्क ङ्क आयआयएम इंदौर, राऊ -पितमपूर रोड, इंदौर- ४५३५५६, दूरध्वनी- ०७३१ -२४३९६८७ **संकेतस्थळ** - www. iimidr. ac. in, **ईमेल-** ipmadmissions @iimid. ac. in

**३) आयआयएम रांची**

या संस्थेच्या इंटिग्रेटेड ( बीबीए एमबीए ) या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला १० वी आणि १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. राखीव संवर्गासाठी ५५ टक्के गुण. तीन वर्षानंतर हा अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना बीबीए पदवी प्रदान केली जाते. या अभ्यासक्रमाच्या पाच वर्षाच्या कालावधीत, मानव्यशास्त्र, समाजशास्त्र, कला, विज्ञान, व्यवस्थापन अशासारख्या बहुज्ञानशाखीय विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात आमुलाग्र बदल घडून, तो व्यवसाय, कार्पोरेट उद्योग जगातील समस्या सोडवण्यासाठीचे कौशल्य प्राप्त करतो.

या अभ्यासक्रमाला, आयआयएम - इंदौरमार्फत घेतल्या जाणाऱ्या, इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट ( आयपीमॅट ) मधील गुणांच्या आधारे प्रवेश दिला जातो.

**संपर्क**- प्रबंधननगर, नया सराई रोड, रांची- ८३५५०३ **संकेतस्थळ-** https:// iimranchi. ac. in/ ipm/ **ईमेल-** chair. ipm@ iimranchi. ac. in

**(४) आयआयएम रोहतक**

२०१९ च्या शैक्षणिक वर्षापासून रोहतक इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटने, पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड ( बीबीए एमबीए ) अभ्यासक्रम सुरू केला आहे. प्रज्ञावंत मुलांना जागतिक पातळीवर, व्यवस्थापकीय व उद्योजकीय नेतृत्व करणे सुलभ जावे,या अनुषंगाने अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे.

प्रवेशासाठी, आयआयएम- रोहतकव्दारेच घेतली जाणारी, संगणकाधारित ( कॉम्पुटर बेस्ड ) परीक्षा, आयपीएम ॲप्टिट्यूड टेस्ट, द्यावी लागते. यापेपरमध्ये क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी, लॉजिकल रिझनिंग, व्हर्बल ॲबिलिटी असे तीन घटक असतात. प्रत्येक घटकावर बहुपर्यायी वस्तुनिष्ट पध्दतीचे, प्रत्येकी ४० प्रश्न विचारले जातात. प्रत्येक घटकाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रत्येकी चाळीस मिनिटांचा कालावधी दिला जातो. प्रत्येक प्रश्नाच्या अचुक उत्तराला चार गुण दिले जातात. उत्तर चुकल्यास एक गुण कपात केला जातो. या परीक्षेतील गुणांवर आधारित निवडक विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. **(पूर्वार्ध)**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
प्रस्तुत



टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# व्यवस्थापन अभ्यासक्रम

## आयआयएम अमृतसर

या संस्थेने पाच वर्षे कालावधीचा, इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट, नव्याने सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर, एमबीए पदवी प्रदान केली जाते. या अभ्यासक्रमातून तिसऱ्या वर्षी बाहेर पडण्याचा पर्याय देण्यात येतो. या पर्यायाचा स्वीकार करणाऱ्या विद्यार्थ्यांना, बॅचलर ऑफ सायन्स इन क्वांटिटेटिव्ह फायनान्स अॅण्ड इकॉनॉमिक्स (बीएसक्यूएफई) ही पदवी दिली जाते.

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये-** (१) वित्त आणि अर्थशास्त्रात परिणामात्मक/संख्यात्मक तंत्राच्या वापरावर, प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले जाते, (२) व्यवसाय व्यवस्थापनाच्या सर्व पैलूंचा सर्वसमावेशक परिचय करून दिला जातो, (३) देशातील सर्वोत्कृष्ट व्यवस्थापन गुरूंकडून विषयघटक शिकवले जातात, (४) तिसऱ्या वर्षानंतर इंटर्नशिपच्या माध्यमातून उद्योगविश्वाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून दिला जातो, (५) चौथ्या आणि पाचव्या वर्षी ड्युएल डिग्री, एमबीएचा अभ्यास करता येतो, (६) वित्त, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन या क्षेत्रांसाठी, भविष्यातील सक्षम नेतृत्वनिर्मिती व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांची सर्वांगीण तयारी केली जाते.

संवादकौशल्य, गणित, सांख्यिकी, संगणकीय प्रोग्रॅमिंग, विपणन, मनुष्यबळ व्यवस्थापन, कार्यान्वयन (ऑपरेशन) व्यवस्थापन या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाते. सामाजिक प्रकल्प, इंटर्नशिप, संशोधन प्रकल्प यांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या प्रारंभिक चाळणीसाठी, आयआयएम इंदौरमार्फत घेतली जाणारी, इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट- अॅप्टिट्यूड टेस्ट (आयपीमॅट)चे गुण ग्राह्य धरले जातात. ही परीक्षा दिलेले, जे विद्यार्थी, आयआयएम अमृतसरच्या, आयपीएम अभ्यासक्रमाला अर्ज करतील, त्यांची गुणवत्ता यादी तयार करून, निवडक विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना महिला उमेदवारांना ५ टक्के वेटेज दिले जाते.

**अर्हता-** १२ वी मध्ये गणित किंवा अल्पाइड मॅथेमॅटिक्स (उपयोजित गणित) या विषयांसह सरासरीने ६० टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांना ५५ टक्के गुण मिळायला हवेत.

**संपर्क-** आयआयएम अमृतसर, मन्नावाला रोड, मन्नावाला, राख जिठा पंजाब- १४३११५, भ्रमणध्वनी- ७८१४३००५६३, **ईमेल-** ipmoffice@ iimamritsar. ac. in, **संकेतस्थळ-** https:// iimamritsar. ac. in

## आयआयएम सिरमौर-

या संस्थेने- बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस) हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम, नव्याने सुरू केला आहे. कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरतात.

या अभ्यासक्रमात, व्यवस्थापकीय शिक्षणातील मूलभूत बाबी, शिकवल्या जातात. व्यवस्थापकीय जबाबदारी सांभाळण्यासाठी आवश्यक कौशल्यनिर्मिती केली जाते. याशिवाय, उच्चशिक्षणासाठी हे विद्यार्थी सक्षम होतात. २०४७ साली विकसित भारताचे स्वप्न, साकारण्याच्या अनुषंगाने, हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी, आपले योगदान देऊ शकतात.

सांख्यिकी, गणित, व्यवस्थापनाची तत्त्वे, व्यवस्थापनातील विविध कार्यकारी शाखा, अर्थशास्त्र, संवादसंप्रेषण, मानसशास्त्र, मानव्यशास्त्र, सामाजिक शास्त्रे, शास्वतता, सार्वजनिक धोरण, आदी विषयांचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना प्रदान केले जाते. संपूर्ण सहाव्या सत्राचा कालावधी, हा आंतरराष्ट्रीय किंवा औद्योगिक इंटर्नशिपसाठी राखून ठेवला जातो. विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रात्यक्षिकांचा अनुभव मिळावा म्हणून प्रयत्न केला जातो. या अभ्यासक्रमात किमान ८ सीजीपीए मिळवलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या, एमबीए अभ्यासक्रमाला थेट प्रवेशाची संधी मिळू शकते.

हा अभ्यासक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तत्त्वांवर आधारित आहे. वेगवेगळ्या टप्प्यांवर या अभ्यासक्रमातून बाहेर पडण्याची सुविधा आहे. हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी, या क्षेत्रातील उत्कृष्ट अध्यापक आणि तज्ज्ञांना बोलावले जाते. अभ्यासक्रमाच्या कालावधित, विद्यार्थ्यांना अनेक प्रकल्पांवर काम करण्याची संधी दिली जाते. वेगवेगळ्या सॉफ्टवेअर प्रोग्रॅमचे प्रशिक्षण दिले जाते. प्रत्यक्ष उद्योग किंवा कॉर्पोरेटमध्ये काम करण्याचा अनुभव मिळवून दिला जातो.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे तीन टप्पे आहेत- (१) प्रारंभिक चाळणीत्ठी, आयपीमॅट (इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट अॅप्टिट्यूड टेस्ट) या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात (ही परीक्षा इंदौर आयआयएममार्फत घेतली जाते.) या परीक्षेतील गुणांना ५५ वेटेज दिले जाते, (२) आयपीमॅट गुणांवर आधारित, निवडक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. याला २० टक्के वेटेज दिले जाते, (३) दहावी आणि बारावीतील गुणांना वेटेज (दोन्हींसाठी प्रत्येकी) - ८५ ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक- ३ वेटेज, ८५ ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक- ४ वेटेज, ९५ टक्के टक्क्यांपेक्षा अधिक- ५ वेटेज, (५) लिंगवैविध्यता (महिला आणि तृतीयलिंगी)- ५ वेटेज.

**संपर्क-** आयआयएम सिरमौर, धौला कौन, सिरमौर- १७३०३०, **ईमेल-** admission@iimsirmaur. ac. in, **संकेतस्थळ-** https:// www. iimsirmaur. ac. in



## आयआयएम बोधगया -

या संस्थेने २०२१ सालापासून इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट (बीबीए एमबीए) अभ्यासक्रम सुरू केला. विद्यार्थ्यांना तीन वर्षांनंतर अभ्यासक्रमातून बाहेर पडता येते. अशा विद्यार्थ्यांना बीबीए (बॅचलर ऑफ बिझिनेस अॅडमिनिस्ट्रेशन) ही पदवी प्रदान केली जाते.

**अर्हता -** १० वी आणि १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण आवश्यक. राखीव संवर्गासाठी ५५ टक्के गुण.

या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांना प्रारंभापासूनच उद्योजकीय नेतृत्व स्वीकारण्यासाठी सर्वांगीणदृष्ट्या तयार करणे, हा आहे. जागतिक पातळीवरील आधुनिक व्यवस्थापकीय संकल्पना, पद्धती आणि प्रकियेचे सखोल ज्ञान प्रदान केले जाते. वैशिष्ट्यपूर्ण विषयघटकांमुळे, हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, विश्लेषणात्मक तंत्राचा वापर करून, कोणत्याही समस्या निर्धारणाचे, कौशल्य निर्माण होणे अपेक्षित आहे.

**संपर्क -** आयआयएम बोधगया, उरुवेला प्रबंधविहार, गया- ८२४२३४, **संकेतस्थळ-** https:// iimbg. ac. in/ programs/ ipm/, **ईमेल -** director_ office@iimbg. ac. in

## आयआयएम जम्मू

या संस्थेने, इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट (बीबीए एमबीए) हा अभ्यासक्रम दोन वर्षांपूर्वी सुरू केला. अर्हता - १० वी आणि १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण आवश्यक. राखीव संवर्गासाठी ५५ टक्के गुण. या अभ्यासक्रमात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यांच्यासोबत व्यवस्थापन शाखेचे एकत्रीकरण केले जाते. कोणत्याही टप्प्यावर हा अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअर करता येणे शक्य व्हावे, यासाठी, अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे, मौखिक आणि लेखी संवादकौशल्य क्षमता वाढते, त्यांना जागतिक दृष्टिकोनाचे भान येते, वेगळ्या पद्धतीची विचारशैली आणि समस्या निर्धारणाचे कौशल्य प्राप्त होते. नैतिक आणि सामाजिक भान असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. तीन वर्षांनंतर हा अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना बीबीए पदवी प्रदान केली जाते.

**संपर्क-** आयआयएम जम्मू, जागती, जम्मू १८१२२१, **संकेतस्थळ-** https:// www. iimj. ac. in. **ईमेल- :** info@iimj. ac. in

## निवड प्रक्रिया

बोधगया आाणि जम्मू येथील, आयआयएममधील पाच वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, ह्यह्नजिपमॅट- जॉइंट इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट अॅडमिशन टेस्टह्नह्न, परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा, नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतली जाते. परीक्षेचा कालावधी अडीच तास. ही संगणकाधारित (कॉम्प्युटर बेस्ड) परीक्षा आहे. या परीक्षेमध्ये, क्वॉंटिटेव्ह अॅप्टिट्यूड (संख्यात्मक कल), डाटा इंटरप्रिटेशन (माहिती विश्लेषण), व्हर्बल अॅबिलिटी (भाषा क्षमता) हे तीन भाग असतात. बहुपर्यायी वस्तुनिष्ठ पद्धतीचे १०० प्रश्न विचारले जातात. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तराला, चार गुण दिले जातात. उत्तर चुकल्यास एक गुण कपात केला जातो. पेपरचा कालावधी अडीचा तास.

चाळणी परीक्षेतील गुण, उमेदवारांच्या प्रारंभिक निवडीसाठी (शॉर्टलिस्टिंग) उपयोगात आणले जातात. त्यानंतर प्रत्येक आयआयएम, अंतिम निवडीसाठी वेगवेगळया बाबींचा अंगीकार करतात. यामध्ये मुलाखत, व्यक्तिमत्त्व चाचणी, लेखनकौशल्य क्षमता यांचा समावेश असतो. १० वी १२ वीमधील शैक्षणिक कामगिरीसाठी काही वेटेज ठेवले जाते.

## आयआयएम रोहतक

या आयआयएममधील, प्रवेशाची अंतिम निवड यादी, आयपीमॅटमधील गुण, शैक्षणिक कामगिरी आणि मुलाखतीचे गुण यावर केली जाते. आयपीमॅट गुणांना ५५ टक्के वेटेज, मुलाखतीला १५ टक्के वेटेज, दहावीतील गुणांना १० टक्के वेटेज, बारावीतील गुणांना २० टक्के वेटेज दिले जाते. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला १० वी आणि १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळणे आवश्यक. राखीव संवर्गासाठी ५५ टक्के गुण. तीन वर्षांनंतर, अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना, बीबीए पदवी प्रदान केली जाते.

**संपर्क-** मॅनेजमेंट सिटी, एनएच- १०, सदर्न बायबास, सुनारिआ, रोहतक- १२४०१०, **संकेतस्थळ-** https:// www. iimrohtak. ac. in/ ipm- admission. php, **ईमेल-** admin@ www. iimrohtak. ac. in

(उत्तरार्ध)

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%*
द.सा. पासून
अटी लागू.





S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# सर्वांना संधी असली तरी...

**काही दिवसांपूर्वी** १२ वीचा निकाल लागला. दरवर्षीपेक्षा यंदाच्या निकालाची टक्केवारी कमी असली तरी विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या लाखावर जाते. या सगळ्यांची पुढील प्रवेशासाठी लगबग सुरू झाली आहे. जेईई- मेनचा निकाल लागल्यामुळे, १२ वीमध्ये विशिष्ट टक्केवारी मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा, एनआयटी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी), आयआयआयटी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) आणि देशातील इतर संस्थांमधील प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. बऱ्याच खासगी अभियांत्रिकी महाविद्यालातील अखिल भारतीय स्तरावरील १५ ते २० टक्के जागा, जेईई- मेनच्या गुणांचा आधार घेऊन भरल्या जातील. देशातील काही नामवंत अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शिक्षण संस्थांच्याही चाळणी परीक्षा एव्हाना झाल्या असतील व त्यांचेही निकाल लवकरच लागतील किंवा लागले असतील. त्यामुळे गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांसह १२वी उत्तीर्ण झालेल्या बऱ्याच विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा मार्ग सुकर झाला असे म्हणता येईल. महाराष्ट्र शासनाच्या अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान सीईटीचा निकाल लवकरच जाहीर होईल. तो झाला की, या गटातील हजारो विद्यार्थी, राज्यातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरतील. काही विद्यार्थी औषधीनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाला जातील. काही कृषी अभ्यासक्रमाला जातील. ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही, आपल्या शहरातील किंवा मुंबई, पुणे नागपूर, नाशिक, कोल्हापूर अशासारख्या मोठ्या शहरांमधील विज्ञान महाविद्यालयात बीएससीला प्रवेश घेतील.

नीट परीक्षा आणि सीइटी जीवशास्त्र गटाचा निकाल लागल्यावर, आणखी काही हजार विद्यार्थी, एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएचएमएस, फिजिओथेरपी, ऑक्युपेशलन थेरपी, नर्सिंग, पॅरॉमेडिकल अभ्यासक्रम या अभ्यासक्रमांसाठी पात्र ठरतील. उर्वरित बीएस्सी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतील. याचा अर्थ विज्ञान शाखेतील बहुतांश विद्यार्थी, हे कोणत्या ना कोणत्या ना महाविद्यालयात प्रवेश घेतील.

## वाणिज्य आणि कला शाखा

वाणिज्य आणि कला शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या बरीच आहे. यातील काही हजार विद्यार्थ्यांनी, बीबीए/बीएमएस अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची सीइटी दिली असणार. तो निकालही नजिकच्या काळात लागेल. काही हजारावर विद्यार्थ्यांना, या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळेल. पाच वर्षे कालावधीच्या बीए- एलएलबी अभ्यासक्रमाला काही हजार मुले प्रवेश घेतील. हॉटेल मॅनिजेंट, डिझायनिंग अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. या ज्ञानशाखांच्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांच्या प्रवेशासाठी, चाळणी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमधून शेकडो विद्यार्थी प्रवेश घेतील.

एवढे झाल्यावरही वाणिज्य आणि कला शाखेतील बऱ्याच जणांना, पुढे काय? चा प्रश्न सतावत राहील. सध्यातरी त्यांच्यापुढे चांगली महाविद्यालये किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यावाचून पर्याय नाही. ज्यांना बारावीमध्ये चांगले गुण मिळाले असतील, त्यांना त्यांच्या मनाजोगत्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल. उर्वरित इतरांनी काय करायचं?

खरेतर इतर विद्यार्थ्यांनी लगेच हताश किंवा निराश होण्याचे कारण नाही. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्याने, बऱ्याच महाविद्यालयांनी नवे रोजगाराभिमुख आणि कौशल्य विकासाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना करता येतात. या अभ्यासक्रमांमधून टप्प्याटप्प्याने बाहेर पडता येते. सहा महिन्यानंतर प्रमाणपत्र, एक वर्षानंतर पदविका, दोन वर्षानंतर ॲडव्हान्स्ड किंवा प्रगत पदविका तीन वर्षानंतर पदवी प्रदान केली जाते. या प्रत्येक टप्प्यासाठी विशिष्ट अशी कौशल्यपातळी एनएसक्यूएफ (नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क)ने निश्चित केली आहे. त्या प्रत्येक टप्प्यात विद्यार्थी, विशिष्ट स्वरूपातील कौशल्य पातळी गाठतो. त्यानुसार त्याला रोजगाराची संधी मिळू शकते. उदा- पदवी प्राप्त उमेदवाराची एनएसक्यूएफ पातळी सात, ॲडव्हान्स्ड पदविका प्राप्त उमेदवाराची - सहा आणि पदविका प्राप्त उमेदवाराची पाच समजली जाते. या अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिकांवर भर असतो. इंटर्नशीप करावी लागते.




कला आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या नजिकच्या महाविद्यालयांमध्ये अशा अभ्यासक्रमांचा शोध, प्रत्यक्ष जाऊन घ्यायला हवा. अनेक महाविद्यालयांनी, वाणिज्य आणि कला शाखेतील विद्यार्थ्यांना सुलभतेने प्रवेश घेता येतील, असे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. (उदा- बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझायनिंग, बीए सायकॉलॉजी, बीएस्सी ॲनिमेशन ॲण्ड व्हीएफएक्स, बीएस्सी फॅशन डिझाइन. बॅचलर ऑफ व्होकेशन इन ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम मॅनेजमेंट, बीएमएस- रिटेल मॅनेजमेंट, बीएमएस- कॅपिटल मार्केट, बीए- मल्टिमीडिया ॲनिमेशन, बीए/बीएस्सी- व्हिज्युएल इफेक्ट्स, बीएमएस- इव्हेंट मॅनेजमेंट ॲण्ड पब्लिक रिलेशन, बीएमएस- ॲडव्हर्टायजिंग कम्युनिकेशन डिझाइन, बॅचलर ऑफ व्होकेशन इन रिअल इस्टेट मॅनेजमेंट किंवा फायनान्शिअल मार्केट्स ॲण्ड सर्व्हिसेस) अशासारखे अभ्यासक्रम, हे विशिष्ट प्रकारच्या तंत्र आणि कौशल्य निर्मितीसाठी उपयुक्त ठरतात.

## कौशल्य विकास

राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख महाविद्यालयांमध्ये, कौशल्य निर्मितीसाठी उपयुक्त ठरू शकतील, असे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यामुळे वाणिज्य आणि कला शाखेतील विद्यार्थ्यांनी आपला कल, आवड, गती, रस, बुद्धिमत्ता, आकलनक्षमता आणि व्यक्तित्व अशा बाबींचा प्रामाणिकपणे विचार करून अभ्यासक्रमांची निवड करायला हवी. या महाविद्यालयांमध्ये, या अभ्यासक्रमांना थेट प्रवेश दिला जातो. आपल्या परिसरातील अशी महाविद्यालये नक्कीच शोधता येतात.

प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी संबंधित शिक्षण संस्था किंवा महाविद्यालयात पुढील बाबींची सुविधा असल्याची खात्री करून घ्यावी, (१) नॅक (नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडेटेशन काऊंसिल) प्रमाणपत्र, (महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्थेच्या दर्जाचे प्रमाणपत्र), (२) एनआयआरएफ (नॅशनल इंस्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क) गुणवत्ता व दर्जावर आधारित क्रमांक रँकिंग, (३) प्लेसमेंट सुविधा, (४) इंटर्नशीप सुविधा, (५) ग्रंथालय, (६) प्रयोगशाळा, (७) क्रीडांगण, (८) उच्चप्रशिक्षित मनुष्यबळ, (९) व्यक्तिमत्त्व विकासासाठी राबवण्यात येणारे उपक्रम. या सर्वच बाबी असणारे महाविद्यालय निश्चितच दर्जेदार समजावे व प्रवेशासाठी प्राधान्य द्यावे. अशी माहिती संस्था किंवा महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असायला हवी. नसल्यास विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष माहिती करून घ्यावी.

कौशल्य निर्मिती आणि रोजगारक्षम अशा या अभ्यासक्रमांमुळे पुढे काय? चा प्रश्न बऱ्याच अंशी मिटू शकतो. मात्र या, अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यावर करिअर घडण्यासाठी किंवा घडवण्यासाठी विद्यार्थ्याला झोकून देऊन अभ्यास करण्याची गरज राहील. या अभ्यासक्रमाचा भर प्रात्यक्षिकांवर अधिक असतो. मात्र, त्यावर प्रभुत्व मिळवण्यासाठी सैद्धांतिक ज्ञानही पक्के करावे लागते. त्यासाठी, या अभ्यासक्रमाचा तीन किंवा चार वर्षाचा कालावधी, हा त्यावरच लक्ष केंद्रित करणारा असला पाहिजे. कला किंवा वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना भरपूर वेळ असतो, असा एक समज किंवा अपसमज असतो. समजा असा काही वेळ असल्यास, त्याचा सदुपयोग, या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने अवांतर वाचन, तांत्रिक कौशल्ये प्राप्त करणे, इंग्रजी, मराठी या भाषा समृद्ध करणे, सादरीकरणाचे कौशल्य हस्तगत करणे, संवादकौशल्य वाढवणे, लिहिण्याचे कौशल्य वाढवणे, अशा चौफेर विकासासाठी करायला हवा.

महाविद्यालयातील ग्रंथालये ओस पडलेली असतात. इतरत्र आणि कोणत्याही सटरफटर गोष्टीत टाइमपास किंवा वेळ घ्यालविण्याऐवजी विद्यार्थ्यांनी आपली पावलं महाविद्यालयातील ग्रंथालयाकडे वळवली पाहिजेत. या काळात, इंडियन एक्स्प्रेस, फायनान्शिअल एक्स्प्रेस, लोकसत्ता सारखी महत्त्वाची वृत्तपत्रे, नियतकालिके, भारत सरकारचे प्रकाशन असलेले, भारत वार्षिकी अशी पुस्तके, यांचे अधिकाधिक वाचन करायला हवे. त्याचा फायदा, क्रिटिकल थिंकिंग म्हणजे वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची, विविध घटना घडामोडींचा कार्यकारणभाव समजून घेण्याची, निष्कर्ष काढण्याची क्षमता आणि कौशल्य विकसित करण्यासाठी होऊ शकतो. हा पाया, या काळात मजबूत केल्यास पुढे केंद्रीय नागरी सेवांपासून ते राज्य नागरी सेवांच्या परीक्षांमधील पेपरमधील उत्तरे सोडवताना, मुलाखतींमध्ये होऊ शकतो. चांगल्या पाठांतरापेक्षा अशा विकसित झालेल्या क्षमता इतर उमेदवारांपेक्षा तुम्हाला चार पावले समोर ठेवता येतात. या काळात महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्थेने किंवा विद्यापीठाने, प्रत्येक वर्षासाठी जो काही अभ्यासक्रम ठरवून दिला असेल, त्यातील प्रत्येक विषयघटक, उपघटकांचा अभ्यास करायलाच हवा. परीक्षेत हे येऊ शकते किंवा ते येऊ शकत नाही किंवा अमुकतमुक घटकावरच अधिक प्रश्न विचारले जातात, वगैरे बाबींकडे लक्ष दिल्यास, परीक्षेत खूप गुण मिळतीलही, पण तुमचे ज्ञान अर्धवट राहील. आजच्या काळात परीक्षेतील गुणांपेक्षा, ज्ञानाची उपयोजिता, कौशल्य या बाबीच महत्त्वाच्या ठरतात.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत




टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# दहावीनंतर पुढे काय?

**दहावीचा निकाल लागला की, पुढे काय करायचे, याविषयी घरोघरी बरेच मंथन केले जाते. बहुतांश पालक, वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील ११ वीमध्ये मुलांचा प्रवेश निश्चित करतात. १० वीनंतर, ११ वी हा राजमान्य राजमार्ग आहे. कला-विज्ञान-वाणिज्य शाखेत प्रवेश घेतल्यानंतर मग, मुलाच्या गुणवत्ता आणि बुद्धिमत्तेनुसार पुढे, पदवी- पदव्युत्तर पदवी- पीएचडी- नेट/सेट- पोस्ट डॉक्टोरल, असा मोठा शैक्षणिक प्रगतीचा अवकाश उपलब्ध होतो.**

**१० वीमध्ये** वेगवेगळ्या विषयांमध्ये मिळालेले गुण आणि विद्यार्थ्यांचा कल किंवा आवड लक्षात घेऊन कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखा निवडता येते. मात्र, ७०-७५ किंवा अगदी ८० टक्क्यांच्या आसपास गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी, मुलाला इंजिनीअर किंवा डॉक्टर बनवण्याच्या अट्टहास करताना, सावधगिरी बाळगलेली बरी. वाणिज्य, अर्थशास्त्र, सांख्यिकी, वित्त, या क्षेत्रात पुढे उत्तम करिअर घडावे असे ज्यांना वाटत असेल, त्यांचा गणिताचा पाया भक्कम आणि संकल्पना स्वयंस्पष्ट हव्या. तरच या विषयांमध्ये यश मिळू शकेल.

१० वीनंतर ज्या विद्यार्थ्यांना ११ वीच्या राजमार्गाने जायचे नसेल, त्यांनी तंत्रकौशल्याचे विविध अभ्यासक्रम करायला हवे. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्याला विशिष्ट स्वरूपाचे रोजगारक्षम कौशल्य प्रदान करते. अशा विद्यार्थ्यांना, या तंत्रकौशल्याच्या बळावर उद्योगांमध्ये संधी मिळते. पुढे अंगभूत गुणवत्ता आणि परिश्रमानुसार, हा विद्यार्थी यशाला गवसणी घालू शकतो.

■ महाराष्ट्रात तंत्रनिकेतन शिक्षणाची भक्कम साखळी आहे. शासकीय तंत्रनिकेतन संस्थांनी स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. बऱ्याच शासकीय तंत्रनिकेतनांना स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात काळानुरूप बदल करता येणे शक्य झाले आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंगसारखे आधुनिक विषय, काही शासकीय तंत्रनिकेत संस्थांनी सुरू केले आहेत. या संस्थांमध्ये प्लेसमेंटचीसुद्धा सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तीन वर्षे कालावधीचा हा अभ्यासक्रम केल्यावर, अभियांत्रिकी पदवीच्या दुसऱ्या वर्गाला प्रवेश मिळू शकतो. त्यामुळे ११ वी, १२ वीमध्ये प्रचंड अभ्यास, महागडे शिकवणी वर्ग, सीईटीची स्पर्धा, आणि प्रवेशाचा ताणतणाव यापासून सुटका मिळू शकते. (अर्थातच, चांगल्या अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयांमध्ये दुसऱ्या वर्गाच्या थेट प्रवेशासाठी तंत्रनिकेतन पदविका परीक्षा उत्कृष्ट गुणाने उत्तीर्ण आवश्यक ठरते. अन्यथा मनासारख्या महाविद्यालयात प्रवेश मिळणे अवघड जाते.)

अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकवले जाणारे, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे विषय तंत्रनिकेतन संस्थांत शिकवले जातात. शिवाय काही वेगळे विषयही शिकवले जातात. (उदा- (१) मुंबई तंत्रनिकेतन- लेदर गुड्स ॲण्ड फुटवेअर टेक्नॉलॉजी, लेदर टेक्नॉलॉजी, रबर टेक्नॉलॉजी, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (२) नागपूर तंत्रनिकेतन- पॅकिजिंग टेक्नॉलॉजी, टेक्सटाइल मॅन्युफॅक्चुरिंग, मायनिंग ॲण्ड माइन सर्व्हेइंग, ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम, मेकॅट्रॉनिक्स, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग, (३) अमरावती तंत्रनिकेतन- प्लॅस्टिक ॲण्ड पॉलिमर इंजिनीअरिंग, केमिकल इंजिनीअरिंग, (४) पुणे तंत्रनिकेतन- ड्रेस डिझायनिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चुरिंग इंजिनीअरिंग, (५) नाशिक तंत्रनिकेतन- पॉलिमर टेक्नॉलॉजी, इंटेरिअर डिझाइन, ड्रेस डिझायनिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चुरिंग इंजिनीअरिंग, मेकॅट्रॉनिक्स, (६) कोल्हापूर तंत्रनिकेतन- केमिकल इंजिनीअरिंग, ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम, (७) नांदेड तंत्रनिकेतन- मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, प्रॉडक्शन इंजिनीअरिंग इत्यादी)

तंत्रनिकेतन संस्थेतील प्रवेशासाठी, केंद्रिभूत (सेंट्रल ॲडमिशन प्रोसेस- कॅप) प्रवेश प्रकिया राबवली जाते. १० वीमधील, सर्वोत्कृष्ट पाच (बेस्ट ऑफ फाइव्ह) विषयातील गुणांचा विचार प्रवेशासाठी केला जातो.



दहावीमध्ये असंख्य विद्यार्थ्यांना समसमान गुण मिळत असल्याने, तंत्रनिकेतन संस्थांतील प्रवेशासाठी गुणवत्तायादी तयार करताना, पुढील सूत्रे (सापेक्ष गुणवत्ता पसंतीक्रम) अवलंबण्यात येते- (१) गणिताचे सर्वोच्च गुण, (२) विज्ञान विषयातील अधिकतम टक्केवारी, (३) इंग्रजी विषयातील अधिकतम टक्केवारी.

शासकीय स्वायत्त संस्था, शासकीय अस्वायत्त संस्था आणि अशासकीय शासन अनुदानित संस्थांमधील प्रवेशासाठी, अभ्यासक्रमाचे शुल्क, खुल्या संवर्गासाठी ७५०० रुपये आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग आणि ट्युशन फी व्हेव्हर (शिक्षण शुल्क माफ) योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क भरावे लागत नाही.

तर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के शुल्क भरावे लागेल. सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित स्वायत्त संस्थांमध्ये (यामध्ये अल्पसंख्याकांसाठी असलेल्या संस्थांचा समावेश नाही)- ७० टक्के जागा मूळ जिल्ह्यातून भरल्या जातात. (ज्या जिल्ह्यातून दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली असेल, तो जिल्हा मूळ जिल्हा समजला जातो.) इतर जिल्ह्यातून दहावी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. प्रत्येक अभ्यासक्रमातील प्रत्येकी ५ जागा दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवण्यात येतात. ३० टक्के जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित असतात.

● **संपर्क-** dtemaharashtra. gov. in

■ सूक्ष्म,लघु, मध्यम उद्योजकता (एमएसएमइ) मंत्रालयाच्या, टेक्नॉलॉजी सेंटरच्या अंतर्गत सुरू असलेल्या, इंडो जर्मन टूल रुम (छत्रपती संभाजीनगर), या संस्थेत, तीन वर्षे कालवधीचा, डिप्लोमा इन मेकॅट्रॉनिक्स, हा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाला १० वी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र ठरतात. प्रवेशासाठी चाळणी परीक्षा द्यावी लागते. अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कापासून सूट दिली जाते. अर्ज करण्याची शेवटची तारीख २२ जून २०२५. २९ जून रोजी चाळणी परीक्षा होईल.

● **संपर्क-** पी-३१, एमआयडीसी, इंडस्ट्रिअल एरिया, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)- ४३१००६, **दूरध्वनी-** ०२४०-२६१०१००, **इमेल-** gm@igtr-aur.org, **संकेतस्थळ-** www.igtr-aur.org

■ **इन्स्टिट्यूट फॉर डिझाइन ऑफ इलेक्ट्रिकल मेझरिंग इंस्ट्रुमेंट्स-** या केंद्रीय संस्थेने पुढील तीन पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत- डिप्लोमा इन (१) रोबोटिक्स ॲण्ड मेकॅट्रानिक्स, (२) टूल ॲण्ड डाय मेकिंग, (३) थ्री डी ॲनिमेशन ॲण्ड ग्रॅफिक्स. दहावीच्या गुणांवर प्रवेश दिला जातो.

● **संपर्क-** स्वातंत्र्यवीर तात्या टोपे मार्ग, पूर्व द्रुतगती मार्ग, एव्हरार्ड नगर बसथांब्याच्या विरुद्ध दिशेला, सायन, चुनाभट्टी मुंबई- ४०००२२, **दूरध्वनी-**०२२-२४०५०३०१, **संकेतस्थळ-** https://idemi.org

■ वाढत्या शहरीकरणामुळे अग्निशमन क्षेत्राचे महत्त्व वाढत चाललेय. मात्र, त्या तुलनेत या क्षेत्रातील प्रशिक्षित व्यक्ती कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. ही उणीव दूर करण्यासाठी, राज्य अग्निशमन अकादमीने, वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. १० वी उत्तीर्ण विद्यार्थी, अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम करू शकतो. दहावीमध्ये ५० टक्के (खुला प्रवर्ग), ४५ टक्के (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग), गुण मिळायला हवेत. कालावधी- सहा माहिने.

● **संपर्क-** महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ(पूर्व) मुंबई- ४०० ०९८, **दूरध्वनी** -०२२-२६६७७५५५, **संकेतस्थळ-** http://www.mahafireservice.gov.in, **ईमेल-** info@mahafireservice.gov.in

■ नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर, या संस्थेमार्फत १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी, सर्टिफिकेट कोर्स इन शुगर बॉयलिंग, हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. कालावधी एक वर्ष. चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो.

● **संपर्क-** जी टी रोड, कल्याणपूर, कानपूर, उत्तर प्रदेश- २०८०१७, **संकेतस्थळ-** https://nsi.gov.in/contact, **ईमेल** - nsikanpur@nic.in, **दूरध्वनी-** ०५१२-२९८८८२५

■ **सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ टूल डिझाइन, हैदराबाद-** संस्थेचे अभ्यासक्रम- (अ) डिप्लोमा इन डाय ॲण्ड टूल मेकिंग - १० वीमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के आणि राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना ४५ टक्के गुण मिळायला हवेत. कालावधी- चार वर्षे.

(ब) डिप्लोमा इन ऑटोमेशन ॲण्ड रोबोटिक इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनीअरिंग- कालावधी प्रत्येकी तीन वर्षे. अर्हता- १० वी उत्तीर्ण. प्रवेश चाळणी परीक्षेव्दारे.

● **संपर्क-** रुम नंबर १०२, डिप्लोमा ब्लॉक, बालानगर, एक्स रोड, हैदराबाद- ५०००३७, **दूरध्वनी-** ०४०-२९५६१७९५, **संकेतस्थळ-** citdindia.org, **ईमेल-** trainig@citdindia.org

(७) **सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज नॉटिकल ॲण्ड इंजिनीअरिंग,** या संस्थेने १० उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी, व्हेसल नेव्हिगेटर कोर्स आणि मरिन फिटर कोर्स, अभ्यासक्रम सुरू केले आहेत. कालावधी दोन वर्षे. खोल समुद्रात मत्स्यमारीसाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या नौकेवर प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना १०वीमध्ये गणित आणि विज्ञान विषयात किमान ४० टक्के गुण मिळायला हवे. प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. अर्ज करण्याची शेवटची तारीख १६ जून २०२५.

● **संपर्क-** फाइन आर्ट्स ॲव्हेन्यू, कोचिन- १६, **संकेतस्थळ-** www.cifnet.gov.in

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
एका समृद्ध ग्रीन भविष्याची करू सुरुवात
टीजेएसबी ग्रीन कार लोन सोबत
व्याजदर 8.15% द.सा. पासून
₹150 लाखांपर्यंत कर्ज
आजच आपली इ-कार घरी घेऊन या !
Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466 | www.tjsbbank.co.in

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM-413507

# आयटीआय - कौशल्यातून उन्नतीकडे

**मागच्या वर्षी,** आयटीआय (इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट- औद्योगिक प्रशिक्षण संस्था) प्रवेश प्रकियेसंदर्भातील एक बातमीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आयटीआय प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांना १० वीत ९० टक्के गुण मिळाले होते. उत्कृष्ट महाविद्यालयात ११ वी प्रवेशाचा पर्याय उपलब्ध असताना, त्यांनी आयटीआयच्या मार्गावरून जाणे श्रेयस्कर समजले. (यंदासुद्धा असेच घडेल, अशी आशा करायला हरकत नाही.)

या सर्व मुलांचे आणि विशेषतः पालकांचे कौतुकच करायला हवे. कारण, ९० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक, आपल्या मुलासाठी इंजिनीअरिंग किंवा मेडिकल अशी स्वप्ने बघू लागतात. त्यात काहीही गैर नाही. असे असतानाही त्यांनी आपल्या पाल्याला आयटीआयमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेतला, ही बाब अनुकरणीय आहे. हे सर्व विद्यार्थी पुढील काही वर्षांत तंत्रकुशल बनून प्रगतीच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल करू लागतील. बुद्धिकौशल्य, तांत्रिक कौशल्य, परिश्रम आणि संयम या गुणांच्या बळावर काही वर्षांत यशाला गवसणीही घालतील. तंत्रकुशल मनुष्यबळाला रोजगार आणि स्वयंरोगाराच्या संधी टप्प्याटप्प्यावर मिळत राहतील. जे या संधीचे सोने करतील, ते कोणत्याही अभियंत्यापेक्षाही समोर जाण्याची क्षमतासुद्धा प्राप्त करतील.

आयटीआयमधून प्राप्त होणारी तंत्रकुशलता ही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व सक्षम करू शकते, ही बाब लक्षात ठेवून मुलाचा कल, बौद्धिक क्षमता, आर्थिक परिस्थिती आदी बाबींचा विचार करून पालकांनी आयटीआयचा पर्याय स्वीकारायला हवा.

महाराष्ट्रात, ४१९ शासकीय आयटीआय आहेत. यामध्ये १ लाख ३९ हजार ९२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ५८८ खासगी आयटीआयमध्ये १ लाख ५५ हजार ७३२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. दहावीची परीक्षा ज्या जिल्ह्यातून दिली असेल, अशा विद्यार्थ्यांसाठी, त्या जिल्ह्यातील आयटीआयमध्ये ९० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात.

शासकीय आणि खासगी आयटीआयमधील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येतात. अशी पद्धत राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य. या पद्धतीने सर्व प्रवेश प्रक्रिया, या पारदर्शक आणि गुणवत्तेनुसारच होतात.

## प्रशिक्षण

आयटीआयमधे एकूण ८३ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीच्या १८ आणि दोन वर्षे कालावधीच्या ३७ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. बिगरअभियांत्रिकी गटात एक वर्ष कालावधीच्या २८ आणि २ वर्षे कालावधीच्या १ व्यवसाय अभ्यासक्रमाचा समावेश आहे. १० अभ्यासक्रमांसाठी १०वी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण अशी अर्हता आहे. तर ७२ अभ्यासक्रमांना केवळ १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो. हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे, राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट दिले जाते). या अभ्यासक्रमांमध्ये ७० टक्के भर प्रात्यक्षिकांवर व ३० टक्के भर सैद्धांतिक (थिअरी) वर दिला जातो.

## सुविधा

(१) प्रात्यक्षिकांसाठी हत्यांर संच, (२) अॅप्रॉन, (३) कच्चा माल, (४) स्टेशनरी, (५) ग्रंथालय, (६) पुस्तकपेढी, (७) गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सुविधा, (८) जाण्यायेण्यासाठी रेल्वे व बसच्या पाससाठी शिफारस, (९) आदिवासी मुला-मुलींकरिता स्वतंत्र वसतिगृह, (१०) रोजगारासाठी नोंदणी, (११) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नियमानुसार सुविधा. (१२) खुल्या संवर्गातील मुला-मुलींना माफक शैक्षणिक शुल्क. (१३) आर्थिकदृष्ट्या मागास संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्कात सूट, अनुसूचित जाती, जमाती आणि भटक्या जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क माफी, (१४) वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रुपये निर्वाह भत्ता, जे विद्यार्थी वसतिगृहात राहत नाहीत त्यांना दरमहा ५०० निर्वाह भत्ता, (१५) अनुसूचित जाती संवर्ग आणि अल्पसंख्याक संवर्गातील विद्यार्थ्यांना नियमानुसार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, (१६) २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, वार्षिक ८ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या अल्पसंख्याक समाजातील व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमध्ये प्रवेश मिळेल, त्यांना दरमहा ५०० रुपये विद्यावेतन दिले जाते. (१७) १५० तासांचे, ऑन द जॉब ट्रेनिंग दिले जाते.



## केवळ महिलांसाठी आयटीआय

महिलांना स्वयंपूर्ण होता व्हावे आणि त्यांनाही विविध प्रकारची कौशल्ये प्राप्त करणे सुलभ व्हावे यासाठी शासनाने १५ ठिकाणी फक्त मुलींसाठीच औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली. यामध्ये ३७७६ मुलींना प्रवेश दिला जातो. ज्या शासकीय आणि खासगी आयटीआयमध्ये ६ ते ८ व्यवसाय अभ्यासक्रम आहेत, त्या ठिकाणी दोन अभ्यासक्रम मुलींसाठी राखीव ठेवावे लागतात. ४ अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांना १ अभ्यासक्रम राखीव ठेवावा लागतो. केंद्रीय प्रवेश पद्धतीअंतर्गत उपलब्ध जागांपैकी ३० टक्के जागा मुलींसाठी आरक्षित ठेवण्यात येतात.

दहावी उत्तीर्ण कोणत्याही विद्यार्थिनींना हे अभ्यासक्रम करता येतात. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मंडळाकडून उमेदवार तांत्रिक वा व्यावसायिक विषय घेऊन दहावी परीक्षा उत्तीर्ण झाला असल्यास त्यांच्यासाठी एकूण उपलब्ध जागांपैकी १० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात येतात.

## शिकाऊ उमेदवारी योजना

महाराष्ट्रातील आयटीआयचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिकाऊ उमेदवारी योजना. आयटीआयमधील शिक्षण संपल्यावर प्रत्यक्ष कारखाना किंवा उद्योगातील यंत्रसामग्री हाताळण्याची अथवा त्यावर काम करण्याची संधी या योजनेंतर्गत संबंधित उमेदवारांना दिली जाते. राज्यातील २५ हजारांच्या आसपास उद्योग/ कारखाने/ औद्योगिक आस्थापनांमध्ये ७० हजारच्या आसपास अशी संधी उपलब्ध करून दिली जाते.

खासगी, निमशासकीय आणि खासगी औद्योगिक आस्थापनांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीसाठी ही योजना उपयुक्त ठरली आहे. देशपातळीवर वेगवेगळ्या ३९ गटांतील २५८ व्यवसायांमध्ये या योजनेंतर्गत उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी दिली जाते. महाराष्ट्रात अशा व्यवसायाची संख्या १८१ आहे. आवश्यकतेनुसार या व्यवसायामध्ये वाढ होऊ शकते. संबंधित आस्थापनांमध्ये, अशा उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन त्यांची निवड केली जाते. प्रादेशिक स्तरावर यासाठी आयटीआयमध्ये भरतीमेळावे आयोजित केले जातात. त्याची जाहिरात वेगवेगळ्याया वर्तमानपत्रांत दिली जाते.

अप्रेंटिसशिपच्या काळात विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार पुढीलप्रमाणे विद्यावेतन दिले जाते- (१) इयत्ता ५ वी ते ९ वी उत्तीर्ण- ५ हजार रुपये, (२) इयत्ता १० वी उत्तीर्ण- ६ हजार रुपये, (३) इयत्ता १२ वी उत्तीर्ण- ७ हजार रुपये, (४) राज्य किंवा राष्ट्रीय प्रमाणपत्रधारक - ७ हजार रुपये, (५) तंत्रज्ञ (व्यावसायिक) - ७ हजार रुपये, (६) तंत्रज्ञ (पदविकाधारक) - ८ हजार रुपये, (७) पदवीधारक - ९ हजार रुपये. या विद्यावेतनात दुसऱ्या वर्षी १० टक्के आणि तिसऱ्या वर्षी १५ टक्के वाढ केली जाते.

## उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना

२०२२ पासून शासकीय आयटीआयमध्ये उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना राबवण्यात येते. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांनी शिकलेल्या कौशल्य (स्किल सेट) संचानुसार समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वस्तू किंवा उत्पादनांची निर्मिती केली जाते. यामुळे प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षक या दोघांचीही तंत्रकुशलता वाढते. या योजनेंतर्गत तयार झालेल्या वस्तूंमध्ये आवश्यक सुधारणा करून त्या बाजारात विक्रीसाठी आणल्या जातात. यामुळे प्रशिक्षणार्थींना मोबदला मिळतो व संस्थेलाही आर्थिक लाभ मिळतो.

## अभियांत्रिकीची स्मार्ट दिशा

१० वी नंतरचा दोन वर्षे कालावधीचा आयटीआय अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांसाठी काही जागा तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमांसाठी राखीव ठेवण्यात येतात. हे विद्यार्थी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयाच्या कोणत्याही शाखेत थेट द्वितीय वर्गात प्रवेश घेण्यास पात्र ठरतात.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने त्यांच्या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांना, आयटीआय विद्यार्थ्यांना काही अटी-शर्तींसह प्रवेश देण्याचे धोरण निश्चित केले आहे. १ वर्षाचा आयटीआय अभ्यासक्रम, १ वर्षाची औद्योगिक अप्रेंटिसशिप व १२ वी आणि दोन वर्षांचा आयटीआय अभ्यासक्रम व आणि १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

संपर्क- संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, ३, महापालिका मार्ग, टपालपेटी क्रमांक- १००३६, मुंबई, दूरध्वनी- ०२२ - २२६२०६०३, फॅक्स- २२६५९२३५, संकेतस्थळ- https:// admission. dvet. gov. in/, ईमेल - itiadmission@ dvet. gov. in(आयटीआयची प्रवेश प्रकिया १५ मे २०२५ पासून सुरू झाली आहे.)

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
प्रस्तुत
टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा!
7.50%* सामान्य नागरिक
7.75%* ज्येष्ठ नागरिक
(कालावधी : 12 महिने)

M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# प्रमाणपत्र आणि प्रामाणिकपणा

**१२ वीचा निकाल, सीईटीचा निकाल आणि त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश प्रकियेचा कालावधी यामध्ये, किमान दीड-दोन महिन्यांचा वेळ उपलब्ध होतो . हा कालावधी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे उपलब्ध करुन घेण्यासाठी पुरेसा असतो . तरीसुध्दा याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही . मग, प्रमाणपत्र सादर करण्यासाठी वेळ वाढवून द्या, अन्यथा आमच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होईल, अशी निवेदने, पालक आणि विद्यार्थी संघटनांकडून शासनाला दिली जातात .**

**पुढील काही** दिवसांत विविध ज्ञानशाखांमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी, केंद्रीभूत प्रवेश (सेंट्रल ॲडमिशन प्रोसेस) प्रकिया सुरू होईल. या प्रवेश प्रकियेसाठी सीइटीचे गुण महत्त्वाचे असले तरी, या प्रकियेमध्ये अनेक संवर्गाना वेगवेगळ्या पध्दतीने लाभ दिला जातो. वेगवेगळ्या संवर्गासाठी आणि वेगवेगळ्या बाबींचा लाभ घेण्यासाठी, विहितं नमुन्यातील प्रमाणपत्रे लागतात. अशी प्रमाणपत्रे योग्य वेळेवर गोळा करुन ठेवावी, असे आवाहन दरवर्षी शासनाला करावे लागते. शासनाच्या संबंधित विभागाकडून तशी जाहीर सूचना काढली जाते. १२ वीचा निकाल, सीईटीचा निकाल आणि त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश प्रकियेचा कालावधी यामध्ये, किमान दीड-दोन महिन्यांचा वेळ उपलब्ध होतो. हा कालावधी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे उपलब्ध करुन घेण्यासाठी पुरेसा असतो. तरीसुध्दा याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. मग, प्रमाणपत्र सादर करण्यासाठी वेळ वाढवून द्या, अन्यथा आमच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होईल, अशी निवेदने, पालक आणि विद्यार्थी संघटनांकडून शासनाला दिली जातात.

## वाचा म्हणजे कळेल

जाईंट एन्ट्रस एक्झामिनेशन (जेईई-मेन), नॅशनल इलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट (नीट), कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट (सीयुइटी) या आणि अशाच इतर महत्त्वाच्या राष्ट्रीय परीक्षांसाठी असलेल्या माहितीपत्रकात, केंद्रीय संस्थांमधील प्रवेशाच्या वेळी आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्रांचे नमुने दिले असतात. या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याने किंवा त्याच्या पालकाने हे माहितीपत्रक पहिल्या पृष्ठापासून शेवटच्या पृष्ठापर्यंत वाचणे अपेक्षित आहे. साधारणतः पुस्तिकेतील, शेवटची काही पृष्ठे या प्रमाणपत्रांच्या नमुन्याची असतात. जेईईसारख्या परीक्षेचे माहितीपत्रक, नॅशनल टेस्टिंग एजंसीच्या संकेतस्थळावर अपलोड झाल्यापासून ते प्रवेश प्रकियेचा कालावधी सुरू होईपर्यंत किमान चार ते पाच महिन्यांचा कालावधी मिळतो. या कालावधीत या नमुन्यासुसार प्रमाणपत्र मिळवण्याची खबरदारी पालकांनी घ्यायला हवी. तसे बरेचदा होत नाही. ही प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालयातून मिळतात. शासनाने ऑनलाइन प्रमाणपत्र मिळण्याचीही सुविधा केली आहे. विद्यार्थी, या काळात अभ्यासात गढलेला असतो. तेव्हा पालकांनी वेळ काढून, प्रमाणपत्र मिळवून ठेवायला हवे. म्हणजे ऐन वेळवर धावपळ होणार नाही. उगाच तणाव येणार नाही. वेळेवर धावपळ करणाऱ्या पालकांना, दलालमंडळी बरोबर हेरतात आणि जाळ्यात ओढतात. मग या दलालांनी ठरवलेली रक्कम देऊन, आपले काम करुन घेण्याची पाळी येते. 'आ बैल, मुझे मार' वाल्या या स्थितीस संपूर्णपणे आपण जबाबदार असतो, ही बाब लक्षात घ्यायला हवी.

केंद्रीय संस्थांमधील प्रवेशाच्यावेळी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे, माहिती पुस्तिकेतील नमुन्यानुसारच द्यावी लागतात. राज्य शासनाचे नमुने ग्राह्य धरले जात नाहीत. त्यामुळे, ही प्रमाणपत्रे शब्दशः तशीच मिळवणे गरजेचे आहे. केंद्रीय आणि राज्य शासनाच्या प्रमाणपत्राचा आशय, विषय सारखाच असल्याने, हे सुध्दा चालेल, असे सांगितले जात असल्यास किंवा आग्रह केला जात असल्यास, त्याकडे दुर्लक्ष करुन, विहीत नमुन्यातीलच प्रमाणपत्र घ्यावे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना हा नमुना दाखवावा. म्हणजे काम सुलभ होऊ शकते.

## प्रमाणपत्रांची यादी




राज्यशासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झालेल्या दिवशी, सीईटीच्या संकेतस्थळावर, शाखानिहाय माहिती पुस्तिका, अपलोड केल्या जातात. या माहिती पुस्तिकेत कोणते प्रमाणपत्र लागेल याची यादी दिलेली असते. नमुनेही दिलेले असतात. २०२४-२५ च्या कॅप प्रकियेची माहिती पुस्तिका सीईटीच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे. त्यावर नजर टाकल्यास कोणत्या प्रमाणपत्राची गरज आहे, हे लक्षात येईल, ते मिळवण्यासाठी कामाला लागता येईल. प्रवेशाच्या वेळेस लागणारी कागदपत्रे पुढील प्रमाणे आहेत-

(१) जात आणि जमात प्रमाणपत्र (कास्ट आणि ट्राइब सर्टिफिकेट)- हे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याने दिलेले असावे. शासनाने ठरवून दिलेल्या नमून्यातच ते असले पाहिजे.

(२) जात आणि जमात वैधता प्रमाणपत्र (कास्ट आणि ट्राइब व्हॅलिडिटी सर्टिफिकेट) - महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्रच ग्राह्य धरले जाते.

(१० वी आणि १२ वीनंतरच्या पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठी, जात वैधता प्रमाणपत्राची गरज भासत नाही. तथापि, प्रथम वर्ष पदविका किंवा द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या राखीव जागेवर प्रवेश मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवाराला, संबंधित जात/जमात पडताळणी समितीकडे, प्रमाणपत्र पडताळणीसाठी, एक महिन्याच्या आत अर्ज सादर करावा लागतो. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागेवर प्रवेशासाठी, अशा उमेदवारांना, वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते.)

(३) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र- इतर मागास संवर्गातील विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्याशिवाय त्याला या संवर्गातून प्रवेश मिळू शकत नाही. हे प्रमाणपत्र ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले हवे. परप्रांतातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा अधिवास महाराष्ट्र असला तरी, त्यांना महाराष्ट्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमात, नॉन क्रिमीलेअर, आरक्षणाचा लाभ दिला जात नाही. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र लागत नाही.

(४) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र (नॅशनॅलिटी सर्टिफिकेट) आणि अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाइल सर्टिफिकेट)

(५) उत्पन्नाचे प्रमाणपत्र- ट्यूशन फी वेव्हर स्कीम (शैक्षणिक शुल्क माफ योजना)- सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर केल्यावरच, या योजनेचा लाभ दिला जातो.

(६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (इकॉनॉमिकली वीकर सेक्शन) उत्पन्नाचे प्रमाणपत्र - या संवर्गामध्ये एकूण १० टक्के आरक्षण दिले जाते. हे आरक्षण प्रत्येक अभ्यासक्रमाच्या मंजूर जागांव्यतिरिक्त असते. हे प्रमाणपत्र २०२५-२६ या वर्षासाठी वैध असणारे हवे. या कालावधीत संबंधित उमेदवाराच्या कुटुंबीयांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. हे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी/तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचे असावे.

(७) अपंग प्रमाणपत्र- अपंगांचे विविध २१ प्रकार यासाठी ग्राह्य धरले जातात. ही संपूर्ण यादी प्रवेश प्रकियेच्या नियम पुस्तिकेत दिली आहे. यापैकी कोणत्याही अपंग प्रकारात किमान ४० टक्के शारीरिक अक्षमता असणे गरेजेचे आहे. विहित नमुन्यात आणि अधिकृत डॉक्टरांकडून, तसे प्रमाणपत्र घेणे आवश्यक. या संवर्गाला एकूण ५ टक्के आरक्षण प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये दिले जाते.

(८) सैन्य दल संवर्ग आरक्षण - या संवर्गात एकूण ५ टक्के आरक्षण प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये दिले जाते. या आरक्षणासाठी प्रमाणपत्राचा नमूना, प्रवेश नियमावली पुस्तिकेत देण्यात आला आहे. याच नमुन्यात सक्षम अधिकाऱ्यांकडून हे प्रमाण मिळालेले असावे.

(९) आधार कार्ड व संलग्नित बँक खाते- शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती व इतर शासकीय लाभ, थेट बँक (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) खात्यात जमा होण्यासाठी या कागदपत्रांची गरज भासते.

(१०) वर्किंग प्रोफेशनलसाठी अनुभव आणि ना हरकत प्रमाणपत्र - वर्किंग प्रोफेशनल या गटातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना, ते काम करत असलेल्या राज्य अथवा केंद्रीय आस्थापना किंवा नोंदणीकृत उद्योग, खासगी /सार्वजनिक मर्यादित कंपनी, सूक्ष्म- लघु-मध्यम (मायक्रो, स्माल, मीडियम एंटरप्रायजेस-एमएसएमइ) उद्योजक, यांच्याकडून नियमितपणे एक वर्ष काम करत असल्याचे अनुभव प्रमाणपत्र आणि ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

(११) अनाथ उमेदवारांसाठी आरक्षण - या संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारास, महिला व बालकल्याण विभागाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. हे प्रमाणपत्र उपायुक्त महिला व बाल विकास विभाग यांच्या स्वाक्षरीचे हवे. त्याचा नमुना प्रवेश नियम पुस्तिकेत देण्यात आला आहे.

(१२) अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, जैन, शिख, ज्यू, पारसी, ख्रिश्चन) संवर्गातील उमेदवारांना, स्वयंघोषणा प्रमाणपत्र सादर करावे लागते. प्रवेश नियम पुस्तिकेत हा नमुना दिलेला असतो. या स्वयं-घोषणापत्रकात त्याच्या समुदायाचा उल्लेख आवश्यक. प्रवेश प्रक्रियेतून मिळालेल्या संस्थेत, प्रवेश घेताना स्वयं-घोषणापत्रात नमूद समुदाय संवर्गात, येत असल्याचे सिद्ध करणारी आवश्यक कागदपत्रे संबंधितांना सादर करावी लागतात.

प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार करू नये. गैरप्रकारातून मिळवलेल्या प्रमाणपत्राची माहिती उघडकीस आल्यास कोणत्याही टप्प्यावर प्रवेश नाकरला जातो. संबंधित विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो. भविष्यातही त्याचे मोठे दुष्परिणाम संभवू शकतात. महाराष्ट्रात एका महिला आयएएस अधिकाऱ्याचे बनावट जातसंवर्ग प्रमाणपत्र, काही महिन्यांपूर्वी उघडकीस आल्यानंतर, जे काही घडले ते कायम लक्षात ठेवायला हवे.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत




घर तुमच्या स्वप्नातले पूर्तता आमच्या साथीने
मर्यादा ₹3 करोड*
टीजेएसबी गृह कर्ज
8.25%
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ Library ★ KALLAM- 413507

# प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

**भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागामार्फत, शिल्पकारागीर प्रशिक्षक प्रशिक्षण योजना (क्राफ्ट इंस्ट्रक्टर ट्रेनिंग स्कीम) राबवली जाते. शासकीय संस्थांमधील प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक कौशल्य आणि ज्ञान, प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी, ही योजना सुरू करण्यात आली.**

**रोजगार आणि** स्वंयरोजगारासाठी विविध प्रकारची तांत्रिक कौशल्ये उपयुक्त ठरतात. असे कौशल्य प्राप्त केलेल्या तरुण - तरुणींना स्वतःच्या पायावर आत्मविश्वासाने उभे राहता यते. पुढे, या कौशल्यांत वाढ केल्यास आणि नवी कौशल्ये आत्मसात केल्यास, अशा तरुण-तरुणींसाठी आणखी प्रगतीच्या संधी टप्प्याटप्याने उपलब्ध होतात. तांत्रकि कौशल्याचे विविध अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे, तांत्रकि प्रशिक्षण केंद्रे, कौशल्य विकास केंद्रे, तंत्रनिकेतने इथे सुरु करण्यात आली आहेत. या संस्थांमध्ये सध्याच्या काळात, आवश्यक विविध व्यवसाय (ट्रेड) प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या संस्थांमधील प्रशिक्षणासाठी चांगल्या आणि दर्जेदार प्रशिक्षकांची गरज भासते.

ही गरज भागवण्यासाठी, भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागामार्फत, शिल्पकारागीर प्रशिक्षक प्रशिक्षण योजना (क्राफ्ट इंस्ट्रक्टर ट्रेनिंग स्कीम) राबवली जाते. या संस्थांमधील प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक कौशल्य आणि ज्ञान, प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी, ही योजना सुरू करण्यात आली.

या योजनेंतर्गत प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षककाडे, उद्योगांसाठी लागणाऱ्या अर्धकुशल आणि कुशल मनुष्यबळाला, प्रगत तंत्रकौशल्याचे ज्ञान प्रदान करण्याचे कार्य, सोपवले जाते. हा प्रशिक्षक औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये, कौशल्य प्रशिक्षण प्रभावीपणे देऊ शकतो. लघु आणि दीर्घ मुदतीच्या कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये सर्टिफाइड (प्रमाणित) प्रशिक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतो. कामगारांमध्ये, कौशल्य विकास करण्यासाठी, सुविधा पुरवण्याची भूमिका बजावतो. लेखी प्रशिक्षण साहित्य, ई लर्निंग साहित्याची निर्मिती करु शकतो. या अभ्यासक्रमाद्वारे, व्यायसायिक अभ्यासक्रम, प्रशिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील प्रवेशद्वार उघडले जाते.

प्रशिक्षक अभ्यासक्रमाच्या निवडीसाठी, अखिल भारतीय स्तरावर, ऑल इंडिया कॉमन एन्ट्रन्स (एआयसीइटी) टेस्ट घेतली जाते. त्याद्वारे, प्रशिक्षक होण्यासाठी उमेदवाराचे कौशल्य, कल आणि ज्ञान यांची तपासणी केली जाते. एआयसीइटी ऑनलाइन घेतली जाते. या परीक्षेतील कामगिरी आणि संस्थेचा पसंतीक्रम लक्षात घेऊन, केंद्रीय प्रवेश प्रकियेद्वारे उमदेवारांची निवड केली जाते.

या परीक्षेद्वारे, महाराष्ट्रातील नॅशनल स्कील ट्रेनिंग सेंटर मुंबई आणि नागपूर, कोल्हापूर, अंबरनाथ-ठाणे, औंध-पुणे, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती येथील इन्स्टिटय़ूट फॉर ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स येथे प्रवेश मिळू शकतो.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २८ मे २०२५ आहे. दि. ५ ते १४ जून पर्यंत मॉक (अभिरुप/सराव) चाळणी घेतली जाईल. परीक्षा १५ जून २०२५ रोजी घेतली जाईल. परीक्षेचा कालावधी दोन तास. या पेपरमध्ये उमेदवारांनी, ज्या ट्रेडच्या प्रशिक्षक अभ्यासकमासाठी अर्ज केला असेल, त्यावर ७५ टक्के प्रश्न विचारले जातात. २५ टक्के प्रश्न तार्किकता (लॉजिकल), संख्यात्मक (न्युमेरिक), कार्यकारणभाव (रिझनिंग) या घटकाचे ज्ञान तपासणिसाठी विचारले जातात. वस्तुनिष्ठ पध्दतीचे प्रश्न असतात. महाराष्ट्रात. ही परीक्षा नागपूर, मुंबई/नवी मुंबई, पुणे या केंद्रावर घेतली जाईल.

## ट्रेड आणि अर्हता

**प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी काही ट्रेड आणि अर्हता पुढील प्रमाणे-**
(१) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन- अर्हता- आर्किटेक्चर पदवी किंवा ३ वर्षे कालावधीची आर्किटेक्चर विषयातील पदविका किंवा १०वी नंतर आयटीआय मधील दोन वर्षे कालावधीचा आर्किटेक्चर ड्राफ्ट्समन अभ्यासक्रम, (२) केटरिंग अॅण्ड हॉस्पिटॅलिटी- हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटेरिंग टेक्नॉलॉजी किंवा संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटेरिंग टेक्नॉलॉजी विषयातील बॅचलर ऑफ वोकेशन पदवी किंवा हॉटेल मॅनेजमेंट आणि केटरिंग टेक्नॉलॉजी विषयातील पदविका किंवा १०वी नंतर आयटीआय मधील एक वर्ष कालावधीचा केटरिंग अॅण्ड हॉस्पिटॅलिटी, फूड प्रॉडक्शन, फूड अॅण्ड बिव्हेरेजेस, सर्व्हिस असिस्टंट, हाऊसकीपर, फ्रंट ऑफिस, बेकर आणि कन्फेक्शनर ट्रेड, (३) कॉम्प्युटर एडेड डिझायनिंग अॅण्ड एम्ब्रॉयडरी- टेक्सटाइल डिझायनिंग/ फॅशन डिझायनिंग, कॉस्च्युम डिझाइन अॅण्ड ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलॉजी पदवी किंवा १०वी नंतरची ३ वर्षे कालावधीची टेक्सटाइल डिझायनिंग/ फॅशन डिझायनिंग, कॉस्च्युम डिझाइन अॅण्ड ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलॉजी विषयातील पदविका किंवा १०वीनंतर आयटीआय मधील १ वर्ष कालावधिचा कॉम्प्युटर एडेड डिझायनिंग अॅण्ड एम्ब्रॉयडरी डिझायनिंग ट्रेड, (४) कॉम्प्युटर हार्डवेअर अॅण्ड नेटवर्क मेंटेनंन्स - कॉम्प्युटर सायन्स, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग, या विषयातील पदवी किंवा १० वी नंतरची ३ वर्षे कालावधीची कॉम्प्युटर सायन्स, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग, या विषयातील पदविका किंवा १० वी नंतरचा १ वर्षे कालावधीचा कॉम्प्युटर हार्डवेअर अॅण्ड नेटवर्क मेंटेनंन्स ट्रेड,
(५) कॉम्प्युटर सॉफ्टवेअर अॅप्लिकेशन- कॉम्प्युटर सायन्स/ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयातील पदवी किंवा १०वी नंतरची ३ वर्षे कालावधीची कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर अॅप्लिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयातील पदविका किंवा १०वी नंतर आयटीआय मधील १ वर्ष कालावधीचा कॉम्प्युटर सॉफ्टवेअर अॅप्लिकेशन विषयातील ट्रेड
(६) कॉस्मेटॉलॉजी- कॉस्मेटॉलॉजी, हेअर अॅण्ड स्किन, ब्युटिशिअन अभ्यासक्रम पदवी किंवा १० वी नंतरची ३ वर्षे कालावधीची कॉस्मेटॉलॉजी, हेअर अॅण्ड स्किन, ब्युटिशिअन अभ्यासक्रम पदविका किंवा १० वीनंतर आयटीआय मधील १ वर्ष कालावधीचा कॉस्मेटॉलॉजी, हेअर अॅण्ड स्किन, ब्युटिशिअन ट्रेड, इत्यादी.

अशा ४१ च्या ट्रेडसचा प्रशिक्षणासाठी समावेश करण्यात आला आहे. यामध्ये, अॅरोनॉटिकल/ इक्विपमेंट फिटर, डेस्कटॉप पब्लिशिंग ऑपरेटर, डॉफ्ट्समन सिव्हिल, डॉफ्ट्समन मेकॅनिकल, ड्रेस मेकिंग, इलेक्ट्रीशिअन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, फॅशन डिझाइन अॅण्ड टेक्नॉलॉजी, फ्रुट्स अॅण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग, फिटर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, फाउंड्रीमॅन, इंस्ट्रुमेंट मेकॅनिक, इंटेरिअर डिझाइन अॅण्ड डेकोरेशन, मशिनिस्ट ग्रायंडर, मशिनिस्ट अॅण्ड ऑपरेटर- अॅडव्हान्स्ड मशिन टूल, मेकॅनिक अॅग्रकिल्चरल मशिनरी, मेकॅनिक- डिझेल, मेकॅनिक मशिन- टूल मेंटनन्स, मेकॅनिक रेफ्रजिरेशन अॅण्ड एअर कंडिशनर, मेकॅनिक मोटार व्हेईकल, मेकॅनिक ट्रॅक्टर, ऑफिस मॅनेजमेंट, पेंटिंग टेक्नॉलॉजी, रिडिंग ऑफ ड्राईंग अॅण्ड अर्थमॅटिक, प्लम्बर, स्युईंग टेक्नॉलॉजी, शीट मेटल वर्क, सर्फेस ऑर्नामेंटेशन टेक्निक, सर्व्हेयर, टूल अॅण्ड डायमेकर, टर्नर, वेल्डर, वूड वर्क टेक्निशिअन, या ट्रेड्सचा समावेश आहे. या ट्रेड्सच्या, प्रशिक्षक प्रशिक्षणासाठी आवश्यक अर्हतेची माहिती, संकेतस्थळावरील माहितीपुस्तिकेत विस्तृतपणे देण्यात आली आहे.
**संपर्क- nimionlineadmission. in**

मुंबई येथील नॅशनल स्कील क्राफ्ट इन्स्टिटय़ूटमध्ये पुढील ट्रेड्सच्या प्रशिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते- (१) कॉम्प्युटर सॉफ्टवेअर अॅप्लिकेशन, (२) इंस्ट्रुमेंट मेकॅनिक, (३) टर्नर ,(४) वेल्डर - गॅस आणि इलेक्ट्रिक ,(५) मशिनिस्ट, (६) फिटर ,(७) मेकॅनिक मोटर व्हेईकल, (८) इलेक्ट्रिशिअन, (९) ड्राफ्ट्समन मेकॅनिकल - (१०) इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक. या सर्व प्रशिक्षणाची, नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क (एनएसक्युएफ)(राष्ट्रीय कौशल्य अर्हता/पात्रता रचना) श्रेणी सहा आहे. (याचा अर्थ, या श्रेणिपर्यंतचे ज्ञान आणि कौशल्य संबधिताने प्राप्त केले, असा होतो.)
**संपर्क- नॅशनल स्किल ट्रेनिंग इन्स्टिटय़ूट, व्ही. एन. पुरव मार्ग, प्रियदर्शनी (आरसीएफ) च्या विरुध्द दिशेला, चुनाभट्टी, सायन, मुंबई- ४०००२२, संकेतस्थळ- https:// nstimumbai. dgt. gov. in/ cits**

## वूड सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी

भारत सरकारच्या वने आणि पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत, कार्यरत इन्स्टिटय़ूट ऑफ वूड सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी या संस्थेने, लाकूड क्षेत्रातील उद्योगांना लागणाऱ्या कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्मितीसाठी पुढील दोन अभ्यासक्रम सुरु केले आहेत- (१) डिप्लोमा इन अॅडव्हान्स्ड वूड वर्किंग- या अभ्यासक्रमात, लाकूड आणि लाकडापासून तयार करावयाच्या विविध वस्तूंच्या निर्मितीसाठी आवश्यक कौशल्य प्रदान केले जाते. कालावधी एक वर्ष. यापैकी सहा महिने, उद्योगामधील प्रशिक्षणाचे आहेत. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी, अत्याधुनिक वूडवर्किंग यंत्रांवर सुलभतेने काम करु शकतात.

(२) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन वूड अॅण्ड पॅनेल टेक्नॉलॉजी. अशा प्रकारचा हा देशातील एकमेव अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमातील विषयघटकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये, लाकडावरील विविध तांत्रिक प्रक्रियेचे कौशल्य विकसित केले जाते. गुणवत्ता व्यवस्थापन, सादरीकरण कौशल्य, संवादकौशल्य यावरही लक्ष केंद्रित केले जाते. प्लायवूड निर्मिती, बांबूपासून निर्मित विविध उत्पादने/ वस्तू, अॅडेहेसिव्ह मॅन्युफॅक्च्युरिंग अशा उद्योगांमध्ये प्लेसमेंट मिळते. औद्योगिक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. अर्हता- बीएस्सी (फिजिक्स/ केमिस्ट्री/ मॅथेमॅटिक्स/ फॉरेस्ट्री) बीई/ बीटेक. प्रवेशासाठी पदवी परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात.
**संपर्क- इन्स्टिटय़ूट ऑफ वूड सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी, मल्लेश्वरम, बेंगळुरू- ५६०००३, ईमेल-, संकेतस्थळ- https:// iwst. icfre. gov. in,ईमेल- dir_ iwst@icfre. org,दूरध्वनी-०८०-२३३४१७३१**

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत




टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी:१२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
Toll

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# देशसेवेची संधी

**स्वातंत्र्योत्तर काळात** लष्कराने देशाच्या सीमांचे रक्षण करण्यात, अभिमानास्पद कामगिरी बजावली. त्याचप्रमाणे देशातील विविध नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, तिनही दलाचे सैनिक/अधिकारी, मदत कार्यात, महत्वाची भूमिका बजावत असतात. भारतीय लष्कर, हे जगातील सर्वोत्कृष्ट लष्करांपैकी एक समजले जाते. अशा श्रेष्ठ दलाचा भाग बनण्याची आणि देशाची सर्वोच्च स्वरुपाची सेवा करण्याची संधी, पुढील विविध मार्गांनी मिळते. ही संधी केवळ गुणवत्तेच्या आधारावर मिळते आणि भविष्यात अजोड पराक्रम-गुणवत्ता आणि दर्जा यांच्या बळावर वरिष्ठ पदांवर कार्य करण्याचीही संधी मिळते.

## कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिस

बारावीनंतर एनडीए किंवा १० २ टेक्निकल एन्ट्री किंवा १० २ कॅडेट एन्ट्री या योजनेमधून लष्करात प्रवेश मिळवण्यात अपयशी ठरलेल्या तरुण-तरुणींसाठी, पदवी अभ्यासक्रमानंतर कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस, ही परीक्षा लष्करातील नियुक्तीची संधी उपलब्ध करुन देते. ही परीक्षा दरवर्षी दोनदा, देशातील विविध शहरांमध्ये घेतली जाते.

या परीक्षेद्वारे पुढील ठिकाणी प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जातो- (१) इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडेमी देहरादून - यासाठी निवडल्या जाणाऱ्या एकूण उमेदवारांपैकी १३ जागा आर्मी विंगमधील एनसीसी - सी प्रमाणपत्रधारकांसाठी राखीव असतात. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी, (२) इंडियन नॅव्हल अ‍ॅकॅडेमी, एजिमाला - यासाठी निवडल्या जाणाऱ्या एकूण उमेदवारांपैकी ६ जागा नॅव्हल विंगमधील एनसीसी- सी प्रमाणपत्रधारकांसाठी राखीव असतात. अर्हता- कोणत्याही विषयातील अभियांत्रिकी पदवी, (३) एअर फोर्स अ‍ॅकॅडेमी, हैदराबाद - यासाठी निवडल्या जाणाऱ्या एकूण उमेदवारांपैकी ३ जागा एअर विंगमधील एनसीसी सी प्रमाणपत्रधारकांसाठी राखीव असतात. अर्हता - कोणत्याही विषयातील पदवीधर या अभ्यासक्रमासाठी अर्ज करु शकतात, तथापि त्यांनी १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा किंवा अभियांत्रिकी पदवी, (४) ऑफिसर्स ट्रेनिंग अ‍ॅकॅडेमी चेन्नई- या ठिकाणी पुरुष आणि महिलांना, लघु सेवा कमिशन योजनेंतर्गत अतांत्रिक स्वरुपाचे प्रशिक्षिण दिले जाते. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी

उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे अत्यावश्यक. या पदांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या शारीरिक क्षमतेची मानके (स्टँडड्‌र्स) नियुक्तीच्या वेळेस महत्वाची ठरतात.

### अशी असते परीक्षा

(१) इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडेमी, इंडियन नॅव्हॅल अ‍ॅकॅडेमी, एअर फोर्स अ‍ॅकॅडेमीसाठी परीक्षा – इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि प्राथमिक (एलिमेंट्री) गणित या विषयांचे प्रत्येकी १०० गुणांचे तीन पेपर. कालावधी प्रत्येकी दोन तास. (२) ऑफिसर्स ट्रेनिंग अ‍ॅकॅडेमी परीक्षा– या परीक्षेत इंग्रजी आणि सामान्य ज्ञान या दोन विषयांचे प्रत्येकी दोन तासांचे आणि प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर्स असतात. प्रश्न वस्तुनिष्ठ पध्दतीचे (ऑब्जेक्टिव्ह) असतात. प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिले जातात. उत्तर चुकल्यास ०.३३ टक्के गुण कापला जातो. एखाद्या प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक उत्तरावर खुणा केल्यास, व त्यातील एक उत्तर बरोबर असल्यासही, त्या प्रश्नाचे उत्तर, चूक समजून ०.३३ टक्के गुण कापला जातो. कोणतेही उत्तर न दिल्यास गुण कपात केली जात नाही.

सामान्य ज्ञान आणि गणित विषयाचा पेपर हिंदी आणि इंग्रजी, या दोन भाषांमध्ये असतो. दोन्ही पेपर्सचा दर्जा पदवी परीक्षेच्या समकक्ष असतो. या परीक्षेचा पेपर विशिष्ट पध्दतीनेच सोडवावा लागतो. त्यासंदर्भातील विस्तृत सूचना माहितीपुस्तिकेत देण्यात आल्या आहेत. या पध्दतीचा काटेकोरपणे अवलंब करणे अपेक्षित आहे. या पेपरची तपासणी यंत्राव्दारे केली जात असल्याने, पेपर सोडवण्याच्या पध्दतीचा अवलंब न केल्यास, गुणांमध्ये कपात होण्याची शक्यता असते, यासाठी संबंधित उमेदवार स्वतः जवाबदार राहील, अशी स्पष्टता, संघ लोकसेवा आयोगाने केली आहे.



गणित पेपरचा दर्जा, १० वीच्या पातळीचा तर, इतर विषयांच्या पेपरचा दर्जा, पदवी परीक्षेच्या पातळीचा असतो. एलिमेंट्री गणिताचा विस्तृत अभ्यासक्रम, माहिती पुस्तिकेत देण्यात आला आहे. त्यातील, सर्व घटकांच्या संकल्पना स्पष्ट करुन घेतल्यास, प्रश्न सोडवणे सुलभ जाऊ शकते. हे विषयघटक विस्मरणात गेले असतील वा कठीण जात असल्यास, या विषयाच्या अध्यापकांडून पुन्हा एकदा समजून घेऊन, सराव करायला हवा. इंग्रजी भाषेचे सर्वसाधारण आकलन आणि शब्दसंग्रह, तपासण्यासाठी प्रश्न विचारले जातात. सामान्य अध्ययनाच्या पेपरमध्ये चालू घडामोडी, भारताचा इतिहास, भूगोल, सर्वसामान्य विज्ञान यावर प्रश्न विचारले जातात. पदवीस्तरीय विद्यार्थ्याला विज्ञानाच्या मूलभूत बाबींचे ज्ञान असणे अपेक्षित आहे. परीक्षा केंद्रे- मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर

इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडमी, इंडियन नॅव्हल अ‍ॅकॅडमी एअर फोर्स अ‍ॅकॅडेमीसाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतीसाठी प्रत्येकी ३०० गुण असतात. ऑफिसर्स ट्रेनिंग अ‍ॅकॅडेमीच्या प्रवेशासाठीच्या मुलाखतीसाठी २०० गुण असतात. मुलाखतीमध्ये बुध्दिमता आणि व्यक्तिमत्व चाचणी (इंटेलिजंन्स अ‍ॅण्ड पर्सनॅलिटी टेस्ट) यांचा समावेश असतो.

### बुध्दिमत्ता आणि व्यक्तिमत्व चाचणी

सेवा निवड मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या, या निवड प्रक्रियेचे दोन टप्पे आहेत- (१) पहिल्या टप्प्यात ऑफिसर्स इंटेलिजन्स रेटिंग (ओआयआर) (अधिकारी बुद्ध्यांक मूल्यांकन/क्षमता निर्देशन) चा समावेश असून, यात पिक्चर पर्सेप्शन टेस्ट (चित्र, जाणीव/आकलन/धारणा चाळणी) आणि डिसक्रिप्शन टेस्ट (वर्णन चाळणी) अशा दोन चाळणींचा समावेश केला जातो.

(२) या दोन्ही टेस्टच्या गुणांवर आधारित दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारांची निवड केली जाते. या टप्प्यात मुलाखत, ग्रुप टेस्टिंग ऑफिसर टास्क, मानसशास्त्रीय चाचणी (सायकॉलॉजी टेस्ट) आणि चर्चा (कॉन्फरन्स) यांचा समावेश आहे. या चाळण्यांचा कालावधी चार दिवसांचा असतो.

उमदेवारांची व्यक्तिमत्व चाचणी, समूह परीक्षण अधिकारी (ग्रुप टेस्टिंग ऑफिसर) मुलाखत घेणारे अधिकारी, मानसोपचार तज्ज्ञ, या तिघांमार्फत घेतली जाते. या तिनहीं चाळणीला विशेष वेटेज ठेवण्यात येत नाही. तीनही चाळणीमधील उमेदवारांची एकत्रित कामगिरी लक्षात घेऊन गुण दिले जातात. उमेदवाराची अधिकारी म्हणून गुणवत्ता आणि प्रशिक्षण क्षमता (ट्रेनॅबिलिटी) जाणून घेण्यासाठी, या सर्व चाचण्यांचा उपयोग केला जातो. त्यानंतरच उमेदवाराची शिफारस केली जाते.

या चाचण्यांची विस्तृत माहिती www. joinindianarmy. nic. in. या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे.

### वैद्यकीय व शारीरिक क्षमता चाचणी

या चाचण्यांसोबतच वैद्यकीय व शारीरिक क्षमता चाचणीही महत्वाची असते. लष्करी सेवेत येऊ इच्छिणारे उमेदवार, किमान पातळीवर वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असणे अपेक्षित आहे. तरच, अशांना कठीण लष्करी प्रशिक्षण घेणे सुलभ जाऊ शकते. आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेच्या वैद्यकीय अधिकारी/डाक्टरांमार्फत ही चाचणी घेतली जाते. उमेदवार वैद्यकीदृष्ट्या (मेडिकली फिट) तंदुरुस्त असल्याचे, प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी, या डॉक्टरांनाच देण्यात आली आहे.

उमेदवार, वैद्यकीय व मानसिकदृष्ट्या फिट असावा, त्याला कोणताही आजार, असक्षमता, लक्षणे नसावित. वैद्यकीयदृष्ट्या फिटसाठी कोणकोणत्या बाबी आवश्यक ठरतात, याचे विस्तृत विवेचन, माहिती पुस्तिकेत करण्यात आले आहे. यापरीक्षेसाठी अर्ज भरण्यापूर्वी किंवा अर्ज भरल्यानंतर, सर्व बाबी समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉक्टरांचे मार्गदर्शनसुध्दा घेता येईल. काही वैद्यकीय बाबींमध्ये सुधारणा करता येणे शक्य असल्यास, ते करणे शक्य होईल. छोट्याछोट्या बाबी राहून गेल्यास, त्याचा अंतिम निवडीच्या वेळी विपरित परिणाम होऊ शकतो. ते टाळण्यासाठी आधीच खबरदारी घेतलेली बरी. वय, वजन आणि उंचिचे कोष्टक देण्यात आले असून, त्यानुसार खबरदारी घ्यायला हवी.

मेडिकल बोर्डाने उमेदवाराला वैद्यकीयदृष्ट्या सक्षम घोषित केल्यावरच, त्याची निवड केली जाते. एखाद्या उमेदवारास अनफिट घोषित केल्यास हा उमेदवार, ४२ दिवसाच्या आत, अपिल मेडिकल बोर्डाकडे, अपिल करु शकतो. या बोर्डानेही अनफिट केल्यास, एका दिवसात, त्याला, रिव्ह्यू (पुनर्विलोकन) मेडिकल बोर्डाकडे अपिल करता येते.

**संपर्क- फॅसिलिटेशन कांऊटर, दूरध्वनी- ०११-२३३८११२५ /२३०९८५४३,संकेतस्थळ- www. upsconline. nic. in**

## (२) केंद्रीय राखीव पोलीस दल

सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स (केंद्रीय राखीव पोलीस दल सीआरपीएफ), सेंट्रल इंडस्ट्रिअल सिक्युरिटी फोर्स (केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल-सीएसआयएफ), इंडो-तिबेटन बॉर्डर फोर्स (इंडो-तिबेट सुरक्षा बल-आयटीबीपी), सशस्त्र सीमा बल (एसएसबी) आणि सीमा सुरक्षा दल (बॉर्डर सिक्युरिटी फोर्स)- मध्ये दरवर्षी, असिस्टंट कमांडंट या पदांची भरती, सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस (असिस्टंट कमांडंट) एक्झामिनेशन, या परीक्षेव्दारे केली जाते.

परीक्षा केंद्र नागपूर आणि मुंबई. परीक्षेसाठी ४रुरू:ल्ल'ल्ली. ल्लू-ल्ल या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा लागतो.

**संपर्क- rectt. bsf. gov. in**

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा ४१

तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466
टी... बँ...
Bharose k...

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★
Library

# प्लास्टिक उद्योगाचे तंत्रज्ञ

**भारत सरकारच्या** रासायनिक आणि पेट्रोरासायनिक मंत्रालयाने, सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी या संस्थेची स्थापना केली आहे. प्लास्टिक तंत्रज्ञान विषयातील शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी ही महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेमार्फत, (१) प्लास्टिक प्रक्रिया, (२) प्लास्टिक वस्तू किंवा उत्पादनांचे संगणकाच्या सहाय्याने डिझाइन, (३) प्लास्टिकच्या विविध वस्तू/उत्पादने निर्मितीसाठी लागणाऱ्या साच्यांची निर्मिती, (४) या साच्यांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची देखभाल, दुरुस्ती आदी विषय शिकवले जातात. या उद्योगासाठी तज्ज्ञ मनुष्यबळाची निर्मिती या अभ्यासक्रमांद्वारे होते.

स्टीलनंतर जगात सर्वाधिक वापरले जाणारे साहित्य, प्लास्टिक आहे. मानवी उपयोगाच्या विविध वस्तू प्लास्टिकपासून तयार केल्या जातात. त्यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळास चांगल्या करिअर संधी मिळू शकतात. प्लास्टिक उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रकौशल्याची गरज लक्षात घेऊन, भारत सरकारने, या संस्थेची स्थापना केली. प्लॅस्टिक उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन, संस्थेच्या अभ्यासक्रमांत सातत्याने बदल करण्यात येतात. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकांचा अधिकाधिक समावेश करण्यात आल्याने, संबंधित उद्योजक या संस्थेतील विद्यार्थ्यांना रोजगार देण्यासाठी पुढाकार घेतात.

**शिक्षण** - प्रशिक्षणासोबतच संस्थेमार्फत, नावीन्यपूर्ण वस्तू/ उत्पादनांची निमिंती आणि डिझाइनसाठी संशोधन व विकासास प्रोत्साहन दिले जाते. ही संस्था, इन्स्टिटयूट ऑफ प्लास्टिक टेक्नॉलॉजी, सेंटर फॉर स्किलिंग अ‍ॅण्ड टेक्निकल सपोर्ट आणि स्कूल फॅार अ‍ॅडव्हान्स्ड रिसर्च इन पॉलिमर्स, या तीन पातळीवर कार्यरत आहे.

**अभ्यासक्रम** - या संस्थेमार्फत अभियांत्रिकी शाखेतील पदवी, पदव्युत्तर पदवी, अभ्यासक्रम चालवले जातात. कौशल्यनिर्मितीसाठी उपयुक्त ठरणारे पदविका अभ्यासक्रमही या संस्थेने सुरू केले आहेत.

पदवी अभ्यासक्रम (१) बी.टेक इन प्लास्टिक इंजिनीअरिंग, अर्हता - १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयांमध्ये सरासरीने ४५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी- चार वर्षे. (२) बी.टेक इन मॅन्युफॅक्चरिंग इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी. अर्हता - १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयांमध्ये सरासरीने ४५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी - चार वर्षे.

हे अभ्यासक्रम संस्थेच्या भुवनेश्वर, चेन्नई, अहमदाबाद, लखनौ, रायपूर, जयपूर, मुरथल येथील कॅम्पसमध्ये चालवले जातात. हे अभ्यासक्रम वेगवेगळ्या विद्यापीठांशी संलग्नित करण्यात आले आहेत. त्यामुळे, प्रत्येक विद्यापीठाच्या प्रवेश प्रकियेनुसार प्रवेश दिला जातो. प्रत्येक कॅम्पस कोणत्या विद्यापीठाशी संलग्नित आहे, याची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**प्लेसमेंट**- विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाले आहे. या कंपन्यांमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज, वेलस्पन फ्लोरिंग, कॉस्मो फिल्म्स, लोहिया कॉर्पोरेशन, तोशिबा मशीन, बजाज सुपर पॅक्स, जिंदाल पॉली फिल्म्स, वामन इंजिनीअर्स, विकास इकोटेक लिमिटेड आदी कंपन्यांचा समावेश आहे.

### पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम-

**एम. टेक इन**- (१) प्लास्टिक इंजिनीअरिंग, (२) पॉलिमर नॅनोटेक्नॉलॉजी. दोन्ही एम.टेकसाठी अर्हता - बी.टेक इन प्लास्टिक इंजिनीअरिंग/ टेक्नॉलॉजी किंवा मेकॅनिकल इंजिनीअरिंग किंवा प्रॉडक्शन इंजिनीअरिंग किंवा केमिकल इंजिनीअरिंग किंवा मॅन्युफॅक्चरिंग इंजिनीअरिंग किंवा पॉलिमर इंजिनीअरिंग किंवा मेटॅलर्जिकल इंजिनीअरिंग किंवा मटेरिअल्स सायन्स इंजिनीअरिंग किंवा रबर अ‍ॅण्ड प्लास्टिक्स इंजिनीअरिंग किंवा किंवा एम.एस्सी. इन पॉलिमर सायन्स /पॉलिमर केमिस्ट्री/ बायोपॉलिमर सायन्स/केमिस्ट्री/अ‍ॅप्लाइड केमिस्ट्री.

भुवनेश्वर, चेन्नई, अहमदाबाद, लखनौ येथे हे अभ्यासक्रम करता येतात.

### पदविका अभ्यसक्रम

**(१) डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी** - अभ्यासक्रमाचा कालावधी तीन वर्षे. १० वी उत्तीर्ण विद्यार्थी हा अभ्यासक्रम करू शकतात. या अभ्यासक्रमात भौतिकशास्त्र, गणित, उपयोजित रसायनशास्त्र, उपयोजित भौतिकशास्त्र, मेकॅनिक्स, अभियांत्रिकी चित्रकला, डिझाइन ऑफ डाइज, मोल्ड्स आणि प्लास्टिक प्रकिया तंत्रज्ञान इत्यादी विषय शिकवले जातात.

**(२) डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी**- १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. संगणकाच्या सहाय्याने प्लास्टिकच्या विविधांगी वस्तू/उत्पादकांच्या डिझाइनचे साचे बनविण्याचे तंत्रकौशल्य या अभ्यासक्रमात शिकवले जाते. कालावधी- तीन वर्षे.

**(३) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग अ‍ॅण्ड टेस्टिंग कालावधी**- दोन वर्षे. कोणत्याही बी.एस्सी. विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम करता येतो. प्लास्टिक प्रक्रिया आणि प्लास्टिकच्या गुणवत्तेचे परीक्षण करण्याचे तंत्र, या अभ्यासक्रमात शिकवले जाते. हे अभ्यासक्रम बलसोरे (ओडिशा), भोपाळ, अमृतसर आणि अहमदाबाद या केंद्रांसोबत महाराष्ट्रातील औरंगाबाद येथे करता येतात.

**(४) पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन विथ कॉम्प्युटर एडेड डिझाइन (कॅड)/कॉम्प्युटर एडेड मॅन्युफॅक्चर(कॅम)**- या




अभ्यासक्रमाचा कालावधी दीड वर्षे. अर्हता- अभियांत्रिकी पदविका (मेकॅनिकल/ प्लॅस्टिक/ पॉलिमर/ टूल अ‍ॅण्ड डाय मेकिंग/ प्रॉडक्शन/ मेकॅट्रॉनिक्स/ ऑटोमोबाइल/ पेट्रोकेमिकल्स/ इंडसट्रियल/ इंस्ट्रुमेंटेशन). प्लास्टिक उत्पादनांचा विकास आणि निर्मिती प्रकियेत येणाऱ्या अडचणी आणि आव्हाने यांचा सामना करण्याचे कौशल्य, अभ्यासक्रमाव्दारे प्राप्त करुन दिले जाते. या अभ्यासक्रमात, प्लास्टिक्स प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी, प्लास्टिक प्रोडक्ट डिझाइन, मोल्ड डिझाइन, आदी विषयघटकांचा समावेश करण्यात आला आहे.

पदविका आणि पदव्युत्तर पदविका, अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, सिपेट प्रवेश परीक्षा(सिपेट अ‍ॅडमिशन टेस्ट- कॅट) ८ जून २०२५ रोजी घेतली जाईल. अर्ज करण्याची शेवटची तारीख २९ मे २०२५ आहे.

**संपर्क**- सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ प्लास्टिक टेक्नॉलॉजी, हेड ऑफिस, टीव्हीके, इंडसट्रिअल इस्टेट गिंडी, चेन्नई- ६०००३२, **ईमेल**- academics@ cipet. gov. in, संकेतस्थळ- www. cipet. gov. in, दूरध्वनी- ०४०- २२२५४५१४

### छत्रपती संभाजीनगर कॅम्पस

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) केंद्रामध्ये, काही लघुमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे अभ्यासक्रम, रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी उपयुक्त ठरणारे आहेत. या अभ्यासक्रमांना, नॅशनल स्किल डेव्हलमेंट कॉर्पोरेशनने, मान्यता प्रदान केली आहे. यातील काही अभ्यासक्रम उद्योगांच्या, गरजेनुसार तयार करण्यात आले आहेत. या प्रशिक्षणासोबत उद्योजकता विकास कार्यक्रम राबवला जातो.

**कौशल्यनिर्मितीचे अभ्यासक्रम**- (१) मशीन ऑपरेटर इंजेक्शन मोल्डिग, (२) मशीन ऑपरेटर-ब्लो मोल्डिग, (३) मशीन ऑपरेटर-प्लास्टिक एक्सट्रुजन, (४) मशीन ऑपरेटर असिस्टंट- प्लास्टिक प्रोसेसिंग, (५) मशीन ऑपरेटर- प्लास्टिक प्रोसेसिंग, (६) मशीन ऑपरेटर असिस्टंट - इंजेक्शन मोल्डिग, (७) मशीन ऑपरेटर असिस्टंट - ब्लो मोल्डिग,(८) मशीन ऑपरेटर अ‍ॅण्ड प्रोग्रमर-सीएनसी मिलिंग ,(९) मशीन ऑपरेटर -सीएनसी मिलिंग,(१०) मशीन ऑपरेटर -सीएनसी लेथ , (११) मशीन ऑपरेटर अ‍ॅण्ड प्रोग्रमर - सीएनसी लेथ, (१२) मेंटेनन्स ऑफ मशिनरी. यातील बहुतेक सर्व अभ्यासक्रमांचा कालावधी सहा महिने असा आहे. ८ वी ते १० वी उत्तीर्ण आणि १८ वर्षांवरील मुलांना हे अभ्यासक्रम करता येतात.

**संपर्क** -सीआयपीईटी, सेंटर फॉर स्किलिंग अ‍ॅण्ड टेक्निकल सपोर्ट - सीएसटीएस जे-३/२,एमआयडीसी, इंडस्ट्रिअल एरिआ, चिखलठाणा - औरंगाबाद- ४३१००६, संकेतस्थळ- https:// www. cipet. gov. in/ centres/ cipet- aurangabad,

### १० वीनंतरची कौशल्य संधी

छत्रपती संभाजीनगर येथे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता मंत्रालयाने, टेक्नॉलॉजी सेंटरची स्थापना केली आहे. या सेंटरच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या, इंडो-जर्मन टूल रुम, या संस्थेमार्फत विविध कौशल्य निर्मितीचे अभ्यासक्रम चालवले जातात. हे अभ्यासक्रम रोजगारक्षम आहेत. ते केलेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या करिअर संधी उपलब्ध होतात. या संस्थेने, दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ,तंत्रकौशल्य निर्मितीस उपयुक्त ठरतील असे, पुढील दीर्घ मुदतीचे अभ्यासक्रम सुरु केले आहेत.

**(१) अ‍ॅडव्हान्स्ड डिप्लोमा इन टूल अ‍ॅण्ड डाय मेकिंग**- या अभ्यासक्रमाला, १० वीमध्ये ६० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. राखीव संवर्गासाठी ५० टक्के गुण. अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षे.

**(२) सर्टिफिकेट कोर्स इन मशिनिस्ट**- अर्हता- १० वीमध्ये ६० टक्के गुण. राखीव संवर्गासाठी ५० टक्के गुण. कालावधी- दोन वर्षे.

या दोन्ही अभ्यासक्रमांना चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो.

### थेट प्रवेश

सर्टिफिकेट कोर्स इन मशिन टूल ऑपरेशन अ‍ॅण्ड वेल्डिग ऑपरेशन आणि सर्टिफिकेट कोर्स इन मशिन टूल मेंटनन्स अ‍ॅण्ड वेल्डिग ऑपरेशन- या दोन्ही अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी एक वर्षे. अर्हता- १० वी उत्तीर्ण. या अभ्यासक्रमांना, प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्रवेश या तत्वावर प्रवेश दिला जातो.

**संपर्क**- इंडो-जर्मन टूल रुम, पी-३१, एमआयडीसी, इंडसट्रिअल एरिआ, चिखलठाणा, छत्रपती संभाजीनगर- ४३१००६, दूरध्वनी- ०२०-२६१०१००, संकेतस्थळ- ईमेल- gm@igtr- aur. org

**– सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी : १२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
Toll

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507



# 'स्टार्टअप'च्या सहाय्यासाठी

**द ग्लोबल** आंत्रप्रिन्युरशिप मॉनिटर, या कंपनीच्या पाहणीनुसार पुढील तीन ते चार वर्षांत भारतात १८ ते ६० या वयोगटातील किमान २० टक्के व्यक्ती स्टार्टअप उद्योजक बनू शकतात. हे चित्र, भारतीय अर्थव्यवस्थेला गतिमान करणारे आहे. त्यामुळे, भारत झपाट्याने विकसित राष्ट्रांच्या पंगतीत जाऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन, उद्योजकीय नवप्रेरणांना प्रोत्साहित आणि प्रेरित केले जाते.

## तंत्रज्ञानाचा पुढचा टप्पा

मायक्रोप्रोसेसर आणि इंटिग्रेटेड चिप्सच्या अनुषंगाने विकसित झालेल्या आणि झपाट्याने पुढचा टप्पा गाठत असलेल्या तंत्रज्ञानामुळे असंख्य, नव्या स्टार्टअप संधी उपलब्ध झाल्या आहेत. भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योगाने, या क्षेत्रात लक्षणीय झेप घेतलीय. त्यामुळे भारताला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते.

भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योग (आयटी इंडस्ट्री) हा जगातील सर्वांत मोठा आउटसोर्सिंग सेवा देणारा उद्योग ठरला असून सध्या, या उद्योगात अंदाजे १० कोटींच्या आसपास तंत्रज्ञानांना रोजगार संधी मिळाल्या आहेत.

## इंडस्ट्री फोर

संगणकीय तंत्रज्ञानातील पुढची प्रगती, इंडस्ट्री फोरसाठी सर्वाधिक उपयुक्त ठरतेय. यामध्ये (१) आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (२) मशीन लर्निंग, (३) डीप लर्निंग, (४) व्हर्च्युअल रिॲलिटी, (५) ऑगमेंटेड रिॲलिटी, (६) नॅचरल लँग्वेज प्रोसेस, (७) स्मार्ट सेन्सर्स, (८) रोबोट, ऑटोमेशन, (९) इंटरनेट ऑफ थिंग्ज, (१०) क्लॉउड कॉम्प्युटिंग, (११) लोकेशन डिटेक्शन टेक्नॉलॉजी, (१२) ह्युमन मशीन इंटरफेस, (१२) थ्रीडी प्रिंटिंग, (१३) बिग डाटा ॲनॅलिटिक्स, (१४) मोबाइल डिव्हायसेस अशांसारख्या बाबींचा समावेश होतो. इंडस्ट्री फोर किंवा औद्योगिक क्रांती चारच्या, या टप्प्यात, भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक, नवसंकल्पनाकार आणि तंत्रज्ञ फार मोठी भूमिका बजावू शकतात.

भारत सरकारने, पुढील पाच वर्षांत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवलेय. यासाठी प्रामुख्याने स्टार्टअप कंपन्यांचा मोठा हातभार लागू शकतो. दरवर्षी साधारणतः १० कोटी नोकरीच्या वा रोजगाराच्या संधी निर्माण होणे आवश्यक आहे. यामधून अधिकाधिक संपत्तीची निर्मिती होऊ शकते. ही संपत्ती, भारताची अर्थव्यवस्था, पाच ट्रिलियन डॉलरमध्ये विकसित करू शकते.

हे सातत्य किमान पुढील पाच वर्षे टिकले पाहिजे. यासाठी सध्या अस्तित्वात असणाऱ्या मोठ्या उद्योगांचा किंवा त्यापेक्षाही अधिक स्टार्टअप उद्योजकांचा अधिक उपयोग होऊ शकतो. हे स्टार्टअप उद्योग, भविष्यातील भारतीय अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन ठरू शकतात.

## स्टार्टअप कंपन्यांचा उदय

भारतात स्टार्टअप कंपन्यांचा उदय, वेगाने होतोय. तंत्राधारित, या स्टार्टअप कंपन्यांनी भारताला जगातील स्टार्टअप कंपन्यांच्या क्षेत्रात तिसरा क्रमांक मिळवून दिला आहे. आपल्यापुढे अमेरिका आणि ब्रिटन हे दोन देश आहेत. या क्षेत्रातील देशाचे स्थान आणखी बळकट करण्यासाठी, भारत सरकारने, स्टार्टअप इंडिया उपक्रमास प्राधान्य दिले आहे. स्टार्टअप संस्कृतीच्या माध्यमातून उद्योजकता आणि नावीन्यता (इनोव्हेशन)ला प्रोत्साहन दिले जाते. त्यासाठी https:// www. startupindia. gov. in/ या वेबपोर्टलची निर्मिती करण्यात आली. या पोर्टलच्या माध्यमातून आतापावेतो, १ लाख ३६ हजारापेक्षा अधिक स्टार्टअपची दखल घेण्यात आली. या वेबपोर्टलच्या वापरकर्त्यांची संख्या साडेसात लाखांपेक्षा अधिक आहे.

या, वेबपोर्टलवर स्टार्टअपसाठी उपयुक्त ठरू शकेल, अशा पुढील योजनांची विस्तृत माहिती आहे. विशेषतः अर्थसहाय्याच्या संदर्भातील माहितीवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे- (१) स्टार्टअप इंडिया सीड फंड स्कीम, (२) स्टार्टअप इंडिया इन्व्हेस्टर कनेक्ट, (३) स्टार्टअप इंडिया क्रेडिट गॅरंटी स्कीम, (४) स्टार्टअपच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या योजना आणि धोरणे.

सध्या आपला देश औद्योगिक क्रांती टप्पा तीनमधून टप्पा चारमध्ये प्रवेशासाठी सज्ज झालाय. हा टप्पा तरुण-तरुणींमध्ये उद्योजकीय प्रेरणा निर्माण व्हाव्यात, यासाठी उपयुक्त ठरेल. भारतीय शैक्षणिक पर्यावरणात, उद्योजकीय प्रेरणांच्या निर्मितीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. नावीन्यता आणि उद्योजकता यांचा सुवर्णमध्य साधण्यासाठी विद्यार्थ्यांची मनोभूमिका टप्प्याटप्प्याने तयार करणे गरजेचे आहे. उद्योजकतेचे स्वप्न बघणे, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी कल्पनांचा विस्तार आणि विकास करणे, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, अंमलबजावणीसाठी नवे प्रयोग करण्याची तयारी ठेवणे, अशासारख्या बाबींवरही स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून लक्ष पुरवले जाते.

## अटल इनोव्हेशन मिशन

देशातील तरुणांना स्टार्टअप्सच्या अंतर्गत नावीन्यपूर्ण कल्पनांवर आधारित उद्योगाची स्थापना करण्याची प्रेरणा मिळावी, त्यासाठी त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य करता यावे, यासाठी भारत सरकारच्या निती आयोगामार्फत, ''अटल इनोव्हेशन मिशन'' राबविण्यात येते. शाळा, महाविद्यालये विद्यापीठे, संशोधन संस्था आणि खासगी वा सूक्ष्म- लघु-मध्यम उद्योगांमध्ये नावीन्यपूर्ण संकल्पना आणि समस्यांच्या निराकरणासाठीची मनोभूमिका तयार करण्यासाठी, या मिशनमार्फत प्रयत्न केले जातात. हे सगळे उपक्रम सातत्याने तपासले जातात व त्यांचे निरीक्षण आणि संनियंत्रण केले जाते. या उपक्रमात सुधारणा घडून याव्यात यासाठी तिसऱ्या पक्षाकडूनही याची तपासणी करण्यात येते.

## अटल टिंकरिंग लॅब

शाळा पातळीवर, अटल टिंकरिंग लॅबची सुरुवात करण्यात आली आहे. वर्ग ६ ते वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण सर्जनशीलतेला चालना आणि प्रोत्साहन देण्यासाठी अत्याधुनिक सुविधा आणि साधने उपलब्ध करुन दिले जातात. याशिवाय, इंटरनेट ऑफ थिंग्ज, थ्रीडी पेंटिंग्ज, रोबोटिक्स, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स, आणि ''तुम्ही करून बघा'' प्रकारातील साहित्य दिले जाते. आतापावेतो, दहा हजार, अटल टिंकरिंग लॅबची स्थापना करण्यात आली.

## अटल इनक्युबेशन सेंटर



या योजनेमार्फत देशभरात उद्योजकता आणि स्टार्टअप्सच्या पर्यावरणनिर्मितीसाठी प्रयत्न केले जातात. ही केंद्रे विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि कॉर्पोरेटमध्ये स्थापन करण्यात आली आहेत. नवसंकल्पनाकार तरुणाईला, त्यांच्या संकल्पनांना उद्योगात रूपांतरित करता येणे शक्य व्हावे म्हणून जागतिक दर्जाच्या सुविधा आणि तंत्रज्ञान या केंद्रांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले जाते. शिवाय संसाधनांच्या स्वरूपातले सहाय्य, प्रेरक किंवा मेंटॉरची सुविधा, निधीची उपलब्धता, संपर्क साखळी, भागीदारी, प्रयोगशाळा सुविधा, सह(को-स्पेस)जागा सुविधा, या सयी उपलब्ध करून दिल्या जातात. सध्या देशात ७२ ठिकाणी अशी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. अशा केंद्रांमधून ३५०० पेक्षा अधिक स्टार्टअप्सना उत्तेजन देण्यात आले. या स्टार्टअप्समुळे ३२ हजारपेक्षा अधिक नोकरीच्या संधी निर्माण झाल्या. यामध्ये महिलांच्या १००० पेक्षा अधिक स्टार्टअप्सचा समावेश आहे. आरोग्य सुविधा, फिनेटेक , एज्युकेशन टेक्नॉलॉजी, स्पेस आणि ड्रोन तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान, पर्यटन, ऑगमेंटेड आणि व्हर्च्युअल रिॲलिटी आदी क्षेत्रांचा समावेश आहे.

## महाराष्ट्रातील केंद्रे

(१) **बारामती येथे अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या सहकार्याने, एआयसी-** एडीटी बारामती फाउंडेशन, या, अटल इनक्युबेशन सेंटर (एआयसी) ची स्थापना करण्यात आली. यामार्फत कृषी तंत्रज्ञान, आरोग्य सुविधा, औषधनिर्मिती, माहिती तंत्रज्ञान, निर्मिती आणि अभियांत्रिकी, या क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहित केले जाते.

- **संपर्क संकेतस्थळ-** https:// www. aicadtbaramatifoundation. org/ aic- adt/,
- **इमेल-** aicadt@aicadtbaramati. com

(२) **एआयसी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी फाउंडेशन-** या केंद्रात स्वच्छ ऊर्जा, परवडणारी आरोग्य सुविधा, अन्न आणि पोषण सुरक्षा, जल आणि स्वच्छता, या क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या स्टार्टअप्सना प्रोत्साहित केले जाते.

- **संपर्क-संकेतस्थळ-** https:// www. aicbamu. ac. in/,
- **ईमेल-** info. aic@bamu. ac. in

(३) **एआयसी -एमआयटी एडिटी-** एमआयटी युनिव्हर्सिटीमधील या केंद्रात उद्योजकीय पर्यावरणनिर्मितीला प्रोत्साहन दिले जाते. संभाव्य नवसंकल्पनाकारक स्टार्टअप्सचा शोध घेऊन त्यांना सहाय्य केले जाते. नव्या पिढीतील उद्योजकांमध्ये IDEA (इनोव्हेशन (नावीन्यता), डिझाइन थिंकिंग (अभिकल्पाचा विचार), आंत्रप्रिन्युरशिप (उद्योजकता) आणि आर्ट्स (कला) संस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न केले जातात. कृषी तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, डिजिटल तंत्रज्ञान आणि सामाजिक नावीन्यता या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाते.

- **संपर्क- संकेतस्थळ-** https:// aic. mituniversity. ac. in,
- **ईमेल-** enquiry. aic@mituniversity. edu. in

## अटल न्यू इंडिया चॅलेंज

ही निती आयोगाची महत्त्वाची योजना आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी, तंत्रज्ञान आधारित नवसंकल्पांना पाठिंबा देणे, निवड करणे, सहाय्य करणे यासाठी, या योजनेंर्तगत मदत केली जाते. या क्षेत्रातील निवड झालेल्या नवसंकल्पनायुक्त स्टार्टअप्सचे, वाणिज्यिक (कमर्शिअल) रूपांतर होण्याच्या पातळीपर्यंत संपूर्ण सहकार्य केले जाते. हा कालावधी १२ ते १८ महिन्यांचा असतो. या कालावधीत १ कोटी रुपयांपर्यंतच्या अर्थसहाय्याचा समावेश आहे.

- **संपर्क-** https:// aim. gov. in/ aic. php

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.25%* द.सा. पासून

*अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# महिला उद्योजकांचे व्यासपीठ

**महिला उद्योजकता** (वुमेन्स आंत्रप्रिनरशीप प्लॅटफॉर्म) व्यासपीठ, ही योजना, निती आयोगामार्फत राबवली जाते. महिला उद्योजकांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी, या व्यासपीठाची निर्मिती करण्यात आली. उद्योगक्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तींमार्फत या व्यासपीठाद्वारे उद्योजकीय कार्यशाळा आयोजित करून, उद्योग/व्यवसायाविषयी प्रबोधन केले जाते. उद्योजकीय विकास व प्रशिक्षणासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरते.

या व्यासपीठाव्दारे सहा मुख्य घटकांवर लक्ष केंद्रीत केले जाते- (१) समुदाय आणि संपर्क साखळी (कम्युनिटी ॲण्ड नेटवर्किंग), (२) वित्त पुरवठा आणि वित्तीय साहाय्यता (फंडिंग ॲण्ड फायनान्शिअल असिस्टन्स), (३) उबवण आणि प्रवेगक (इनक्युबेशन ॲण्ड ॲक्लिरेशन), (४) अनुपालन आणि करसाहाय्यता (कम्प्लॉयन्स ॲण्ड टॅक्स असिस्टन्स), (५) उद्योजकता कौशल्य आणि प्रेरकांचे मार्गदर्शक/सल्ला (आंत्रप्रिनर स्किलिंग ॲण्ड मेंटॉरशीप), (६) विपणन साहाय्य (मार्केटिंग असिस्टन्स)

इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती आणि कर्मशक्ती या तीन तत्त्वांवर ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत असलेले उपक्रम २०२२ साली सार्वजनिक, खासगी, भागिदारी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) मध्ये रुपांतरीत झाले.

भारताच्या विविध प्रांतातील उद्योजकीय महत्त्वाकांक्षा असणाऱ्या महिलांना एकत्र आणणारे, हे पहिलेच पोर्टल ठरले आहे. या व्यासपीठाद्वारे महिला उद्योजकांना, नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रत्यक्ष साकारण्यासाठी आणि दीर्घ कालावधीच्या शास्वत स्वरुपाच्या व्यावसायिक व्यूहनीतींचा विकास करण्यासाठी, सर्व प्रकारचे साहाय्य केले जाते. कॉर्पोरेट भागीदारी, अप्रेंटिसशीप (शिकावू उमेदवारी/प्रशिक्षण)ची संधी उपलब्ध करून दिली जाते. यशस्वी उद्योजकांचा प्रवास, यशकथा, अनुभवांची देवाणघेवाण केली जाते. त्याव्दारे नव्या उद्योजिकांना आणखी प्रेरणा मिळू शकते.

महिला उद्योजिका प्रेरक (वुमेन आंत्रप्रिनरशीप मेंटॉरशीप प्लॅटफॉर्म) व्यासपीठांद्वारे मार्गदर्शक, प्रेरक आणि महिला उद्योजकांना एकत्र आणले जाते. त्याव्दारे सुरक्षित आणि सर्वसमावेशक उद्योजकीय पर्यावरणाची निर्मिती केली जाते. चार पध्दतीच्या प्रेरकांची सुविधा यामुळे उपलब्ध होते. यामध्ये व्यक्तीगत मार्गदर्शन, संस्थात्मक मार्गदर्शन, आदिंचा समावेश आहे.

महिला उद्योजकांच्या गरजा आणि पसंती लक्षात घेऊन हे मार्गदर्शन दिले जाते. या व्यासपीठामुळे लाभार्थ्यांना, अनेक प्रेरकांची संसाधने आणि संधीचा लाभ घेता येतो. प्रेरक आणि लाभार्थ्यांमध्ये प्रभावीपणे संवादसेतू निर्माण व्हावा म्हणून कृत्रिम प्रज्ञा, मशिन लर्निंग (यंत्र अध्ययन) तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामुळे लाभार्थ्यांच्या विशिष्ट गरजांचे समाधान प्रभावीपणे शक्य होते.

इच्छूक महिला उद्योजकांना सुलभतेने, प्रेरक/मार्गदर्शन कार्यक्रमाचा लाभ घेता येतो. या व्यासपीठाद्वारे बहुविध क्षेत्रांसाठी मार्गदर्शन केले जाते. यामध्ये वित्त पुरवठा, बाजार संपर्क साखळी, प्रशिक्षण आणि कौशल्य निर्मिती, इनक्युबेशन, ॲक्लिरेशन आणि व्यवसाय विकास सेवा, आदिंचा समावेश आहे. कृत्रिम प्रज्ञा आणि मशिन अध्ययन तंत्राचा वापर, प्रेरक आणि लाभार्थ्यांसोबत समान उद्योजक अनुभव आणि तज्ज्ञतेचा लाभ देण्यासाठी केला जातो. त्याव्दारे लाभार्थ्यांचे प्रोफाइल (व्यक्तिगत कार्याविषयी माहिती), उद्दिष्टे, आवडनिवड यांचे विश्लेषण केले जाते.

या व्यासपीठावरील माहिती गोपनीय आणि सुरक्षित ठेवली जाते. लाभार्थ्याने, माहिती खुली केल्याशिवाय ती कुणालाही बघता येत नाही. हे व्यासपीठ प्रेरक आणि लाथार्थ्यांसाठी निशुल्क असते.

**संपर्क- संकेतस्थळ- wep. gov. in,ईमेल- wep@wepindia. org**



## कृषी क्षेत्रातील स्टार्टअप

ॲग्रीक्लिनिक्स आणि ॲग्रीबिझिनेस सेंटर, ही एक स्टार्टअप योजना असून, नॅशनल बँक ऑफ ॲग्रिकल्चर ॲण्ड रुरल डेव्हलमेंट (नाबार्ड) मार्फत राबवली जाते. या योजनेंतर्गत वित्तीय साहाय्यता, कौशल्य विकास, प्रशिक्षण उद्योजकता विकास, यासाठी साहाय्य केले जाते. नाबार्ड आणि मॅनेज (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल एक्सटेंशन मॅनेजमेंट) या संस्थांच्या सहकार्याने, केंद्रिय कृषीकल्याण मंत्रालयामार्फत ही योजना राबवली जाते. कृषी पदवीधरांच्या तज्ज्ञतेचा उपयोग करण्याच्या अनुषंगाने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने फलोत्पादन, वानिकी, दुग्धव्यवसाय, मत्सव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुवैद्यकीय, रेशीमउद्योग या क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिले जाते.

या क्षेत्रासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, उद्योग/व्यवसायासाठी असलेल्या खास स्टार्टअप कर्जासाठी अर्ज करु शकतात. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना किंवा इच्छूक कृषी पदवीधारकांना, कृषी व्यवसायकेंद्र किंवा कृषी क्लिनिक सुरु करण्यासाठी आवश्यक असणारे ४५ दिवसांचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणात उद्योजकता, व्यवसाय व्यवस्थापन, कौशल्य विकास या विषय घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

व्यक्तिगत प्रकल्पासाठी २० लाख रुपयांपर्यंत साहाय्य दिले जाते. समूह प्रकल्पसाठी १ कोटी रुपयांचे साहाय्य दिले जाते. कर्ज परतफेडीचा कालावधी पाच ते दहा वर्षांचा आहे. अधिस्थगन कालावधी दोन वर्षांचा आहे.

**संपर्क संकेतस्थळ- https:// wep. gov. in/ ciiyi- schemes- details**

## प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना -

ही योजना, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता मंत्रालयामार्फत नियंत्रति केली जाते. राज्य स्तरावर खादी ग्रामोद्योग विभाग, जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत राबवली जाते. या योजनेंतर्गत सूक्ष्म उद्योजकता घटक स्थापन्यासाठी, निर्मिती क्षेत्रासाठी कमाल अर्थसाहाय्य ५० लाख रुपये आहे. सेवा आणि व्यवसाय घटकांसाठी कमाल साहाय्य २० लाख रुपये आहे. प्रकल्प खर्चावर आधारित अनुदान दिले जाते. याचे दर ग्रामीण भागासाठी ३५ टक्के आणि नागरी भागासाठी २५ टक्के आहे. हा लाभ महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक संवर्ग, अपंग, माजी सैनिक, तृतीय पंथी, आकांक्षित जिल्हे यांना दिला जातो. या संवर्गातील लाभार्थ्यांना केवळ ५ टक्के रक्कम स्वतःचा हिस्सा म्हणून भरावा लागतो. खुल्या संवर्गातील व्यक्तींना नागरी भागात १५ टक्के आणि ग्रामीण भागात २५ टक्के अनुदान दिले जाते. लाभार्थ्यांचा हिस्सा १० टक्के असावा लागतो. लाभार्थ्यांचे वय किमान १८ वर्षे असावे. निर्मिती क्षेत्रातील उद्योग/व्यवसाय स्थापन्यासाठी १० लाख रुपयांपेक्षा अधिक प्रकल्प खर्च आणि सेवा क्षेत्रासाठी किमान ५ लाख रुपये प्रकल्प खर्चापेक्षा अधिक असल्यास किमान ८ वी उत्तीर्ण आवश्यक. इच्छुकांना कर्ज अनुदानासाठी अर्ज, ( http:// www. kviconline. gov. in/ pmegpeportal/ jsp/ pmegponline. jsp)या पोर्टलवर जाऊन करावा लागतो. https:// www. kviconline. gov. in/ या संकेतस्थळावर या योजनेची विस्तृत माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. व्यक्तीशः या योजनेसाठी अर्ज जिल्हा उद्योग केंद्रात देता येतो. अर्ज मराठीत देण्याची सुविधा आहे.

### सुविधा आणि संधी

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत विविध प्रकारचे व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज स्वरुपातील साहाय्य केले जाते. हे व्यवसाय करणे सुलभ आणि सोईचे होण्यासाठी केंद्र शासनाने काही प्रकल्प अहवाल तयार केले आहेत. हे अहवाल ऋद्यमी ( https:// www. udyami. org. in/ project- reports ) पोर्टलवर ठेवण्यात आले आहेत. इच्छुक लाभार्थीस ज्या क्षेत्रात व्यवसाय सुरु करायचा असेल, तो या प्रकल्प अहवालांचा उपयोग, व्यवसाय सुरु करण्याआधी उपयोग करु शकतो. हे प्रकल्प अहवाल/व्यवसाय नियोजन अहवाल, तज्ज्ञांच्या सहकार्याने तयार करण्यात आले आहेत. उद्योग/व्यवसायाच्या मूलभूत बाबींचे ज्ञान मिळावे म्हणून प्रतिरुप किंवा मूळ रचनेतील (प्रोटोटाइप) प्रकल्प अहवालही बघता येतात. भांडवल उभारणीसाठी उपयुक्त ठरू शकतील, असे विस्तृत प्रकल्पसुध्दा उपलब्ध करुन दिले जातात.

### उपलब्ध प्रकल्प

या वेबपोर्टलवरील, इंडस्ट्री अशी संपर्कसाखळी दिसते. ती क्लिक केल्यावर १९ उद्योगक्षेत्राची यादी समोर येते. या यादीतील हव्या त्या उद्योगक्षेत्रावर क्लिक केल्यास, त्या अंतर्गत येणारे व्यवसाय हे, 'सिलेक्ट प्रोजेक्ट' असे नमूद असलेल्या खिडकी (विंडो)त दिसतात.

**उदाहरणार्थ,** 'इंडस्ट्री' नमूद केलेल्या खिडकीतील, स्माल बिझिनेस मॉडेल (१० लाख रुपयांच्या मर्यादेत असणारे लघु उद्योग प्रारुप) यावर क्लिक केल्यावर, 'सिलेक्ट प्रोजेक्ट' या खिडकीत (१) बूक बायंडिंग (पुस्तक बांधणी), (२) बिन बॅग निर्मिती, (३) आदिवासी कलाकुसरीच्या वस्तू (ट्रायबल क्रॅफ्ट), (४) हॉकी स्टिक्स, (५) सॉफ्ट टॉइज, (६) टेरॉकोटा भांडी, (७) घुंगरु/ घंटी निर्मिती, (८) मूंज संमारंभाच्या सजावटीच्या वस्तू निर्मिती, (७) हाताने तयार करावयाचा गालीचा, (८) बासरी निर्मिती, (९) रेशीम गालीचा निर्मिती, (१०) चामडी पर्स, (११) ढोलक निर्मिती, (१२) गव्हाच्या दांडीपासून कलाकृती निर्मिती, (१३) ग्लास (काच) बल्ब शेल (कवच), (१४) काचेची भांडी, (१५) काचेच्या बांगड्या, (१६) बांबू खूर्ची, (१७) बांबू तंतूकला साहित्य, (१८) केळीचे तंतू इत्यादी उद्योग निदर्शनास येतात.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत

टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी : १२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
Toll



S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# अन्नप्रकिया: तंत्र आणि कौशल्य

**अन्नप्रक्रिया उद्योगाची वार्षिक वाढ ही १२ टक्के आहे . देशातील औद्योगिक वाढीचा दर चार टक्क्याच्या आसपास असल्याचे लक्षात घेतले, तर अन्नप्रकिया उद्योगाचा वाढीची प्रगती सहज लक्षात येते . या क्षेत्रात १०० टक्के थेट परकीय चलन आकर्षित झाले आहे . इन्स्टिट्यूट ऑफ ॲप्लाइड मॅनपॉवर रिसर्च, या संस्थेच्या अभ्यासानुसार या क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळाचा तुटवडा ३५ दशलक्षपर्यंत पोहचला आहे . त्यामुळे या क्षेत्रात पुढील काही वर्षांमध्ये रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विपुल संधी निर्माण होऊ शकतात .**

**मेक इन** इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या उपक्रमांमुळे अन्नप्रकिया उद्योग क्षेत्राच्या विकासाला नवी ऊर्जा मिळाली. गेल्या काही वर्षात अन्नप्रकिया उत्पादन आणि निर्मिती घटकांमध्ये ३७ हजारावरुन ३९ हजार घटकांपर्यंत वाढ झाली. या क्षेत्रातील गुंतवणुकीत ३४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. देशातील निर्यातीपैकी १३ टक्के वाटा या क्षेत्राचा आहे. देशातील प्रचंड लोकसंख्या लक्षात घेऊन परदेशी कंपन्या व उद्योगसमूह अन्नप्रकिया उद्योगांमध्ये गुंतवणूक व व्यावसायिक सहकार्य करु लागले आहेत. करारपध्दतीची शेती, कच्चा मालाचा पुरवठा इत्यादीबाबींमध्ये ही गुंतवणूक वाढलेली दिसते. न्याहरीसाठी लागणारी विविध प्रकारची खाद्यपदार्थ, विविध ऊर्जा पेये (एनर्जी ड्रिंक्स), स्नॅक्स, केक्स, आइस्क्रीम आणि पाळीव प्राण्यांचे अन्नपदार्थ यांची निर्मिती वाढली आहे. या उद्योगवाढीसाठी डिजिटल क्रांतीही उपयुक्त ठरली आहे. मोठ्या किराणा दुकानांच्या साखळी (रिटेल) मुळे अन्नप्रक्रिया उद्योगाच्या वाढीस हातभार लागला.

## संस्था आणि अभ्यासक्रम

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनरशीप ॲण्ड मॅनेजमेंट (एनआयएफटीईएम), ही संस्था केंद्रीय अन्न प्रकिया मंत्रालयाने, हरयाणातील कुंडली आणि तामिळनाडूतील तंजावूर येथे स्थापन केली आहे. अन्नप्रक्रिया उद्योगासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी जगातील सर्वोत्कृष्ट संस्था बनण्याचे उद्दिष्ट्य या संस्थेने ठेवले आहे. या दोन्ही संस्थांना, इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्सचा दजा देण्यात आला आहे.

अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन, या संस्थांनी अभ्यासक्रमाची संरचना केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नव्या संकल्पनांचा, अधिकाधिक वापर उमेदवारांना करता यावा यासाठी अभ्यासक्रमात भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या क्षेत्रात उत्तमोत्तम संधी मिळू लागल्या आहेत.

### (१) एनआयएफटीएम - कुंडली, हरयाणा.

**अभ्यासक्रम**- (१) बी.टेक इन फूड टेक्नालॉजी ॲण्ड मॅनेजमेंट- या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दोन पध्दती अवलंबल्या जातात- (१) जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन – जेईई (मेन) या परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया, जॉईंट सिट ॲलोकेशन ॲथॉरिटी / सेंट्रल सिट ॲलोकशन बोर्डामार्फत राबविली जाते. या प्रक्रियेव्दारे १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.( csab. nc. in ), (२) या संस्थेव्दारे थेट प्रवेश प्रकिया राबवली जाते, याव्दारे ५० विद्यार्थी जेइइ मेन, ३० विद्यार्थी सीयुइटी-युजी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट-अंडर ग्रज्युएट), २० विद्यार्थी नीट (नॅशनल इलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट) मधील गुणांवर निवडले जातात. ऑनलाइन प्रवेश प्रकिया २ जून २०२५ पासून सुरु होईल.

**अर्हता**- भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र या विषयासह १२ वीमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना ६० टक्के आणि राखीव संवर्गातील



विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुण मिळायला हवेत.

### काय शिकाल ?

व्यवस्थापनाची मुलभूत तत्त्वे, वित्त आणि लेखा, अन्न तंत्रज्ञान, अन्न रसायनशास्त्र, अन्न सूक्ष्मजीवशास्त्र आणि सुरक्षा, कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग आणि आयटी सोल्युशन्स, यांत्रिकी अभियांत्रिकी, अन्नपुरवठा साखळी व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन, रेफ्रिजरेशन आणि फ्रिजिंग, निर्णय पाठिंबा प्रक्रियेचे प्रारुप, व्यवसायासाठी नैतिकमूल्ये, अन्नपदार्थ पॅकिजिंग तंत्रज्ञान, अन्न नियामके आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली, अन्न पदार्थांचे ॲडिटिव्ह (मिश्रण) आणि सुरक्षा, अन्न विश्लेषणाच्या पध्दती, नवीन पदार्थांचा विकास, विपणन व्यवस्थापन, उद्योजकता विकास, अन्न अभियांत्रिकी, मांस, मासोळी, कुक्कुट उत्पादने तंत्रज्ञान, बेकरी आणि कन्फेक्शनरी तंत्रज्ञान, बौध्दिक संपदा अधिकार, तृणधान्ये, कडधान्ये तंत्रज्ञान, तेलबिया, दुग्ध तंत्रज्ञान, फळे भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान, मानवी पोषणआहार, इत्यादी.

उपरोक्त दोन मुख्य विषयांसोबतच पुढीलपैकी काही विषय (इलेक्टिव्ह) संबंधित विद्यार्थी त्याच्या आवड आणि कल ओळखून निवडू शकतो - अन्न आणि कृषी धोरण, जैवरसायनिक अभियांत्रिकी, दुग्ध पदार्थ प्रकिया अभियांत्रिकी, अन्न जैवतंत्रज्ञान, भारतीय वित्तीय संस्था, नॅनो टेक्नॉलॉजी, पोषण, अन्न पेये, अन्नपदार्थ निर्मिती यंत्रसामग्री डिझाइन, ताजी फळे आणि भाजीपाला उत्पादन व्यवस्थापन प्रक्रिया, अन्नप्रक्रिया उद्योगातील कचरा आणि उपवस्तुंचे व्यवस्थापन इत्यादी.

या अभ्यासक्रमात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या दोन घटकांचा समावेश असल्याने, विद्यार्थी संबंधित उद्योगक्षेत्रात कोणतीही तांत्रिक आणि व्यवस्थापकीय जबाबदारी समर्थपणे सांभाळू शकतो.

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी प्राप्त होतात- (१) प्रॉडक्ट डेव्हलपमेंट सायंटिस्ट, (२) सेन्सरी सायंटिस्ट, (३) फूड मायक्रोबायलॉजिस्ट, (४) फूड ॲनॅलिस्ट, (५) क्वालिटी कंट्रोल मॅनिजर, (६) फूड प्रोसेसिंग इंजिनीअर, (७) फूड रेग्युलेटरी इंजिनीअर, (८) फूड रेग्युलेटरी अफेअर्स स्पेशॅलिस्ट, (९) न्युट्रिशन स्पेशॅलिस्ट, (११) सप्लाय चेन, कोल्ड चेन लॉजिस्टिक्स स्पेशॅलिस्ट, (१२) फूड फरमेंटिशन स्पेशॅलिस्ट, (१३) फूड प्रोसेसिंग सेक्टर - स्नॅक फूड, डेअरी फूड, वायनरी, शितपये, प्राण्यांचे मास, (१४) फूड सर्विस सेक्टर - हेल्थ ॲण्ड वेलनेस सर्विस प्रोव्हायडर्स, फूड रेग्युलेशन, फूड रिटेलिंग, सप्लाय चेन, पोस्ट हार्वेस्ट, (१५) व्यवस्थापक, (१६) तंत्रोव्यवस्थापक, (१७) सल्लागार,

● **एम.टेक** - या स्पेशलायझेशनला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.ई/ बी.टेक मध्ये ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. स्पेशलायझेशनचे विषय- (अ) फूड सप्लाय चेन मॅनिजमेंट, (ब) फूड सेफ्टी आणि क्वालिटी मॅनिजमेंट. (क) फूड प्रोसेस इंजिनीअरिंग आणि मॅनेजमेंट, (ड) फूड टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट. (ई) फूड प्लँट ऑपरेशन्स आणि मॅनेजमेंट

**प्रवेश प्रकिया**- दोन पध्दतीने प्रवेश दिला जातो. (१) ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट फॉर इंजिनीअरिंग (गेट) (२) ज्या विद्यार्थ्यांनी गेट परीक्षा दिली नसेल, अशा विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत घेण्यात येणारी चाळणी परीक्षा द्यावी लागते.

**संपर्क - प्लॉट नंबर- ९७, सेक्टर-५६, एचएसआयआयडीसी इंडस्ट्रिअल इस्टेट कुंडली, जिल्हा सोनपत, हरयाणा - १३१०२८, दूरध्वनी - ०१३०-२२८११००, ई-मेल- info@niftem. ac. in आणि संकेतस्थळ- www. niftem. ac. in ,**

● **नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनरशीप ॲण्ड मॅनेजमेंट, तंजावूर-**

**अभ्यासक्रम**- बी.टेक इन फूड टेक्नॉलॉजी,

**अर्हता**- १२वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र ,रसायनशास्त्र आणि गणित या विषयात खुल्या आणि इतर मागासवर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांना ७५ टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती आणि जमातीच्या उमेदवारांना ६५ टक्के गुण मिळायला हवेत. अभ्यासक्रमाला ७५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. कालावधी - ४ वर्षे.

**निवड**- जॉईंट एन्ट्रन्स टेस्ट (मेन) या परीक्षेतील गुणांवर आधारीत निवड केली जाते. जॉईंट सिट ॲलोकेशन ॲथॉरिटी / सेंट्रल सिट ॲलोकशन बोर्डामार्फत राबविली जाते. ( https:// josaa. nic. in/ )

● **एम.टेक इन**- (१) फूड प्रोसेस इंजिनीअरिंग, (२) फूड प्रोसेसं टेक्नॉलॉजी, (३) फूड सेफ्टी ॲण्ड क्वालिटी ॲश्युरन्स. कालावधी - दोन वर्षे. निवड- संस्थेच्या चाळणी परीक्षेद्वारे किंवा गेट परीक्षेतील गुण

**संपर्क - नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनरशीप ॲण्ड मॅनेजमेंट पुदूकोट्टल रोड, तंजावूर- ६१३००५, तामिळनाडू, दूरध्वनी- ०४३६२-२२८१५५, ई-मेल- director@ niftem-t. ac. in, संकेतस्थळ- niftem-t. ac. in**

● **इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,मुंबई-** अभ्यासक्रम- बी.टेक इन फूड इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी. कालावधी- चार वर्षे. अर्हता-१२ वी विज्ञानशाखेत रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये ५० टक्के गुण. निवड- जेइइ मेन परीक्षा आणि एमएचसी

टी मधील गुण. या संस्थेतील ७० टक्के जागा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत. या संस्थेने आता भूवनेश्वर आणि जालना येथे कॅम्पस सुरु केली आहेत.

**संपर्क — नाथालाल पारेख मार्ग, माटुंगा मुंबई- ४०००१९ दूरध्वनी- ०२२- ३३६११११११, ई-मेल- admission@ictmumbai. edu. in, संकेतस्थळ- http:// www. ictmumbai. edu. in**

● **लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी, नागपूर-**

**अभ्यासक्रम**- बी.टेक इन फूड टेक्नॉलॉजी

**संपर्क - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटी, अमरावती, भारतनगरच्या विरुध्द दिशेला नागपूर, दूरध्वनी-०७१२-२५६११०७, ई-मेल- registrar@ litu. edu. in,संकेतस्थळ- litu. edu. in**

**– सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%*
द.सा. पासून
अटी लागू

लोकसत्ता मार्ग यशाचा ४५

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# दूध: तंत्रज्ञान आणि व्यवसाय

भारतामध्ये दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. त्यावर प्रकिया करून विविध प्रकारच्या उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या अनेक नामांकित संस्था आपल्या देशात उभ्या राहिल्या. यातील अनेक संस्थांनी उद्योगाचा दर्जा प्राप्त केला. अशा संस्थांना, संशोधन, दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती प्रक्रिया ते विक्री, अशा विविध बाबींसाठी तंत्रज्ञ आणि संशोधकांची गरज भासते. या क्षेत्रासाठी उत्कृष्ट गुणवत्ताप्राप्त मनुष्यबळाची निर्मिती, नॅशनल रिसर्च डेअरी इंस्टिट्यूट, ही संस्था करते. या संस्थेतील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, या विषयात रस असणाऱ्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी, यंदा प्रयत्न करायला हवे. पदवी- पदव्युत्तर पदवी- पीएचडी अशा विविध पातळ्यांवरील येथील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी मिळवून देतात.

## बी.टेक. इन डेअरी टेक्नॉलॉजी

**या अभ्यासक्रमात** दूध उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण आणि प्रकियेच्या अनुषंगाने सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक ज्ञान प्रदान केले जाते. दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांचे नियंत्रण, दुरुस्ती आणि देखभाल या अभियांत्रिकी बाजूही शिकवल्या जातात. अभ्यासक्रमाचा कालावधी - चार वर्षे किंवा आठ सत्रे. सातव्या आणि आठव्या सत्रात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दुग्धप्रकिया संयंत्रावर काम करावे लागते. या कालावधीत अशा संयंत्रांचे कार्यान्वयन आणि व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते.

**प्रवेश अर्हता-** भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि इंग्रजी या विषयांसह १२ वी विज्ञान परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती, जमाती आणि दिव्यांग संवर्गासाठी गुणांमध्ये १० टक्क्यांची सूट. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीयूईटी-यूजी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स टेस्ट- अंडर ग्रॅज्युएट) या चाळणी परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. केंद्र सरकारच्या नियमानुसार वेगेवगळ्या संवर्गासाठी जागा राखीव ठेवल्या जातात. या जागा रिक्त राहिल्यास त्या खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना दिल्या जातात. वयोमर्यादा - ३१ जुलै रोजी १७ वर्षे ते २३ वर्षे असावे.

**संस्थेचे महत्त्व**

भारतीय कृषी अनुसंधान (इंडियन काऊन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्च) या संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असणारी, ही संस्था आपल्या देशातील दूध आणि दुग्ध तंत्रज्ञान विषयांतील शिक्षण, प्रशिक्षण देणारी आणि संशोधनास चालना देणारी सर्वात महत्त्वाची संस्था होय. भारताच्या दुग्धव्यवसाय क्षेत्राच्या विकास आणि वाढीत या संस्थेने बजावलेली भूमिका फार मोठी आहे. या संस्थेने दुग्ध व्यवसायाशी निगडित विविध पैलूंवर प्राधान्याने लक्ष पुरवले आहे. या संस्थेला १९८९ साली डीम्ड युनिव्हर्सिटीचा दर्जा देण्यात आला. दुग्ध तंत्रज्ञान व्यवसायात शिक्षण - प्रशिक्षण देणारी ही आशिया खंडातील सर्वोच्च दर्जाची संस्था समजली जाते. अध्यापन आणि दुग्धजन्य व्यवसाय/ उद्योगासाठी लागणाऱ्या उच्च प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा या संस्थेने सातत्याने केला आहे.

**सुसज्ज प्रयोगशाळा**

कर्नाल येथील या संस्थेच्या कॅम्पस परिसरात अत्याधुनिक यंत्रसामग्री, उपकरणे यांसह सुसज्ज अशी प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या संस्थेचे कॅम्पस ५६० एकराच्या परिसरात वसले आहे. या ठिकाणी दुधाळ जनावरांचे दूध काढणारी अत्याधुनिक यंत्रणा (मिल्क पार्लर) उभारण्यात आली आहे. जनावरांचे निवास/आसरा व्यवस्थापन, जनावरांच्या अधिक दर्जेदार प्रजाती निर्मिती प्रकल्पांवर येथे काम केले जाते. या ठिकाणी दुग्धविषयक सर्व आधुनिक विषय-घटकांवर सखोल संशोधन केले जाते.

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम- संस्थेच्या कर्नाल, बेंगळुरु आणि कल्याणी येथील कॅम्पसमध्ये, डेअरी टेक्नॉलॉजी, डेअरी इकॉनॉमिक्स, डेअरी इंजिनीअरिंग ॲनिमल न्युट्रिशन अशासारख्या विविध विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम करता येतात.

**शिष्यवृत्ती**

(१) पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा १ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. याशिवाय डेअरी उद्योगांकडूनही काही शिष्यवृत्ती दिल्या जातात.

(२) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा ७५६० रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

(३) या संस्थेत पीएचडीसाठी नाव नोंदवलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा १०,५०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

डेअरी तंत्रज्ञान अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना दुग्ध प्रकिया, साठवणूक (स्टोअरेज), पॅकेजिंग, वाहतूक आणि वितरण अशा बाबींच्या संनियंत्रणाचे कार्य करावे लागते. दुधाची नासाडी कमी करणे, दुधाचा टिकाऊपणा वाढवणे, दुधाचा दर्जा वाढवून ते अधिक आरोग्यदायी व सुरक्षित होईल याकडे लक्ष पुरवणे, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा सुयोग्य वापर होण्यासाठी रासायनिक, भौतिक आणि अर्थशास्त्रीय सूत्राचा वापर करणे, या बाबींकडे या तज्ज्ञास लक्ष पुरवावे लागते. सध्या भारतात ४०० हून अधिक दुग्धजन्य प्रकिया संयंत्रे कार्यरत असल्याने, या क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळास चांगल्या करिअर संधी मिळू शकतात.

**करिअर संधी**

हा अभ्यासक्रम केल्यावर सर्वसाधारणतः पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) डेअरी प्लँट मॅनेजर, (२) डेअरी प्रॉडक्शन सुपरवायझर, (३) क्वालिटी कंट्रोल अॅनॅलिस्ट, (४) डेअरी प्रॉडक्ट डेव्हलपमेंट स्पेशॅलिस्ट, (५) डेअरी सायंटिस्ट, (६) डेअरी कंसल्टंट, (७) डेअरी इक्विपमेंट ॲण्ड मशिनरी सप्लायर, (८) डेअरी फार्म मॅनेजर, (९) फूड सेफ्टी ॲण्ड रेग्युलेटरी कॅम्प्लायन्स ऑफिसर. स्वयंरोजगारही करता येतो.



**संपर्क-** https:// ndri. res. in, दूरध्वनी-०१८४-२२५९००६, jda. ndri@car. gov. in

## महाराष्ट्रातील संस्था

महाराष्ट्रामध्ये उदगीर आणि वरुड या ठिकाणी शासकीय दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालये आहेत. ही महाविद्यालये महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत आहेत. या दोन्ही ठिकाणी, बी.टेक- डेअरी टेक्नॉलॉजी, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. दोन्ही संस्थेत प्रशिक्षित मनुष्यबळ आणि उत्तम प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.

अर्हता- भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, इंग्रजी या विषयांसह १२ वी परीक्षेत किमान ५० टक्के गुण (खुला संवर्ग) आणि ४५ टक्के गुण (राखीव संवर्ग) मिळवणे आवश्यक. एमएचटी-सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारावर या अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

**काय शिकाल?**

या अभ्यासक्रमात (१) डेअरी टेक्नॉलॉजी, (२) डेअरी इंजिनीअरिंग, (३) डेअरी बिझिनेस मॅनेजमेंट, (४) डेअरी मायक्रोबॉयलॉजी, (५) डेअरी केमेस्ट्री, (६) ट्रॅडिशनल इंडियन मिल्क प्रॉडक्ट, (७) आइसक्रीम ॲण्ड फ्रोजन डेझर्ट, (८) पॅकेजिंग ऑफ डेअरी प्राडक्ट्स, (९) डेअरी प्लँट मॅनेजमेंट, (१०) फूड टेक्नॉलॉजी, (११) डेअरी मशीन डिझाइन, (१३) मिल्क प्रॉडक्शन मॅनेजमेंट ॲण्ड डेअरी डेव्हलपमेंट, (१४) मार्केटिंग मॅनेजमेंट, (१५) फायनान्शिअल मॅनेजमेंट, (१६) बायप्रॉडक्ट टेक्नॉलॉजी, (१७) फॅटरिच डेअरी प्रॉडक्ट्स, (१८) चिज टेक्नॉलॉजी, (१९) मार्केट मिल्क आदी विषय घटक शिकता येतात.

**संपर्क- (१) कॉलेज ऑफ डेअरी टेक्नॉलॉजी वरुड (पुसद) (पोस्ट मोहा, पुसद- ४४५२०४, दूरध्वनी-०७२३३-२४८६९६, संकेतस्थळ- cdtwarudmafsu. ac. in, ईमेल- addtcwarud@gmail. com), (२) कॉलेज ऑफ डेअरी टेक्नॉलॉजी-उदगीर, जिल्हा- लातूर (संपर्क- वेटर्नरी उपकेंद्र, उदगीर- ४१३५१७, दूरध्वनी- ०२३८५-२५४७५४, संकेतस्थळ- cdtudgmafsu. ac. in)**

## कृषी निर्यात व्यवस्थापक

कृषीक्षेत्रावर आधारित उद्योग आणि व्यवसायांना भारत सरकारमार्फत प्रोत्साहित केले जाते. या क्षेत्रातील निर्यात वाढीवरही लक्ष केंद्रित केले जाते. निर्यातक्षम कृषी उद्योगांना, उत्कृष्ट दर्जाच्या व्यावसायिक नेतृत्वाची गरज भासते. ही गरज भागवण्याचे काम, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ॲग्रिकल्चर एक्स्पोर्ट ॲण्ड बिझिनेस मॅनेजमेंट, हा अभ्यासक्रम करतो. हा अभ्यासक्रम, इंडियन इंस्टिट्यूट ऑफ प्लँटेशन मॅनेजमेंट, या संस्थेने सुरू केला आहे. ही संस्था भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने स्थापन केली आहे.

या अभ्यासक्रमात, कृषीव्यवसाय निर्यातीसाठी आवश्यक घटकांचे दर्जेदार शिक्षण प्रदान केले जाते. अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षे. यामध्ये १२ आठवड्यांच्या उन्हाळी इंटर्नशीपचा समावेश आहे. शैक्षणिक आदानप्रदान योजनेंतर्गत, सहयोगी परदेशी शैक्षणिक संस्थांमध्ये अध्ययनाचीही संधी दिली जाते.

अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के.) कृषी व तत्सम विषयातील (उदा- उद्यानविद्या, वानिकी), पदवीधरांना प्राधान्य दिले जाते. प्रारंभिक चाळणीसाठी कॅट/ मॅट/ सीमॅट/ एटीएमए परीक्षेतील वैध गुण ग्राह्य धरले जातात. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना, प्रोफेशनल ॲप्टिट्यूड टेस्ट द्यावी लागते. या अभ्यासक्रमाला अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे.

गोदरेज ॲग्रोव्हेट, महिको, टाटा कॉफी, मिल्की मिस्ट, अदानी विल्मर, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक इत्यादी कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले आहे.

**संपर्क** - https:// iipmb. edu. in, ईमेल- admissions@iipmb. edu. in

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
प्रस्तुत




घर तुमच्या स्वप्नातले पूर्तता आमच्या साथीने
टीजेएसबी
मर्यादा ₹3 करोड*
गृह कर्ज
8.25%
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# आत्मनिर्भर भारतासाठी 'प्रयास'

**भारत सरकारच्या** विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागामार्फत, नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर डेव्हलपिंग अ‍ॅण्ड हार्नेसिंग इनोव्हेशन (निधी) आणि प्रमोटिंग अ‍ॅण्ड अ‍ॅक्सलरेटिंग यंग अ‍ॅण्ड अ‍ॅस्पायरिंग टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनर्स (प्रयास) ही योजना राबवण्यात येते.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनामार्फत ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. भारत सरकार अशा संकल्पनांना प्रत्यक्ष साकारता यावे म्हणून, केंद्रीय संशोधन आणि विकास संस्था किंवा प्रयोगशाळा, संबंधितांना उपलब्ध करून देते. त्याचबरोबर अशा संकल्पनांच्या वाणिज्यकरणासाठी साहाय्य करते. या योजनेंतर्गत, नवसंकल्पना, प्रत्यक्ष प्रोटोटाइप (प्रारूप किंवा नमुना) स्वरूपात येण्यासाठी १० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य केले जाते. कामकाज करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जाते. मेंटॉरशीप म्हणजेच प्रेरकांचीही सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

**विशेषतः** नॅशनल सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनरशीप डेव्हलपमेंट बोर्ड (एनएसटीईडीबी) मार्फत प्रोत्साहित करण्यात आलेल्या, सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी आंत्रप्रिनरशीप पार्क (स्टेप) आणि टेक्नॉलॉजी बिझिनेस इनक्युबेटर्स (टीबीई) यांनी विकसित केलेल्या संकल्पनांना प्राधान्य दिले जाते. तथापि स्टेप आणि टीबीई यांचे मुख्य ध्येय हे वाणिज्यिक उपक्रमांसाठी नावीन्यूर्ण संकल्पना आणि तंत्रज्ञान यांचा शोध घेणे हा आहे. हा शोध घेताना सध्या अस्तित्वात आणि उपलब्ध असलेले ज्ञान, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांचा उपयोग करून विकसित केलेल्या संकल्पनांना उत्तेजन दिले जाते. या सुविधा शैक्षणिक, तांत्रिक, व्यवस्थापन संस्था किंवा तंत्रज्ञान आणि संशोधन पार्क राहू शकतात. अशा संकल्पनांना प्रारंभी प्रोटोटाइपमध्ये आणायचे असते. त्यासाठी निधीची गरज भासू शकते. या तांत्रिक संकल्पना, प्रत्यक्ष एखाद्या उत्पादनाच्या स्वरूपात विकसित करून उद्योजकतेला उत्तेजन दिले जाते.

आत्मनिर्भर भारत मिशन, अंतर्गत स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित विविध उत्पादनांच्या विकासावर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले जाते.

"प्रयास"चा मुख्य उद्देश, हा तरुण नवसंकल्पनाकार तंत्रज्ञ किंवा उदयोन्मुख व्यावसायिकाला उत्तेजन आणि प्रोत्साहन देणे हा आहे. अपयशाची भीती किंवा अपयशाची अजिबात चिंता न करता, आपल्या संकल्पनांवर काम करण्यासाठी हे साहाय्य उपयुक्त ठरते. यामुळे, संपूर्ण लक्ष या उत्पादनाच्या विकासावर केंद्रित करू शकतात. अशा पद्धतीने विकसित उत्पादनाच्या वाणिज्यिक कार्यासाठी इनक्युबेटकर्सकडे धाडू शकतात. यासाठी "प्रयास"योजनेंतर्गत इनक्युबेटर्सची निवड, प्रोग्रॅम मॅनेजमेंट युनिटद्वारे केली जाते. हे इनक्युबेटर्स, प्रयास केंद्र म्हणून कार्य करतात.

महाराष्ट्रात प्रयाससाठीची केंद्रे पुढीलप्रमाणे आहेत. (अ) मुंबई- (१) साइन (sine)- सोसायटी फॉर इनोव्हेशन अ‍ॅण्ड एन्टरप्रायझेस) आयआयटी मुंबई, (२) आरआयआयडीएल (रिसर्च इनोव्हेशन इनक्युबेशन डिझाइन लॅब), (३) सोमय्या युनिव्हर्सिटी, (४) सरदार पटेल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी मुंबई- बिझिनेस इनक्युबेशन, (ब) पुणे- (१) सायंस अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी पार्क, (२) आंत्रप्रिनरशीप डेव्हलपमेंट सेंटर-व्हेंच्युर सेंटर, (३) सीओईपी- भाऊ इंस्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन आंत्रप्रिनरशीप अ‍ॅण्ड लीडरशीप.

**संपर्क- प्रोग्रॅम मॅनेजमेंट युनिट, सोसायटी फॉर इनोव्हेशन अ‍ॅण्ड आंत्रप्रिनरशीप, आयआयटी मुंबई- ४०००७६, संकेतस्थळ-** https:// www. nidhi- prayas. org, **ईमेल-** nidhiprayas@sineiitb. org. **दूरध्वनी-०२२-२५७६७०१६**

## उद्योजकीय कार्यशाळा

नवउद्योजकांच्या साहाय्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता मंत्रालयामार्फत, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या लाभार्थ्यांना उपयुक्त ठरतील, अशा उद्योजकीय ऑनलाइन कार्यशाळा (वेबिनार), नियमितपणे आयोजित केल्या जातात. त्यासाठी खादी ग्रामोद्योग विभागाचे साहाय्य घेतले जाते. तरुणतरुणींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या अनुषंगाने या कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

या कार्यशाळांना, तज्ज्ञ, प्रशिक्षक आणि उद्योगक्षेत्रात प्रत्यक्ष कार्यरत व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाते. या कार्यशाळांमध्ये संबंधित उद्योगास आवश्यक असणारे तंत्रज्ञान, कार्यप्रणाली, प्रकिया, बाजारपेठीय संधी, याविषयी विस्तृत माहिती दिली जाते. पहिल्या पिढीतील उद्योजकांना, सक्षमतेने कार्यरत होण्यासाठी या कार्यशाळा उपयुक्त ठरतात.

या कार्यशाळांमध्ये पुढील सहा बाबींवर भर दिला जातो- (१) औद्योगिक क्षेत्राच्या तांत्रिक बाबी- संबंधित उद्योग प्रकियेसाठी आवश्यक अत्याधुनिक ज्ञान, यंत्रसामग्री, कच्चामाल याविषयीची माहिती दिली जाते. ही माहिती नवउद्योजकांना, त्यांची व्यूहनीती तयार करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. (२) व्यवसाय प्रारूप - स्वतःचा व्यवसाय /उद्योग सुरू करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल असे व्यावसायिक प्रारूप आणि त्यांच्या प्रभावाची माहिती करून दिली जाते. या माहितीचा उपयोग व्यवसायाची पायाभरणी करण्यासाठी होतो. (३) थेट संवाद- स्वतःच्या उद्योजकीय/व्यावसायिक समस्यांच्या निराकरणाबाबत उद्योग/व्यवसायातील तज्ज्ञांसोबत थेट संवाद साधता येतो. (४) शासकीय योजना- संबंधित उद्योग उभारणीसाठी उपयुक्त ठरतील अशा, शासकीय योजना, अनुदान, साहाय्य, धोरणे, निर्णय यांची माहिती दिली जाते. (५) भांडवल मार्गदर्शन- उद्योग/व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाची उभारणी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या स्त्रोतांविषयी सांगितले जाते.(६) संपर्कसाखळी- उद्योगाचा ब्रँड (मुद्रा) स्थापित करण्यासाठी, संपर्कसाखळी तयार करता येते. या कार्यशाळेच्या माध्यमातून इतर उद्योजक, मार्गदर्शक आणि सल्लागार, गुंतवणूकदार, भविष्यकालीन पुरवठादार यांच्यासोबत तयार केलेली संपर्कसाखळी उपयुक्त ठरते.

या कार्यशाळा सकाळी ११ ते दुपारी एक या कालावधीत आयोजित केल्या जातील. या कार्यशाळेसाठी कोणतेही शुल्क नाही. मात्र, इच्छुकांना https:// www. udyami. org. in/ workshop या संपर्क साखळीवर जाऊन नोंदणी करावी लागेल. नोंदणीची प्रकिया सोपी असून केवळ नाव, ईमेल आणि भ्रमणध्वनीची नोंद करून अर्ज सादर करावा लागतो.

## आयटी इनक्युबेटर

आधुनिक तंत्रज्ञान आणि ज्ञानावर आधारित उद्योगांच्या विकासासाठी, नव्या संकल्पनांची गरज असते. अशा संकल्पना ज्या संशोधक/व्यक्तींकडून मांडल्या जातात, त्यांना विशिष्ट स्वरूपाच्या साहाय्याची गरज भासते. ही गरज भागवण्यासाठी, ''आयटी इनक्युबेटर'' हा पायाभूत सुविधा पुरवणारा प्रकल्प, नॅशनल स्माल इंडस्ट्री कॉर्पोरेशन (एनएसआयसी) मार्फत राबवला जातो. याद्वारे नवउद्यमींच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी साहाय्य केले जाते. त्यासाठी लागणारे भांडवल आकर्षित करण्यासाठी, या साहाय्याचा उपयोग होतो.

## उद्दिष्टे

(१) पहिल्या पिढीच्या उद्योजकांना उपयुक्त ठरेल, अशा माहिती, संवादसंप्रेषण आणि तंत्रज्ञानक्षेत्रात, शास्वत स्वरूपाच्या उद्योजकतेचा विकास करणे, (२) व्यवसायामध्ये रूपांतरित होऊ शकेल, अशा नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देणे, (३) व्यावसायिक स्वरूपाचे यश मिळवू शकेल, अशा संशोधन आणि विकास प्रकल्पांना प्रोत्साहन आणि चालना देणे, (४) एनएसआयसीच्या तज्ज्ञतेचा वापर करून स्टार्टअप्सना यशस्वी लघुउद्योगात रूपांतरित करणे, (४) उद्योजक आणि संशोधन व विकासकार्यात संपर्कसाखळी म्हणून कार्य करणे.

## सुविधा आणि साहाय्य

(१) संगणकीय हार्डवेअर सुविधा, सॉफ्टवेअर संग्रहालय, इंटरनेट आणि व्यवसाय केंद्राच्या सुविधेसह सुसज्ज अशी इमारत, (२) प्राथमिक स्तरावरील समुपदेशन/ प्रशिक्षण सुविधा, व्यवसाय नियोजन आराखडा अधिक सक्षम करण्याची सुविधा, विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सल्ल्याची सुविधा, बाजाराची (मार्केट) ओळख, (३) प्रगत स्तरावरील बीज भांडवल सुविधा, व्हेंच्युर (व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा नवोपक्रमाला मूर्त स्वरूप देण्यासाठीचे प्रारंभीचे अर्थसाहाय्य) भांडवल, बाजार सर्वेक्षण, कायदेशीर बाबींसाठी साहाय्य, दस्तावेजीकरणासाठी साहाय्य, (४) व्यवसाय भागीदारांचा शोध, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, उद्योग सुरू करण्यासाठी कायदेशीर आणि वैधानिक साहाय्य.

## अर्ज कोण करू शकतात?

(१) प्रशिक्षणाची गरज असलेले विद्यार्थी किंवा स्टार्टअपचे संभाव्य कर्मचारी, (२) उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या किंवा नवीन उद्योग स्थापन करणाऱ्या व्यक्ती, (३) नजिकच्या विद्यापीठांमधील संशोधकांचा समूह, (या समूहासोबत सहभागीदार असलेल्या उद्योजकाने संशोधनासाठी काही प्रमाणात वित्तीय साहाय्य केले असते. या संशोधकांमार्फत, भागीदार उद्योजकाच्या गरजेनुसार, वस्तूचा विकास केला जातो.) (४) उद्योगांमध्ये विश्वासार्हता कमावून आता, स्वतः एखादी वस्तू किंवा उत्पादनाचा विकास करू इच्छिणाऱ्या व्यक्ती. (५) स्टार्टअप आणि संशोधकांना अर्थसाहाय्य करण्याचे आश्वासन देणारे गुंतवणूकदार, (६) इनक्युबेटरमधील संशोधक किंवा स्टार्टअपसोबत भागीदारी करू इच्छिणारे क्लायंट आणि विक्री प्रतिनिधी. (७) इनक्युबेटरमधील संशोधक/स्टार्टअप्सना, काही अटीशर्तींसह स्वतःकडील ज्ञान आणि कौशल्य देऊ इच्छिणारी विद्यापीठे, उद्योजक आणि खाजगी प्रशिक्षण संस्था.

**संपर्क- प्रोजेक्ट मॅनेजर, एनएसआयसी- टीबीआय ओखला, एनटीएससी प्रिमायसेस, ओखला इंडस्ट्रिअल एरिआ, न्यू दिल्ली- ११००२०, दूरध्वनी- ०११-२६९२६५१३ ईमेल-** itincubator@nsic. co. in

**सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी:१२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
Toll F

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# 'ती'च्या हाती व्यवस्थापनाची दोरी !

**कोणत्या ज्ञानशाखेतून आणि कोणत्या शैक्षणिक संस्थेतून पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेतल्यास उत्तम करिअर घडू शकते, हा प्रश्न, मुलींचे पालक आणि मुलींना कायम पडत असतो. याच्या उत्तराची दिशा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, या संस्थेकडे जाते. या संस्थेच्या वेगवेगळ्या कॅम्पसमधील, एमबीए अभ्यासक्रमांना मुलींना प्रवेश मिळाला, तर त्यांना उत्तमोत्तम करिअर संधी लगेच मिळू शकतात.**

**गेल्या काही** वर्षात, भारतीय कॉर्पोरेट किंवा मोठ्या उद्योगांनी आपल्या व्यवस्थापकीय प्रशासनाच्या संनियंत्रणासाठी पुरुष उमेदवारांसोबतच महिला उमेदवारांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे अनेक मोठ्या कंपन्या, उद्योग समूह, खाजगी बँका, वित्तीय संस्था, सल्लागार कंपन्या, यामध्ये महिला उमेदवारांना संधी मिळू लागलीय. या संधीचे सोने करत अनेक महिला उमेदवार, अल्पावधीत उच्चपदांवरही पोहचत आहेत.

आयआयएममधील प्रवेशाच्या प्रारंभिक चाळणीसाठी कॉमन ॲडमिशन टेस्ट (कॅट) ही परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेव्दारे प्रारंभिक चाळणीसाठी निवडल्या जाणाऱ्यांच्या यादीमध्ये, बरीच वर्षे मुलींची संख्या अल्पच होती. त्यामुळे लिंग वैविध्यता (जेंडर डायव्हरसिटी) साध्य होत नव्हती. ही बाब लक्षात घेऊन, विद्यार्थीनींची संख्या वाढवण्यासाठी, बऱ्याच आयआयएम यांनी, अंतिम निवड गुणांक तयार करताना, महिला उमेदवारांना अतिरिक्त गुण अथवा वेटेज अथवा पॉईंट देण्यास सुरुवात केली. परिणामी, गेल्या काही वर्षात आयआयएममधील मुलींची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. काही आयआयएममध्ये ही संख्या जवळपास मुलांइतकीच झाली आहे.

हे अतिरिक्त गुण/ वेटेज/पर्सेंटाइल पुढील प्रमाणे आहेत- (१) रोहतक आयआयममध्ये शैक्षणिक वैविध्यता आणि महिला विद्यार्थीनींना २० टक्के अधिक वेटेज दिले जाते. (२) नागपूर आयआयएममध्ये १० पॉईंट्स दिले जातात. (३) आयआयएम बोधगयामध्ये (काही अटी/ शर्ती/ नियमांच्या अधिन राहून) ३० टक्केपर्यंत जादा जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे धोरण राबवले जाते. (४) आयआयएम काशिपूरमध्ये अंतिम निवडीसाठी वेगवेगळ्या घटकांचे मिळून एकूण वेटेज ७५ निर्धारित करण्यात आले आहेत. महिलांना, ६ टक्के अतिरिक्त वेटेज दिले जाते. (५) आयआयएम रांची मधील एमबीए, एमबीए- बिझिनेस ॲनॅलिटिक्स आणि एमबीए -ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, या तिनही अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रकियेत अतिरिक्त ५ गुण दिले जातात. (६) आयआयएम तिरुचिरापल्ली- ६ टक्के वेटेज देते. (७) आयआयएम उदयपूरने प्रवेशासाठी ५७ टक्के वेटेज, हे कॅट गुणांना, २१ टक्के वेटेज लेखन क्षमता चाचणी आणि मुलाखतीला, प्रोफाइल (कामाचा अनुभव, शैक्षणिक आणि जेंडर) याला २२ टक्के वेटेज निधारीत केले आहेत. यामध्ये ५ टक्के वेटेज महिलांसाठी आहेत. (८) आयआयएम संबलपूर- १० गुण देते. (९) आयआयएम रायपूर, महिला उमेदवांराना, काही अटिंच्या अधिन राहून ७ टक्के वेटेज देते. (१०) आयआयएम विशाखापट्टणम १० वेटेज देते. (११) आयआयएम कोझिकोड १० टक्के वेटेज देते. (१२) आयआयएम अमृतसर १० टक्के वेटेज देते. (१२) आयआयएम सिरमौर ५ टक्के अतिरिक्त वेटेज देते. या संस्थेतील एमबीए अभ्यासक्रमासाठी एकूण ४० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतात. (१३) आयआयएम जम्मूमध्ये ५ टक्के गुण दिले जातात. त्याचबरोबर कॅटच्या एकूण गुण आणि पेपरमधील तिनही सेक्शन (व्हर्बल ॲबिलिटी आणि रिडिंग कॉमप्रिहेन्शन, डाटा इंटरप्रिटेशन आणि लॉजिकल रिझनिंग, क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी) मधील पर्सेंटाइलमध्ये मुलांपेक्षा सूट दिली जाते. उदा- खुल्या संवर्गातील मुलांसाठी प्रारंभिक चाळणीसाठी किमान पर्सेंटाइल ९१ लागत असल्यास, मुलींसाठी हे पर्सेंटाइल ८९ असते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत संवर्ग आणि नॉन क्रिमीलेअर इतर मागास वर्ग संवर्गातील मुलांसाठी प्रारंभिक चाळणीसाठी किमान पर्सेंटाइल ७४ लागत असल्यास, मुलींसाठी हे पर्सेंटाइल ७२ असते.

(वेटेज, गुण, पॉईंटस् या वेगवेगळ्या संज्ञांमुळे गोंधळून जाण्याचे कारण नाही. याचा सोपा अर्थ असाच आहे की, प्रवेश प्रकियेत मुलींना अतिरिक्त गुण दिले जातात. त्यासाठी उपरोक्त नमूद आयआयएम वेगवेगळ्या घटकांच्या नॉर्मलायझेशनचे (सामान्यीकरण) धोरण अवलंबते, त्यासाठी या संज्ञा वापल्या जातात.)

## फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट सायन्स

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनिजमेंट इतकीच महत्त्वाची असणारी आणि अनेक आयआयएमपेक्षा प्लेसमेंट, रिटर्न ऑन इव्हेंस्टमेंटमध्ये सरस ठरत असलेली, फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट सायन्स ही संस्था, एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी असलेल्या मुलाखतीच्या प्रकियेतील निवडीसाठी एकूण वेटेजमध्ये ५ अतिरिक्त गुण देते. ही संस्था युनिव्हर्सिटी ऑफ दिल्लीच्या अंतर्गत कार्यरत आहे. (https:// fms. edu/)

ही बाब लक्षात घेता, महाराष्ट्रीय अधिकाधिक मुलींनी कॅट परीक्षा देऊन, आयआएएममध्ये जाण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

## महाराष्ट्रातील संस्था

राष्ट्रीय स्तरावरील या व्यवस्थापन स्कूल सोबतच महाराष्ट्रातील पुढील दोन संस्थांमधील एमबीए अभ्यासक्रमांना मुलींनी प्रवेश मिळवल्यास त्यांना उत्तमोत्तम करिअरची संधी मिळू शकते. या दोनही



संस्थांमध्ये ३० टक्के जागा महिला उमेदवारांसाठी राखीव असतात.-

(१) सिडनहॅम इन्स्टिटयूट ऑफ मॅनिजमेंट स्टडीज, रिसर्च ॲण्ड आंत्रप्रिनरशीप एज्युकेशन -ही संस्था महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील संस्था आहे. देशातील नामवंत आणि दर्जेदार बिझिनेस स्कूलच्या यादित ही संस्था कायम असते. पश्चिम भारतातील बिझिनेस स्कूलमध्ये पहिल्या १५ संस्थांमध्ये या संस्थेचा समावेश होतो. रिटर्न ऑन इनव्हेस्टेंट म्हणजेच एकूण शैक्षणिक शुल्क आणि मिळणारे वार्षिक पॅकिज, या प्रतवारित गेल्या अनेक वर्षात, देशातील पहिल्या दहा संस्थांमध्ये ही संस्था येते. या संस्थेत मास्टर ऑफ मॅनिजमेंट (एमएमएस) हा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, एमएच-सीइटी-एमएमए/एमबीए, कॅट, सीमॅट (कॉमन मॅनिजमेंट ॲडमिशन टेस्ट) या परीक्षांचे गुण ग्राह्य धरले जातात.

**संपर्क**- बी रोड, चर्चगेट मुंबई- ४०००२०, **संकेतस्थळ**- https:// simsree. org/ contact_ us/

(२) जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनजेमेंट स्टडीज- ही संस्था मुंबई विद्यापीठाची संलग्नित स्वायत्त संस्था आहे. देशातील पहिल्या १० व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये, या संस्थेचा समावेश होतो. संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांनी देशातील अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये, मुख्य कार्यकारी (चिफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर- सीइओ) अधिकारी या पदांपर्यंत मजल मारली असल्याने, या संस्थेचा उल्लेख, सीइओ फॅक्टरी असाही केला जातो. या संस्थेत एमएमएस (मास्टर ऑफ मॅनिजमेंट स्टडीज), एमएस्सी (फायनान्स), एमएचआरडी (मास्टर ऑफ ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट) या तीन अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

## प्रवेश प्रकिया

(१) एमएमएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, एमएएच-सीटी-एमएमएस/एमबीए आणि कॅट परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात.

(२) एमएस्सी (फायनान्स) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या प्रारंभिक चाळणीसाठी सीटी, कॅट या परीक्षेतील गुणांचा आधार घेतला जातो. जे उमेदवार संघ लोकसेवा (यूपीएससी) आयोगाच्या नागरी सेवा (सिव्हिल सर्व्हिस एक्झामिनेशन) परीक्षेची प्राथमिक आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी निवडले गेले असतील, त्यांना एमएस्सी फायनांस, अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीटी किंवा कॅट परीक्षा देण्याची गरज नाही. ते थेट मुलाखतीसाठी अर्ज करु शकतात. सीटी, कॅट आणि यूपीएससी मुलाखत स्तर, या तीनही गटातील उमदेवारांची व्यक्तिमत्त्व चाचणी घेतली जाते. यामध्ये मुलाखत, समूह कृती (ग्रुप ॲक्टिव्हिटी) आणि लेखन क्षमता चाचणी या तीन घटकांचा समावेश असतो.

(३) एमएचआरडी, या अभ्यासक्रमाचा प्रारंभिक चाळणीसाठी सीटी/कॅटच्या गुणांचा आधार घेतला जातो. या उमेदवारांना समूह कृती, मुलाखत आणि लेखन क्षमता चाचणी या तीन घटकांचा समावेश असणाऱ्या व्यक्तीमत्व चाचणीस सामोरे जावे लागते.

या संस्थेतील तीनही अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क हे आयआयएमपेक्षा कितीतरी पटींनी कमी आहे. अनेक नव्या आयआयमएमधील एमबीए अभ्यासक्रमापेक्षा या संस्थेतील एमएमएस अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना अधिक वार्षिक पॅकेज मिळत असते. देशातील सर्व महत्त्वाच्या कंपन्या, कार्पोरेट हाऊस प्लेसमेंटसाठी जातात. दरवर्षी १०० टक्के प्लेसमेंट होते.

**संपर्क**- १६४, बॅकबे रिक्लेमेशन, एच.टी पारेख मार्ग, मुंबई- ४०००२०, **संकेतस्थळ**-

https:// jbims. edu/ contact

*(सिडनहॅम इन्स्टिटयूट ऑफ मॅनिजमेंट स्टडीज, रिसर्च ॲण्ड आंत्रप्रिनरशीप एज्युकेशन आणि जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनजेमेंट स्टडीज या दोन्ही संस्थांमधील प्रवेशासाठी सीटी परीक्षेत पहिल्या दोनशे ते अडीचशेमध्ये येणे आवश्यक आहे.)*

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466
टीजे बँक
Bharose ka

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM-413507

# सायबर योद्धे

१. **गेल्या** काही महिन्यांत, सायबर गुन्हेगारांनी घातलेल्या धुमाकुळीच्या चर्चा, वेगवेगळ्या माध्यमातून केल्या जात आहेत. (पहलगाम घटनेनंतर १० लाखाच्या आसपास सायबर गुन्हेगारीच्या घटना घडल्याचे निदर्शनासे आले.) सायबर गुन्हेगारांपासून सावध आणि दक्ष राहण्याच्या सूचनेचा, मौखिक आणि मुद्रित संदेश, आपल्या स्मार्ट फोनवर सतत येतच असतो. यावरुनही सायबर गुन्ह्यांचे जाळे आपल्याभोवती कधीही पडू शकते, ही बाब स्पष्ट व्हावी. बँकिंग व्यवहारात, डिजिटल देवाणघेवाण वाढल्यापासून किंवा या व्यवहारांना अधिकाधिक प्रोत्साहन देणे सुरू झाल्यापासून, सायबर गुन्हेगारांची बुद्धिमत्ता आणखीनच तेजाळल्याचे दिसून येते.

सायबर गुन्हेबार, डिजिटल व्यवहारातील, आपल्या सूक्ष्म चूक किंवा त्रुटीकडे बारकाईने लक्ष ठेवतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये, भारतासह जगात मोठी वाढ झालेली दिसते. सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नही केले जात आहेत. त्यासाठी उच्चप्रशिक्षित, सायबर सुरक्षा मनुष्यबळाची गरजही मोठ्या प्रमाणावर वाढलीय. त्यामुळे या क्षेत्रात करिअरच्या चांगल्या संधी मिळू शकतात, ही बाब ध्यानात घेऊन, या क्षेत्राशी निगडित, उच्च तांत्रिक शिक्षण घेण्याचा पर्याय विद्यार्थ्यांनी निवडायला हवा. डाटा सिक्युरिटी काउंसिल ऑफ इंडिया (डीएससीआय) या संस्थेच्या निरीक्षणानुसार, पुढील एकदोन वर्षातच भारताला ६४ हजाराच्या आसपास सायबर सिक्युरिटी तज्ज्ञांची गरज भासू शकते.

## अभ्यासक्रम

सायबर सिक्युरिटीच्या अनुषंगाने काही संस्थांनी पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू केले आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमही करता येतात. पदवीस्तरीय अभ्यासक्रमात सर्वसाधारणपणे, पुढील विषयघटकांचा समावेश असतो - पेनिट्रेशन टेस्टिंग, व्हलनेरॅबिलिटी ॲसेसमेंट, सायबर क्राइम, सायबर फॉरेंसिक, मालवेअर ॲनॅलिसीस, एआय फॉर सायबर सिक्युरिटी, एन्टरप्राइज सिक्युरिटी, नेटवर्क ॲण्ड डाटा सिक्युरिटी, थ्रेट इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर सिक्युरिटी, सायबर सिक्युरिटी रेग्युलेशन.

## संस्था आणि अभ्यासक्रम

(१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, श्री सिटी चित्तूर - बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// www. iiits. ac. in

(२) नॅशनल फॉरेंसिक सायन्स युनिव्हर्सिटी- इंटिग्रेटेड बीटेक-एम.टेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग (सायबर सिक्युरिटी), हा अभ्यासक्रम संस्थेच्या गांधीनगर, दिल्ली, त्रिपुरा, धारवाड, गौहाटी या कॅम्पसमध्ये करता येतो, **संपर्क संकेतस्थळ** - nfsu. ac. in/ admission

(३) एसआरएम इंस्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी,तिरुचिरापल्ली- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// www. srmist. edu. in

(४) व्हेलोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// vit. ac. in/ schools/

(५) मुकेश पटेल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट ॲण्ड इंजिनिअरिंग, मुंबई- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी), **संपर्क-** https:// engineering. nmims. edu/ btech- degree-programmes/ b- tech- computer- science- cybersecurity/

(६) एमआयटी पुणे- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (सायबर सिक्युरिटी ॲण्ड फोरेंसिक), **संपर्क-** https:// admissions. mitwpu. edu. in/

(७) विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सिक्युरिटी ॲण्ड ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी), **संपर्क-** https:// www. vit. edu



(८) डी.जे संघवी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग- बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सिक्युरिटी ॲण्ड ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी), **संपर्क-** https:// www. djsce. ac. in/

(९) सीडॅक (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग)- या संस्थेने, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन (१) सायबर सिक्युरिटी ॲण्ड फॉरेंसिक आणि (२) आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, सिस्टिम्स ॲण्ड सिक्युरिटी हे प्रत्येकी सहा महिने कालावधीचे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. अर्हता- आयटी/कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स/ टेलिकम्युनिकेशन/ इलेक्ट्रिकल /इंस्ट्रुमेंटेशन या विषयातील अभियांत्रिकी पदवी किंवा कॉम्प्युटर सायन्स/आयटी/ इलेक्ट्रॉनिक्स या विषयातील एम.एस्सी किंवा कोणत्याही विषयातील अभियांत्रिकी पदवी किंवा मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) किंवा भौतिकशास्त्र/ गणित/ सांख्यिकी या विषयातील पदव्युत्तर पदवी. **संपर्क-** https:// www. cdac. in

याक्षेत्रात येण्यासाठी माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र किंवा यासारख्या अभ्यासक्रमांसोबतच पुढील काही प्रमाणपत्र प्रशिक्षणही महत्त्वाची, अर्हता ठरतात - यामध्ये, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इंडस्ट्री असोशिएशन सिक्युरिटी (कॉम्पटीआयए सिक्युरिटी), सर्टिफाइड इन्फॉर्मेशन सिस्टिम्स सिक्युरिटी प्रोफेशनल (सीआयएसएसपी), सर्टिफाइड इथिकल हॅकर, यांचा ठळकपणे उल्लेख करावा लागतो. क्लॉऊड सिक्युरिटी, रिस्क ॲनॅलीसीस, इंट्रुजन डिटेक्शन, माहिती सुरक्षेची साधने, ही कौशल्य प्राप्त केल्यास, याक्षेत्रात अधिक चांगल्या करिअर संधी मिळू शकतात.

## करिअर संधी

सायबर सिक्युरिटीच्या क्षेत्रात पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) सायबर सिक्युरिटी ॲनॅलिस्ट - या तज्ज्ञांचे वर्णन डिजिटल गार्ड किंवा डिजिटल सुरक्षा रक्षक असे केले जाते. हे रक्षक कोणत्याही संशयास्पद कृत्याचा शोध घेतात. नेटवर्क सुरक्षेचे संनियंत्रण करतात. माहिती तंत्रज्ञानातील सायबर सुरक्षेच्या प्रवाहांबाबत संशोधन करतात. वापरकर्त्यांना सुरक्षा नियमावलीचे प्रशिक्षण देतात, (२) सिक्युरिटी टेस्टर- सायबर हल्ल्यापासून बचाव करण्याच्या यंत्रणेचा विकास करण्यासाठी, अशा हल्ल्यांचे सदृष्यीकरण करुन, संभाव्य धोक्यांचा शोध, हे तज्ज्ञ घेतात, (३) नेटवर्क सिक्युरिटी इंजिनीअर- कोणताही संभाव्य सायबर हल्ला थोपवण्यासाठी, नेटवर्कचे डिझाइन आणि संरक्षण, सुरक्षा हॉर्डवेअर आणि सॉफ्टवेअरचे एकत्रिकरण, जोखीम व्यवस्थापन, हे अभियंते करतात. (४) सायबर सिक्युरिटी कंसल्टंट- एकाच वेळी अनेक ग्राहकांना, सायबर सुरक्षेविषयी सल्ला आणि मार्गदर्शन करतात. प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार अतिशय भक्कम अशी सुरक्षा कार्यप्रणाली विकसित करतात. जोखीम विश्लेषणाचे कार्य करतात, (५) इन्फॉर्मेशन सेक्युरिट स्पेशॅलिस्ट- संस्थात्मक पातळीवरील सायबर सुरक्षा यंत्रणा आणि प्रणाली हाताळण्याचे कौशल्य या तज्ज्ञांकडे असते. संस्थागत पातळीवर सायबर सुरक्षेविषयी प्रशिक्षण देतात. ॲण्टीव्हायरस सॉफ्टवेअरचे संनियंत्रण करतात, (६) सायबर सिक्युरिटी मॅनेजर- संस्थेतील सुरक्षा पथकाचे संनियंत्रण करतात. उच्च श्रेणीचे सुरक्षा नियोजन करतात, त्यासाठी निधीची उपलब्धतता करुन घेतात. (७) चिफ इन्फॉर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर- संस्थांतर्गत, सायबर सुरक्षा हाताळणारे सर्वोच्च अधिकारी म्हणून, हे तज्ज्ञ कार्य करतात. विविध पथकांचे संनियंत्रण करतात. कंपनीच्या किमती मालमत्तेच्या संरक्षणासाठी विविध धोरणे आखून, त्यांची अंमलबजावणी करतात, (८) सायबर सिक्युरिटी इंसिडेंट रिस्पॉंडर- माहितीच्या साठ्याचे संरक्षण करण्यासाठी, सायबर हल्ले कमी होतील, यावर लक्ष केंद्रित करणे, सायबर धोक्यानंतर कार्यप्रणाली सुरळीत करणे, ही कार्ये या तज्ज्ञांना करावी लागतात. (९) आयटी ऑडिटर- माहिती कार्यप्रणालीचे मूल्यांकन, लेखा परीक्षण, सुरक्षा, कार्यक्षमता आणि अनुपालनाची खात्री हा तज्ज्ञ करतो.

## संधी देणाऱ्या संस्था

पुढील संस्थांमध्ये सायबर सिक्युरिटी तज्ज्ञांना करिअर संधी मिळू शकते- (१) शासकीय संस्था, (२) डिफेन्स कॉंट्रॅक्टर, (३) कंसल्टिंग फर्म्स, (४) शिक्षण आणि संशोधन संस्था, (५) माध्यमे आणि मनोरंजन संस्था, (६) निर्मिती संस्था- (७) परिवहन आणि साहित्य पुरवठा, (८) विमा कंपनी, (९) औषध निर्माण संस्था, (१०) क्लाऊड सेवा पुरवठादार, (११) वित्तीय संस्था, (१२) टेक जायंट्स, (१३) आरोग्यसुविधा (हेल्थकेअर), (१४) टेलिकम्युनिकेशन कंपन्या, (१५) ई कॉमर्स आणि रिटेल, (१६) उर्जा, (१७) स्टार्ट अप आणि इनोव्हेटर्स, (१८) गेमिंग उद्योग, (१९) अशासकीय संस्था, (२०) व्यावसासिक सेवा पुरवठादार कंपन्या.

## एथिकल हॅकर

सायबर हल्ल्याला परतवून लावणाऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळास, एथिकल हॅकर म्हणून ओळखले जातात. संभाव्य सायबर धोके किंवा जोखिमेच्या घटकांचा शोध घेण्यासाठी, या तज्ज्ञास कायदेशीररित्या संगणकीय यंत्रणा किंवा नेटवर्कमध्ये शिरकाव करता येतो. त्यामुळे त्यांना यंत्रणेतील कमकुवत दुवे, बाजू लक्षात येतात व त्यावरचे उपायही करता येतात. परिणामी, संभाव्य धोके टळतात अथवा हल्ले झाल्यास, ते तत्काळ परतवून लावणे शक्य होते. या तज्ज्ञांना, डिजिटल कार्यप्रणालीची सुरक्षा करण्यासाठी, सायबर हल्ल्यांचा सामना करणे, संभाव्य धोके ओळखणे, जोखीम कमी करणे, यासाठी विविध कौशल्ये प्राप्त करावी लागतात. कार्यप्रणालीच्या सुरक्षेचे संनियंत्रण आणि विश्लेषण करण्यासाठी, हॅकिंग तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो. नेटवर्कची सुरक्षा भक्कम केल्यावर, कोणताही डाटा/माहितीची चोरी करणे, या माहितीचा दुरुपयोग करणे, यापासून हल्लेखोरांना थोपवू शकते. यामुळे ब्लॅकमेल, वित्तीय नुकसान, प्रतिष्ठेच्या नुकसानीची जोखीम कमी होते. सायबर दहशतवाद्यांशी सामना करता येणे शक्य होते.

या क्षेत्रात (१) वेब ॲप्लिकेशन हॅकिंग, (२) सिस्टिम हॅकिंग, (३) वेब सर्व्हर हॅकिंग, (४) वायरलेस नेटवर्क हॅकिंग, या चार घटकांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी:१२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
S. M. D. M. MAHAVIDYALAYA * KALLAM- 413507 * Library



# 'उद्यमी'चा फायदा

**लघुउद्योग क्षेत्रात, सर्वाधिक रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी असल्याने, भारत सरकारने यावर ठळकरित्या लक्ष केंद्रित केले आहे. विशेषत: आपले प्रधानमंत्री याबाबत फार आग्रही असतात. सर्व प्रकारच्या लघुउद्योग व्यवसायाला, सतत प्रोत्साहन देतात.**

**आपल्या दैनंदिन** जीवनात, लघुउद्योग व्यावसायिकांना मोठे स्थान मिळू लागले आहे. लघुउद्योगातून उत्[illegible]ात लक्षणीय वाढ होते. त्यामुळे जीवनाचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास साहाय्य होते. या उद्योगाच्या उभारणीसाठी फारसे भांडवल लागत नाही. स्थानिक गरजा व आवश्यकता लक्षात घेऊन उद्योग /व्यवसाय सुरू केल्यास व त्यासाठी स्थानिक उपलब्ध कच्चा माल व संसाधने वापरल्यास नफ्याचे प्रमाण मोठे राहते. लघुउद्योग व व्यवसायांना प्रोत्साहन दिल्याने देशातील उद्योजकतेचा मोठा विकास होऊ शकतो, ही बाब अनेक शासकीय समित्यांनीसुध्दा लक्षात आणून दिली आहे.

काही छोट्या उद्योग/ व्यवासायातून रोजगार व स्वयंरोजगाराच्या चांगल्या संधी मिळू शकतात. अशा काही व्यवसायांचे प्रारुप (मॉडेल), भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकता मंत्रालयाने (एमएसएमइ- मायक्रो, स्माल अॅण्ड मिडियम एन्टरप्राइज) तयार केले आहे. ही मॉडेल्स, 'उद्यमी' पोर्टलवर ठेवण्यात आली आहेत.

उद्यमी (UDYAMI- अल्टिमेट ड्रीम ऑफ यंग अॅण्ड मॉर्डन इंडिया) या वेबपोर्टलची निर्मिती, एमएसएमइ मार्फत करण्यात आली आहे. उद्योजकतेला चालना देण्यासाठी, या पोर्टलच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात. या वेबपोर्टलवर उद्योग/ व्यवसायासाठी उपयुक्त ठरू शकणारी माहिती- (१) इंडसट्रिअल सोल्युशन्स, (२) इडिपी (आंत्रप्रिनरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) ट्रेनिंग, (३) प्रोजेक्ट रिपोर्ट्स, (४) स्किम, (५) वर्कशॉप, (६) रजिस्ट्रशेन, (७) हेल्पलाइन, या शीर्षकांखाली ठेवण्यात आली आहेत.

वेगवेगळ्या व्यवसायाचे मॉडेल https:// www. udyami. org. in/ industrial- solution/ small- business- models

संपर्कसाखळीवर बघायला मिळते. या या साखळीवरील 'हाऊ टू स्टार्ट यूवर बिझनेस?' या लिंकवरील, 'रजिस्टर नाऊ' या बटनवर क्लिक केले की, थेट https:// www. udyami. org. in/ login

या पोर्टलवर पोहचतो. या पोर्टलवर, 'उद्योजकता विकास कार्यक्रम (आंत्रप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम)' ही लिंक दिसते. या लिंकवर जाऊन, लॉगईन करु शकतो किंवा प्रशिक्षणासाठी नाव नोंदवू शकतो.

## कृषीमालावर आधारित व्यवसाय

कोणत्याही मोठ्या मॉलमध्ये किंवा किराणा दुकानांमध्ये, प्रकिया केलेले काजू, बडिशेप, मिरची पावडर, विविध प्रकारची पापडे, टोमॅटो सॉस, चटण्या, मसाले लोणची, अशी विविध उत्पादने असतात. या सर्व उत्पादनांची निर्मिती, कृषीआधारित प्रकिया व्यवसाय किंवा उद्योगांद्वारे केली जाते. या सर्व उत्पादनांना मोठी ग्राहकी लाभते. कृषी आधारित, प्रक्रिया उद्योग आणि व्यवसायासातून रोजगार आणि स्वंयरोजगाराच्या उत्तमोत्तम संधी निर्माण होऊ शकतात, ही बाब लक्षात घेऊन, 'उद्यमी' मार्फत प्रोत्साहन दिले जाते. त्याअनुषगांने विविध प्रशिक्षण कार्यक्रम आणि योजना राबवल्या जातात. या योजनेचा लाभ, प्रधानमंत्री रोजगारर्निमिती कार्यक्रम योजनेंतर्गत, अर्थसाहाय्य करून दिले जाते.

देशाच्या औद्योगिक विकासामध्ये, कृषी आधारित प्रकिया उद्योगाचा मोठा हातभार लागतो. या उद्योगामध्ये शेतीतील कच्च्या मालावर प्रकिया केली जाते. याप्रकिया उद्योगांमध्ये कृषी, वने आणि मासोळीपासून निर्मित वस्तुंच्या समावेश होतो.

## प्रशिक्षण संधी

'उद्यमी' प्रशिक्षण योजनेंतर्गत पुढील, अन्नप्रक्रिया उद्योगांच्या प्रशिक्षणाचा समावेश आहे- (१) मसाले तयार करण्याचा उद्योग, (२) टोमॅटो केचअप निर्मिती उद्योग, (३) टोमॅटो पुरी निर्मिती उद्योग, (४) बहुधान्य (मल्टीग्रेन) प्रकिया उद्योग आणि पॅकेजिंग, (५) काजू प्रकिया व्यवसाय, (६) किशमीश प्रकिया व्यवसाय, (७) पेठा निर्मिती व्यवसाय, (९) जिरा निर्मिती व्यवसाय, (१०) धने पावडर निर्मिती व्यवसाय, (११) गुळपावडर निर्मिती उद्योग, (१२) काळा तांदूळ प्रकिया व्यवसाय, (१३) मिरी पावडर निर्मिती व्यवसाय, (१४) बाजरी स्वच्छता आणि प्रकिया व्यवसाय, (१५) मसाला चहा निर्मिती प्रकिया, (१६) चिकोरी प्रकिया व्यवसाय, (१७) ग्रीन टी प्रकिया व्यवसाय, (१८) रोस्टेड मखाना प्रकिया व्यवसाय, (१९) तिखट निर्मिती व्यवसाय, (२०) बडिशेप स्वच्छता आणि प्रकिया व्यवसाय, (२१) उदीड दाळ पापड निर्मिती व्यवसाय, (२२) जिरे स्वच्छता आणि प्रकिया व्यवसाय, (२३) फळ लगदा (पल्प) प्रक्रिया व्यवसाय, (२४) सत्तू पावडर प्रक्रिया व्यवसाय. (२४) बटन मशरूम व्यवसाय, (२४) दही प्रकिया उद्योग, (२४) तूप प्रकिया उद्योग.



हे उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तिना, संबंधित उद्योग/व्यवसायाची माहिती 'उद्यमी,' प्रशिक्षण पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाते. या पोर्टलवरच या उद्योग आणि व्यवसायाचे, प्रशिक्षण मॉड्यूल ठेवण्यात आले आहेत. खादी आणि ग्रामोद्योग विभागाच्या मार्गदर्शक सूचीनुसार प्रशिक्षण मॉड्युल तयार करण्यात आले आहेत.

त्याव्दारे पुढील व्यवस्थापकीय आणि कार्यान्वयन कौशल्याचे ज्ञान प्रदान केले जाते- (१) व्यवसाय नियोजन, (२) विपणन, (३) वित्त, (४) कार्यान्वयन, (५) निर्मिती, (६) विपणन, (७) ब्रँडिंग, (८) उद्योजकता व्यवस्थापन, (९) बँकिंग, (१०) माहिती तंत्रज्ञान आणि ऑनलाइन व्यवसाय, (११) बुककीपिंग, (१२) व्यवसायातील जोखिम आणि शास्वतता, (१३) शासकीय योजनांसाठी वैधानिक पूर्तता.

प्रशिक्षणाचे व्हिडिओ इंग्रजी, हिंदी, मराठी, तेलुगु, तमिळ, मल्याळम, कन्नड या भाषेत उपलब्ध आहेत. अभ्यासाचे साहित्य पीडीएफ स्वरुपात उपरोक्त नमूद भाषेत उपलब्ध करुन दिले जातात. मूल्यांकनसुध्दा मराठी व उपरोक्त नमूद भाषांमध्ये उपलब्ध आहे. मूल्यांकनासाठी बहुपर्यायी प्रश्नसंच असतात.

## अर्थसाहाय्य

प्रकिया उद्योगाला अर्थसाहाय्य देण्याची योजना, सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योजकता मंत्रालयाच्या वतिने, केंद्रीय खादी आणि ग्रामोद्योग विभागामार्फत राबवली जाते. राज्यपातळीवर, खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकामार्फत, ही योजना राबवली जाते. खादी व ग्रामोद्योग विभागामार्फत वित्तीय साहाय्य, नोडल बँकांव्दारे केले जाते. या योजनेव्दारे, ग्रामीण आणि नागरी विभागात स्वयंरोजगाराची निर्मिती करण्याची क्षमता असणारे छोटे औद्योगिक घटक आणि प्रकल्पांची स्थापना व्हावी, असे अपेक्षित आहे. या योजनेद्वारे, ग्रामीण भागातील कुशल कारागिर आणि बेरोजगार युवकांसाठी त्यांच्याच पंरिसरात शास्वत स्वरुपाच्या, रोजगार संधींची निर्मिती, १८ वर्षावरील कोणत्याही इच्छुक व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येतो. त्यासाठी कोणत्याही प्रकारची उत्पनाची मर्यादा ठेवण्यात आलेली नाही.

**संपर्क-** (१) हेल्पलाइन- ९११८१३३५१३५, संकेतस्थळ- https:// www. udyami. org. in/ industrial- solution/ agro-based- food- processing#

हेल्पलाइनच्या माध्यमातून पुढील सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात- (१) नोंदणी संदर्भातील विविध समस्यांचे निराकरण, (२) प्रशिक्षणासंदर्भातील तांत्रिक समस्यांचे निराकरण, (३) मूल्यांकनासंदर्भातील समस्यांचे निराकरण, (४) प्रमाणपत्राची निर्मिती आणि तपासणी, (५) व्यवसाय नोंदणी मार्गदर्शन, (६) औद्योगिक कागदपत्रे, (७) तज्ज्ञांच्या मार्गदर्शन मालिका, (८) प्रकल्प अहवाल. हेल्पलाइनच्या, कॉलसेंटरची सेवा दररोज सकाळी व ते रात्रौ ९ वाजेपर्यंत सुरू राहते.

## ऑनलाइन प्रशिक्षण

उपरोक्त नमूद व्यवसाय प्रारुपाच्या अनुषंगाने ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलीय. यामध्ये- (१) विषयाची तोंडओळख, (२) नव्या व्यवसाय घटकाची सुरुवात, (३) विविध वैधानिक व व्यावसायिक नोंदणी प्रमाणपत्रे, (४) उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्यसंचाची निर्मिती, (५) उद्योग/व्यवसायाची उभारणी, (६) उद्योग/व्यवसायाला प्रत्यक्ष कार्यान्वीत करणे, (७) मार्केटिंग (विपणन), ब्रँडिंग (नाममुद्रा) ठसवणे, सेल्स (विक्री), (८) बँक व वित्तपुरवठा समजून घेणे, (९) करआकारणी व इतर वैधानिक बाबी, (१०) व्यवसायाची शास्वतता व विकास, (१०) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकतेला उपयुक्त ठरणाऱ्या शासकीय योजना, या विषयांचा समावेश आहे.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून व्यवसायाचा आराखडा तयार करणे, स्वयंरोजगाराचे फायदे समजून घेणे, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची महत्त्वाची वैशिष्ट्ये जाणून घेणे, यशस्वी उद्योजकांकडे असणाऱ्या कौशल्यसंचाची माहिती करुन घेणे, उद्योग किंवा व्यवसायास उभारणीसाठी आवश्यक असलेले टप्पे माहीत करुन घेणे, निवडलेल्या प्रकल्पाची व्यवहार्यता जाणून घेणे, निर्मिती व्यवस्थापनातील घटक, उद्योग/व्यवसायासाठी लागणाऱ्या वित्तीय बाबींचे विश्लेषण, विपणन व्यवस्थापनातील महत्त्वाच्या घटकांची ओळख करून घेणे, व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक विविध वैधानिक बाबीची माहिती करून घेणे, व्यवसाय वाढीचे टप्पे समजून घेणे, या महत्त्वाच्या, घटकांच्या संकल्पना स्पष्ट होतात. या प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करावी लागते. वेबपोर्टलवर तशी सुविधा आहे.

**संपर्क-** टोल मुक्त क्रमांक-१८००१०३८९११, व्यवसाय नोंदणीसाठी क्रमांक- ७५२६०००३३३, ईमेल- helpdesk@udyami. org. in

**– सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
प्रस्तुत
करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.25%* द.सा. पासून
*अटी लागू



S. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# माहितीसाठ्याचे कुशल खोदकाम

**विक्री, विपणन,** संशोधन, ग्राहकसेवा आदी मार्गातून, उद्योग, कॉर्पोरेट, व्यावसायिक संस्था, अनेक प्रकारची व्यामिश्र माहिती गोळा करत असते. विशिष्ट कालावधीनंतर, या माहितीचा प्रचंड साठा गोळा होतो. साठलेल्या या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर, संस्था किंवा कार्पोरेट हाऊसेस यांना, भविष्यात येणाऱ्या अडचणी, समस्या, प्रश्न याची कल्पना येते. कोणत्या क्षेत्रात तत्काळ सुधारणा करण्याची आवशक्यता आहे, हे कळते. कंपनीच्या महसुलात वाढ करण्या [illegible]ठी या विश्लेषणाचा उपयोग होतो.

सध्या (१) बँकिंग, (२) टेलिकम्युनिकेशन, (३) आऊटसोर्सिंग, (४) सोशल मीडिया, (५) फायनान्शिअल सर्व्हिसेस, (६) मॅन्युफॅक्चुरिंग, (७) हेल्थकेअर, (८) ट्रॅव्हल, (९) एनर्जी, (१०) ई-गव्हर्नन्स आणि (११) ई-कॉमर्स या क्षेत्रात, बिझिनेस अर्नॅलिटिक्स क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळाची सेवा मोठया प्रमाणावर घेतली जाते.

भारतात, या ज्ञानशाखेतील मनुष्यबळाची मागणी मोठया प्रमाणावर वाढली आहे. मात्र, सध्या तरी या क्षेत्रात पुरेशा प्रमाणात असे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नाही. (१) बिग डाटा (गोळा होणाऱ्या विविध प्रकारच्या माहितीचा साठा), (२) ॲनॅलिटिक्स (साठलेल्या माहितीचे सांख्यिकीय निष्कर्ष काढणे किंवा विश्लेषण करणे), (३) प्रॉबेबिलिटी (संभाव्यता), (३) मॅनेजिंग ॲबिलिटी (व्यवस्थापकीय कौशल्य), (४) बिझनेस अंडरस्टँडिंग (व्यवसायाची सूक्ष्म जाणीव), (५) मेंटनिंग रिसोर्सेस (संसाधनाची देखभाल) हे विषय हाताळणाऱ्या उच्चप्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता आढळून येते.

बिझिनेस ॲनॅलिटक्स तंत्र आणि प्रणालीद्वारे, निर्णय क्षमतेसाठी आवश्यक ठरणाऱ्या विश्लेषणात्मक, कार्यात्मक आणि तांत्रिक कौशल्यात वाढ करणे शक्य होऊ शकते. मॅकन्सी, मॉर्गन स्टॅनले, मायक्रोसॉफ्ट, टाटा समूह ,गुगल, फेसबुक, लिंकडइन, अमेरिकन एक्सप्रेस, डिलॉइट, ॲक्सेंच्युर, लार्सन ॲण्ड टयुब्रो अशासारख्या सर्वच मोठ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये या मनुष्यबळाची भरती केली जात आहे.

## करिअर संधी

या मनुष्यबळास (१) डाटा अर्नॅलिटिक्स, (२) फंक्शनल मॅनेजर्स (वित्त/ मनुष्य बळ/ विपणन/ वित्त/ कार्यान्वयन इत्यादी), (३) बिझिनेस ॲनॅलिस्ट प्रोजेक्ट मॅनेजर, (४) बिझिनेस इंटेलिजन्स एक्सपर्ट, (५) बिझिनेस ॲनॅलिटिक्स कन्सलटंट, (६) डाटा अर्नॅलिस्ट, (७) बिगडाटा अर्नॅलिस्ट, (८) डाटा अर्नॅलिटिक्स प्रोग्रॅमर, (९) डाटा मायनिंग एक्सपर्ट , (१०) डाटा वेअरहाऊस एक्सपर्ट, (११) प्रेडिक्टिव्ह मॉडेलर , (१२) क्वालिटेटिव्ह अर्नॅलिस्ट, अशा पदांवर कार्य करण्याची संधी मिळू शकते.

## डाटा मायनिंग

डाटा मायनिंग म्हणजेच माहितीचे उत्खनन करुन, बँका त्यांना भेडसावू शकणाऱ्या संभाव्य समस्या जाणून घेऊ शकतात, त्यादृष्टिने



त्यांना खबरदारीचे उपाय शोधणेसुध्दा सुलभ जाते. क्रेडिट कार्ड कंपन्यांना, फसवणूक करणाऱ्या घटक/ व्यक्ती/ कार्यप्रणाली अंदाज बांधणे शक्य होत आहे.

## अभ्यासक्रम आणि संस्था

### (१) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बिझनेस ॲनिलिटिक्स

हा आपल्या देशातील सर्वोत्कृष्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम देशातील तीन दर्जेदार संस्थांनी एकत्रितरित्या सुरू केला आहे. या तीन संस्था आहेत- (१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनिजमेंट, कोलकाता (आयआयएम), (२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर (आयआयटी) आणि (३) इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट कोलकाता (आयएसआय).

बिझनेस ॲनॅलिटिक्स, क्षेत्रातील जागतिक पातळीवरील सर्वोत्कृष्ट मनुष्यबळाची निर्मिती करण्याच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी, या तीन श्रेष्ठ संस्था एकत्र आल्या आहेत. हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध स्वरुपाच्या करिअर संधी सुलभतेने मिळाल्या आहेत. गणितीय विश्लेषणात गती व रस असणाऱ्या आणि आव्हानात्मक व्यावसायिक समस्यांना सोडवू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींसाठीं हा अभ्यासक्रम, उत्कृष्ट करिअर घडवण्याचा उत्तम पर्याय ठरू शकतो. हा अभ्यासक्रम, या तीनही संस्थांमध्ये अनुभवी प्राध्यापक शिकवतात. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये, प्रात्यक्षिकाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. अभ्यासक्रमाच्या कालावधीत, सातत्याने या क्षेत्रातील, व्यावसायिकांशी संवाद घडवून आणला जातो. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना, प्रत्येकी सहा महिने तीनही संस्थांमध्ये अभ्यास करावा लागतो. (अ) आयआएम कोलकता येथे व्यवस्थापनाच्या कार्यात्मक क्षेत्रात, ॲनलिटिक्स तंत्राचा वापर, (ब) आयएसआय कोलकता येथे, ॲनलिटिक्ससाठी आवश्यक असणारे सांख्यिकी आणि मशिन लर्निंग तंत्रकौशल्य, (क) आयआयटी कानपूर येथे ॲनलिटिक्सच्या विविध तंत्रज्ञानात्मक पैलूचे ज्ञान प्रदान केले जाते.

- या अभ्यासक्रमांचा कालावधी दोन वर्षांचा आहे. यामध्ये प्रतिष्ठित व्यावसायिक संस्थेतील, सहा महिन्याच्या इंटर्नशीपचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाची पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र तीनही संस्था एकत्रितरित्या देतात. हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना आयआयएम, आयआयटी आणि आयएसआय या तीनही संस्थांच्या प्लेसमेंट प्रक्रियेत संधी दिली जाते.

### अशी असते परीक्षा-

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, सीबीटी (कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट) घेतली जाते. या परीक्षेत १५० गुणांचे ५० प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न बहुपर्यायी (मल्टिपल चॉइस) पध्दतीचे असतात. प्रत्येक प्रश्नाचे फक्त एकच अचुक उत्तर असते. अचुक उत्तराला ३ गुण दिले जातात. चुकलेल्या उत्तरासाठी एका गुणाची कपात केली जाते. या पेपरमध्ये- (१) भाषिक आणि शाब्दिक क्षमतेचे (व्हर्बल ॲबिलिटी) १५ प्रश्न, (२) तार्किक कारणमीमांसा (लॉजिकल रिझनिंग) ५ प्रश्न, (३) माहिती विश्लेषण (डाटा इंटरप्रिटेशन आणि डाटा व्हिज्युलायझेशन) १५ प्रश्न (४) संख्यात्मक कल (क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटी) – २५ प्रश्न विचारले जातात.

या परीक्षेतील गुणांच्या आधारे उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण केले जाते. त्यानंतर विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाते.

**अर्हता**- या अभ्यासक्रमासाठी पुढील अर्हताप्रापत विद्यार्थी पात्र ठरतात- (१) बीई/ बीटेक/ एम कॉम/ एम.एससी किंवा (२) ज्या विद्यार्थ्यांनी ३ वर्षे कालावधीची अभियांत्रिकी पदविका करुन बीई/बीटेक अभ्यासक्रम पूर्ण केला असेल किंवा अभियांत्रिकी पदविकेनंतर चार वर्षे कालावधीचा बीएस्सी अभ्यासक्रम केला असेल, तेसुध्दा अभ्यासक्रमासाठी पात्र ठरतात, किंवा या सोबत चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा /कंपनी सेक्रेटरी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थीही पात्र ठरतात. या सर्व अभ्यासक्रमांमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना ६० टक्के आणि अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुण मिळायला हवेत.

**संपर्क- https:// www. iimcal. ac. in/ programs/ pgdba, ईमेल- pgdbaadmissions@iimcal. ac. in, दूरध्वनी- ०३३-७१२११२०३**

### (२) एमबीए-बिझनेस ॲनॅलिटिक्स

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, काशिपूर मधील बिझिनेस ॲनॅलिटिक्स, अभ्यासक्रमाची संरचना ही विद्यार्थ्यांना, सध्याच्या व्यावसायिक पर्यावरणात, व्यामिश्र स्वरुपाच्या माहितीसाठ्याचे विश्लेषण करून, सुयोग्य निर्णय घेणे शक्य व्हावे, याअनुषंगाने करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमात विविध व्यवस्थापकीय कौशल्य आणि ॲनॅलिटिक्सच्या तंत्राचा सुयोग्य समन्वय साधण्यात आला आहे. ॲनलिटिकल तंत्रकौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, संवादकौशल्य या तीन घटकांनी, भविष्यातील व्यावसायिक नेतृत्वाचा विकास, या अभ्यासक्रमाव्दारे होणे अपेक्षित आहे. डाटा ॲनॅलिटिक्सच्या तंत्रकौशल्यामुळे, या विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसायाच्या अधिक प्रगतिसाठी व्युहनीती विकसित करणे आणि त्यानुसार अचूक निर्णय घेणे शक्य होते. या अभ्यासक्रमामध्ये अनुभवासाठी इंटर्नशीपची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षे. अर्हता- कोणत्याही शाखेतील पदवी- खुला संवर्ग- ५० टक्के, राखीव संवर्ग- ४५ टक्के. प्रारंभिक चाळणीसाठी कॅट परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात. **संपर्क- https:// iimkashipur. ac. in**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट बेंगळुरुनेसुध्दा एमबीए इन बिझिनेस ॲनिलिटिक्स हा अभ्यासक्रम सरू केला आहे. कालावधी दोन वर्षे. अर्हता- कोणत्याही विषयातील ६० टक्के गुणांसह पदवी (खुला संवर्ग), ५५ टक्के (राखीव संवर्ग). या अभ्यासक्रमाच्या प्रारंभिक चाळणीसाठी कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (कॅट) परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. **संपर्क- ttps:// www. iimb. ac. in**

(३) पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट कोर्स इन बिझनेस ॲनॅलिटिक्स- हा अभ्यासक्रम, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तिरुचिरापल्लीने, सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी तेरा महिने. अर्हता- कोणत्याही विषयातील ५० टक्के गुणांसह पदवी (खुला संवर्ग), ४५ टक्के (राखीव संवर्ग).

या अभ्यासक्रमात, ऑपरेशन रिसर्च फॉर बिझिनेस, डाटा सायंस युझिंग पॉयथॉन, डाटा कलेक्शन, व्हिज्युलायझेन ॲण्ड स्टोरीटेलिंग वुइथ डाटा, प्रेडिक्टिवह मॉडेलिंग, डाटा मायनिंग, बिझनेस इंटेलिजन्स ॲण्ड ॲनॅलिटिक्स, रिस्क ॲनॅलिटिक्स, फायनांशिअल ॲनलिटिक्स, फायनान्शिअल ॲनॅलिटिक्स, पिपल ॲनॅलिटिक्स, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड मशिन लर्निंग, मार्केटिंग ॲनॅलिटिक्स, ऑपरेशन ॲण्ड सप्लाय चेन ॲनॅलिटिक्स आदी विषयघटकांचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम सध्या कार्यरत असणाऱ्या व्यावसायिकांना उपयुक्त ठरू शकतो.

**संपर्क- https:// www. iimtrichy. ac. in**

सुरेश वांदिले

टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



टीजेएस्बी मुदत ठेव योजना
आजच गुंतवणूक करा !
७.३०%* सामान्य नागरिक
७.५५%* ज्येष्ठ नागरिक
कालावधी: १२ महिने
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
Toll Fr

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# कौशल्याची कला !

**महाराष्ट्र शासनाने** सुरू केलेल्या, रतन टाटा कौशल्य विद्यापीठात पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, प्रमाणपत्रे असे, कौशल्य निर्मितीचे विविध अभ्यासक्रम करता येतात. पांरपरिक विद्यापीठातील अभ्यासक्रमांपेक्षा या अभ्यासक्रमांची संरचना वेगळ्या पद्धतीने करण्यात आली असून प्रात्यक्षिकांवर अधिक लक्ष केंद्रित केले जाते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार टप्प्याटप्प्याने या अभ्यासक्रमातून बाहेर पडण्याची सुविधाही आहे. त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी प्रदान केली जाते. या टप्प्यांमध्ये निर्धारित करण्यात आलेले कौशल्य, विद्यार्थी प्राप्त करतो. हे कौशल्य त्याला रोजगार-स्वयंरोजगारासाठी उपयुक्त ठरते.

## कौशल्य विकास

या संस्थेच्या, स्कूल ऑफ क[illegible]र्स अ‍ॅण्ड मॅनेजमेंट स्किलने, मॅकडोनाल्ड या बहुराष्ट्रीय फूड चेन (अन्नसाखळी) कंपनीच्या सहकार्याने आतिथ्यसेवा क्षेत्रातील पुढील अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

### (१) बॅचलर ऑफ बिझनेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन (बीबीए) इन रेस्टॉरंट मॅनेजमेंट-

नेतृत्व कौशल्य, वेगळा विचार करण्याचे कौशल्य, रेस्टॉरंटच्या अनुषंगाने मनोरंजनाच्या बाबी, पाककलेचे विविध पैलू, कॅटेरिंग (खाद्यपेय व्यवस्था) विपणन, ग्राहकाची वर्तणूक, विक्री, व्यवस्थापन आदी बाबींचे ज्ञान, या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रदान केले जाते. कालावधी चार वर्षे. हा अभ्यासक्रम ठाणे आणि लोणावळा कॅम्पसमध्ये शिकवला जातो. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर एनएसक्यूएफ लेव्हल (नॅशनल स्किल क्वालिकेशन फ्रेमवर्क- राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता रचना- स्तर) चार प्राप्त होते. हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन वर्षांनंतर पदविका, तीन वर्षांनंतर बॅचलर ऑफ व्होकेशन आणि चार वर्षांनतर बीबीए पदवी मिळू शकते.

या अभ्यासक्रमात पुढील कौशल्ये प्रदान केली जातात- (१) अन्न आणि खाद्यपेय सेवा व्यवस्थापन, (२) रेस्टॉरंट कार्यान्वयन आणि व्यवस्थापन, (३) ग्राहकसेवा आणि अतिथी समाधान, (४) मालसाठा/सूची नियंत्रण आणि व्यवस्थापन, (५) खर्च व्यवस्थापन आणि अंदाजपत्रक, (६) रेस्टॉरंटचे विपणन व प्रचार आणि प्रसिद्धीसाठी व्यूहनीती, (७) कर्मचाऱ्यांची नियुक्ती, प्रशिक्षण, देखरेख, (८) गुणवत्ता नियंत्रण आणि अन्नसुरक्षा नियामके, (९) विक्री आणि महसूल व्यवस्थापन, (१०) पाककलेतील प्रवाह आणि नावीन्यता, (११) रेस्टॉरंट उभारताना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक, (१२) प्रभावी संवाद आणि आंतरसमूह संवाद कौशल्य.

अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण, खुला संवर्ग ४० टक्के, राखीव संवर्ग- ३५ टक्के. १२ वीमध्ये इंग्रजीचा अभ्यास केलेला असावा किंवा दहावीनंतर ३ वर्षे कालावधीची पदविका किंवा १ वर्ष कालावधीचा आयटीआय अभ्यासक्रम आणि औद्योगिक क्षेत्रात १ वर्षाची, पूर्ण केलेली आणि प्रमाणित केलेली अप्रेंटिसशीप किंवा दोन वर्षाचा आयटीआय अभ्यासक्रम आणि बारावी समकक्ष प्रमाणपत्र.

### (२) रेस्टॉरंट ऑपरेशन-

हा तीन महिने कालावधीचा अभ्यासक्रम आहे. उपाहारगृहाचे संचालन आणि संनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने, या अभ्यासक्रमात सैद्धांतिक ज्ञान आणि प्रात्यक्षिकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये अन्नपदार्थांची निर्मिती, ग्राहक सेवा, मालसाठा/सुचीवर नियंत्रण, नेतृत्व कौशल्य याबाबींचे ज्ञान प्रदान केले जाते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राला संबंधित उद्योगामार्फत मान्यता दिली जाते. त्यामुळे संबंधित उमेदवाराला रोजगाराच्या संधी सुलभतेने मिळू शकतात. हे अभ्यासक्रम, या विद्यापीठाचे विद्याविहार कॅम्पस मुंबई, पुणे आणि नागपूर येथे करता येतात.

### (३) बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रशेन



या विषयातील प्रमाणपत्र आणि पदवी अभ्यासक्रम, झुडियो संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आले आहेत. रिटेल, बीएफएसआय (बँकिंग, फायनांशिअल सर्व्हिस अ‍ॅण्ड इंश्युरन्स), विपणन, कार्यान्वयन, रिटेल आस्थापना, कॉर्पोरेट पर्यावरण, ग्राहक संबंध व्यवस्थापन, आदी विषयांचे ज्ञान प्रदान केले जाते.

हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील कौशल्ये प्रदान केली जातात- (१) एक्सेल, (२) नेटवर्किंग (संपर्क साखळी), (३) वेगळा विचार करण्याचे कौशल्य, (४) समस्यांचे निर्धारण, (५) टॅली, (६) वित्तीय साक्षरता, (७) इंग्रजी संवाद कौशल्य, (८) परदेशी भाषा, (९) ग्राहक सेवा, (१०) वेळेचे व्यवस्थापन, (११) तणाव व्यवस्थापन, (१२) वित्तीय विश्लेषण, (१३) विक्री आणि विपणन. अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षे. हा अभ्यासक्रम पुणे, नागपूर आणि ठाणे कॅम्पसमध्ये करता येतो.

### (४) रिटेल स्टोअर ऑपरेशन प्रमाणपत्र-

अभ्यासक्रमाचा कालावधी तीन महिने. रिटेल उद्योग/व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन, या अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. रिटेल क्षेत्रातील रोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्य आणि ज्ञान या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रदान केले जाते. विषेशतः रिटेल विक्री कार्यान्वयन आणि ग्राहक सेवेवर अधिक भर दिला जातो. प्रत्यक्ष कामावरचे प्रशिक्षण, हे या अभ्यासकमाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे, या उद्योग/व्यवसायातील सर्व बारकावे विद्यार्थ्यांना अभ्यासणे शक्य होते. हा अभ्यासक्रम ठाणे, पुणे आणि नागपूर येथील कॅम्पसमध्ये करता येतो.

### (५) बीबीए इन फॅसिलिटी मॅनेजमेंट-

या विद्यापीठाच्या संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनीमार्फत, सेवासुविधा क्षेत्रासाठी आवश्यक असणारे कौशल्य विकसित केले जाते. स्वच्छ भारत मिशनमार्फत देशाला अधिक आरोग्यदायी केले जात आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन ही प्रबोधिनी कार्यरत आहे. महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायसिटीच्या सहकार्याने, सेवासुविधा क्षेत्रातील वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी, या अभ्याक्रमातून मिळणारे ज्ञान उपयुक्त ठरू शकते. या क्षेत्रातील उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणावर भर दिला जातो. हा अभ्यासक्रम, बीव्हीजी इंडिया लिमिटेड या कंपनीच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षांचा आहे. एके महिन्याच्या कालावधीचे फॅसिलिटी सुपरवायझर आणि सेक्युरिटी सुपरवायझर हे अभ्यासक्रमही करता येतात.

### ६) पदव्युत्तर पदवी

एमबीए अभ्यासक्रम, केपीएमजी, प्रायमस पार्टनर आदित्य बिर्ला ग्रुप, टाटा-ट्रेन्ट लिमिटेड, एमएसआयएनएस, आय स्पार्क फाउंडेशन, या संस्थांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांतर्गत (१) बिझनेस अ‍ॅनॅलिटिक्स, (२) फायनांशिअल मॅनेजमेंट, (३) न्यू एज मार्केटिंग, (४) इनोव्हेशन अ‍ॅण्ड न्यू व्हेंच्युर मॅनेजमेंट या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर व्यवस्थापकीय स्तरावरील करिअर सुरू व्हावे, या अनुषंगाने या अभ्यासक्रमातील विषयघटकांच्या माध्यमातून कौशल्य प्रदान केले जाते. या अभ्यासक्रमाच्या कालावधीत, (१) डिझाइन थिंकिंग, (२) डिजिटल टूल्स अ‍ॅण्ड टेक्निक्स, (३) गूगल अ‍ॅड्स, (४) गूगल अ‍ॅनॅलिटिक्स, (५) हब स्पॉट, (६) पॉयथॉन, (७) आर- प्रोग्रॅमिंग, ही प्रमाणपत्रे प्रदान केली जातात. इन्फ्ल्युंसर मार्केटिंग आणि कंटेंट मार्केटिंगचे ज्ञान प्रदान केले जाते. ९ महिन्यांचे प्रत्यक्ष कामावरचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. बिझिनेस अ‍ॅनॅलिटिक्स अभ्यासक्रमाचे बहुतांश विद्यार्थी कंसल्टिंग कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. एमबीए अभ्यासक्रम नवी मुंबई आणि नागपूर कॅम्पसमध्ये करता येतो.

हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी एनएसक्यूएफ स्तर -६ प्राप्त करतात. ज्या विद्यार्थ्यांना एक वर्षानंतर अभ्यासक्रमातून बाहेर पडायचे असेल, त्यांना पदव्युत्तर पदविका प्रदान केली जाते. अर्हता- या अभ्यासक्रमाला कोणत्याही विषयातील पदवीधर प्रवेश घेऊ शकतो.

हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील कौशल्ये प्राप्त होतात- (१) प्रगत संवाद कौशल्य आणि वाटाघाटी कौशल्य, (२) विश्लेषणात्मक कौशल्य, (३) डिजिटल मार्केटिंग, (४) डिझाइन थिंकिंग, (५) नवीन व्यवसाय उभारणी, (६) डाटा (माहिती साठा) खोदकाम साधने आणि तंत्र, (७) डिजिटल विपणन (मार्केटिंग) साधने आणि तंत्र, (८) व्यवसाय कुशाग्रता,

प्रवेशासाठी सीयूईटी पोस्ट ग्रॅज्युएट परीक्षेतील गुणाचा प्रारंभिक चाळणीसाठी केला जातो. मुलाखतीनंतर अंतिम निवड केली जाते. अर्ज ऑनलाइन करावा लागतो.

**संपर्क- (१) महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ एलफिंस्टन टेक्निकल स्कूल, मेट्रो चौक, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१, संकेतस्थळ- https:// mssu. ac. in, (२) संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, शासकीय आयटीआय- कोपरी स्टेशन रोड, साधू वासवानी नगर, कोपरी ठाणे- ४०० ६०३, (३) आयटीआय, नांगरगाव, लोणावळा, कुसगाव बुद्रुक- ४१०४०१, (४) महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ, पुणे विद्यापीठ परिसर, पिंपळे,गौरव स्मार्ट सेंटर इमारत, राजमाता जिजाऊ उद्यानाच्या विरुद्ध दिशेला, पिम्पळे गौरव रोड, काशिद नगर पिंपरी चिंचवड- ४११०६१, (५) जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन दुसरा माळा नागपूर- ४०००२५**

**– सुरेश वांदिले**

B. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# उत्तम आरोग्यातून करिअरचा मार्ग

उत्तम आरोग्य आणि तंदुरुस्तीसाठी अधिकाधिक नागरिक जिम, फिटनेस सेंटर, फिटनेस स्टुडियोकडे वळताहेत. स्वतःला 'फिट अ‍ॅण्ड फाइन' ठेवण्याकडे मोठ्याप्रमाणावर जाणीवजागृती झालेली दिसते. ही बाब, भारतातील फिटनेस इंडस्ट्रीच्या वाढीसाठी उपयुक्त ठरतेय. गेल्या काही वर्षांत अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी (फिटनेस ब्रँड) भारतभर शाखाविस्तार केला. जिम आणि हेल्थ सेंटर्सची संख्या वाढली. त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि स्वयंरोजगार संधीही निर्माण झाली आहे.

सर्टिफाइड पर्सनल ट्रेनर (अधिकृत प्रमाणपत्रधारक व्यक्तिगत प्रशिक्षक) यांची मागणी वाढत चाललीय. अनेक संस्था असे प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवत असल्या तरी, मान्यताप्राप्त संस्थांचा अभाव दिसून येत होता. ही बाब लक्षात घेऊन, मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या, गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट, या संस्थेने, फिटनेस ट्रेनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. पर्सनल ट्रेनर होण्यासाठी आवश्यक असणारे सगळे विषयघटक या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत. हा अभ्यासक्रम केल्यावर विद्यार्थ्यांना भारत आणि परदेशातही चांगल्या संधी मिळाल्या आहेत.

## फिटनेस न्यूट्रिशन

हा कौशल्यनिर्मितीचा, अभ्यासक्रम केल्यावर जिम, हेल्थ सेंटर, फिटनेस सेंटर, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आदी ठिकाणी रोजगाराच्या संधी मिळू शकतात. स्वयंरोजगाराच्याही संधी मिळू शकतात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर मिळणारे प्रमाणपत्र, स्पोर्ट्स अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडियाच्या मार्फत निघणाऱ्या या क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी पात्र ठरवले जाते. मुंबई विद्यापीठातील, या विषयातील तज्ज्ञांनी या अभ्यासक्रमातील विषयघटकांना मान्यता प्रदान केली आहे. हा अभ्यासक्रम या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींकडून शिकवला जातो. प्रात्यक्षिकांवर भर दिला जातो.

दोन्ही अभ्यासक्रमांसाठी अर्हता- १०वी उत्तीर्ण, वयाची किमान १८ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

संपर्क- https://www.glcededu.co.in

मुंबई विद्यापीठ - सर्टिफिकेट कोर्स इन फिटनेस सेंटर मॅनेजमेंट. अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने. हा अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील १२वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला करता येतो.

संपर्क- डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, सांताक्रुज पश्चिम, मुंबई- ४०००९८.

संकेतस्थळ- https://partimecourses.mu.ac.in/

मणिपाल अ‍ॅकॅडेमी फॉर हायर एज्युकेशन- या संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या, मनिपाल कॉलेज ऑफ हेल्थ प्रोफेशन मार्फत, बीएस्सी इन एक्झरसाइज अ‍ॅण्ड स्पोर्ट्स सायंस, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अर्हता- १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या गटात किंवा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या गटात सरासरीने ४५ टक्के गुणांसह १२वी उत्तीर्ण. हा अभ्यासक्रम केल्यावर हेल्थ ट्रेनर, हेल्थ फिटनेस स्पेशलिस्ट, एक्सरसाइज स्पेशलिस्ट, एक्सरसाइज अ‍ॅण्ड स्पोर्ट्स फिजिऑलॉजिस्ट, स्पोर्ट्स अ‍ॅडमिनिस्ट्रेशन अशा करिअर संधी मिळू शकतात.

संपर्क- https://www.manipal.edu/soahs-manipal/program-list/b-sc--exercise-and-sports-science-.html

सिम्बॉयसीस स्कूल ऑफ स्पोर्ट्स सायंस, पुणे- या संस्थेने, बीएस्सी इन स्पोर्ट्स अ‍ॅण्ड एक्सरसाइज सायंस, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण. खुला संवर्ग ५० टक्के, राखीव संवर्ग ४५ टक्के.

संपर्क- https://www.ssss.edu.in

सोमय्या स्पोर्ट्स अ‍ॅकॅडेमी, मुंबई - अभ्यासक्रम बीएस्सी स्पोर्ट्स अ‍ॅण्ड एक्सरसाइज सायंस, कालावधी- तीन वर्षे, अर्हता- ४५ टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण.

संपर्क- https://sports-academy-files.somaiya.edu



लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन, ग्वाल्हेर- या संस्थेच्या, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फिटनेस मॅनेजमेंट, अभ्यासक्रमामध्ये फिटनेस व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे आणि संकल्पना, फिटनेस क्षेत्रातील नवे प्रवाह, पोषणविषयक सर्वसाधारण माहिती, स्नायू आणि त्याचे प्रकार, ताकद/ जोर (स्ट्रेंग्थ), लवचीकता, तग धरण्याची क्षमता, या प्रशिक्षणाची संकल्पना, व्यायामाचे शरीरशास्त्र, अशा विषयघटकांचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष. या अभ्यासक्रमाला कोणत्याही शाखेतील पदवीधराला प्रवेश घेता येतो. पदवी परीक्षेत खुल्या संवर्गातील विद्यार्थ्याला ४५ टक्के आणि राखीव संवर्गातील ४० टक्के गुण मिळायला हवेत. या अभ्यासक्रमाला चाळणी परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो. अर्ज करण्याची शेवटची तारीख २० जून २०२५ आहे. लेखी चाळणी परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी २५ जून ते २७ जून २०२५ या कालावधीत घेतली जाईल. लेखी परीक्षेला ४० गुण आणि शारीरिक क्षमता चाचणीला ६० गुण असतात. लेखी परीक्षेत वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न, उमेदवारास असलेली क्रीडा क्षेत्रातील सर्वसामान्य ज्ञानाची माहिती जाणून घेण्यासाठी विचारले जातात. कालावधी- १० मिनिटे. शारीरिक क्षमता चाचणीमध्ये धावणे, चालणे, उंच उडी यांसारख्या बाबींचा समावेश असतो. त्याविषयी विस्तृत माहिती संस्थेच्या माहितीपत्रकात देण्यात आली आहे.

## दूर शिक्षणपद्धतीचे अभ्यासक्रम

या संस्थेमार्फत पुढील अभ्यासक्रम मुक्त आणि दूरशिक्षण (डिस्टंस एज्युकेशन) पद्धतीने सुरू करण्यात आले आहेत- (अ) डिप्लोमा इन (१) स्पोर्ट्स मॅनेजमेंट, (२) स्पोर्ट्स जर्नालिझम, (३) स्पोर्ट्स अ‍ॅनॅलिटिक्स, (४) स्पोर्ट्स सायकॉलॉजी, (६) स्पोर्ट्स अ‍ॅनॅलिटिक्स. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण. खुला संवर्ग ४५ टक्के, राखीव संवर्ग ४० टक्के. (ब) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स इव्हेंट मॅनेजमेंट हा अभ्यासक्रमसुद्धा दूरशिक्षण पद्धतीने करता येतो. कालावधी एक वर्ष. अर्हता- कोणत्याही विषयातील पदवी उत्तीर्ण. खुला संवर्ग ४५ टक्के, राखीव संवर्ग ४० टक्के.

प्रवेश प्रक्रिया १ जुलै २०२५ ते २० ऑगस्ट २०२५ पर्यंत सुरू राहील. संस्थेच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीनेच प्रवेश घ्यावा लागतो. या अभ्यासक्रमांना थेट प्रवेश दिला जातो.

संपर्क- https://lnipe.edu.in/

## क्रीडा पत्रकारिता

भारतीय क्रीडा विश्वाने आता बरीच कात टाकली असून, क्रिकेटसह, बॅडमिंटन, बुद्धिबळ, हॉकी, कबड्डी, नेमबाजी, कुस्ती, टेनिस अशा खेळांमध्ये भारतीय खेळाडू दमदार कामगिरी करताना दिसतात. यामुळे क्रीडा रसिकांचाही ओढा इतरही खेळांकडे वाढू लागलाय. या सगळ्यांची वित्तंबातमी देण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी, खास प्रशिक्षण घेतलेले पत्रकार किंवा माध्यमकर्मींची गरज वाढत चाललीय. क्रीडा पत्रकारितेच्या किंवा कम्युनिकेशनच्या क्षेत्रात चांगले करिअर घडवता येणे शक्य आहे. यादृष्टीने पुढील काही अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतात.

### संस्था आणि अभ्यासक्रम

**(१) लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन-** एम इन स्पोर्ट्स जर्नालिझम- कालावधी दोन वर्षे. कोणत्याही विषयातील पदवीधराला हा अभ्यासक्रम करता येतो. खुल्या संवर्गातील उमेदवारास ४५ टक्के आणि राखीव संवर्गातील विद्यार्थ्याला ४० टक्के गुण मिळायला हवेत. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ५० गुणांची वस्तुनिष्ठ पद्धतीची ऑनलाइन चाळणी परीक्षा घेतली जाते. यामध्ये ३५ गुण हे विषयाचे ज्ञान तपासण्यासाठी आणि १५ गुण तार्किकक्षमता (रिझनिंग) तपासणीसाठी असतात. अर्ज करण्याची शेवटची तारीख २० जून २०२५ आहे.

या अभ्यासक्रमात पुढील घटकांचे ज्ञान प्रदान केले जाते- (१) क्रीडा पत्रकारितेची ओळख, (२) क्रीडा क्षेत्रासाठी माध्यमाची भूमिका, (३) पत्रकारांची भूमिका, (४) वृत्तमूल्य आणि वस्तुनिष्ठता, (५) बातमी आणि त्याचे घटक, (६) माध्यमांचे प्रकार, (७) माध्यमांचा अर्थ आणि संकल्पना, (८) पत्रकारितेचा अर्थ आणि संकल्पना, (९) पत्रकारितेतील नैतिक मूल्ये, (१०) पत्रकारितेतील व्यावसायिकता आणि प्रशिक्षण, (११) संपादक आणि उपसंपादकांचे कार्य आणि जबाबदारी, (१२) इव्हेंट व्यवस्थापनासाठी आवश्यक संवादकौशल्य, (१३) व्यवसाय संवादकौशल्याची ओळख, (१४) लेखन कौशल्य, (१५) नियतकालिकांसाठी लिखाणाचे गुणधर्म, इत्यादी.

**(२) मनिपाल इंस्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन-** पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्पोर्ट्स कम्युनिकेशन- कालावधी एक वर्ष. अर्हता- कोणत्या विषयातील पदवी. संपर्क- ३३रु२:// ६६६. छरु. ]ि/ २ु/ हा अभ्यासक्रम केल्यावर, मीडिया रिलेशन स्पेशलिस्ट इन स्पोर्ट्स क्लब, राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय क्रीडा चमूंचे प्रवक्ते, कम्युनिकेशन मॅनेजर, मीडिया आणि पब्लिक रिलेशन मॅनेजर, इव्हेंट कुऑर्डिनेटर, अशा संधी मिळू शकतात.

**(३) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जर्नालिझम अ‍ॅण्ड न्यू मिडिया, बेंगळुरू-** या संस्थेने पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ब्रॉडकास्टिंग, प्रिंट जर्नालिझ आणि ऑनलाइन/ मल्टिमीडिया जर्नालिझम हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामध्ये, स्पोर्ट्स रिपोर्टिंग, हा एक ऐच्छिक विषय निवडण्याची सुविधा आहे.

संपर्क- https://www.iijnm.org

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत




@9.50%*
द.सा.पासून
ॲसेट बॅक्ड क्रेडिट
तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर
कर्जाची रक्कम ₹ 5 कोटी* पर्यंत
वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने *

M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# सर्जनशीलतेचे नवे पर्व !

आपल्या देशात ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (एव्हीजीसी) क्षेत्राची झपाट्याने वाढ होत आहे. जागतिक पातळीवर, या क्षेत्रातील भारतीयांच्या कामगिरीची दखल घेतली गेलीय. आता, या क्षेत्रातील महत्वाच्या देशांमध्ये भारताचा समावेश केला जातो. पुढील काही वर्षातच जागतिक पातळीवरील ॲनिमेशन क्षेत्रातील ६० टक्के आशय (कंटेट) हा भारतीय राहू शकतो, अशी शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही वर्षात, भारतीय चित्रपटांनी अत्याधुनिक तंत्रकौशल्याचे प्रदर्शन करणारे ॲनिमेशन आणि दृष्यात्मक परिणाम (व्हिज्युअल इफेक्ट्स) साधणारे भव्य पट जगापुढे आणले आहेत. यातून दृष्यात्मक कथाकथनास नवे परिमाण मिळाले आहे. जागतिक पातळीवर ॲनिमेशनच्या प्रेक्षकांची भारतातील संख्या दुसऱ्या क्रमांकाची आहे. या क्षेत्रातील अमर्याद क्षमता लक्षात घेऊन भारत सरकारने, मुंबईत, नॅशनल सेंटर ऑफ एक्सलेन्स फॉर एव्हीजीसी-व्हीआर (व्हर्च्युअल रिॲलिटी), ही संस्था स्थापन केली आहे. ही संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी यानावाने ओळखली जाईल, अशी घोषणा, केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, गेल्या महिन्यात मुंबईत झालेल्या, व्हेव्हज (वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट) मध्ये केली. या संस्थेला विविध औद्योगिक फेडरेशनने साहाय्य केले आहे.

गेमिंग, ॲनिमेशन, कॉमिक्स, ऑगमेंटेड रिॲलिटी, व्हॅर्च्युअल रिॲलिटी, या क्षेत्रातील आशय निर्मितीचे भारत जागतिक केंद्र बनावे, हे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आ: यासाठी या क्षेत्राच्या विकासाला आणखी चालना मिळावी, यासाठी शास्वत आणि नावीन्यपूर्ण पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. देशी आशयाची अधिकाधिक निर्मिती आणि सर्जनशील प्रतिभावंतांची मोठ्या प्रमाणावर उलब्धता करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. ही संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या दर्जाची असेल. या संस्थेत प्रात्यक्षिकांवर अधिक भर देणारे अत्याधुनिक अभ्यासक्रम सुरू केले जातील. पुढील काळात या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या ५ लाखाच्या आसपास रोजगार संधीचा लाभ, या संस्थेतील विद्यार्थ्यांना मिळेल. जागतिक पातळीवरची आशय निर्मितीही होईल.

भारताच्या गेमिंग उद्योगाची वार्षिक वाढ २५ टक्के आहे. मोबाइल गेमिंग प्लॅटफॉर्मचा वापर करणाऱ्यांची संख्या आश्चर्यकारक गतिने वाढत असल्याने, या क्षेत्राच्या विकासालाही विलक्षण गती आली आहे. त्यामुळे गेमिंग, व्हीएफएक्स, ॲनिमेशन याक्षेत्रातील करिअरच्या संधीही वाढल्या आहेत. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुढील तंत्रकौशल्याची गरज असते-

(१) अनरिअल इंजिन, युनिटी, गोडॉट सारखे गेम इंजिन तंत्र- ग्राफिक्स, ध्वनी आणि गेम खेळण्यासाठीच्या यंत्रणेची निर्मिती, या तंत्राव्दारे केली जाते. (२) ब्लेंडर, ऑटोडेस्क माया, थ्रीडी मॅक्ससारखे थ्रीडी मॉडेलिंग तंत्र- ॲनिमेशनच्या स्वरुपातील पात्र, कथानकाचे पर्यावरण, विविध वस्तूंची निर्मिती, (३) सी प्लस प्लस (अनरिअल), सी (युनिटी), पायथन या सारख्या प्रोग्रॅमिंग भाषा- गेमप्लेची संहिता, प्रकियेचे स्वयंचलन आणि गेम निर्मितीसाठी आवश्यक असणारी साधने, (४) टेन्सरफ्लो, पाय टॉर्च, नॅवमेश सारखे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - बुध्दिमान नॉन प्लेअर (गेम मधील काल्पनिक पात्र, जे स्वतः खेळतात आणि ज्याला खरा खेळाडू नियंत्रित करु शकत नाही.) कॅरेक्टरची निर्मिती, आशयाची निर्मिती, (५) एफमॉड, डब्ल्यूवाइज, ऑर्डॅसिटी सारखे साऊंड डिझाइन कौशल्य- ध्वनी निर्मिती, पार्श्वध्वनी, (६) व्हुफोरिआ, ऑक्युलस, एसडीके, युनिटी, अनरिअल इंजिन सारखे ऑगमेंटेड रिॲलिटी/ व्हर्च्युअल रिॲलिटी तंत्र - खेळाडूंना गुंतवणूक ठेवणाऱ्या आणि वेढून टाकणाऱ्या एआर आणि व्हीआरची त्रिमिती चित्रे, (७) ॲबॉड, एक्सडी, फिग्मा, स्केच सारखे, युझर एक्सपिरिअंस डिझाइन/युझर इंटरफेस डिझाइन- अंर्तज्ञानी गेम प्रकियेचे डिझाइन करणे, (७) शेडर ग्रॅफ (युनिटी), मटेरिअल एडिटर (अनरिअल) शेडर्स आणि व्हीएफएक्स (व्हिज्युअल इफेक्ट्स)- अत्यंत आकर्षक असे दृष्यपरिणाम आणि ग्रॅफिक्सची निर्मिती



काही अभ्यासक्रम आणि संस्था-

(१) नॅशनल स्कूल ऑफ डिझाइन (एनआयडी), अहमदाबाद कॅम्पसमध्ये, बॅचलर ऑफ डिझाइन इन ॲनिमेशन फिल्म डिझाइन, ग्रॅफिक डिझाइन हा अभ्यासक्रम करता येतो. कालावधी चार वर्षे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण. प्रवेशासाठी संस्थेमार्फत घेण्यात येणारी चाळणी परीक्षा द्यावी लागते.

**संपर्क**- एनआयडी पाल्डी, अहमदाबाद- ३८०००७, **संकेतस्थळ**- https:// www. nid. edu/ about/ campuses/ ahmedabad-campus

(२) एनआयडीच्या बेंगळुरु कॅम्पसमध्ये, मास्टर ऑफ डिझाइन इन डिजिटल गेम डिझाइन, हा अभ्यासक्रम करता येतो. कालावधी- अडीच वर्षे. अर्हता कोणत्याही विषयातील पदवी किंवा बॅचलर ऑफ डिझाइन. चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो.

संपर्क- एनआयडी, १२, लिंक रोड, तुमकर रोडच्या विरुध्द दिशेला, बेंगळुरु- ५६००२२

**संकेतस्थळ**- https:// www. nid. edu/ academics/ programmes/ master- of- design- mdes/ digital- game-design- mdes

(३) फिल्म ॲण्ड टीव्ही इन्स्टिट्यूट पुणे- या संस्थेने, अंडर ग्रॅज्युएट सर्टिफिकेट कोर्स इन ॲनिमेशन ॲण्ड व्हिज्युअल इफेक्ट्स, हा तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण. अभ्यासक्रमाला संस्थेच्या चाळणी परीक्षेव्दारे प्रवेश दिला जातो.

**संपर्क**- लॉ कॉलेज रोड, एरंडवणे, पुणे- ४११००४, **संकेतस्थळ** - https:// ftii. ac. in/ p/ admission- process, **ईमेल**- academic. office@ftii. ac. in, **दूरध्वनी**- ०२०-२५५८००२२

(४) एशिअन ॲकॅडेमी ऑफ फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन (एएएफटी) नॉयडा- बीएस्सी गेम डिझाइन, बीएस्सी- ॲनिमेशन, बी. डिझाइन इन ॲनिमेशन ॲण्ड व्हिज्युअल इफेक्ट्स- या तिनही अभ्यासक्रमाचा कालावधी प्रत्येकी तीन वर्षे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण.

**संपर्क**- एएएफटी मारवाह स्टुडिओ कॉम्प्लेक्स वन, एफसी- १४/१५, सेक्टर- १६ ए, नॉयडा फिल्म सिटी, दिल्ली एनसीआर-२०१३०१, **संकेतस्थळ**- https:// aaft. com, **ईमेल**- help@aaft. com

(५) इमेज कॉलेज ऑफ आर्ट्स इन ॲनिमेशनं ॲण्ड टेक्नॉलॉजी- गेमिंग डेव्हलपमेंट (डिजिटल खेळांचा विकास)चा अभ्यासक्रम चालवणारी महत्वाची संस्था आहे. या संस्थेने राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळासोबत, कौशल्यनिर्मितीचे अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणासाठी भागिदारी केली आहे.

पदवीस्तरीय अभ्यासक्रम- (१) गेम प्रोग्रॅमिंग- अर्हता- १२वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा. कालावधी- चार वर्षे, (२) गेम डिझाइन ॲण्ड डेव्हलपमेंट - अर्हता- १२वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र आणि गणिताचा अभ्यास केलेला असावा. कालावधी- तीन वर्षे, (३) गेम आर्ट आणि डिझाइन, (४) युझर एक्सपिरिअंस डिझाइन ॲण्ड डेव्हलपमेंट, (५) बॅचलर डिग्री इन व्हिज्युअल इफेक्टस (व्हीएफएक्स) (क्रमांक ३,४ आणि ५ अभ्यासक्रमांसाठी अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण. कालावधी- तीन वर्षे.) या अभ्यासक्रमांना बारावीतील गुण आणि मुलाखतीव्दारे प्रवेश दिला जातो.

**संपर्क**- (१) ४२४ बोमनहल्ली, हौसर मेन रोड, बेंगळुरु, ५६००६८, दूरध्वनी- ०८०-४११०७७५५, संकेतस्थळ- www. icat. ac. in,

(६) व्हिसलिंगवूड इंटरनॅशनल (स्कूल ऑफ ॲनिमेशन ॲण्ड गेम डिझाइन)- बॅचलर ऑफ डिझाइन इन गेम डिझाइन, बॅचलर ऑफ डिझाइन इन व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझाइन, ॲनिमेशन, कालावधी चार वर्षे. अर्हता- कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी. ही पदवी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायंस, या संस्थेमार्फत दिली जाते.

**संपर्क**- फिल्मसिटी, गोरेगाव (पश्चिम) मुंबई- ४०००६५, दूरध्वनी- ०२२-६२७१६०७०, **ई-मेल**- admissions@whistlingwoods. net, **संकेतस्थळ**- whistlingwoods. net

(७) एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन- बॅचलर ऑफ डिझाइन इन गेम डिझाइन. कालावधी- चार वर्षे. संपर्क- राजबाग, लोणी- काळभोर, हडपसरच्या बाजूला, पुणे- सोलापूर महामार्ग, पुणे- ४१२२०१, **संकेतस्थळ**- mitid. edu. in,

(८) वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी- बीएस्सी मल्टिमीडिया ॲण्ड ॲनिमेशन, व्हिज्युअल कम्युनिकेशन, अर्हता- कोणत्याही शाखेतील १२ वी कालावधी- तीन वर्षे. प्रवेश- चाळणी परीक्षेव्दारे,

**संपर्क**- ॲडमिशन ऑफिस, वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वेल्लोर- ६३२०१४, दूरध्वनी- ०४४-४६२७७५५५, **ईमेल**- ugadmission@vit. ac. in https:// vit. ac. in/ admissions/ programmes- offered

(९) श्रीष्टी मनिपाल इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाइन ॲण्ड टेक्नॉलॉजी- बॅचलर ऑफ व्होकेशन इन (१) डिजिटल मीडिया प्रॉडक्शन, (२) युझर इंटरफेस ॲण्ड इंटरॲक्शन डिझाइन, (३) क्रिएटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, (४) ग्रॅफिक आर्ट ॲण्ड डिझाइन प्रॅक्टिसेस. हे सर्व कौशल्य आधारित अभ्यासक्रम आहेत. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी. प्रवेशासाठी संस्थेची चाळणी परीक्षा द्यावी लागते.

**संपर्क**- एमएएचइ बेंगळुरु कॅम्पस, गोविंदपुरा, येलेहांका, बेंगळुरु- ५६००६४, दूरध्वनी- ०८०-२४४९७१०१

**ईमेल**- admissions@srishtimanipalinstitute. in,

**संकेतस्थळ**- srishtimanipalinstitute. in

(१०) अजिंक्य डी.वाय.पाटील युनिव्हर्सिटी - बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन इन गेम डेव्हलपमेंट. कालावधी- ३ वर्षे. अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण.

संपर्क- दूरध्वनी- ०२०-३५०३७९४२, संकेतस्थळ- www. adypu. edu

**- सुरेश वांदिले**

प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा
५४

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.

घर तुमच्या स्वप्नातले पूर्तता आमच्या साथीने
टीजेएसबी
मर्यादा ₹3 करोड*
गृह कर्ज
8.25
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM-413507

# आयुर्वेदातील करिअर

सध्याच्या अत्यंत धावपळीच्या युगात, प्रगती आणि यशाच्या पायऱ्या झपाझप चढणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या सुबत्ता प्राप्त केलेल्या तरुण-तरुणींनी, त्यांच्या कुटुंबियांनी ऑर्गनिक फूड किंवा नैसर्गिक अन्नपदार्थांकडे स्मार्टपणे बघायला सुरुवात केली आहे. अशा अन्नपदार्थांना आयुर्वेदाचा तडका मिळू लागल्याने, तिकडे आकर्षित होणाऱ्यांची संख्या देशात आणि परदेशातही वाढू लागलीय. ही बाब लक्षात घेता या विषयातील तज्ज्ञ, निश्चितच करिअरमध्ये वेगळी उंची गाठू शकतात. या विषयातील तज्ज्ञता मिळवण्यासाठी, मास्टर ऑफ सायंस इन आयुर्वेद डायट अॅण्ड न्युट्रिशन, हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरु शकतो. या वैशिष्ट्पूर्ण अभ्यासक्रमात आयुर्वेदाची मुलभूत तत्त्वे, आयुर्वेद जीवनशैली, आयुर्वेद अन्न आणि पोषण, आधुनिक अन्न आणि पोषण, आयुर्वेद आहार आणि ऋतूनिहाय आहार, आहार संस्कार, प्रकृती, वय आणि व्यवसायानुसार आहार, आजारनिहाय आहार, या विषयांचे ज्ञान प्रदान केले जाते. (अर्हता- बीएएमएस, बीएचएमएस, बीएनवायएस, एमबीबीएस, बीएस्सी इन डायटेटिक्स, बीएसस्सी इन फूड अॅण्ड न्युट्रिशन)

हा अभ्यासक्रम सुरू केलाय, राष्ट्रीय आयुर्वेद (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद) संस्थने. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत, असलेली ही, आयुर्वेदाचे शिक्षण-प्रशिक्षण आणि संशोधनास प्राधान्य देणारी देशातील सर्वोत्कृष्ट संस्था. या संस्थेने सध्याच्या काळात उत्तम करिअर घडवू शकणारे, उपरोक्त नमूद अभ्यासक्रमासारखे आणखी काही आंतरज्ञानशाखीय अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या अभ्यासक्रमाधून मिळवलेले ज्ञान, तंत्र आणि कौशल्य रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या दर्जेदार संधीचे प्रवेशव्दार उघडू शकतात.

## मास्टर ऑफ सायन्स इन सौंदर्य आयुर्वेद-

या अभ्यासक्रमात पुढील विषयघटकांचा समावेश आहे- आयुर्वेदिय सौंदर्यशास्त्राची मुलभूत तत्त्वे, केसांची काळजी आणि आजार, त्वचेची काळजी आणि आजार, सौंदर्यासाठी वनौषधी/जडीबुटी, सौंदर्य प्रसाधने आणि पंचकर्म, योग आणि उद्योजकीय कौशल्य.

**अर्हता-** बीएएमएस, बीएचएमएस, बीएनवायएस, एमबीबीएस, बीएस्सी इन स्कीन केअर

मास्टर ऑफ सायंस इन आयुर योग प्रिव्हेंटिव्ह कॉर्डिऑलॉजी- या अभ्यासक्रमात, ह्रदयरोग थोपवण्यासाठी योगाची मुलभूत तत्वे, ह्रदयरोग आणि रोगी परीक्षा, आयुर्वेद कार्डिऑलॉजी-उपचार, या विषयघटकांचे ज्ञान प्रदान केले जाते. आयुर्वेद आणि योग पध्दतीचा वापर करुन ह्रदयरोगावर उपचार करणाऱ्या प्रिव्हेंटिव्ह (प्रतिबंधात्मक ह्रदयरोगतज्ज्ञ) कॉर्डिऑलिस्टची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. हे कौशल्य प्राप्त केलेल्या प्रशिक्षित मनुष्यबळाला भारतात आणि परदेशातही चांगली संधी मिळत आहे. या क्षेत्रात प्रतिभावंत तज्ज्ञांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर व्हावी, या अनुषंगाने, या अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे.

**अर्हता-** बीएएमएस, बीएचएमएस (बॅचलर ऑफ होमिओपॅथिक मेडिसिन आणि सर्जरी अॅण्ड योग सायंस), बीएनवायएस (बॅचलर ऑफ नेचरोपथी अॅण्ड योग सायंस), एमबीबीएस.

सर्व एमएस्सी अभ्यासक्रमाचा कालावधी प्रत्येकी दोन वर्षे. प्रवेशासाठी संस्थेमार्फत घेण्यात येणारी चाळणी परीक्षा द्यावी लागते.

आयुर्वेदातील उच्च शिक्षणाचा दर्जा उन्नत करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्वेद संस्थेमार्फत प्रयत्न केले जातात. रुग्णांच्या देखभालीमध्ये आयुर्वेदिक उपचारांच्या शास्त्रीय पध्दतीचा वापर करुन या उपचार पध्दतीची ग्राह्यता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे, आयुर्वेदात रस दाखवणाऱ्या जगातील इतर देशांना सर्व प्रकारचे सहाय्य करणे, यासाठीही संस्थेमार्फत प्रयत्न केले जातात. या संस्थेला डीम्ड टु बी युनिव्हर्सिटीचा दर्जा देण्यात आला आहे.

### संस्थेचे इतर अभ्यासक्रम

(१) बीएएमएस- बॅचलर ऑफ आयुर्वेद मेडिसीन अॅण्ड सर्जरी, (२) एम.डी- आयुर्वेद वाचस्पती/ एम.एस- आयुर्वेद धन्वंतरी. कालावधी - ३ वर्षे. तो १४ विषयांमध्ये करता येतो (३) पीएचडी- आयुर्वेद विद्यावरिधी- कालावधी दोन वर्षे. पदव्युत्तर पदवी (एम.डी/एम.एस- अभ्यासक्रमांसाठी असलेल्या विषयांमध्ये पीएचडी करता येते.), (४) डिप्लोमा इन आयुष नर्सिंग अॅण्ड फार्मसी- या अभ्यासक्रमाला १२ वी विज्ञानशाखेतील गुणांवर प्रवेश दिला जातो. अभ्यासक्रमाचा कालावधी अडीच वर्षे. यामध्ये सहा महिन्याच्या इंटर्नशीपचा समावेश आहे.



### कौशल्य प्रदान करणारे अभ्यासक्रम

(१) सर्टिफिकेट कोर्स ऑन ट्रेनिंग फॉर ब्युटी केअर इन आयुर्वेद, अर्हता- कोणत्याही विद्याशाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम करता येतो. कालावधी - १० दिवस. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश, या तत्वावर प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमामध्ये शरीरसौंदर्य वाढवण्यासाठी आयुर्वेदातील तंत्राचा वापर करण्याचे ज्ञान प्रदान केले जाते.

(२) सर्टिफिकेट कोर्स ऑन स्टँडर्डायझेशन ऑफ आयुर्वेदिक मेडिसिनल प्लँट मटेरिअल- आयुर्वेद औषधींसाठी उपयोगात येणाऱ्या औषधीजन्य वनस्पती आणि त्याच्या गुणवत्ता नियंत्रणाचे प्रशिक्षण, या अभ्यासक्रमात दिले जाते. औषधी गुणधर्म असणाऱ्या वनस्पतींच्या शोधाचे तंत्र आणि त्यासाठीची आयुधे, जागतिक आरोग्य संघटनेच्या दिशा निर्देशानुसार आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचे विशेषीकरण/ माणकीकरणांच्या (स्टँडर्डायझेशन) कार्यपध्दती, गुणवत्तेची हमी, प्रयोगशाळेतील अहवाल नियंत्रण, विश्लेषणात्मक आकडेमोड, माणकीकरणासाठीचे परीक्षण इत्यादी. आयुर्वेद औषधी निर्मिती क्षेत्रात, करिअर करण्यासाठी हा अभ्याक्रम उपयुक्त ठरू शकतो. कालावधी- एक महिना. अर्हता- बी.एस्सी, बी.फार्म, डी.फार्म, बीएएमएस.

(३) पंचकर्म टेक्निशिअन कोर्स, कालावधी एक वर्ष. कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. शरीरातील विषारी द्रव्य/ पदार्थ बाहेर काढून शरीराच्या शुध्दीकरणाची प्रक्रिया पंचकर्म तंत्राव्दारे राबवली जाते. शरीरात अत्यंत खोलवर रुजलेला तणाव आणि आजारावर मात करण्यासाठी पंचकर्म उपयुक्त ठरू शकते. या विषयातील जाणकार किंवा तंत्रकौशल्य हस्तगत केलेल्या मनुष्यबळाला आयुर्वेद रुग्णालये, पंचकर्म केंद्रे, आरोग्य केंद्रे (हेल्थ रिसॉर्ट), वेलनेस सेंटर, पुनर्वसन केंद्रे या ठिकाणी करिअरच्या विविध संधी मिळू शकतात.

**संपर्क - नॅशनल इन्स्टिट्यूटऑफ आयुर्वेद, जोरवार सिंग गेट, अमर रोड जयपूर -३०२००२, दूरध्वनी - ०१४१- २६३५८१६, संकेतस्थळ- nia. in, ईमेल- nic. innia_ rj@nic. in**

## आयुर्वेदाचे महत्व

शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आयुर्वेदिक उपचार उपाय, औषधी उपयुक्त ठरु शकतात, यावर आता मोठ्याप्रमाणावर एकवाक्यता होताना दिसते. त्यामुळे आयुर्वेदिक औषधी मूल्ये असणाऱ्या विविध उत्पादनांची निर्मिती गेल्या काही वर्षात चांगलीच वाढलेली दिसते. हा विस्तार पुढील काळात मोठ्या प्रमाणावर होण्याची, चिन्हे आहेत.

अॅलोपथीचे महत्व अनन्यसाधारण असून ते पुढेही कायम राहीलच तथापि आता पर्यायी उपचार पध्दतीकडे वळण्याचा कल वाढू लागला आहे. यामध्ये आयुर्वेद उपचार पद्धतींचा अग्रक्रम लागतो. शरीरांतील विविध आजार किंवा व्याधी, आयुर्वेदातील तंत्र- कौशल्य- उपचार पध्दती- औषधी मूल्य असलेल्या वनस्पतींचा वापर करुन दूर करता येणे शक्य असल्याची खात्री अनेकांना पटू लागली आहे. त्यामुळे यापुढील काळात आयुर्वेदाचे महत्त्व देश आणि विदेश पातळीवरही मोठे वाढेल.

महाराष्ट्रात एमबीबीएसच्या समकक्ष दर्जा बीएएमएस पदवीस देण्यात आला आहे. आयुर्वेद डॉक्टरांना यापुढे कॉर्पोरेट रुग्णालये, हेल्थ स्पा, मेडिकल टुरिझम (वैद्यकीय पर्यटन) च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली केंद्रे, या ठिकाणीही करिअर संधी मिळू शकतात. या विद्यार्थ्यांना आयुर्वेद उपचार पध्दतीसोबत काही प्रमाणात अॅलोपथी उपचार पध्दतीचे ज्ञान प्रदान करण्यात येत असल्याने, ग्रामीण आणि निमशहरी भागातही स्वतःचा व्यवसाय करणे शक्य आहे. पुढील काळात आरोग्य व्यवस्थेच्या सुद्दढीकरणावर केंद्र आणि राज्य सरकारे प्राधान्याने लक्ष केंद्रित करतील. त्यामध्ये मनुष्यबळाची भरती हा मोठा भाग असेल. एमबीबीएस डॉक्टरांची संख्या पुरेशी राहणार नाही, तेव्हा बीएएमस डॉक्टरांनाही संधी मिळेल. आयुर्वेदामध्ये आता एम.डी/ एम.एस अभ्यासक्रम करता येत असल्याने, विशेषज्ञ म्हणूनही या डॉक्टरांच्या सेवांना अधिक मूल्य प्राप्त होणार आहे. संशोधनाचा मार्ग स्वीकारल्यास उच्च प्रतिच्या संधी आयुर्वेदिक औषधी आणि विविध उत्पादनांची निर्मिती करणारे उद्योग, प्रयोगशाळा इत्यादी ठिकाणी संधी मिळू शकतात.

आयुर्वेद ही भारतीय औषधी पध्दती असूनही तिला मागच्या स्थानावर जावे लागले होते, मात्र आता आयुर्वेदास नव्याने उर्जितावस्था प्राप्त झाली आहे. ही बाब लक्षात घेऊन एमबीबीएस अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी, दर्जेदार महाविद्यालयातील, बीएएमएस (बॅचलर ऑफ आयुर्वेद मेडिसिन अॅण्ड सर्जरी) पर्यायाचाही गंभीरपणे विचार करायला हवा. महाराष्ट्रात, मुंबई ( https:// www. ayurvedinstitute. com/) आणि नागपूर ( https:// gacnagpur. org) येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालये गेल्या ६० वर्षापासून आयुर्वेदाचे शिक्षण प्रदान करत आहेत. या दोन्ही ठिकाणी बीएएमएस, एमडी/ एमएस हे अभ्यासक्रम करता येतात. पीचडी करण्याची सुविधा आहे.

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.25%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

S. M. D. M. MAHAVIDYALAYA
Library
KALLAM- 413507

# उच्च शिक्षणासाठी विद्यालक्ष्मी !

**राष्ट्रीय शैक्षणिक** धोरणामध्ये देशाच्या शैक्षणिक पर्यावरणात आमूलाग्र बदलाचे उद्दिष्ट्य ठेवण्यात आले आहे. यामध्ये उपलब्धता, गुणवत्ता, समानता, विश्वासार्हता, यावर भर देण्यात आला आहे. याच अनुषंगाने, प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश, समाजाच्या सर्व घटकांतील, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि तळागाळातील विद्यार्थ्यांना संपूर्णपणे अध्ययनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी साहाय्य करणे, हा आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना कोणत्याही प्रकारची वित्तीय अडचण येऊ नये यासाठी या योजनेंतर्गत साहाय्य केले जाते. उच्च शिक्षण क्षेत्रातील नामवंत व दर्जेदार शिक्षण संस्थांमध्ये सुलभतेने शिक्षण घेता यावे यासाठी कोणत्याही, कोलॅट्रल (संलग्न) अटीशिवाय कर्जसुविधा उपलब्ध करून दिली जाते.

या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना सुलभतेने घेता यावा, यासाठी पीएम विद्यालक्ष्मी ( https:// www. vidyalakshmi. co. in/ Students/ ) पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. शैक्षणिक कर्जासाठी अर्ज प्रक्रिया आणि वित्तीय साहाय्य करण्यासाठी हे पोर्टल, एक थांबा (वन स्टॉप) व्यासपीठ, पद्धतीने कार्य करते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याला याच पोर्टलच्या माध्यमातून थेट ऑनलाइन अर्ज करावा लागेल. या सुविधेचा वापर सुलभतेने करता येणे शक्य व्हावे या दृष्टीने पोर्टलचे डिझाइन करण्यात आले आहे. खूप कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही किंवा क्लिष्ट प्रक्रिया करावी लागणार नाही. ही सगळी प्रक्रिया डिजिटल स्वरूपाची असल्याने विद्यार्थ्याला आपल्या अर्जाचे संनियंत्रण करणे सुलभ जाते. व्याज रकमेच्या परताव्याची अर्हता तपासता येते. कर्जाच्या वितरणावर सहजतेने लक्ष ठेवता येते. नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ)च्या सर्वेक्षणात नोंद झालेल्या जवळपास ८६० शैक्षणिक संस्थांचा यात समावेश आहे. यापैकी कोणत्याही संस्थेत विद्यार्थ्यास प्रवेश मिळाल्यास, त्याला सुलभतेने शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या योजनेसाठी प्रारंभी २०२३-२४ ते २०३०-३१ पर्यंतच्या कालावधीसाठी केंद्र शासनाने ३,६०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. दरवर्षी २२ लाख गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना साहाय्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत ७.५ लाखांपर्यंतच्या कर्जावर बँकांना, ७५ टक्के पत (क्रेडिट गॅरंटी) हमी दिली जाते. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना कर्ज देण्यासाठी बँका किंवा वित्तीय संस्थांना प्रोत्साहन मिळू लागले आहे.

मान्यताप्राप्त आणि अधिकृत शैक्षणिक संस्थेतील, तांत्रिक आणि व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न वार्षिक ८ लाख रुपयांपर्यंत असेल, त्याला १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याजासाठी ३ टक्के रोख अनुदान दिले जाते. वार्षिक ४.५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याजासाठी संपूर्ण रोख अनुदान (सबव्हेंशन) दिले जाते.

व्यवहारामध्ये पारदर्शकता राहण्यासाठी हे वित्तीय साहाय्य ई (पावती) व्हावचर्स आणि सेंट्रल बँक डिजिटल करंसी वॅलेटद्वारे वितरित केले जाते. या पोर्टलवर फक्त एकदाच नाव नोंदवता येते. या पोर्टलवर बँकांच्या शैक्षणिक कर्ज योजनांची माहिती बघायला मिळते. विविध बँकांच्या कर्जासाठी कॉमन एज्युकेशन लोन ॲप्लिकेशन फॉर्म (सीएलएफ) (सामाईक शैक्षणिक कर्ज) अर्ज करता येतो. विद्यार्थ्यांचे अर्ज डाऊनलोड करण्याची आणि कर्ज प्रक्रियेची सद्य:स्थिती अपलोड करण्याची बँकांना सुविधा आहे. कर्ज प्रक्रियेसंबंधी काही तक्रारी असतील त्या ईमेल करण्याची विद्यार्थ्यांना सुविधा आहे. शासकीय शिष्यवृत्तींची माहिती मिळण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलशी संपर्क जोडणी करण्यात आली आहे. सामाईक शैक्षणिक कर्ज अर्जाद्वारे जास्तीत जास्त तीन बँकांकडे कर्जासाठी अर्ज करता येतो. हा अर्ज इंडियन बँक असोसिएशनने निर्धारित केला आहे.



या योजनेमुळे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अथवा प्रमाण वाढेल. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (एआयएसएचई) २०२३ नुसार उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्याची, भारतातील टक्केवारी २८.४ टक्के आहे. अमेरिकेत हीच टक्केवारी ८० टक्के, कॅनडा ९० टक्के, इंग्लंड ८० टक्के, जर्मनी ७० टक्के, ऑस्ट्रेलिया ८५ टक्के आहे. या जागतिक पातळीवरील टक्केवारीच्या तुलनेत भारत खूप मागे आहे. ही दरी बुजवण्यासाठी भारत सरकारने २०३३ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंतचे उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरवले आहे.

## प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा प्रोत्साहन योजना

वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे उच्च शिक्षण घेताना गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना दैनंदिन गरजा भागवणे बऱ्याचदा कठीण जाते. त्यांची ही समस्या सोडवण्यासाठी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा प्रोत्साहन योजना सुरू करण्यात आली. ही योजना केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत राबवली जाते. या शिष्यवृत्तीला पात्र ठरण्यासाठी विद्यार्थ्यांना १२ वीमध्ये किमान ८० टक्के गुण मिळणे आवश्यक. एकूण शिष्यवृत्तीच्या संख्येपैकी ५० टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखीव आहेत. कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न साडेचार लाख रुपयांच्या मर्यादित असावे. उत्पन्नाचे प्रमाणपत्र नव्या अर्जदारांनाच सादर करावे लागते. पदवी अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती वार्षिक १२ हजार रुपये असून पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी २० हजार रुपये आहे. पाच वर्षे कालावधीच्या व्यावसायिक किंवा इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षी २० हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. बी.टेक. आणि बी.ई. अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षी २० हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

एखाद्या शाखेतील पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या काळासाठी, या शिष्यवृत्तीचे दरवर्षी नूतनीकरण केले जाते. हे नूतनीकरण कमाल ५ वर्षांसाठी केले जाते. यासाठी या विद्यार्थ्याला आधीच्या दोन सत्रांमध्ये किंवा वार्षिक परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळायला हवेत. वर्गामध्ये त्याची उपस्थिती किमान ७५ टक्के असावी. रॅगिंगसारख्या कोणत्याही कृत्यात त्याचा सहभाग नसावा. या शिष्यवृत्तीसाठी राखीव जागांचे तत्त्व अंगीकारले जाते. (उदा- १५ टक्के अनुसूचित जाती, ७.५ टक्के अनुसूचित जमाती, २७ टक्के ओबीसी, दिव्यांग ३ टक्के). या शिष्यवृत्तीची रक्कम, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजनेद्वारे विद्यार्थ्याच्या आधारकार्डाशी जोडलेल्या बँक खात्यात जमा केली जाते. अधिकृत आणि मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा विचार शिष्यवृत्तीसाठी केला जातो. दूरशिक्षण किंवा पत्रव्यवहाराद्वारे होणाऱ्या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. राज्य शासनाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क माफी अथवा शुल्क परतावा अशासारख्या योजनांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा या शिष्यवृत्तीसाठी विचार केला जात नाही. इच्छुक विद्यार्थ्यांना, नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलच्या माध्यमातूनच ऑनलाइन अर्ज करावा लागेल. नूतनीकरणाचा अर्जही याच पोर्टलद्वारे करावा लागेल. विद्यार्थ्याने संस्थेत बदल केल्यास ही शिष्यवृत्ती त्या संस्थेतही दिली जाते, तथापि ही संस्था अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (एआयएसएचई) मध्ये नोंद झालेली असावी. या संस्थेने तसा संकेतांक (कोड) मिळवलेला असावा. aishe. gov. in/ aishe/ aisheCode या संपर्क साखळीवर ही माहिती मिळू शकते.

**संपर्क - सेक्शन ऑफिसर, नॅशनल स्कॉलरशिप डिव्हिजन डिपार्टमेंट ऑफ हायर एज्युकेशन, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, वेस्ट ब्लॉक १, दुसरा माळा, विंग सहा, आर. के. पूरम, सेक्टर १, नवी दिल्ली- ११००६६, दूरध्वनी- ०११-२०८६२३६०, संकेतस्थळ - www. scholarships. gov. in**

## स्कॉलरशिप फॉर सिंगल गर्ल चाइल्ड -

विद्यापीठ अनुदान आयोगाने पोस्ट ग्रॅज्युएट इंदिरा गांधी स्कॉलरशिप फॉर सिंगल गर्ल चाइल्ड ही शिष्यवृत्ती योजना सुरू केली. या योजनेंतर्गत पदव्युत्तर पदवी (नॉन प्रोफेशनल-अव्यावसायिक) अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलेली आणि आपल्या पालकांना एकच मुलगी असलेली विद्यार्थिनी या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकते. (या मुलीला एक भाऊ असल्यास ती या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत नाही.)

दूरस्थ शिक्षण (डिस्टंस एज्युकेशन) या पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती दिली जात नाही. या योजनेंतर्गत दरवर्षी ३६,२०० रुपयांचे अर्थसाहाय्य केले जाते. ही शिष्यवृत्ती दहा महिन्यांसाठी दिली जाते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार विद्यार्थीनीकडून शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक शुल्क आकारू नये असे अपेक्षित आहे. या शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थीनींना इतर दुसऱ्या शिष्यवृत्तींचा लाभ घेता येतो. विद्यार्थिनी अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती बंद केली जाते. पदव्युत्तर पदवीच्या पहिल्या वर्षी किमान ६० टक्के गुण मिळाले नाही तर शिष्यवृत्ती बंद केली जाते. दिव्यांग उमेदवारांसाठी ही अट ५५ टक्के अशी आहे.

**संपर्क संकेतस्थळ - https:// www. ugc. gov. in/ Scholarships/ stu_ Scholarship4, ईमेल- contact. ugc@nic. in**

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी ऑटो लोन संगे
व्याजदर 8.25%* द.सा. पासून



*अटी लागू.

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# गुणवंतांच्या सहाय्यासाठी

**शिक्षणाचा खर्च,** दरवर्षी वाढत चालला आहे. या खर्चामुळे वेगवेगळ्या संवर्गातील गुणवंत विद्यार्थी आणि विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नये, अभ्यासक्रमाच्या कालावधीत त्यांनी संपूर्ण लक्ष ज्ञानार्जनावरच केंद्रित करावे, यासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या वतीने वेगवेगळ्या शिष्यवृत्ती योजना राबवल्या जातात. शैक्षणिक प्रगती साध्य करण्यासाठी या शिष्यवृत्तींचा मोठा हातभार लागतो.

**अशा काही शिष्यवृत्ती-**

**(१) मुलींना १०० टक्के सवलत -** व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मुलींना १०० टक्के मोफत शिक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने, गेल्या वर्षी घेतला. या योजनेमुळे मुलींना, शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कातून १०० टक्के सुट देण्यात आली आहे. यापूर्वी ही सवलत ५० टक्के होती. या योजनेचा लाभ, आर्थिकदृष्ट्या मागास संवर्ग (इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास- ईडब्ल्यूएस), शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (सोशल अँण्ड इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास- एसईडब्ल्यूएस), इतर मागास वर्ग संवर्गातील मुलींना घेता येईल.

शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, विनाअनुदानित महाविद्यालये (टप्पा एक), कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ सार्वजनिक विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे/ सार्वजनिक विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ दिला जाईल. हा प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रकिया (सेंट्रलाइज्ड अॅडमिशन प्रोसेस- कॅप) व्दारे मिळालेला असावा. संस्थास्तरावरील कोटा आणि व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

या योजनेच्या लाभ मिळण्यासाठी संबंधित संवर्गातील मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असावे.

संपर्क हेल्पलाइन- ०७९६९१३४४० आणि ०७९६९१३४४४१

**(२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना-** या योजनेचा लाभ, व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिला जातो. या योजनेंतर्गत (१) मुलांचे, शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्काची ५० टक्के रक्कम शासन भरेल. (२) मुलींचे, शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के रक्कम शासन भरेल. विद्यार्थ्याच्या कुटुंबीयाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे.

शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमधील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती दिली जाते. व्यवस्थापन कोटयातील आणि संस्था स्तरावरील प्रवेश घेणाऱ्यांना याचा लाभ दिला जात नाही. खासगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यात प्रवेश घेतल्यास या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.

**(३) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ शासकीय विद्यापीठे व उपकेंद्रातील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतात.

**हे घटक पुढीलप्रमाणे आहेत-**

**(१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल संवर्ग -** या संवर्गासाठी, कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा - १ लाखाच्या पुढे ते ८ लाख रुपये अशी ठरवण्यात आली आहे. एकूण शिष्यवृत्तींची संख्या ५००. यामध्ये ३३ टक्के महिलांसाठी आरक्षण असून अभ्यासक्रमनिहाय गुणवत्तेनुसार त्यांची निवड केली जाते.

**(२) अल्प-भूधारक शेतकरी, नोंदणीकृत मजूर संवर्ग-** सर्व पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.

**(३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक संवर्ग-** यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १ लाख रुपये, निर्धारित केली आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.



**हे आर्थिक साहाय्य पुढील प्रमाणे दिले जाते-**

(१) मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी - भोजन भत्ता- ३२ हजार रुपये, निवास भत्ता- २० हजार रुपये, निर्वाह भत्ता- ८ हजार रुपये, एकूण ६० हजार रुपये. (२) इतर महसुली विभागीय शहरातील आणि उर्वरित क वर्ग महापालिका क्षेत्रात उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी- भोजन भत्ता- २८ हजार रुपये, निवास भत्ता- १५ हजार रुपये, निर्वाह भत्ता- ८ हजार रुपये, एकूण ५१ हजार रुपये, (३) इतर जिल्ह्यांची ठिकाणे- भोजन भत्ता- २५ हजार रुपये, निवास भत्ता- १२ हजार रुपये, निर्वाह भत्ता- ६ हजार रुपये, एकूण ४३ हजार रुपये, (४) तालुक्याची ठिकाणे- भोजन भत्ता- २३ हजार रुपये, निवास भत्ता- १० हजार रुपये, निर्वाह भत्ता-५ हजार रुपये, एकूण ३८ हजार रुपये

**(४) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती-** मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल, गुणवत्ताधारक ज्या विद्यार्थ्यांनी, उच्च व्यावसायिक पदविका, पदवी, पदव्युत्तर तांत्रिक व अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल, त्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. अशा कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ८ लाखांपर्यंत असावे. विदयार्थ्यांनि १०वीची परीक्षा महाराष्ट्रातून उत्तीर्ण होणे आवश्यक .

या योजनेंतर्गत अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणारे प्रत्यक्ष वार्षिक शिक्षण शुल्क व परीक्षाशुल्क किंवा ५० हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल, ती रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरूपात दिली जाते. (यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमाचा समावेश नाही.)

(शिष्यवृत्ती क्रमांक २, ३ आणि ४ संपर्क- **संकेतस्थळ -** https:// mahadbt. maharashtra. gov. in, पात्र, विद्यार्थ्यांनी या योजनेचा ऑनलाइन अर्ज, महाडिबीटी पोर्टल वर देण्यात आलेल्या सूचनांनुसार भरणे अपेक्षित आहे.)

**(५) राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना -**विद्यापीठ अनुदान (यूजीसी) आयोगाने, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना सुरू केली आहे. यूजीसी मान्यताप्राप्त व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना, ही शिष्यवृत्ती दिली जाते. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्णवेळेचे असावेत. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असावे. या शिष्यवृत्तीसाठी देशभरातून १० हजार विद्यार्थ्यांची निवड केली जाते. शिष्यवृत्तीचा कालावधी दोन वर्षे. या योजनेतील मंजूर रक्कम, थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर- डीबीटी) अंतर्गत जमा करण्यात येईल. या योजनेंतर्गत दीड लाख रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

**संपर्क संकेतस्थळ-** https:// www. ugc. gov. in/ Scholarships/ stu_ Scholarship6) आणि www. scholarships. gov. in

**(६) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता -नि ङ्साधन शिष्यवृत्ती योजना-** केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयामार्फत ही योजना राबवली जाते. अल्पसंख्याक समाजातील, पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना, या योजनेचा लाभ दिला जातो. कुटुंबाचे वार्षिक एकत्रित उत्पन्न अडीच लाखांपर्यंत असावे. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक ३० हजार रुपये आणि वसतिगृहाच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीचा कालावधी दरवर्षी, दहा महिन्यांचा असतो. हा कोटा (वाटा) पुढीलप्रमाणे आहे- मुस्लीम- ३३२८ विद्यार्थी, बौद्ध- १६७६ विद्यार्थी, ख्रिश्चन-२७७ विद्यार्थी, शीख- ५७ विद्यार्थी, पारशी- १२ विद्यार्थी आणि जैन- ३५९ विद्यार्थी.

**संपर्क संकेतस्थळ :** www. minorityaffairs. gov. in आणि www. scholarships. gov. in

**(७) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना-** भारत सरकारच्या सामाजिक न्याय विभागामार्फत ही योजना राबवली जाते. पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ८ लाखांपर्यंत असावे. दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक असावे.

**लाभाचे स्वरूप-** (१) शैक्षणिक शुल्क व ना-परतावा शुल्काची प्रतिपूर्ती- प्रत्यक्ष वार्षिक शुल्क किंवा दोन लाख रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल, ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते, (२) देखभाल /परिरक्षण भत्ता - वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दर महिना -३ हजार रुपये, डे स्कॉलरला- दीड हजार रुपये, (३) दिव्यांगाच्या प्रकारानुसार विशेष भत्ते (उदा. वाचन भत्ता, संरक्षण भत्ता, मदत भत्ता इ.)- दर महिन्याला २ हजार रुपये, (४) पुस्तक/स्टेशनरी- दरवर्षी ५ हजार रुपये. (५) संगणक व त्याच्या सुटे भाग खरेदी खर्चाची प्रतिपूर्ती- एकदाच ४५ हजार रुपये, (६) विशिष्ट दिव्यांगासाठी आवश्यक असणाऱ्या सॉफ्टवेअरसह मदत व मदतीच्या साहित्याच्या खरेदीसाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती- एकदाच पहिल्या वर्षी- ३० हजार रुपये.

**संपर्क संकेतस्थळ-** www. disabilityaffairs. gov. in आणि www. scholarships. gov. in

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
प्रस्तुत



आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी
@9.25%* द.सा. पासून

M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM-413507

# अनोखे सामर्थ्य, वेगळे अभ्यासक्रम !

**अपंगांना अनोख्या सामर्थ्याचे धनी समजले जाते. त्यांना तंत्रशुद्ध पद्धतीने शिक्षण-प्रशिक्षण दिले गेल्यास ते स्वबळावर आयुष्य जगू शकतात. विविध प्रकाराचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना शिक्षण आणि प्रशिक्षण देणाऱ्या मनुष्यबळनिर्मितीसाठी भारत सरकारने स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.**

विविध प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना शिक्षण आणि प्रशिक्षण देण्या मनुष्यबळनिर्मितीसाठी भारत सरकारने स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. अली यावर जंग नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्पीच अँण्ड हिअरिंग डिसॅबिलिटीज - या संस्थेची स्थापना भारत सरकारच्या दिव्यांगजन मंत्रालयाने १९८३ साली केली. या संस्थेला स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे. अपंगांच्या क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्यांसाठी, शिक्षण- प्रशिक्षण-संशोधन असे उपक्रम संस्थेमार्फत राबवले जातात.

## अभ्यासक्रम

बॅचलर ऑफ ऑडिऑलॉजी अँण्ड स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजी (बीएएसएलपी) - हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी, स्वतंत्र श्रवणतज्ज्ञ किंवा भाषा पॅथॉलॉजिस्ट म्हणून स्वतंत्रपणे कार्य करू शकतात. वेगवेगळ्या रुग्णालयांतील, कान- नाक- घसा विभाग, पुनर्वसन औषध (रिहॅबिलिटेशन मेडिसिन), न्युरॉलॉजी, पेडिॲट्रिक्स, प्लास्टिक सर्जरी आणि प्रिव्हेंटिव्ह मेडिसिन विभागांमध्ये, श्रवण आणि भाषा केंद्र, श्रवण साहाय्यता साहित्य (हिअरिंग एड इंडस्ट्री) उद्योग, अपंग मार्गदर्शन केंद्र. दिव्यांग शाळा, प्रशिक्षण कार्यक्रमातील संशोधन साहाय्यक, अशा करिअर संधी मिळतात.

**अर्हता** - १२ वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित किंवा जीवशास्त्र हे विषय अभ्यासणे आवश्यक. (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग - ४५ टक्के), (कॅम्पस- मुंबई, कोलकाता, सिकंदराबाद, नॉयडा). कालावधी - ४ वर्षे.

२) बॅचलर ऑफ एज्युकेशन इन स्पेशल एज्युकेशन (बीएड- हिअरिंग इम्पेअरमेंट),

**अर्हता** - कोणत्याही विषयातील पदवी (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के), (कॅम्पस- मुंबई, कोलकाता, सिकंदराबाद, जान्ला). कालावधी - दोन वर्षे.

३) डिप्लोमा इन इंडियन साइन लँग्वेज इंटरप्रिटर कोर्स,

**अर्हता** - कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के). (कॅम्पस - कोलकाता, जान्ला, अहमदाबाद आणि मुंबई). कालावधी - दोन वर्षे.

४) मास्टर ऑफ सायन्स इन ऑडिऑलॉजी - हा अभ्यासक्रम मुंबई आणि सिकंदराबाद येथे करता येतो.

**अर्हता** - बॅचलर ऑफ ऑडिऑलॉजी अँण्ड स्पीच लँग्वेज पॅथालॉजी, (खुला संवर्ग ५५ टक्के आणि राखीव संवर्ग ५० टक्के), कालावधी - दोन वर्षे.

५) मास्टर ऑफ सायन्स इन स्पिच लँग्वेज पॅथालॉजी - हा अभ्यासक्रम कोलकाता येथे करता येतो.

अर्हता - बॅचलर ऑफ ऑडिऑलॉजी अँण्ड स्पिच लँग्वेज पॅथालॉजी, (खुला संवर्ग ५५ टक्के आणि राखीव संवर्ग ५० टक्के). या अभ्यासक्रमाला वेस्ट बेंगाल युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेतील गुणांवर प्रवेश दिला जातो. कालावधी - दोन वर्षे. दोन्ही पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम केलेले उमेदवार शिक्षकांना प्रशिक्षित करू शकतात. प्रशिक्षण संस्थांमध्ये मास्टर ट्रेनर्स, शिक्षण संस्थांमध्ये प्राचार्य, अध्यापक, शिक्षक, संशोधन अधिकारी म्हणून कार्य करू शकतात.

६) मास्टर ऑफ एज्युकेशन इन स्पेशल एज्युकेशन (हिअरिंग एम्पेरमेंट) - हा अभ्यासक्रम मुंबई येथे करता येतो.

**अर्हता** - बीएड एचआय, बीएड डीफ, बीएड स्पेशल एज्युकेशन, खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के)

७) डिप्लोमा इन एज्युकेशन इन स्पेशल एज्युकेशन (हिअरिंग एम्पेरमेंट) - हा अभ्यासक्रम कोलकाता, नॉयडा, सिकंदराबाद, जान्ला येथे करता येतो.

**अर्हता** - कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के), कालावधी- दोन वर्षे.

हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना, पूर्वप्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून संधी मिळू शकते. श्रवणदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्राथमिक विभागात शिकवू शकतात.

८) डिप्लोमा इन टीचिंग साइन लँग्वेज इंटरप्रिटर कोर्स, अर्हता - कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के). हा अभ्यासक्रम कोलकाता, गोवा, जान्ला, सिकंदराबाद आणि मुंबई येथे करता येतो. कालावधी दोन वर्षे.

९) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ऑडिटरी व्हर्बल थेरपी (पीजीडीएव्हीटी) - हा अभ्यासक्रम मुंबई येथे करता येतो. कालावधी- एक वर्ष.

१०) बॅचलर ऑफ एज्युकेशन इन स्पेशल एज्युकेशन (इंटलेक्चुअल अँण्ड डेव्हलपमेंटल डिसॅबिलिटी),

**अर्हता** - कोणत्याही विषयातील पदवी (खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के). हा अभ्यासक्रम अहमदाबाद कॅम्पसमध्ये चालवला जातो.

११) डिप्लोमा ऑफ एज्युकेशन इन स्पेशल एज्युकेशन (इंटलेक्चुअल अँण्ड डेव्हलपमेंटल डिसॅबिलिटी) - हा अभ्यासक्रम अहमदाबाद येथे करता येतो.

**अर्हता** - कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के.

१२) डिप्लोमा इन हिअरिंग लँग्वेज अँण्ड स्पीच - हा अभ्यासक्रम जान्ला येथे करता येतो.

**अर्हता** - कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी खुला संवर्ग ५० टक्के आणि राखीव संवर्ग ४५ टक्के, कालावधी-एक वर्ष.

**प्रवेश प्रक्रिया**

या अभ्यासक्रमांना अर्ज करण्याची शेवटची तारीख ८ जून २०२५ आहे.

बीएएसएलपी अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा २८ जून २०२५ रोजी मुंबई आणि नागपूर येथे होईल. एम.एस्सी. ऑडिऑलॉजी अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा १२ जुलै २०२५ रोजी मुंबई आणि नागपूर येथे होईल. एमएड- स्पेशल एज्युकेशन (हिअरिंग एम्पेअरमेंट), बीएड- स्पेशल एज्युकेशन (हिअरिंग एम्पेअरमेंट), पीजीडीएव्हीटी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची चाळणी परीक्षा परीक्षा २६ जुलै २०२५ रोजी मुंबई आणि नागपूर येथे होईल.

**संपर्क - अली यावर जंग नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्पीच अँण्ड हिअरिंग डिसॅबिलिटीज (दिव्यांगजन), के. सी. मार्ग, बांद्रा रेक्लमेशन ,बांद्रा वेस्ट, मुंबई - ४०००५०, दूरध्वनी- ०२२-२६४०१५२९, संकेतस्थळ- https:// ayjnishd. nic. in/ ईमेल- ayjnihh-mum@nic. in**

## अपंगांसाठी कौशल्य अभ्यासक्रम

याच संस्थेत श्रवणदोष आणि भाषादोष (हिअरिंग अँण्ड स्पीच डिसॅबिलिटी) अपंगांसाठी पुढील अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत -

(१) सर्टिफिकेट कोर्स फॉर डाटा एन्ट्री, अर्हता - दहावी उत्तीर्ण, कालावधी - सहा महिने. हा अभ्यासक्रम निःशुल्क आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जाण्यायेण्यासाठी दरमहा हजार रुपये आणि जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्यांना दीड हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. अपंगांच्या साहाय्यासाठी असणाऱ्या उपकरणासाठी प्रशिक्षण संपल्यावर ५ हजार रुपये, प्रशिक्षण संपल्यावर प्लेसमेंटच्या अनुषंगाने दोन ते सहा महिन्यांसाठी दरमहा ३ हजार रुपये दिले जातात.

**संपर्क - सोशिओ इकॉनॉमिक रिहॅबिलिटेशन डिपार्टमेंट, रूम नंबर डी १०४, फर्स्ट फ्लोअर, एवायजेएनआयएसडीएच (डी), मुंबई, दूरध्वनी- ०२०-६९१०२१०१**

(२) सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर (अर्हता- दहावी उत्तीर्ण, कालावधी- एक वर्ष), (३) सर्टिफिकेट कोर्स इन डाटा एन्ट्री ऑपरेटर (अर्हता- दहावी उत्तीर्ण, कालावधी- सहा महिने), (४) सर्टिफिकेट कोर्स इन बेसिक अॅनिमेशन (अर्हता- बारावी उत्तीर्ण, कालावधी- सहा महिने), हे अभ्यासक्रम निःशुल्क आहेत. डे स्कॉलरला ४०० रुपये आणि वसतिगृहात राहणाऱ्यांना दरमहा ७०० रुपये विद्यावेतन दिले जाते.

(५) वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना बसलेल्या किंवा बसू इच्छिणाऱ्या दिव्यांगांना कोचिंग (प्रशिक्षण) - अर्हता १२वी/पदवी. कालावधी- ९ महिने. दरमहा ४००० रुपये विद्यावेतन आणि दोन हजार रुपये दिव्यांग साहाय्यता दिले जाते. पुस्तकांसाठी ५ हजार रुपयांचे साहाय्य केले जाते.

## ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अँण्ड हिअरिंग, म्हैसूर

(१) डिप्लोमा इन हिअरिंग एड अँण्ड इअरमोल्ड टेक्नालॉजी, अर्हता - इलेक्ट्रॉनिक्स विषयासह आयटीआय. कालावधी - १ वर्ष, (२) डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहूड स्पेशल एज्युकेशन हिअरिंग एम्पेअरमेंट, अर्हता -१२ वी. कालावधी - १ वर्ष, (३) डिप्लोमा इन हिअरिंग लँग्वेज अँण्ड स्पीच, अर्हता - १२ वी. कालावधी- १ वर्ष, (४) बॅचलर ऑफ ऑडिऑलॉजी अँण्ड स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजी, अर्हता - १२ वी. कालावधी- ४ वर्षं, (५) बॅचरल ऑफ एज्युकेशन इन हिअरिंग एम्पेरमेन्ट, अर्हता - कोणत्याही विषयातील पदवी. कालावधी - २ वर्षं. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते.

**संपर्क - ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ स्पीच अँण्ड हिअरिंग, नैमिशाम कॅम्पस, मानसगंगोत्री, म्हैसूर - ५७०००६, दूरध्वनी - ०८२१- २५०१०५१५, संकेतस्थळ - www. aiishmysore. in, ईमेल- director@aiishmysore. in**

- सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



ॲसेट बॅक्ड क्रेडिट
तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर
@9.50%* द.सा.पासून
कर्जाची रक्कम ₹ 5 कोटी* पर्यंत
वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने *

S. M. D. M. MAHAVIDYALAYA ★ KALLAM- 413507 ★ Library

# अग्निपरीक्षा

**आपल्या देशातील** अमर्याद लोकसंख्या, वाढते शहरीकरण, गगनचुंबी इमारतीच्या बांधकामात सातत्याने होत असलेली वाढ, औद्योगिक घटकांची वाढ, या बाबींमुळे आग लागण्याच्या किंवा इतर अनेक धोकादायक घटना घडण्याच्या संख्येत मोठीच वाढ झाल्याचे दिसून येते. सुरक्षिततेची किमान तत्त्वे किंवा नियम पाळण्याची खबरदारी घेतली जात नाही. पुढचे पुढे बघून घेऊ, अशी बेदरकार वृत्ती दिसते. अशा प्रसंगी अग्निशमन आणि आपत्कालीन सेवेतील प्रशिक्षित मनुष्यबळाला आपले सारे तंत्रकौशल्य पणाला लावावे लागते. अशा मनुष्यबळाची बरीच कमतरता दिसून येते.

या क्षेत्रातील प्रतिभावंत आणि निर्भय मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी, केंद्रीय गृह मंत्रालायच्या अंतर्गत कार्यरत असणारी, नागपूर येथील, नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, ही संस्था, गेल्या अनेक दशकांपासून कार्यरत आहे. अग्निशमन आणि आपत्कालीन प्रसंगांसाठी, अत्यावश्यक सेवेचे उच्चस्तरीय प्रशिक्षण देणारी ही इन्स्टिट्युशन ऑफ एक्सलन्स गटात मोडणारी संस्था आहे.

## फायर इंजिनीअरिंग

या संस्थेत, बीटेक इन फायर इंजिनीअरिंग, हा अभ्यासक्रम चालवला जातो. अशा प्रकारचा, हा देशातील एकमेव अभ्यासक्रम. तो वेगळ्या प्रकारचे कौशल्य प्रदान करणारा असल्याने, विद्यार्थ्यांना, औद्योगिक सुरक्षा, औद्यौगिक अभिकल्प, राज्य अग्निशमन सेवा, आपत्कालीन व्यवस्थापन अशा क्षेत्रात, भारत आणि इतर देशात करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

या अभ्यासक्रमाद्वारे, अग्निशमन, आपत्तीतून सुटका, जीव वाचवण्याचे कौशल्य प्रदान केले जाते. अग्निशमन आणि आपत्कालीन सेवांच्या अनुषंगाने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन कार्यास प्रोत्साहन दिले जाते. यासाठी संस्थेकडे अत्याधुनिक साहित्य आणि उपकरणांनी सुसज्ज अशा १४ प्रयोगशाळा आहेत. अग्निप्रलयाशी सामना करण्यासाठी नावीन्यपूर्ण संसाधने, तंत्रज्ञान आणि सुरक्षेच्या साहित्याच्या विकासासाठी प्रोत्साहित केले जाते.

### प्रवेश प्रकिया

बीटेक अभ्यासक्रमासाठी, जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेईई-मेन) चे गुण ग्राह्य धरले जातात. साठ विद्यार्थ्यांना, राष्ट्रीय पातळीवरील, केंद्रीय प्रवेश प्रकियेद्वारे प्रवेश दिला जातो. यासाठी, देशातील प्रमुख दैनिकांमध्ये जाहिरात दिली जाते. त्याद्वारे, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले जाते. अर्ज प्रकिया संपूर्णपणे ऑनलाइन आहे.

अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची जेईई-मेन आणि १२ वीतील गुणांच्या आधारे, गुणवत्ता यादी तयार केली जाते. प्रवेशासाठी असलेल्या जागांच्या विशिष्ट प्रमाणात पुढील टप्प्यांसाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. ही यादी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते. या यादीतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तपासणी आणि वैद्यकीय चाळणीसाठी नागपूर येथे उपस्थित राहावे लागते.

या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये किमान ५० टक्के गुण मिळायला हवेत. शासनाच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या संवर्गांसाठी जागा राखीव ठेवण्यात येतात. आर्थिकदृष्ट्या कमकुवत (इकॉनॉमिकली वीकर सेक्शन) घटकासाठी सहा अतिरिक्त जागा राखीव ठेवण्यात यतात. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सुविधा आहे.

मुंलामुलींसाठी वैद्यकीय तंदुरुस्तीची, पुढील मानके निर्धारित करण्यात आली आहेत- (१) मुले- उंची किमान १६५ सेंमी, वजन किमान ५० किलो, छाती न फुगवता- किमान ८१ सेंमी, फुगवून ८६ सेंमी. (२) मुली- उंची किमान १५७ सेंमी, वजन किमान ४७ किलो. रातआंधळेपणा नको. मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे. कोणतेही शारीरिक व्यंग नको.

या अभ्यासक्रमात तीव्र स्वरूपाच्या शारीरिक क्षमता चाचणीचा आणि व्यायामाचा समावेश असतो. ही बाब ध्यानात घेऊन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विचार करण्याची सूचना संस्थेने केली आहे.



### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) फायर सेफ्टी इंजिनीअर, (२) इंडस्ट्रिअल सेफ्टी ऑफिसर, (३) रिस्क असेसमेंट कन्सल्टंट, (४) सेफ्टी ऑडिटर, (५) हेल्थ ॲण्ड सेफ्टी मॅनेजर, (६) इमर्जन्सी मॅनेजमेंट प्रॅक्टिशनर, (७) एन्हव्हॉयरमेंटल सेफ्टी इंजिनीअर, (८) इमर्जन्सी रिस्पॉन्स मॅनेजर, (९) फायर प्रोटेक्शन सिस्टिम्स डिझायनर, (१०) सेफ्टी कन्सल्टंट

**संपर्क- नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, गृह मंत्रालय, राजनगर नागपूर, दूरध्वनी- ०७१२-२९८२२२५ संकेतस्थळ- nfscnagpur.nic.in, ईमेल- nfscnagpur-mha@nic.in**

## अग्नी प्रतिबंधक अधिकारी

महाराष्ट्र राज्य अग्निशमन अकादमीने, उपस्थानक अधिकारी आणि अग्नी प्रतिबंधक अधिकारी, हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा पूर्णपणे निवासी अभ्यासक्रम आहे. कालावधी -एक वर्ष. कोणत्याही शाखेतील ५० टक्के गुणांसह, पदवी परीक्षा उतीर्ण झालेल्या, पुरुष विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, इतर मागास संवर्ग- ४५ टक्के) वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती संवर्गासाठी वयोमर्यादेत ५ वर्षांची आणि इतर मागास संवर्गाला ३ वर्षांची सूट दिली जाते. शारीरिक पात्रता- उंची- किमान १६५ सेंमी, वजन किमान ५० किलो, छाती न फुगवता- किमान ८१ सेमी, फुगवून ८६ सेंमी.

**संपर्क- महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रूझ(पूर्व) मुंबई- ४०००९८, दूरध्वनी -०२२-२६६७७५५५, संकेतस्थळ- http:// www. mahafireservice. gov. in, ईमेल- info@ mahafireservice. gov. in**

## पॉवर प्लान्ट इंजिनीअरिंग

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने; या क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या, तंत्रकुशल मनुष्यबळाची गरज भागवण्यासाठी, नॅशनल पॉवर ट्रेनिंग (एनपीटीआय) इन्स्टिट्यूटची स्थापना केली आहे. या संस्थेचे नागपूर, दुर्गापूर, फरिदाबाद, नेव्हेली, शिवपूरी, अलापुज्जा (केरळ) येथे कॅम्पस आहेत.

### या संस्थेचे अभ्यासक्रम-

(१) एक वर्ष कालावधीचा, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन पॉवर प्लान्ट इंजिनीअरिंग. अर्हता- मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, पॉवर इंजिनीअरींग अशासारख्या विषयांमध्ये ६० टक्के गुणांसह बीटेक/बीई. राखीव संवर्गातील उमेदवारांना ५५ टक्के गुण मिळायला हवेत. या अभ्यासक्रमांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची, बीई/बीटेकमध्ये मिळालेल्या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते.

(२) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन हायड्रो पॉवर प्लान्ट इंजिनीअरिंग- या अभ्यासक्रमाचा कालावधी ९ महिने. हा अभ्यासक्रम नांगल कॅम्पसमध्ये करता येतो.

हे अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना- बजाज एनर्जी, एबीबी, ॲबेलान क्लीन एनर्जी, अभिजीत पॉवर, अदानी, मर्क्याडॉस, क्रिसिल, डिलॉइट, जीएमआर, एचसीएल, एस्सार पॉवर, इंडिया बुल्स, सुझलॉन, टाटा पॉवर, केपीएमजी, जिंदाल पॉवर आदी संस्थांमध्ये प्लेसमेंट मिळाली आहे.

## एमबीए इन पॉवर मॅनेजमेंट

या संस्थेने ऊर्जा क्षेत्रातील व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळू शकणाऱ्या मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी, एमबीए इन पॉवर मॅनेजमेंट, हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्हता- कोणत्याही शाखेतील पदवी. (खुला संवर्ग ६० टक्के आणि राखीव संवर्ग ५५ टक्के गुण). अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कॅट, मॅट, झॅट, जी-मॅट, सी-मॅट, सीयूईटी-पीजी या परीक्षांमधील गुण प्राथमिक चाळणीसाठी ग्राह्य धरले जातात. यापैकी कोणतीही परीक्षा न दिलेल्या उमेदवारांना, एनपीटीआय ॲडमिशन टेस्ट, द्यावी लागते. या परीक्षेचा कालावधी ९० मिनिटे. प्रत्येकी एक गुणाचे ९० प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न संख्यात्मक कल (क्वान्टिटेटिव्ह ॲप्टिटयूड), तार्किकता (लॉजिकल रिझनिंग), माहिती विश्लेषण (डाटा इंटरप्रिटेशन) या घटकांवर आधारित असतात. उत्तर चुकल्यास गुण कपात केली जात नाही. या अभ्यासक्रमात ऊर्जा क्षेत्रातील विविध समस्या, शाश्वतता, डाटा ॲनॅलॅटिक्स, डाटा सायन्स, सायबर सेक्युरिटी, क्लाउड मॅनेजमेंट या विषयघटकांवर लक्ष केंद्रित केले जाते. व्यवस्थापकीय सिद्धांत, संकल्पना आणि तांत्रिक ज्ञानाचा प्रभावी वापर करून, समस्या निर्धारणासाठीचे कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त करून दिले जाते.

### काय शिकाल?

दोन वर्षे कालावधीच्या या अभ्यासक्रमात, पहिल्या वर्षी पुढील विषयघटकांचा समावेश करण्यात आला आहे- मनुष्यबळ संसाधने, वित्त आणि लेखा, विपणन, माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा क्षेत्राचे प्रमुख विषय. दुसऱ्या वर्षात मुख्य विषयांसोबत शाश्वतता, डाटा सायन्स, डाटा ॲनॅलिटिक्स, सायबर सेक्युरिटी, क्लाउड हे घटकही अभ्यासता येतात. विद्यार्थ्यांना सहा ते आठ आठवड्यांची इंटर्नशिप करावी लागते. सध्याच्या औद्योगिक आस्थापनांच्या गरजेनुसार एखाद्या प्रकल्पावरही काम करावे लागते.

हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना १०० टक्के प्लेसमेंट मिळाले आहे. प्लेसमेंटसाठी पुढील संस्था येतात- एचसीएल, लँको, क्रिसिल, बीएसईएस, जीएमआर, टाटा पॉवर, पीडब्ल्यूसी, रिलायन्स पॉवर, टॉरेंट पॉवर, हिंदुस्थान पॉवर, सुझलॉन, रिन्यू पॉवर, इन्फोसिस, केपीएमजी इत्यादी.

**संपर्क- डायरेक्टर ट्रेनिंग, नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, एनपीटीआय कॉम्प्लेक्स, सेक्टर ३३, फरिदाबाद १२१००३, संकेतस्थळ- https:// npti. gov. in ईमेल- nptipgadmission@gmail. com आणि ईमेल- mbapm@npti. ac. in**

– सुरेश वांदिले

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



आता गोल्ड वर लोन मिळवण्याची सुवर्णसंधी

@9.25%* द.सा. पासून
अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# उच्च शिक्षणाचे 'प्रवेशद्वार'

**अभियांत्रिकी, तंत्रज्ञान**, विज्ञान, मानव्यशास्त्र यामध्ये अधिकाधिक प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, संशोधनकार्यास वाहून घ्यावे, यासाठी भारत सरकारच्या वतीने सातत्याने प्रयत्न केले जातात. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात, जगात भारत अग्रेसर राहावा, तसेच आत्मनिर्भरही व्हावा, अशी धोरणकर्त्यांची अपेक्षा आहे. अंतराळविज्ञान आणि सागरीविज्ञान क्षेत्रात भारताने केलेली प्रगती विकसित राष्ट्रांच्या तोडीस तोड अशी आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय लष्कराने, प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून, अत्यंत काटेकोरपणे साध्य केलेल्या, निर्धारित उद्दिष्टामुळे, बऱ्याच राष्ट्रांना आश्चर्यचकित केले. चंद्रयान तीनच्या यशस्वी कामगिरीनंतर, भारतीय तरुणांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील उच्च शिक्षण आणि संशोधनामध्ये अधिक रस निर्माण झाल्याचे निरीक्षण, खुद्द पंतप्रधानांनी संसदेत नोंदवले.

विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेतील दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च (आयसर), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स- बेंगळूरु, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग- पुणेसारख्या काही महत्त्वाच्या शासकीय संस्थांमध्ये दिले जाते. या संस्थांमधील प्रवेशासाठी हुशार आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी प्रयत्न करायला हवेत. यातील काही संस्थांनी, मानव्यशास्त्राशी निगडित वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमही सुरू केले आहेत. (उदा- आयआयटी मद्रास - एमए इन डेव्हलपमेंट स्टडी, आयआयटी दिल्ली- एमए इन कल्चर, सोसायटी अ‍ॅण्ड थॉट, इत्यादी)

## गेट परीक्षा

ग्रॅज्युएट अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनीअरिंग- गेट (अभियांत्रिकी स्नातक अभिक्षमता), या परीक्षेद्वारे देशातील उपरोक्त नमूद महत्त्वाच्या संस्थांमधील, अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान/ वास्तुकला या विषयांतील पदव्युत्तर पदवी आणि डॉक्टोरल अभ्यासक्रमांना प्रवेश मिळू शकतो. या अर्थाने या संस्थांमधील प्रवेशासाठी ही परीक्षा, प्रवेशद्वार असल्याचे म्हटल्यास वावगे ठरू नये. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील डॉक्टोरल अभ्यासक्रमांसाठी 'गेट'चे गुण ग्राह्य धरले जातात.

## मिळणारी संधी

(अ) पुढील सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या कंपन्या नियुक्ती प्रकियेत या परीक्षेतील गुणांचा आधार प्राधान्याने घेऊ शकतात इ

(१) भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड- भेल, (२) भारत संचार निगम लिमिटेड - बीएसएनल, (३) कोल इंडिया लिमिटेड- सीआयएल, (४) सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टिम्स, (५) चेनाब व्हॅली पॉवर लिमिटेड, (६) दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन, (७) इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, (८) इंजिनीअर्स इंडिया लिमिटेड, (९) गॅस अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया- गेल, (१०) इंडियन ऑइल कॉर्पोरशन लिमिटेड-आयओसीएल, (११) माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड, (१२) नॅशनल हायवेज अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया, (१३) एनएलसी-इंडिया लिमिटेड, (१४) नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (१५) न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, (१६) नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन- एनटीपीसी, (१७) आइल अ‍ॅण्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन- ओएनजीसी, (१८) पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया- पीजीसीएल, (१९) ग्रिड कंट्रोलर ऑफ इंडिया लिमिटेड, (२१) राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड, (२२) हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड - हाल, (२३) स्टील अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, इत्यादी




(ब) केंद्र सरकारातील, सिनिअर फील्ड ऑफिसर (टेलिकम्युनिकेशन), सिनिअर रिसर्च ऑफिसर (क्रिप्टो), कॅबिनेट सचिवालयात- सिनिअर रिसर्च ऑफिसर (सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), अशी गट अ श्रेणीतील पदे, थेट 'गेट' परीक्षेच्या गुणांवर भरली जातात. भारत सरकारच्या इतर विभागातसुद्धा, 'गेट' गुणांचा विचार नियुक्तीसाठी करू शकतात.

## गेट अर्हता

ज्या विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान/ वास्तुकला/ विज्ञान/ वाणिज्य/ कला या शाखेतील पदवी प्राप्त केली असेल, ते किंवा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षाला असलेले विद्यार्थी, ही परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेसाठी कोणतीही वयोमर्यादा नाही. कला/ वाणिज्य/ विज्ञान शाखा- पदव्युत्तर पदवी किंवा या पदवीच्या शेवटच्या वर्षाला असणारे विदयार्थी.

## गेटमधील पेपर्स

ही परीक्षा संगणकाधारित म्हणजेच कॉम्प्युटर बेस्ड असते. पुढील विषयांमध्ये ही परीक्षा देता येते.

(१) एरोस्पेस इंजिनीअरिंग, (२) अ‍ॅग्रिकल्चरल इंजिनीअरिंग, (३) आर्किटेक्चर अ‍ॅण्ड प्लॅनिंग, (४) डाटा सायन्स अ‍ॅण्ड आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (५) बायोमेडिकल इंजिनीअरिंग, (६) सिव्हिल इंजिनीअरिंग, (७) केमिकल इंजिनीअरिंग, (८) कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, (९) केमिस्ट्री, (१०) इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (११) इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग, (१२) एनव्हिरॉन्मेंटल सायन्स अ‍ॅण्ड इंजिनीअरिंग, (१३) इकॉलॉजी अ‍ॅण्ड इव्होल्युशन, (१४) जिओमॅटिक्स इंजिनीअरिंग, (१५) जिऑलॉजी अ‍ॅण्ड जिओफिजिक्स, (१७) इंस्ट्रुमेंटेशन इंजिनीअरिंग, (१८) मॅथेमॅटिक्स, (१९) मेकॅनिकल इंजिनीअरिंग, (२०) मायनिंग इंजिनीअरिंग, (२१) मेटॅलर्जिकल इंजिनीअरिंग, (२२) नॅव्हल आर्किटेक्चर अ‍ॅण्ड मरिन इंजिनीअरिंग, (२३) पेट्रोलियम इंजिनीअरिंग, (२४) फिजिक्स, (२५) प्रॉडक्शन अ‍ॅण्ड इंडसट्रिअल इंजिनीअरिंग, (२६) स्टॅटिस्टिक्स, (२७) टेक्स्टाइल इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड फायबर सायन्स, (२८) इंजिनीअरिंग सायन्स, (२९) ह्युमॅनिटीज अ‍ॅण्ड सोशल सायन्स, (३०) लाइफ सायन्स

## परीक्षा पद्धती

प्रत्येक पेपरचे गुण १००. निगेटिव्ह मार्किंग आहे. या पेपरमध्ये तीन प्रकारचे प्रश्न विचारले जातात.- (१) मल्टिपल चॉइस -बहुपर्यायी. (एमसीक्यू) - १ किंवा २ गुण. हे प्रश्न वस्तुनिष्ठ पद्धतीचे असतात. दिलेल्या चार पर्यायांमधून एक पर्याय अचूक उत्तराचा असतो. १ गुण असलेल्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे लिहिल्यास एकतृतीयांश गुण कपात केले जातात. २ गुण असलेल्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे लिहिल्यास दोनतृतीयांश गुण कपात केले जातात.

(२) मल्टिपल सिलेक्ट प्रश्न (एमएसक्यू) - सर्व पेपरमध्ये १ किंवा २ गुणांचे प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न वस्तुनिष्ठ पद्धतीचे असतात. उत्तरांमध्ये चार पर्याय असतात. यापैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक उत्तरे बरोबर राहू शकतात. या विभागातील (सेक्शन), प्रश्नांसाठी निगेटिव्ह गुण नाहीत. मात्र, एकापेक्षा अधिक अचूक उत्तरे असताना, एकच उत्तर नमूद केल्यास गुण दिले जात नाहीत. एक चूक आणि एक अचूक उत्तर नमूद केल्यासही गुण दिले जात नाहीत, आणि किंवा (३) संख्यात्मक उत्तर पद्धत- म्हणजे (न्युमरिकल अ‍ॅन्सर्स टाइप- नॅट) प्रश्न - या सेक्शनमधील प्रश्नांना १ किंवा २ गुण असतात. ही उत्तरे संख्यात्मक असतात. यामध्ये कोणतेही पर्याय दिले जात नाहीत. उत्तर अपूर्णांकातसुद्धा राहू शकतात.

विद्यार्थ्यांना एक किंवा दोन विषयांच्या पेपरला बसण्याची संधी दिली जाते. दोन पेपरचा पर्याय दिलेल्या यादीनुसार स्वीकारावा लागतो. मात्र परीक्षा केंद्रांशी निगडित पायाभूत सुविधा आणि उपलब्ध तारखा लक्षात घेऊनच, दोन पेपर्सना बसण्याची संधी दिली जाऊ शकते.

प्रत्येक पेपरमध्ये १०० गुणांचे ६५ प्रश्न विचारले जातात. यापैकी १० प्रश्न हे सामान्य कलचालणी (जनरल अ‍ॅप्टिट्यूड) पद्धतीचे असतात. विद्यार्थ्यांची भाषा आणि विश्लेषण कौशल्याची चाचणी करण्यासाठी या प्रश्नांची रचना केली असते. ८५ टक्के गुण हे परीक्षेसाठी निवडलेल्या विषयावर आधारित असतात. गेट परीक्षा कितीही वेळ देता येते.

अर्ज ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारला जातो. दोन पेपर्ससाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना एकच अर्ज करावा लागता. गेटचे गुण पुढील सलग तीन वर्षांतील प्रवेशासाठी ग्राह्य धरले जातात. (२०२५ मधील गुण हे २०२६, २०२७ आणि २०२८ सालातील प्रवेशासाठी ग्राह्य धरले जातील.)

## परीक्षा केंद्र

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बारामती, चंद्रपूर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नासिक - नवी मुंबई- ठाणे, पनवेल-रायगड, पुणे, रत्नागिरी, संगमनेर- लोणी-शिर्डी, सांगली, सातारा, सोलापूर, वसई-पालघर, वर्धा, यवतमाळ सांगली. यांपैकी कोणत्याही तीन केंद्रांचा पर्याय विद्यार्थी देऊ शकतात.

## वित्तीय सहाय्य

गेट गुणांच्या आधारावर, शासकीय किंवा शासन अनुदानित संस्थेत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. एम. टेक अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना दरमहा १२,४०० रुपयांचे विद्यावेतन २२ महिन्यांसाठी दिले जाते. बीई/ बीटेक/ एमएस्सीनंतर थेट पीएचडीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या दोन वर्षांसाठी दरमहा ३७ हजार रुपये आणि पुढील तीन वर्षांसाठी दरमहा ४२ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. (ऑगस्ट २०२५ मध्ये, गेट- २०२६ परीक्षेची, अर्ज भरण्याची प्रकिया सुरू होईल याची सूचना, देशातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीच्या माध्यमातून दिली जाते.)

**- सुरेश वांदिले**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत



करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी
ऑटो लोन संगे
व्याजदर 8.25%* द.सा. पासून

*अटी लागू

S. M. D. M. MAHAVIDYALAYA Library KALLAM- 413507

# हाच (खरा) मार्ग यशाचा !

**गेल्या दोन** महिन्यांत, संघ लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षा, नॅशनल डिफेन्स अ‍ॅकॅडेमी (एनडीए) परीक्षा, चार्टर्ड अकाउंट (सीए) अंतिम परीक्षा, जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन- मेन आणि अ‍ॅडव्हान्स्ड, महाराष्ट्र बोर्डासह इतर वेगवेगळ्या बोर्डांच्या १२ वींच्या आणि १० वीच्या परीक्षांचा निकाल लागला. या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थी-विद्यार्थिनीनी उत्कृष्ट कामगिरी केली, त्यापैकी बऱ्याच जणांच्या छोटेखानी मुलाखती किंवा मनोगत वृत्तपत्रादी वेगवेगळ्या माध्यमांमधून प्रकाशित झाले. या सगळ्याच मुलाखती किंवा मनोगत हे, ''मार्ग यशाचा'' दाखवणाऱ्या आहेत. या, यशवंत आणि गुणवंतांनी दाखवलेल्या मार्गाने, जे जे विद्यार्थी प्रामाणिकपणे जातील, त्यांना, ते कोणत्याही ज्ञानशाखेत शिकत असतील, कोणत्याही महाविद्यालयात असतील, निराश होण्याची गरज नाही. कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर, ते यशाला गवसणी घालतील किंवा यशश्री त्यांच्या पायाची दासी बनेल.

**वेगवेगळ्या राष्ट्रीय स्तरावरील आणि राज्यस्तरीय परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंतांच्या मनोगतांच्या विश्लेषणातू . पुढील काही बाबी लक्षात येतात–**

(१) या सर्वच विद्यार्थ्यांनी, अभ्यासासाठी कोणताही शार्टकट (जवळचा सुलभ मार्ग) वापरला नाही. परीक्षेसाठी, जे जे विषयघटक असतील, त्यापैकी हा महत्वाचा, तो बिनमहत्त्वाचा असा दुजाभाव न करता, सर्वांना समान न्याय दिला. याचा अर्थ कोणत्याही घटकाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही.

(२) जिथे जिथे संकल्पना समजून घेण्याची गरज असेल, त्या संकल्पना स्वयंस्पष्टपणे समजून घेतल्या. त्यानंतरच पुढचा अभ्यास केला.

(३) आपली आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, भवताल किंवा इतर कथित वैगुण्याचा कोणताही परिणाम अभ्यासावर होऊ दिला नाही. स्वतःचे लक्ष विचलित होऊ दिले नाही. त्यामुळे महागडे शिकवणी वर्ग न लावताही, त्यांना यश मिळवता आले.

(४) ज्या विद्यार्थ्यांनी महागडे शिकवणी वर्ग लावले, त्यांनी शिकवणी वर्गातील नोट्स वा इतर साहित्यासोबतच, बोर्डाने किंवा परीक्षा मंडळाने ठरवून दिलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमाचे मुळातून अध्ययन केले.

(५) या विद्यार्थ्यांकडे इतर विविध माध्यमातून उपलब्ध झालेले रेडिमेड अभ्यास साहित्य असतानाही, त्यांनी, शक्य होईल तितक्या स्वतःच्या नोट्स तयार केल्या.

(६) या विद्यार्थ्यांपैकी काहींनी संपूर्णपणे मोबाइल व इतर गॅजेट्सना प्रयत्नपूर्वक दूर ठेवले तर काहींनी या गॅजेट्सचा उपयोग अभ्यासासाठी कसा करता येईल, याचा हुशारीने विचार करून मर्यादित स्वरूपात वापर केला.

(७) या विद्यार्थ्यांनी, अभ्यासक्रम आणि परीक्षेच्या संपूर्ण कालावधीत पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि योग्य आहार या सूत्रांचा अंगीकार केला.

(८) विशिष्ट प्रकारची शिस्त अंगी बाणवून, अभ्यासक्रमासह इतर दैनंदिन गोष्टींसाठी वेळापत्रक तयार केले. त्या वेळापत्रकानुसार या साऱ्या गोष्टी घडत राहतील, याची काटेकोर काळजी घेतली.

(९) राष्ट्रीय स्तरांवरील परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी, वेगवेगळ्या प्रश्नपत्रिकांचा सराव, नियमितपणे व पारदर्शकपणे केला. या सराव परीक्षेत येणाऱ्या अडचणी व त्रुटी समजून घेतल्या. स्वतःच्या कमकुवत बाबी समजून घेतल्या. या त्रुटी दूर करण्यावर लक्ष केंद्रित केले.

(१०) इतरांची अभ्यासपद्धती, इतरांकडे असलेली साधने वा त्यांना मिळत असलेले, महागड्या शिकवणीसारख्या मार्गाने होणारे मार्गदर्शन, या घटकांचा, स्वतःशी तुलना करण्याचा मोह टाळला.

(११) या काळात स्वतःवरचा आत्मविश्वास अजिबात ढळू दिला नाही. परिपूर्ण अभ्यास केल्यानेच, उत्तम यश मिळवू ही खात्री या सर्वच विद्यार्थ्यांना होती.

(१२) प्रत्यक्ष परीक्षेच्या दोन-तीन दिवस आधी, या विद्यार्थ्यांनी अजिबात तणाव घेतला नाही. तणावरहित मनाने ते परीक्षा केंद्रांवर गेले आणि त्यांनी पेपर सोडवले.

(१३) या यशस्वी विद्यार्थ्यांनी पाठांतरावर अजिबात भर दिलेला नाही. पाठांतराने अभ्यासाचा पाया पक्का होत नाही, सर्वंकष तयारी होत नाही. हे या विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्याने, ते या मोहाला बळी पडले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षेमध्ये कशाही रीतीने किंवा पद्धतीने प्रश्न विचारले गेल्यास, त्यांना सोडवणे कठीण गेले नाही.

(१४) बऱ्याच विद्यार्थ्यांनी, अभ्यास एके अभ्यास, असे न करता, आपल्या आवडत्या छंदांना जोपासण्यासाठीही वेळ काढला. यामुळे अभ्यास आणि परीक्षेचा ताण कमी करण्यास त्यांना साहाय्यच झाले.




उपरोक्त सर्वच बाबी सोप्या, सहज आणि सुलभ अशा आहेत. त्या कोणत्याही विद्यार्थ्याला अंगीकारणे जरासुद्धा कठीण जाऊ नये. मात्र, त्यासाठी इच्छाशक्ती हवी. पारदर्शकपणा हवा. स्वतःच्या प्रयत्नांकडे, वस्तुनिष्ठपणे बघायला हवे. सर्वच परीक्षांसाठी विद्यार्थ्यांध्ये तीव्र स्पर्धा आणि चुरस असते. ही बाब कायम लक्षात ठेऊनच, 'आजचा अभ्यास आज', हे सूत्र अंगीकारले पाहिजे. त्यासाठी, टाळाटाळ, उद्या बघू किंवा मॅनेज करू, एक दिवस रिलॅक्स राहिल्याने काय बिघडेल? मित्रांसोबत थोड्याफार टवाळकीसाठी वेळ काढू, आईबाबांचे लक्ष नाही, हे बघून हळूच नेटफ्लिक्समध्ये डोकावू, असे जर घडत असेल तर, इच्छाशक्तीची कमतरता आहे, हे नक्कीच समजावे.

प्रत्येक विद्यार्थ्याची बौद्धिक कुवत, विविध विषयघटक समजून घेण्यासाठीची आकलन क्षमता वेगवेगळी असणे, स्वाभाविकच आहे. कुणाला एकदोनदा वाचले तरी समजून जाते किंवा लक्षात राहते. काहींना, त्यासाठी चारपाच वेळा वाचावे लागते. यात काही गैर नाही. त्यामुळेच, स्वतःची आकलनक्षमता लक्षात घेऊन, अभ्यासाला वेळ देणे गरजेचे ठरते. एखादा विद्यार्थी, जो अभ्यास पाच तासात पूर्ण करत असेल तो, पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या विद्यार्थ्याला सात तास लागू शकतो. ही बाब लक्षात ठेऊन, संबंधित विद्यार्थ्याने, स्वतःच्या वेळेचा काटेकोर हिशेब ठेवला पाहिजे. त्यासाठी प्रामाणिकपणा हवा. नाहीतर, ती स्वतःची फसवणूक ठरेल. अशा स्वफसवणुकीतून अपयशाच्या खोल दरीत स्वतःच ढकलले जातो, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे.

या काळात पालकांनीसुद्धा त्यांच्यावरच सगळ्या जगाचे ओझे असल्यासाखे वागू नये. विद्यार्थ्याच्या अवतीभवती सतत राहिल्याने त्याला प्रोत्साहन आणि उत्साहाची ऊर्जा मिळण्याऐवजी, तो दडपण आणि तणावाखाली जाऊ शकतो. ही बाब लक्षात ठेवायला हवी. ''मुलाच्या अभ्यासासाठी सुटी घेतली किंवा रजा टाकली, आम्ही अवतीभवती असू तरच तो व्यवस्थित अभ्यास करेल, नाहीतर इकडेतिकडे भरकटेल,'' असे बऱ्याच पालकांना वाटते. हा आपल्याच मुलावर अविश्वास दाखवण्यासारखे झाले. या काळात विद्यार्थ्याला मनःपूर्वक पाठिंब्याची, प्रेमाची गरज असते. त्याच्या आत्मविश्वासाला कोणत्याही कारणाने का होईना, तडे जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची गरज असते. त्याच्या अभ्यासात लुडबुड करून किंवा सतत त्याच्या अवतीभवती राहून, हे काही साध्य व्हायचे नाही. आजचे विद्यार्थी अपवाद वगळता, सुज्ञ आणि समंजसच असतात. असलेली तीव्र किंवा जीवघेणी स्पर्धा, परीक्षेची काठिण्यपातळी याची योग्य ती समज आणि ज्ञान त्यांना असते. त्यामुळे त्याला सतत त्याबद्दल जाणीव करून देणे किंवा टोकत राहणे, यामुळे त्याचे मनोधैर्य आणि मनोबल कमी होऊ शकते.

या लेखमालेच्या पहिल्या लेखात, करिअर घडवणे ही आनंददायी प्रकिया असल्याचे नमूद केले होते. हा आनंद, प्रत्येक विद्यार्थ्याला आणि पालकालाही घेता येणे शक्य आहे. त्यासाठी दोघांनींही आपल्यामध्ये किंचित बदल केला आणि त्याप्रमाणे वाटचाल केल्यास अडचणींचा कथित डोंगर पार करता येऊ शकतो किंबहुना अडचणींशिवाय, मार्ग यशाचा दिसू शकतो.

## निरोप घेण्यापूर्वी

मार्ग यशाचा, या सदरात गेल्या दोन महिन्यांत २०० च्यावर वेगवेगळ्या ज्ञानशाखांच्या अभ्यासक्रमांची माहिती करून दिली. हे अभ्यासक्रम कोणत्याही विद्याशाखेतील विद्यार्थ्याला करता येतात. या अभ्यासक्रमांमुळे वेगवेगळ्या प्रकारच्या तंत्र आणि कौशल्य विकासास साहाय्य होते. अशा कौशल्यातूनच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या दिशा, वाटा आणि वळणेसुद्धा स्पष्टपणे दिसू लागतात. आजच्या काळात कौशल्य मिळवणे (स्किलिंग), ते सतत उन्नत करणे (अपस्किलिंग), आणि नवी कौशल्ये (रिस्किलिंग) मिळवत राहणे, याला पर्याय नाही. कोणतेही क्षेत्र निवडले तरी, ते याला अपवाद नाही. प्लेसमेंटसाठी येणारे निवडकर्ते, यावर बारकाईने लक्ष ठेवतात. विद्यापीठीय परीक्षेतील गुणांपेक्षा तुमच्याकडे असलेले कौशल्य, त्याचा प्रभावीपणे वापर करण्याचा आत्मविश्वास आणि अथक परिश्रम या त्रिसूत्रीवर कोणत्याही करिअरमध्ये यश मिळवता येते आणि हे यश टिकवतासुद्धा येते.

**–सुरेश वांदिले**

(समाप्त)